अभिनव भारत

अथवा

सावरकरांची क्रांतिकारक गुप्त संस्था




अभिनव भारत

अथवा

सावरकरांची क्रांतिकारक गुप्त संस्था

लेखक

डॉ. विष्णू महादेव भट,

बी. अे., अेम्. बी. बी. अेस्., येवलें

प्रकाशन-क्रमांक ३९

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४

मूल्य चार रुपये

लेखक

डॉ. विष्णू महादेव भट

बी.ए.एम्. बी.बी.एस्., येवले

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४

www.savarkar.org

प्रकाशक

ग. पां. परचुरे,

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर,

गोरेगांवकर चाळ, क्रमांक २,

गिरगांव, मुंबई ४.

- **प्रथमावृत्ति १९५०**

मुद्रकः

श्री. आ. रा. भट

५६८, नारायण पेठ,

केसरी मुद्रणालय, पुणे २.

प्रस्तावना

राज्यक्रांतिकारक गुप्त संस्थांचे इतिहास क्वचितच लिहीले जातात. त्यांच्या गुप्ततेमुळे, त्यांच्या इतिहासाची साधने जतन करून ठेवणे धोक्याचे असते. कारण जर ती सापडली तर ज्या राज्यसत्तेविरुद्ध त्या संस्था क्रांति करू इच्छित असतात तिच्या हातात या साधनांचा पुरावा आयताच मिळून, अशा संस्था नामशेष करणे, सत्ताधिशांना शक्य असते. अभिनव भारत या सावरकरांनी इंग्रजी राज्य उलथून पाडण्याकरिता स्थापलेल्या गुप्त संस्थेचा इतिहास लिहीणे या कारणानेच दुष्कर झाले आहे. या संस्थेबद्दल जी काही हस्तलिखित साधने क्वचित् होती ती आम्ही, आपल्या हाताने, वरील कारणांकरिताच नष्ट केली, आणि काही सरकार-जमा झाली. त्यामुळे आता, त्या संस्थेचे जे काही थोडे सभासद आज हयात आहेत त्यांच्या माहितीवरच विसंबून, जी काही पुटपुंजी साधने मिळाली ती जमेस धरून, मी हा प्रयत्न केला आहे. उपर्युक्त कारणांनी तो पुष्कळच अपुरा आहे हे सांगणे नकोच.

साधनांच्या अपूर्णतेची आणखीही दोन कारणे आहेत. राज्यक्रांति ही काही लौकर साध्य होणारी गोष्ट नाही. त्यातूनही हिंदुस्थानांत सशस्त्र व प्रबल इंग्रजी साम्राज्याला, त्यांनी हेतूपुर:स्सर नि:शस्त्र केलेल्या प्रजेने, सशस्त्र क्रांति करून सुरूग लावणे हे तर महादुर्घट काम होते. किंबहुना सशस्त्र व प्रचंड राजसत्तेला नि:शस्त्र प्रजेने राज्यक्रांति करून उखडल्याचे हिंदुस्थान हे, आजपर्यंतच्या इतिहासात, एकच उदाहरण आहे. पण ही अघटित घटना घडून यावयाला ९० वर्षे - १८५७ ते १९४७ पर्यंत – लागली. अर्थात् त्यांत निदान तीन तरुण पिढ्या खर्ची पडल्या. या एवढ्या प्रदीर्घ काळांत, पहील्याच काय पण दुसऱ्याही पिढीतली क्रांतिकारक माणसें जिवंत राहणे प्राय: अशक्यच. आणि माणसाच्या सामान्य आयुर्मर्यादेमुळे मागच्या १ल्या पिढीतले तर कोणी जिवंत राहीलेच नाहीत, पण आमच्या पिढीतलेही आम्ही फारच थोडे विद्यमान आहोंत. त्यामुळें या ९०वर्षांचा इतिहास संपूर्णतया लिहीणे, या दोन पिढ्यांतले पुष्कळसे क्रांतिकारक दिवंगत झाल्याने, आणि त्यांच्याबरोबरच त्यांची माहितीही नष्ट झाल्याने, शक्य नाही. त्यातूनही आम्ही जे काही थोडे अवशिष्ट राहीलो आहो त्यांची, ६० नंतरच्या वयोमानाप्रमाणे, स्मृति पूर्वीइतकी तीव्र राहीली नाही. त्यामुळे बराचसा इतिहास विस्मृतीच्या सागरांत लुप्त होऊन गेलेला आहे. स्मरणशक्तीच्या या वठत चाललेल्या वृक्षास जी काही पालवी शिल्लक आहे, तिलाच टवटवीत करून, तिला लागलेलीं पुष्पें खुडून, ही माळ मी तयार केली आहे. ती भरगच्च असती तर तिचा सुगंध व तिचे स्वरूप अधिक मोहक झाले असते. पण ते तसे असणे शक्य कां नाही याची कारणे वर दिलीच आहेत.

साधनांच्या अपूर्णतेचे तिसरे कारण म्हणजे अभिनव भारताला सोसावा लागलेला पराजय हे आहे. आणि मनुष्यस्वभावच असा आहे की, तो विजयी वीरांचे पोवाडे गातो, पराजितांचे नाही. कुस्तीत पडलेल्या माणसाला शेलापागोटे कोणी बांधत नाही. पण जाणते तज्ज्ञ असतात त्यांना पराजितांतही गुण दिसतात, आणि ते पडलेल्या मल्लालाही अल्पसें पारितोषिक देतात. राज्यक्रांतीच्या चिरकालीन युद्धांत यश हे अखेरच्या प्रयत्नाला मिळते. त्याच्या पूर्वीचे सर्व प्रयत्न, सर्व बंडें, सर्व चकमकी, सर्व उठावण्या यांच्या वांट्याला अपयशच आलेले असते. पण या अपयशी बंडांनीं, चकमकींनी, उठावांनी क्रांतीची ज्वाला धगधगलेली, भडकलेली, राहते.

स्वातंत्र्यलालसेचा नंदादीप सारखा तेवत ठेवण्याला या सर्व प्रयत्नांचे तेल एकसारखे घालावेच लागते. आणि या दृष्टीने तरी त्यांचे महत्त्व इतिहासाला मान्य असते. म्हणून या १८५७ प्रमाणे पराजित बंडांचा इतिहासही लोकांना आदरणीयच वाटतो. एतदर्थ या पराजयाचा इतिहास शक्य तितका ग्रथित करून ठेवणे, हे एक राष्ट्रेतिहासाचें साधनच आहे. ते साधन पुरेसे हाती यावे म्हणून मी माझ्या सहकाऱ्यांना विनंत्या केल्या, पत्रें लिहीलीं, वृत्तपत्रांतूनही माहिती मागवली. पण आमच्या पराजयाने निराश झालेल्या कित्येकांनी ती पाठवली नाही, याचें मला वाईट वाटते.

पण त्यांनी लिहीली नाही म्हणून आपणही ती लिहूं नये हे मला प्रशस्त वाटेना. माझी कल्पना अशी होती की, सावरकरच हे काम हातीं घेतील. अभिनव भारत हा त्यांचाच मानसपुत्र. त्याच्या पराक्रमाचे, त्यागाचे, धैर्यशौर्यादिकाचे खरे कौतुक त्यांनाच अधिक. म्हणून तो जरी अल्पायुषी ठरला तरी त्याचे गुणवर्णन त्यांनीच जितके सहृदयतेने केले असते, आणि त्यांच्या उपजत काव्य-प्रतिभेने ते जसे मोहक व भव्य मनोहर झाले असते, तसे व तितके माझ्याने होणार नाही. म्हणून मी त्यांनाच त्याबद्दल वारंवार लिहीले. 'त्यांचे आत्मचरित्र' प्रसिद्ध झाल्यावर माझी आशा द्विगुणित झाली. पण शेवटी त्यांच्या प्रकृतीनें त्यांच्या हातून ते होईलसे दिसेना. म्हणून त्यांनी उलट मलाच गळ घातली की, 'बाबा गेले, बाळही गेला, मीही दुर्बल झालो, तूंच ते पुरे अपुरे कसे होईल तसे लिहून काढ.' त्यांच्याप्रमाणेच माझ्या इतर स्नेह्यांनींही मला लकडा लावला की, मीच ते पुरे करावे. म्हणून मी ते काम १९४८च्या प्रारंभी हाती घेतले. इतक्यांत गांधीजींच्या वधानंतर झालेली कॉंग्रेस गुंडांची हुल्लड मलाही भोवलीं; ८ दिवस तुरुंगवासही झाला. त्यामुळें मी मोठ्या प्रयासाने मिळवलेली तुटपुंजी साधने, आणि लिहीलेला मजुकूरही मला मित्रांच्या सहाय्याने दडवून ठेवावा लागला. सावरकरांवरही सरकारने खुनशीपणाने खटला चालवला. त्यामुळे गोडसे खटल्याचा निकाल लागेपर्यंत हे काम मला स्थगित करावे लागले. सावरकर त्यांत निर्दोषी ठरून सुटून आल्यावर मग पाहतों तो लिहीलेली २ प्रकरणे व माझ्या सहकाऱ्यांच्या माहितीची काही पत्रें, या गडबडीत गहाळ झालेली. म्हणून मला ती प्रकरणे पुन्हां लिहावी लागली. असा हा द्राविडी प्राणायाम झाला. पण तो एकदां करावयाचाच असे ठरवून तो आज पुरा केला आहे. मला जेवढी माहिती होती ती यांत संक्षेपानें आढळेल. सावरकर विलायतेत होते तोंपर्यंतचा इतिहास अर्थात् त्यांनाच माझ्यापेक्षां अधिक माहीत असणार. म्हणून त्यांना तो तरी लिहून पाठवा म्हणून लिहीले. पण ते वरील कारणांनी, आणि प्रकृतीच्या अस्वास्थ्याने, लिहू शकले नाहीत. म्हणून सेनापति बापटांना तो लिहून पाठवण्यास विनंती केली. आणि सावरकरांचे त्यावेळचे इतर सहकारी मद्रासचे मंत्री डॉ. राजन्, आफ्रिकेतील बॅ. पाथर, मुंबईचे डॉ. एरुळकर यांनाही विनंतिपत्रें पाठवली. पण फक्त बापटांनींच थोडीशी माहिती पाठवली. बाकीच्यांची उत्तरेही आली नाहीत. त्यामुळे विलायतेत, व इतरत्र ज्या क्रांतिकारक खटपटी सावरकरांनीं केल्या त्यापैकी थोडीशीच माहिती मी येथे देऊ शकलों. सावरकरच जर ती लिहीतील तरच ती पूर्णपणें इतिहासांत जमा होईल.

'मुहुर्तं ज्वलितं श्रेयोन च धूमायितं चिरं' या सुभाषिताला अनुसरून, अभिनव भारताची कारकीर्द जरी १०च वर्षांची असली तरी त्याने प्रचलित केलेले सशस्त्र राज्यक्रांतिचे नाणे पुढे बरीच वर्षे तरुणांच्या व्यवहारांत होते. स्वातंत्र्यकवि गोविंद यांची काव्यें जशीं राज्यक्रांतिकारक तरुण गुणगुणत, तसे अभिनव भारताचे नाणेही त्यांच्या एकमेकांच्या देवघेवींत असे. आणि ते, किंवा

त्याच किमतीचे व जातीचे, नाणे नेताजी सुभाषचंद्रांच्या सैन्यांतही खुळखुळत होते. हिंदुस्थानांतली राज्यक्रांति ही सशस्त्र किंवा नि:शस्त्र साधनांनी घडून आली, हा वादाचा प्रश्न आपण सोडून देऊं. दोन्ही तऱ्हेच्या साधनांनी ती घडली, हा समन्वयच स्वातंत्र्याचा इतिहास मान्य करील. त्या प्रश्नांतर्गत अहिंसेचा ऊहापोह पुढे एका प्रकरणांत मी केला आहे. म्हणून येथे त्याती द्विरुक्ति करीत नाही. पण या समन्वयांत, सशस्त्र साधनांचा जो भाग आहे त्यांत, अभिनव भारताचा अंश थोडा तरी आहे हे खचित. आणि त्याची तत्त्वप्रणालीच पुढे आजही चालत आहे, हे हैड्रोजन बॉम्बची जी तयारी राष्ट्राराष्ट्रांत चालली आहे तिच्यावरून सिद्ध होत आहे. अहिंसा हा परम धर्म खरा. पण तो धर्म मानणारे दोन विरोधी पक्ष असतील तरच त्याला यश आहे. तसे धर्मप्रवण लोक जगांत नाहीत, तोंवर सशस्त्र साधनांवरच विसंबणे भाग आहे.

क्रांतिवीर बाबा आणि स्वातंत्र्यवीर विनायकराव सावरकर यांची जी चरित्रे माझे मित्र रा. गोखले व करंदीकर यांनी लिहीली आहेत त्यांत, व विशेषतः सावरकरांच्या 'आत्मचरित्रांत', अभिनव भारताच्या कार्याबद्दल बरीच माहिती आलेली आहे. त्यांत मीही काहीशी पुरवली होती. म्हणून या ग्रंथांत त्याची काहीशीं पुनरुक्ती आढळेल. पण ती शक्य तितकी कमी करून, त्यांत न आलेली, पण खरी महत्त्वाची माहिती, म्हणजे अभिनव भारताखेरीज दुसऱ्या गुप्त संस्था, शस्त्रास्त्रांची सिद्धता, बॉम्बचे कारखाने, ज्याक्सन वधाचा कट, खटल्यांतली अंतस्थ माहिती वगैरे यांत दिलेली आहे. यांपैकी पुष्कळशा गोष्टी गोखले किंवा करंदीकरांना प्रसिद्ध करणे शक्य नव्हते. हिंदुस्थान आता स्वतंत्र झाला असल्याने त्या प्रसिद्ध करण्यास हरकत नाही. त्यापैकी अभिनव भारताच्या बॉम्बच्या कारखान्यांबद्दल माझे मित्र, आणि अभिनव भारताचे जुने सभासद, रा. रामभाऊ भाटे यांनी पुष्कळच गोष्टी अगदी नव्यानेंच उजेडात आणल्या. ते आणि त्यांचे सहकारी ह्यांच्याशिवाय त्या कोणासही माहीत नव्हत्या. म्हणून त्यांचे महत्त्व विशेष आहे.

त्यांतही आम्ही आमच्या खटल्यांत गायडरचे उजवे हात असलेले पोलीस इन्स्पेक्टर सदावर्ते यांस फितवून, बॉम्बच्या कारखान्याबद्दल एक अवाक्षरही पोलिसांपुढें, आणि म्हणून आमच्यावरील खटल्यांत, कसे येऊं दिले नाही, आणि त्यामुळें त्या बॉम्बच्या कारखान्यांतले आमचे अभिनव भारताचे सभासद कसे अजिबात सरकारच्या तावडींतून निसटले, आणि म्हणून रा. भाटे नुसते सुरक्षित राहीले इतकेच नव्हें, तर इंग्रज सरकारच्याच नोकरींत शिरून सुखानें आज कसे निवृत्तीवेतन खात आहेत, याची सत्यकथा प्रथमच आज उजेडांत येत आहे. कल्पित कादंबरीसारखी ती आश्चर्यकारक, मनोरंजक, तशीच उद्बोधकही वाटेल आणि आमच्या कार्याच्या व्यापाचीही कल्पना त्याने स्पष्टपणे येईल. शिवाय त्या बॉम्बच्या कारखान्यांत गुप्तपणे कार्य करणाऱ्यांचें समाधानही होईल. रा. भाटे यांनी जी माहिती दिली ती त्यांच्याच शब्दांत दिली आहे. त्यांच्या उपकारांचें ऋण मी कसे फेडूं? वाईट इतकेंच वाटते की, हे प्रकरण भाट्यांचें बॉम्बच्या कलेतले गुरु रा. कृष्णाजी गोपाळ खरे, वकील यांना, मी रा. डावरे यांच्या मार्फत, वारंवार विनंती केली असतांही, त्यांनी ते लिहीले नाही. त्यांनी ते लिहीले असते तर अधिक स्पष्ट व भव्य ते झाले असते.

असो. ज्या माझ्या मित्रांनी मला बरीच माहिती देऊन उपकृत केले त्यांची नांवे योग्य त्या ठिकाणीं मी दिलीच आहेत. त्याबद्दल त्यांचे प्रसिद्धपणे आभार मानणे माझें कर्तव्य आहे.

तसेच रा. गोखले व करंदीकर यांनी लिहीलेल्या चरित्रांचा मी थोडासा उपयोग केला असल्याने त्यांचेही आभार मानतो. सावरकरांसारख्या अलौकिक क्रांतिवीरांची चरित्रे त्यांनी प्रथमच प्रसिद्ध करून जनतेला त्यांचे कार्य व त्यांचे महत्त्व पटवून दिले. या ग्रंथांत त्या चरित्रांत नसलेला भाग प्रसिद्ध होत असल्यानें अभिनव भारताचें कार्य व माहात्म्य प्रथमच काहीसे जनतेला समजेल, अशी आशा आहे.

तुरुंगांत व सुटकेनंतर जे आमचे हाल पोलिसांनी व अधिकाऱ्यांनी केले त्याबद्दलची माहिती, प्रकाशक रा. परचुरे व विश्वासराव सावरकरांच्या आग्रहावरून, त्रोटक रूपानें १ल्या परिशिष्टांत दिली आहे. न्यायदानांत खास न्यायालयानें कशा कायद्याच्या कसरती केल्या तेवढ्यापुरतीच माहिती २ऱ्या परिशिष्टांत घातली आहे. कोल्हापूर प्रकरणाची माहिती १९४८पासून मी मागत होतो, ती माझे मित्र गंगाधरपंत गोखले यांनी नुकतीच पुरवली म्हणून तिचे ३रें परिशिष्ट केले आहे. हस्तलिखिते पाहून माझे मित्र व सहकारी रा. कृ. गो. खरे, विश्वासराव डावरे, वामनराव जोशी, गोपाळराव धारप व कोल्हापूर केसमधले रा. गोविंदराव बापट यांनी ज्या सूचना केल्या त्याप्रमाणें दुरुस्त्या, शक्य तेथे, केल्या आहेत. कोल्हापूर प्रकरणावरूनही लो. टिळक व गंगाधरराव देशपांडे यांचे क्रांतिकारकांशी किती दृढ संबंध होते हे वाचकांच्या लक्षांत येईल. रा. गंगाधरपंत गोखल्यांचे त्याबद्दल मी आभार मानतों. ग्वाल्हेरच्या कटाची हकीकत लिहून धाडावी म्हणून प्रा. डॉ. हरी रामचंद्र दिवेकर यांना मी वारंवार विनंत्या केल्या. पण त्यांनी ती पाठवली नाही याबद्दल खेद होतो. ती आली असती तर कोल्हापूर, ग्वाल्हेर, नासिक, सातारा येथल्या उघडकीस आलेल्या सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नांची संगतवार हकीकत पुरी मिळाली असती. पण ग्वाल्हेरचें गालबोट राहीलेंच.

अभिनव भारताचे बरेचसे सभासद आतां दिवंगत झाले आहेत. त्यांना, व ज्यांनी आमच्याबरोबर देहदंड व सर्वस्व हानि आनंदाने पत्करली त्या आमच्या विद्यमान ज्ञाताज्ञात सहकाऱ्यांना, कृतज्ञतेनें शतशः अभिवादन करून ही प्रस्तावना संपवतो.

अक्षय तृतीया

शके १८७२

येवलें

विष्णू महोव भट

अनुक्रमणिका

प्रस्तावना ३

१ अभिनव भारताची पार्श्वभूमि १४

१.१ टिळकांची पिढी व क्रांतीची स्फूर्ति १४

१.२ महाराष्ट्राला क्रांतीचा अग्रमान १५

१.३ क्रांतीची स्मरणी १६

२ महाराष्ट्रांतल्या गुप्त संघटना व त्यांचे कार्य १९

२.१ नाशिकचा मित्रमेळा - अभिनव भारत १९

२.२ प्रतिकूल परिस्थिति २०

२.३ गुप्त-प्रकट-विरोधी कार्ये २१

२.४ सुशिक्षितांत प्रक्षोभ २२

२.५ तरुण क्रांतिकारकांचा संग्रह व शिक्षण २२

२.६ अभिनव भारतांतील प्रसिद्ध व्यक्ति २३

२.७ मरावें परी किर्तिरूपें नुरावें ! २४

२.८ मित्रमेळ्याची प्रगति २५

२.९ इंग्रजांची नोकरी, नव्हे नाकेबंदी व हेरगिरी २५

२.१० मित्रमेळ्याचें प्रचारकार्य २६

२.११ मित्रसमाज २७

२.१२ मुख्य प्रकट कार्ये २८

२.१३ वार्षिक वा अर्धवार्षिक बैठकी-संमेलने २९

२.१४ मित्रमेळ्याचे 'अभिनव भारत' झाले २९

२.१५ मित्रमेळ्याची प्रकाशने ३०

२.१६ गोविंद-काव्य ३१

२.१७ समान गुप्त संस्था आणि त्यांचे संघराज्य ३३

२.१८ इतर प्रांत मंद व थंड ३५

३ पुण्यातून क्रांतिकार्याचा महाराष्ट्रभर प्रसार ३६

३.१ पुण्यांतल्या मित्रमेळ्याच्या शाखा ३६

३.२ ट्रेनिंग कॉलेजांतील शाखा ३७

३.३ डेक्कन कॉलेजांतला प्रसार ३७
३.४ विलायती कपड्यांची चिता ३८
३.५ सावरकर-जोगळेकरांची हद्दपारी ३८
३.६ इतर कार्यें ३९
३.७ सिंहगडावरील सफर ४०
३.८ बृहन्महाराष्ट्रभर क्रांतिकारकांचा प्रसार ४०
४ मुंबईतल्या प्रकट व गुप्त चळवळी ४२
४.१ माधवाश्रमांतला आमचा अड्डा ४२
४.२ बंगाली क्रांतिकारकांशी नाते जुळवले ४३
४.३ मुंबईंतला गुप्त प्रचार ४४
४.४ देशभर एकदम उठावणीची योजना ४५
५ अभिनव भारताचे विलायतेतले कार्य ४६
६ अभिनव भारताची शस्त्रास्त्र-सिद्धता ४८
६.१ बौद्धिक व सैनिकी शिक्षण ४८
६.२ दरिद्रीनारायणांचा त्याग ४९
६.३ द्रव्यासाठीं वक्र उपाय ५१
६.४ शस्त्रास्त्रांची जमवाजमव ५१
६.५ सावरकरांनीं पाठविलेलीं पिस्तुलें ५२
६.६ पिस्तुलांची रवानगी व प्रसार ५४
६.७ हुतात्मा कर्व्यांचा संबंध ५४
६.८ कर्व्यांची व माझी योजना व आणाभाका ५५
७ अभिनव भारताचे बॉम्बस्चे कारखाने ५८
७.१ बॉम्बचे पॅरिस येथे प्रयोग ५८
७.२ आमचे स्फोटकास्त्रतज्ज्ञ खरे गुरुजी ५९
७.३ स्फोटकास्त्रविद्येतले अनेक शिष्य ६१
७.४ बॉम्बकर्ते रामभाऊ भाट्यांच्या स्मृति ६२
७.५ वसईची शाखा ६३
७.६ विद्यार्थ्यांचीं नांवें :- ६४
७.७ बॉम्ब तयार करण्याचा निश्चय व योजना ६४

७.८ बॉम्ब करण्याचे प्रयोग ६५
७.९ प्राणसंकट........ ६५
७.१० जर्मन कंपन्यांची सहानुभूति........ ६६
७.११ पहीला बॉम्ब उडवण्याचा फसलेला प्रयोग ६६
७.१२ यशस्वी प्रयोग ६७
७.१३ ग्रामकंटकांच्या चांभारचौकशा ६८
७.१४ वसईकरांची मदत ६९
७.१५ गुप्त अंक-लिपी........ ७०
७.१६ ज्याक्सनचा वध व निरवानिरव........ ७१
७.१७ समद्रास्तृप्यंतु । ७४
७.१८ बॉम्बचे कारखानदार सरकारी नोकर झाले! ७४
७.१९ दैवानें खैर केली........ ७५
७.२० नियमच भोंवला ७६
७.२१ पाटणकरांना पडलेला भयंकर पेचप्रसंग........ ७६
७.२२ पाटणकरांनी मला गोंवले ७८
७.२३ पोलीस इन्स्पेक्टर सदावर्ते यांची सहानुभूति व मदत........ ७९
७.२४ सदावर्ते यांची थोडी माहिती ८०
७.२५ आमचे साहस व सदावर्त्यांवर विश्वास ८०
७.२६ बॉम्बचे कारखानदार वांचविले........ ८१
७.२७ सदावर्त्यांच्या गमती ८१
७.२८ बॉम्ब करण्याचे अन्य प्रयत्न........ ८२
७.२९ औंधचा प्रयत्न व सातार्‍याचा अभियोग........ ८३
७.३० आमच्या विध्वंसक्षमतेचें गमक........ ८३
८ सरकारचे अभिनव भारतावरील हल्ले ८४
८.१ वंदे मातरम्‌चा खटला ८४
८.२ १९08 मधला बाबांवरचा दुसरा खटला........ ८५
८.३ सरकारचे मावळांशी कारस्थान ८६
८.४ आमचे हेर मोघे........ ८६
८.५ ना. गोखल्यांची भेट व मोर्ल्यांचीं कारस्थाने ८७

८.६ गोखल्यांचे कारस्थान व बाबांवर सक्त पहारा ८७
८.७ बाबांना जन्मठेपेची शिक्षा ८८
८.८ बाबांची घातकी इतिहास-लोलुपता ८८
८.९ वाळवे यांना शिक्षा ९०
८.१० श्रीधर वामन बर्वे यांना शिक्षा ९०
८.११ गाडगीळ व जोशी यांना शिक्षा ९१
८.१२ खऱ्यांचा मोकासा जप्त व राजद्रोह न करण्याबद्दल जामीन ९१
८.१३ नारायणराव कल्हईकरांना शिक्षा ९१
८.१४ जुलुमाची प्रतिक्रिया प्रतिहिंसा ही अहिंसाच आहे ९२
८.१५ क्रांतिपूर्व प्रतिहिंसेची आवश्यकता ९४
८.१६ अहिंसेचा व्यवहार प्रतिपक्षसापेक्ष असतो ९५
८.१७ मदनलाल धिंग्रा ९६
९ ज्याक्सन-वध ९८
९.१ कर्व्यांची गुप्त शाखा ९९
९.२ अनंतराव कान्हेरे अभिनव भारताचे सभासद ९९
९.३ अनंताची वधाची तयारी व गणूची भंबेरी १००
९.४ अनंतरावांची तळमळ १०१
९.५ कर्व्यांची वधाची योजनां १०१
९.६ धिंग्रा व कान्हेरे यांच्यांतले साम्य १०२
९.७ हत्यारांचे विषम कायदे १०३
९.८ हत्यारांचा कायदा भोंवला १०४
९.९ ज्याक्सन-वधाचा गौप्यस्फोट १०४
९.१० औरंगाबाद नाव भोंवले १०५
९.११ अनंताच्या औरंगाबादी स्नेह्यांची कुतरओढ १०६
९.१२ योजनेच्या अभावीं घात १०७
९.१३ दोषचक्र मध्येच का तुटले नाही ? १०९
९.१४ वधाचा अचानक बेत १११
१० इंग्रज सरकारविरुद्ध सशस्त्र बंडाचा अभियोग ११२
१०.१ छळाला मुक्तद्वार ११२

१०.२ काही देशभक्त पोलीस ११३
१०.३ टिळकांना गोवण्याची कारवाई ११४
१०.४ ज्याक्सन-वधाबद्दल शिक्षा ११५
१०.५ सशस्त्र क्रांतीची कट ११५
१०.६ आमचे अगतिकत्व ११६
१०.७ बॅ. बॅप्टिस्टांचे उपकार ११७
१०.८ न्यायाची विचित्रता व घाई ११८
१०.९ इंग्रज व हिंदी पोलीस ११९
१०.१० बंड केल्याबद्दल झालेल्या शिक्षा ११९
१०.११ साध्या चुकीचे घनघोर परिणाम १२०
१०.१२ अभिनव भारताची योजना १२१
१०.१३ तिचे अंतिम साफल्य १२२
११ अपयशाची कारणमीमांसा १२३
११.१ पोलिसांचा अमानुष छळ १२४
११.२ कायद्याचे थोतांड १२५
११.३ कळकळ म्हणजे कर्तबगारी नव्हे १२६
११.४ दुर्दैवाचा कहर १२७
११.५ अभिनव भारताची अखेर १३०
१२ परिशिष्ट पहीले - तुरुंगांत आणि मुक्ततेनंतरचा छळ १३२
१२.१ माझा अपमृत्यूचा छळ १३२
१२.२ चतुर्भुजला फोडण्याचा प्रयत्न १३३
१२.३ तुरुंगांतल्या छळाची सुरुवात १३४
१२.४ ३ आठवड्यांत २१ पौंड वजन घटले १३४
१२.५ तुरुंगांत माणुसकीलाही मज्जाव १३६
१२.६ एकांतवास आणि आत्महत्त्येचा संकल्प १३६
१२.७ कदान्न व विषारी अन्नाचा कहर १३७
१२.८ दु:सह शीतोष्णता व त्यामुळे मृत्यु १३७
१२.९ तुरुंगांतल्या काही प्रतिष्ठित चोऱ्या १३८
१२.१० मुंगी नाही पण हत्ती गेला! १३८

१२.११ इंग्रजी भाषेचे आम्ही दोन अधिकारी १३८
१२.१२ सरकारचा खुनशीपणा १३९
१२.१३ सोडतांनाही प्लेगांत ढकलले १३९
१२.१४ दारिद्र्याची सीमा १४०
१२.१५ लो. टिळकाचा एकमेव आधार १४०
१२.१६ सरकारचे टिळकांविरुद्ध कारस्थान मी मोडले १४१
१२.१७ गणूचा पश्चात्ताप व पापक्षालन १४१
१२.१८ मुक्ततेनंतरही छळ १४२
१२.१९ माझा विश्वविद्यालयांत छळ १४३
१३ परिशिष्ट दुसरे - खास कोर्टाचा खासा न्याय १४५
१३.१ खास न्यायाची खास पद्धती १४५
१३.२ सरकारवरच उपकार १४६
१३.३ सर्वांची एकच मोट बांधली १४७
१३.४ शास्त्र व न्यायनीति गुंडाळली १४७
१३.५ न्यायमूर्ति का न्यायाची विभूति ? १४८
१३.६ पुराव्याच्या ग्राह्याग्राह्यतेच्या मौजा १४८
१३.७ सर्वच बनावट पुरावा १५१
१३.८ खरा पुरावा १५१
१३.९ न्यायाची घिसाडघाई १५२
१३.१० अस्सल इंग्रजांचे स्वातंत्र्यप्रेम १५३
१४ परिशिष्ट तिसरे - कोल्हापूर बॉम्ब केस १५४
१४.१ लो. टिळक व गंगाधरराव देशपांडे यांचे क्रांतिकारकाशी संबंध १५४
१४.२ सशस्त्र क्रांतीची पूर्वतयारी १५४
१४.३ घटनेचे सुसंघटित कार्य १५५
१४.४ पुण्याचा बॉम्बचा कारखाना १५६
१४.५ कोल्हापुरास प्रयाण १५७
१४.६ टिळकांविरुद्ध छत्रपतींचे कारस्थान १५७
१४.७ बॉब्स कुठे गेले ? १५८
१४.८ गंगाधरराव मोकळेच राहीले! १५८

१४.९ पुन: गंडांतर १५९
१४.१० कर्नल फेरिस वांचले १५९
१४.११ कोल्हापूर-कटाचे धागेदोरे १६०

१ अभिनव भारताची पार्श्वभूमि

स्वराज्येच्छूनें पाहिजे युद्ध केले ।

- गोविंद

१८५७ च्या सशस्त्र स्वातंत्र्ययुद्धांत हिंदुस्थानाला रजपूत, शिंदे, शीख आणि इतर संस्थानिक यांचें साहाय्य न मिळाल्यानें अपयश आले; आणि त्याचा सूड इंग्रजांनीं इतक्या अघोर कृत्यांनीं घेतला की, पुढे स्वातंत्र्यवादी पिढी निर्माण होऊं नये म्हणून त्यांच्यांतल्या कित्येक राक्षसांनी हिंदी स्त्रियांची स्तनेही कापून टाकली! त्यानंतर कित्येक वर्षेपर्यंत सर्वसामान्य जनतेनें स्वातंत्र्यार्थ कोणतेही प्रयत्न केले नाहीत. जवळजवळ एक पिढीपर्यंत ही अनास्था टिकली. त्या कालांत राणीचा जाहीरनामा, शस्त्रबंदीचा कायदा, संस्थाने खालसा करण्याचे रहीत करणे, आणि जनतेला संतुष्ट राखणें हे धोरण अवलंबून इंग्रजांनीं आपले आसन पुनः स्थिरावलें. पण स्वातंत्र्याची उपजत लालसा काही काळ प्रस्तुप्त झाली असली तरी ती ठार मेली नव्हती. काही सरकारी नोकरांतच त्या स्वातंत्र्याच्या लालसेच्या स्फुल्लिंगाने पेट घेतला! 'लोकहीतवादी' गोपाळराव देशमूख आणि प्रसिद्ध बंडखोर वासुदेव बळवंत फडके हे सरकारी नोकरच होते. देशमुखांना स्वातंत्र्याचीं सुखस्वप्नें पडत होती, असे त्यांच्या हल्ली प्रसिद्ध झालेल्या चरित्र-लेखांवरूनच दिसते. वासुदेव बळवंत फडक्यांनी तर इंग्रजांविरुद्ध खास बंडाचा झेंडाच उभारला! रा. जोशी यांनी जे फडक्यांचे चरित्र लिहीले आहे त्यांत स्वातंत्र्यप्राप्तीबद्दलच्या फडक्यांच्या मनोवृत्तींचा सुंदर आविष्कार सापडतो. विष्णु शास्त्री चिपळूणकर हेही प्रथम सरकारी नोकरीतच शिरले होते. पण सरकारी नोकरीत असतांना देशस्वातंत्र्याची हुरहुर त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती. प्रसिद्ध ज्योतिराव फुले यांनाही इंग्रजांचा कांटा काढण्याची स्फूर्ति एकदा झाल्याचे त्यांच्या उद्गारांवरून दिसते. सुप्रसिद्ध माधवरावजी रानडे हे जरी त्या वेळी सरकारी नोकर होते तरीही, ते वासुदेव बळवंतांना मदत करितात या संशयावरून, इंग्रज सरकार त्यांच्या पाळतीवर होते, व त्यांचा पत्रव्यवहारही फोडून पाही. यावरूनच असे दिसते की, स्वतंत्र, जिवंत, प्रतिभासंपन्न माणसांना स्वातंत्र्यप्राप्तीशिवाय देश ऊर्जितावस्थेला यावयाचा नाही, हे कळून चुकले होते. आणि जो तो आपापल्या परीने त्या दृष्टीने लोकशिक्षणाचे काम करीत होता.

१.१ टिळकांची पिढी व क्रांतीची स्फूर्ति

या कालांतच चिपळूणकर, टिळक व आगरकर यांसारख्या स्वयंप्रभ विभूतींना 'लोकहीतवादी' व माधवरावजी रानडे याचें मिळमिळत धोरण न पटून त्यांनी त्यांच्यापेक्षा एक पाऊल पुढे टाकलें. 'निबंधमाला', 'केसरी' आणि 'सुधारक' या वृत्तपत्रांतून इंग्रज सरकारविषयीं द्वेष उत्पन्न होईल असे लेख येऊं लागले. निःशस्त्रता आणि राजद्रोहाच्या कायद्याचे काटेरी कूंपण यांच्या कचाट्यांत सांपडलेल्या असहाय्य, असंघटित, अज्ञानी जनतेला हळूंहळूं देशभक्तीचे, स्वार्थत्यागाचें, प्रतिकारक्षमतेचें बाळकडू पाजून भारतीय जनता, विशेषतः महाराष्ट्रीय जनता, त्यांना क्रांतिपथावर आणावयाची होती. १८५७ च्या सशस्त्र क्रांतीच्या आठवणी पुसट होत जात होत्या, पण वासुदेव बळवंतांच्या प्रयत्नांची स्मृति ताजी होती. त्या स्मृतीच्या स्फुल्लिंगाला

देशभक्तीचा फूंकर घालून तो प्रज्वलित ठेवणें अवश्य होते. या पेटत्या देशभक्तीच्या ज्वाळेंत इंग्रजसरकारच्या हरएक दुष्कृत्यांच्या इंधनावर, कडक टीकेचें पेट्रोल ओतून, क्रांतीचा वणवा पेटवण्याचें पत ह्या टिळकांच्या पिढींतील देशभक्तांनी केले. आणि त्यांच्या लेखांमुळेंच चाफेकर व सावरकर यांना क्रांतिप्रवण केले, हे इतिहासच सांगतो. चाफेकरांनी ऱ्यांडचा वध केल्याच्या आरोपाच्या खटल्यांत आपल्याला 'केसरी'मुळें स्फूर्ति मिळाली हे स्पष्टच सांगितले होते. स्वातंत्र्यवीर सावरकरही आपल्या आत्मचरित्रांत लो. टिळकांना 'गुरूणां गुरुः' असाच मान देतात (सावरकर आत्मचरित्र पृ. ८९). त्यांच्या 'लेखाची पारायणें' ते करीत होते. आणि 'टिळक आंतून सदैव राजद्रोहीच होते' असाच संस्कार त्यांच्या मनावर या 'टिळकपणा'मुळें झाला होता (तोच ग्रंथ पृ. २१६). चिपळूणकरांच्या निबंधमालेंतील 'आमच्या देशाची स्थिती' या, त्यावेळी व नंतरही, जहाल गणलेल्या लेखावर इंग्रज सरकार कैक वर्षे प्रेस ऍक्टचा घण मारीत होते, हा एकच पुरावा चिपळूणकरांच्या ज्वलंत देशभक्तीच्या पुरस्काराचा उत्कृष्ट पुरावा आहे. आणि ऱ्यांडशाहीमुळे 'सुधारका'चे संपादकही इतके खवळले होते की, त्यांचे त्या वेळचे 'सुधारकां'तील लेख हे केसरींतल्या लेखांपेक्षांही अधिक कडक व भडक होते, असे दिसून येते.

पण या देशभक्तांनी इंग्रज सरकारांविरुद्ध पेटवलेल्या वणव्यांत सशस्त्र क्रांतीच्या विचारांचा भडका उठवण्याचें प्रत्यक्ष कार्य 'काळ'कर्ते शिवरामपंत परांजपे यांचेंच होय. ऱ्यांडसारख्या जुलमी अधिकाऱ्याचा शिताफीनें वध करणाऱ्या चाफेकरांस सर्व नरमगरम पत्रकार खुनी, माथेफिरू, असे म्हणत असतां, चाफेकरांच्या देशप्रेमाचा गौरव करून त्यांना 'हुतात्मा' 'देशवीर' martyr या आदरदर्शक विशेषणांनी परांजप्यांनीच प्रथम संबोधले! आणि म्हणूनच सावरकर म्हणतात की, माझ्या क्रांतिकारक जीवनाचें गुरुपद 'मी काळासच देऊ शकेन' (सा. आ. पृ. ८८). पण तेही 'स्फूर्तीचें', 'कृतीचें नव्हे.' आणि शेवटच्या शब्दांतच खरी मख्खी आहे; कारण पुढे शिवरामपंतांचे चरित्र या पूर्वध्येयापासून अलग झाले, हे पुष्कळांस माहीतच आहे. पण 'क्रांतिकारकांची पिढी' महाराष्ट्रांत निर्माण करण्याचें श्रेय त्यांनाच पुष्कळांशीं दिले पाहिजे, हेही खरे आहे.

१.२ महाराष्ट्राला क्रांतीचा अग्रमान

क्रांतिकारक जीवनाच्या 'स्फूर्तीचें' ऋण जरी अभिनव भारताच्या जनकांनी - सावरकर, म्हसकर, पागे यांनी - या सर्वांपासूनच घेतले असलें तरी 'कृतीचें' ऋण फडके, चाफेकर यांच्यापासूनच सावरकरांनी घेतले हे उघड आहे (सा. आ. पृ. ७८, ८१). आणि त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे 'राष्ट्रभक्तसमूह' या अभिनव भारताच्या पूर्वीच्या रूपांतल्या गुप्त संस्थेची १८९९ च्या अखेरीस नाशिकक्षेत्रांत झालेली स्थापना, हा होय. तिचे 'स्वातंत्र्य हेच साध्य, आणि सशस्त्रक्रांति हेच साधन होते. (सा. आ. पृ. १३८)'. सावरकरांच्या आत्मचरित्रांत (पृ. २१३-२३३) हे ध्येय व हेच साधन ठरवणें कां आवश्य होते, याची उत्कृष्ट मीमांसा केली असल्यानें त्याची पुनरावृति मी करीत नाही. वाचकांनी ते वर्णन मुळांतूनच वाचावें एवढीच शिफारस मी येथे करू शकतों. अभिनव भारताच्या तत्त्वप्रणालीचें सारच त्यांत आले आहे. आणि तदनुसारच त्याचा पुढला १० वर्षांतला प्रचंड विस्तार पाहीला पाहिजे.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयाचा उगम प्रथम महाराष्ट्रांतच झाला, याला इंग्रज सरकारच्या दप्तरांतला प्रत्यक्ष पुरावा आहे. हिंदुस्थानांत जेव्हां राजद्रोहाचा कल्लोळ उठून इंग्रज सरकारविरुद्ध सशस्त्र क्रांतीची चौफार उठावणी होऊं लागली, तेव्हां त्यावर उपाययोजना सुचवण्यासाठीं सरकारनें १९१८ सालीं रौलेटं कमिटी नेमली होती. तिनें जो अहवाल प्रसिद्ध केला त्यांत राजद्रोहप्रसाराच्या अग्रपूजेचा मान महाराष्ट्रांतल्या चित्पावन ब्राह्मणांनाच दिला आहे. तसेच घ्र्ह्ग्ीह ळहीोू म्हणजे ‘‘हिंदुस्थानांतली अशांतता’ या चिरोलच्या ग्रंथांत या ‘‘अशांततेच्या जनकत्वाचा मान’ ही त्यानें टिळकांनाच दिला आहे. आणि त्यांत ‘केसरी’, ‘काळ’, ‘विहारी’ यांनीच हा प्रसार केला, आणि चाफेकरांना व सावरकरांच्या अभिनव भारताला टिळक-परांजपे यांनीच स्फूर्ति व उत्तेजन दिले, असा स्पष्ट उल्लेख आहे. बंगाल व मद्रास या प्रांतांत इंग्रजी शिक्षणाचा प्रसार ५०-७५ वर्षे अगोदर झाला असला तरी, तिकडे स्वातंत्र्याच्या कल्पनेचा उदय न होतां, महाराष्ट्रांतच तिचा उदय झाला, ही घटना खरोखरच महत्त्वाची आहे. असा एक ऐतिहासिक गैरसमज निबंधमालाकारांनींही पसरविला होता आणि आहे की, केवळ इंग्रजी शिक्षणानेंच स्वातंत्र्याच्या विचारांचा सुशिक्षितांत उदय झाला. पण केवळ तेच कारण असते तर बंगाल व मद्रासमध्येच या स्वातंत्र्यतेच्या कल्पनांचे बीजारोपण प्रथम व्हावयास पाहिजे होते. पण ते झाले नाही, यावरून केवळ इंग्रजी शिक्षण हे स्वातंत्र्याच्या कल्पनेचें एकमेव कारण नव्हे हे उघड ठरते. आणि उपर्युक्त सरकारच्या ‘‘राजद्रोही कमिटीचा’ निर्णयही तसाच आहे. महाराष्ट्रांतल्या ब्राह्मणवर्गांत पेशवाईच्या वेळची स्वातंत्र्यलालसा जागृत असल्यानें, त्या पुढारलेल्या वर्गांतच तिनें, शिक्षणाच्या साहाय्यानें, प्रक्षोभ उत्पन्न केला, आणि बेडरपणें त्याच मार्गानें तिचा प्रसार केला, हे खरे ऐतिहासिक सत्य आहे. मराठ्यांत ही स्वातंत्र्यप्रीति आणि लढाऊवृत्ति उपजत व जागृत नसती तर इंग्रजी शिक्षणानें त्यांच्यावरही फारसा परिणाम होण्याचें कारण नव्हते. तेव्हां मराठ्यांच्या रक्तांतच स्वातंत्र्यप्रेमाची लाली चमकत होती, आणि इतर प्रांतांत असलीच तर ती पंडुरोग्याच्या रक्ताप्रमाणें निस्तेज होती, हे उघड आहे. असो.

१.३ क्रांतीची स्मरणी

अभिनव भारताच्या पूर्वपीठिकेचा हा थोडक्यात आढावा आहे. सावरकर हे सशस्त्र क्रांतिकारक संस्थेचे जनक असल्यानें त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत तो विस्तारानें, त्यांच्या उपजत काव्यमय भाषेंत, सांगितला आहे. तेव्हां त्याची द्विरुक्ति येथे करण्याचें कारण नाही. त्या संस्थेचें मूळ नांव ‘राष्ट्रभक्तसमूह’ आणि उघड टोपणनाव ‘मित्रमेळा’. या मित्रमेळ्याचेंच रूपांतर कालांतरानें १९०४ मध्ये ‘अभिनव भारतां’त झाले, आणि पुढेतेच गाजले. या संस्थेंत माझा प्रवेश १९०१ मध्ये झाला आणि तो अखेरपर्यंत टिकला. हिंदुस्थानांतला, विसाव्या शतकांतला, हा स्वातंत्र्यप्राप्तीचा पहीलाच उठाव असल्यानें त्याचा इतिहास विस्तृत लिहीणें योग्य. पण सावरकरांच्या आत्मचरित्रांत, (पृ. १११, १७१, १८३) आणि पुढेया ग्रंथांतही, सांगितल्याप्रमाणें त्या इतिहासाचीं साधनें आम्हींच आपल्या हाताने नष्ट केली असल्यानें, आतां केवळ यमराजाच्या तावडींतून अद्याप सुटलेलों, व साठीच्या पैलतीरावर गेलेलों, असे जे काय आम्ही दोघे-चौघे आहोंत त्यांच्या ‘‘आठवणी’ वरच विश्वासून राहणें अपरिहार्य आहे. मूर्ख ब्राह्मणांच्या आज्ञेनें तुकाराममहाराजांनी जशा आपल्या अभंगांच्या वह्या इंद्रायणींत बुडविल्या त्याचप्रमाणें आम्हींही आमच्या दैनंदिन्या, टांचणें, टिपणें, अग्रेय स्वाहा करून टाकलीं.

तुकोबांना खुद्द परमेश्वराचें पाठबळ असल्यानें त्यांच्या वह्या अगदीं कोरड्या व जशाच्या तशाच राहील्या. आम्हांला ईश्वराचें साहाय्य नसलें तरी आमच्या सर्व दिव्यातून बचावलेल्या स्मृतिशिलांवर कोरलेले जे संस्कार आहेत तेच उजळून वाचकांपुढे ठेवण्यावरच आम्हांस समाधान मानून घेणें भाग आहे. आणि या आठवणींनाच शक्य तितकें नीटनेटकें स्वरूप देऊन त्यांचीच स्मरणी मी वाचकांना सादर करीत आहे. खुद्द सावरकरांनीं व इतरांनींही अनेकवार सूचना करून गळ घातली म्हणूनच मी ही स्मरणी जुळवली. या स्मरणींतही सर्व मणी एकसारखे व सलग ओंवलेले नाहीत. थोडेच पण ठसठशीत आहेत ते, येतील तसे, ओंवून ही मुक्तांची माला स्वातंत्र्याच्या प्राप्तीकरतां सशस्त्र वा नि:शस्त्र क्रांतीच्या यज्ञकूंडांत ज्यांनी अक्षरश:, कणशः आणि क्षणश:, आपले आयुष्य भस्मसात् केले त्या मुक्ताम्यांच्या चरणांवर अर्पित आहे. १८५७ तले नानासाहेब पेशवे, बहादुरशहा, तात्या टोपे आणि झांशीच्या लक्ष्मीबाईपासून तो तहत १९४७त स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत, ९० वर्षांच्या या काळांत, ज्यांनी ज्यांनी स्वातंत्र्यार्थ आत्मबलिदान केले ते सर्व पुण्यात्मे वंदनीयच आहेत. या स्वातंत्र्यार्थ चाललेल्या यज्ञांत आम्हींही आमच्या कर्तृत्वाच्या ज्या काही आहुति टाकल्या त्यांची अल्पशीच माहिती या स्मरणीत आहे. तिचा योग्य तो उपयोग भावी सरकारी इतिहासकार करो हीच इच्छा.

ही स्मरणी शक्य तितकी पुरी व सर्वांगसुंदर व्हावी म्हणून मी अनेक प्रयत्न केले. जे काही थोडेफार आमचे देशभक्त यावेळी जिवंत आहेत त्यांना पत्रे लिहीलीं. वृत्तपत्रांतून विनंती करून माहिती मागविली. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. फारच थोड्या मित्रांनी लेख पाठवले. त्यांचा शक्य तो उपयोग झाला नाही. फारच थोड्या मित्रांनीं लेख पाठवले. त्यांचा शक्य तो उपयोग मी या ग्रंथांत केला आहे. आणि त्यांचे त्याबद्दल मी आभारही येथे मानतो. या अभिनव भारताचे खरे जनक म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर. त्यांनीच वास्तविक हा ग्रंथ लिहावयाचा. पण त्यांनी आपल्या आत्मचरित्राचा १९०२ पर्यंतच जो अर्धविराम केला आहे तो अद्याप तेथेच आहे. त्यांना मी वारंवार सांगितले की, तुम्हीच हा ग्रंथ लिहा. निदान तुमची विलायतेतली कामगिरी आम्हांला पुरी माहीत नाही ती तरी तुम्ही लिहून काढा; बाकीची आम्ही लिहीतों. पण त्यांच्या प्रकृतिमानामुळें, इच्छा असूनही, त्यांना ते कारणे अशक्य आहे, असे त्यांनी मला कळवलें, आणि ''तूंच तुला जितकी माहिती आहे तितकी लिहून काढ व प्रसिद्ध कर' अशी मलाच उलट गळ घातली. कै. डॉ. नारायणराव ऊर्फ बाळ सावरकर यांनाही मी त्यांची माहिती कळवण्याबद्दल लिहीले होते. पण महात्मा गांधीवधानंतर त्यांच्यावर अधम कॉंग्रेसगुंडांनी हल्ले करून त्यांना ज्या प्राणांतिक जखमा केल्या, त्यामुळें मरेपर्यंत पुरती त्यांची प्रकृति बरी झालीच नाही, आणि त्यांच्याही हातून काही लिहीले गेलें नाही. म्हणजे ज्यांच्याकडून हा ग्रंथ वास्तविक पुरा लिहीला जावयाचा त्यांना प्रकृतीच्या अस्वास्थ्यानें ते शक्य झाले नाही. मीही आतां ६५ व्या वर्षांत आहे. माझीही प्रकृति बरी नाही व नसते. तरी पण आपण आपले कर्तव्य करावे, त्याचें चीज होवो न होवो, अशा ईर्षेनें मी हे लिहून काढीत आहे. आमचे सर्वच प्रयत्न जेथे विफल झाले तेथे हा तरी सफल होईल याची आशाच कशाला? प्राप्त कर्तव्य करीत रहावयाचें एवढेंच आमचें पत. तेच आमचें ब्रीद. त्याप्रमाणेंच हा यत्न करीत आहे. आणि तो ज्या देशस्वातंत्र्यासाठीं आम्हीं आमच्या संसाराची, आयुष्याची, सर्वस्वाची होळी केली, त्या स्वातंत्र्यलक्ष्मीच्या चरणांवर अर्पित आहे. विस्मृतीमुळें यांत बऱ्याच उणीवा राहील्या

आहेत. हे मीच कबूल करतो. पण आतां विस्मृति वाढणार, कमी होणार नाही. म्हणून तिचा फारसा पगडा बसला नाही तोंच आठवते ती कथा येथे उतरून ठेवीत आहे.

२ महाराष्ट्रांतल्या गुप्त संघटना व त्यांचे कार्य

मामनुस्मर युध्य चं । - गीता

फडके, चाफेकर, टिळक, परांजपे वगैरे प्रसिद्ध महाराष्ट्रीय क्रांतिप्रचारकांच्या कार्याचा इष्ट तो परिणाम म्हणजे सुशिक्षित तरुणांच्या अंत:करणांत सशस्त्र क्रांतीची ज्योत पेटवणे, हाच होता. आणि त्यांनी पेटवलेल्या या ज्योतीवर, आपल्या अंत:करणांतील ज्योत पेटवून, हजारों सुशिक्षित तरुण क्रांतिप्रवण झाले होते. या क्रांतीचा उद्देश इंग्रज सरकारची जुलमी परकी राजवट उलथून पाडणें हाच होता. असे प्रयत्न कोणतेही जुलमी सरकार उघडपणें करूं देत नाही. इंग्रज सरकार तरी ते कसे करूं देणार ? म्हणून हे प्रयत्न गुप्तच करणे भाग होते. पण गुप्त प्रयत्न करणे म्हणजे खालीं, वर, मागे, पुढें, चोहोंबाजूस, सरकारच्या रोषाचा अग्नि पेटलेला असतां त्यामध्ये बसून पंचाग्निसाधनाइतकीच त्रासदायक व धोक्याची तपश्चर्या होती. असले प्रयत्न करणाऱ्या लोकांस फाशी, जन्मठेप, व सर्व इस्टेट जप्ती वगैरे अत्यंत दारुण शिक्षा, दंडविधीमध्ये (पीनल कोडमध्ये) सांगितलेल्या होत्या. त्यामुळें सामान्य अशिक्षित माणसें या असल्या भयंकर साहसी प्रयत्नांत पडणें शक्य व इष्टही नव्हते. सर्वस्वाचा होम करण्यास सदैव तत्पर असे त्यागी, धाडसी, हजरजबाबी, सुशिक्षित व निष्ठावंत तरुणच या कामास हवे असतात. आणि असे शेकडों तरुण मातृभूमीच्या स्वातंत्र्यार्थ महाराष्ट्रांत तयार होऊं लागले होते.

या सुविद्य तरुणांना एकत्र आणून त्यांची सर्वसमर्थ अशी गुप्त संघटना घडवून आणणें म्हणजे सुळावरची पोळी होती. पण तीही घेण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होते. सुसंघटित, प्रबळ आणि सशस्त्र सरकारला उलथून पाडण्यास तितकीच, किंबहुना अधिक विशाल व अधिक जोरदार, सशस्त्र संघटना हवी. म्हणून विस्कळितपणें भडकलेल्या या तरुणांना एकत्र आणण्याचे, लोकसंग्रहाचे, संघटित प्रयत्न सुरू झाले. प्रथमश्रेणीचा मान, या बाबतींत वासुदेव बळवंत फडके यांचा. त्यांच्या चरित्रांत तो सविस्तर दिला आहे. नंतरचा, आधुनिक काळांत तरी, चाफेकरांच्या संघटनेला घावा लागेल. त्यांच्या खटल्यांत शिवाजीवरचे काव्यात्मक उद्गार जे त्यांचे दिलेले आहेत त्यांवरून, आणि त्यांनीं ज्या हीकमतीनें ऱ्यांड व आयर्स्ट यांच्या वधाचा घाट रचला त्यावरून, ही त्यांची गुप्त संस्था चांगलीच संघटित आणि दक्ष असावी, असे वाटते. शिवाय त्यांचे नांव सांगणाऱ्यां देशद्रोही, विश्वासघातकी, द्रविडांचा वध वासुदेव चाफेकर, रानडे व साठे यांनी ज्या युक्तीनें केला त्यावरून, तर ह्या अनुमानाला अधिकच बळकटी येते. आणि पिस्तुलें, तरवारी वगैरे शस्त्रें जमवण्याच्या त्यांच्या गुप्त प्रयत्नास गुप्त संघटनेचा आधार असलाच पाहिजे, असेही निर्विवाद म्हणतां येते. असो. ही त्यांची संघटना त्यांच्या फाशीच्या शिक्षेनंतर लौकरच विरून गेली. आज त्या संघटनेपैंकी कोणी शिल्लक असतील तर रा. साठे हे हयात आहेत. त्यांनी आपले अनुभव आतां प्रसिद्ध करण्यास हरकत नाही. मला स्वत:ला त्याबद्दल काहीच माहिती नाही.

२.१ नाशिकचा मित्रमेळा - अभिनव भारत

क्रांतिवृक्षाची चाफेकरांची शाखा सरकारी दडपशाहीनें जरी तुटली तरी त्याला मित्रमेळ्याची किंवा अभिनव भारताची नवी शाखा १८९९तच लौकर फुटली. सावरकर नाशकास विद्यार्जनासाठीं

आल्यानंतर त्यांचा व नाशिकचे रा. त्र्यंबकराव म्हसकर व रावजी कृष्ण पागे यांचा स्नेहसंबंध लौकरच जुळला. हे दोघेही गृहस्थ त्यावेळी सरकारी नोकरींत होते पण 'केसरी', 'काळ' वगैरे वर्तमानपत्रांच्या वाचनानें त्यांनाही देशाच्या स्वातंत्र्यासाठीं काहीं करावे, अशी मनापासून कळकळ होती. म्हणून तिघांच्या विचारविनिमयानंतर प्रथम 'राष्ट्रभक्तसमूह' या नांवाची एक गुप्त संस्था १८९९ च्या नोव्हेंबरांत या तिघांनी काढली, आणि हे तिघेही त्या संस्थेचे शपथबद्ध सभासद झाले. स्वातंत्र्य, स्वराज्य हे शब्दही त्या कालांत सामान्य लोकांस परिचित नव्हते. त्यांतही इंग्रज सरकारशी झगडूनच स्वातंत्र्य मिळणें शक्य असल्यानें उघडपणें कोणतीही चळवळ त्यासाठी इंग्रज सरकार करूं देणें हेही शक्य नव्हते. म्हणून संस्थेचें सर्व कार्य गुप्तपणेंच चालें.

पण 'गुप्त' संस्था लोकांना कळणार कशी, आणि कळल्याशिवाय तिला लोक मिळणार कसे? हा पेंच या तरुणांना अडवीत होता. म्हणून स्वराज्याचा आणि स्वातंत्र्याचा उघडपणें प्रचार करणारी, आणि त्या प्रचारानें आकृष्ट झालेल्या देशभक्तांतून राज्यक्रांतीच्या प्रचंड दीर्घोद्योगाला लागणाऱ्या कसलेल्या युयुत्सु वीरांना चांगल्या कसोटीवर परीक्षून एकत्र करणारी, अशी एक उघड कार्यकर्ती संस्था हवी, असे या संस्थापकांना वाटू लागलें. आणि या विचारांचा परिपाक म्हणजे १९०० च्या प्रारंभीच 'मित्रमेळा' या साध्या सौंवळ्या नांवाची उघड कार्य करणारी संस्था प्रस्थापिण्यांत आली. वरील तीन संस्थापकांशिवाय या उघड संस्थेत तात्या सावरकरांचे वडील बंधु गणेश दामोदर ऊर्फ बाबा सावरकर, वैद्यभूषण वामन केशव त्यांचे वडील बंधु रामचंद्र केशव दातार, त्र्यंबक रघुनाथ व त्यांचे वडील बंधु नाना वर्तक व इतर काही हे प्रारंभीचे सभासद होते.

२.२ प्रतिकूल परिस्थिति

उघड आणि गुप्त कार्य करणाऱ्या अशा या दोन संस्था स्थापल्या खऱ्या. पण तो काळच राजकीय चळवळीच्या अगदीं बाल्यावस्थेत होता. अनेक वर्षांच्या पारतंत्र्यांत कावळ्याकुत्र्यांप्रमाणे जगण्यापलीकडे काही ध्येय नसल्यामुळें, शिक्षणाच्या अभावामुळें, आणि जाति - धर्म - भाषा - आचारविचार यांच्या भेदामुळें, समाज शतशः विदीर्ण आणि निर्बल कुजट झाला होता. कोणतीही संघटित चळवळ चालूं ठेवण्याचें, समाजकार्य करण्याचें, शिक्षण, वळणच, लोकांना नव्हते. त्यामुळें कोणतेही कार्य जाणतेपणानें, नेटानें, कष्टानें, त्यागानें सतत होत नव्हते. सुशिक्षित मंडळीही थोडी व त्यांतली बरीचशी आळशी, चैनी, स्वार्थलंपट आणि व्यसनी होती. समाजातला जाणता वर्गच जर असा नीति आणि विवेकभ्रष्ट, तर खालच्या अज्ञानी थरांबद्दल तर विचारावयासच नको. न कळतच, शाक्त पंथांतल्या पंच मकरांनी, आणि तदुद्भव गुह्य रोग, आपापसांतली भांडणें, मारामाऱ्या यांनी समाज अगदीं पोखरून कुडून गेला होता. कोणत्याही सार्वजनिक चळवळीला त्यामुळें जोर चढत नव्हता. आपणांस काय हवें, हेच बहुजन समाजाला कळत नव्हते! त्यामुळें लोकसत्ता, स्वातंत्र्य, स्वराज्य म्हणजे काय, याचा बोधच लोकांना होईना. मग त्याकरितां करावा लागणारा प्राणत्यागापर्यंतचा स्वार्थयज्ञ याची कल्पनाच लोकांना कशी येणार? अशा स्थितींत गुप्त राष्ट्रभक्तसमूह किंवा प्रगट मित्रमेळा, या संस्थांना सभासद मिळणार कसे? त्यांतही या संस्थांचे सभासद नुकतेच विशी-तिशीच्या

आंतले. पोरसवदाच लोकांना ते वाटत. त्यामुळें सभासदांची संख्या फारशी त्यावेळी लौकर वाढत नव्हती. इतकेंच नव्हे तर मिळविलेले सभासदही चुकारपणा करीत. सावरकरांच्या आत्मवृत्तांत व बाबाराव सावरकरांच्या चरित्रात, खुद्द बाबा, रामभाऊ दातार, नाना वर्तक यांसारखी जरा वडीलधारी मंडळी, मित्रमेळ्याच्या साप्ताहीक बैठकीलाही, पोरखेळ समजून, अनेक बयादी सांगून, कशी हजर रहात नसत, यांचे वर्णन वाचकांनी पहाण्यासारखें आहे. जाणत्या वर्गांतल्या लोकांची, साप्ताहीक सभांसारख्या साध्या लोकसंग्रहाच्या व शिक्षणाच्या प्रकट कार्याविषयी, ही अनस्था, तर मग त्या कार्यातून त्यागानें तावूनसुलाखून आणि अभ्यासानें घासूनपुसून, सुसंस्कृत होऊन, रेखीव सतत कार्य करणारी आणि स्वातंत्र्य-संपादनाच्या कार्यांत एकनिष्ठेने शिस्तीनें दीर्घोघोगी असलेली मंडळी मिळणें किती दुष्कर होते, याची वाचकांना कल्पना येईल.

२.३ गुप्त-प्रकट-विरोधी कार्ये

या सभासदत्वाच्या अल्पसंख्येमुळें प्रथमतः गुप्त व प्रकट कामें त्याच माणसांना करावीं लागत. घरांतल्या कर्त्यासवरत्या व जबाबदार अशा एकाच माणसाला ज्याप्रमाणें बाहेरचा बाजारहाट आणि घरांतले कुलुपबंद जडजवाहीराचे व इतर गुप्त व्यवहार करावे लागतात, त्याप्रमाणेंच, नाइलाजाने, याही दोन्ही संस्थांत मंडळी थोडीच असल्यानें, त्यांनाच हीं परस्परविरोधी कामें करणे भाग असे. नटांची संख्या कमी असली म्हणजे नाटकांत एकाच नटाला ज्याप्रमाणें परस्परविरोधी दिसणारी कामें करणे जरूर असते, तसेच येथेही होई. त्यांतही, दुष्काळांत तेराव्या महीन्याच्या अडचणीप्रमाणें, कार्याचा व्याप वाढलेला असतांच त्र्यंबकराव म्हसकर प्लेगने वारले, पागे बदलून गेले, आणि वर्तनानेंही अगदीं बहकले. त्यामुळें या नवीन असंस्कृत, अननुभवी, तरुणांनाच कोणतेही काम निघालें म्हणजे वेठीस धरावें लागे, सुदैवानें लोकसंग्रहासारखें प्रकट कामच त्यावेळी करणे जरूर होते म्हणून फारशी अडचण किंवा कार्यांत फारसा परस्परविरोध, निर्माण झाला नाही. कारण साप्ताहीक गुप्त सभांत तरी, पण जरा जीभ अधिक सैल ठेवून, मनःक्रांतीचें शैक्षणिक कार्यच चालूं असे. इंग्रजी राज्याबद्दल तिरस्कार, द्वेष निर्माण करणे, त्यांच्या अन्यायांचें खत घालून स्वातंत्र्यप्राप्तीच्या कल्पनांचे शेत पिकवणें, इतर परतंत्र राष्ट्रांनीं आपले गतस्वातंत्र्य कोणत्या मार्गांनी व साधनांनी मिळवलें ते इतिहास सभासदांपुढेः व्याख्यानरूपानें मांडणें, अडीअडचणींच्या प्रसंगी प्रसंगावधान राखून त्यांतून कसे निसटून जावें हे शिकवणें, एवढेंच मुख्य कार्य मित्रमेळ्याच्या साप्ताहीक गुप्त सभांतून तेव्हां चालत असे. पण ते उघडउघड राजद्रोही असे; आणि म्हणून ते गुप्तच करावे लागे. गुप्त व प्रकट अशीं विरोधी कार्ये एकाच व्यक्तीने किंवा समुदायानें करणे हे तत्त्वतः चूक खरे. पण पुरेशा संख्याबळाच्या अभावीं, मित्रमेळ्याच्या आरंभकाळांत, ते परस्परविरोधी दिसणारें कार्य सावरकरमंडळाला करणे अपरिहारर्यच होते. पुढेपुढे जेव्हां गुप्त मंडळाचे सभासद वाढतं गेले तेव्हांच यां दोन विरोधी कार्यांसाठीं निरनिराळ्या व्यक्तींची योजना करण्यांत आली. त्याला अवधीही बराच लागला. पण या मध्यंतरींच्या काळांत लोकसंग्रहासाठी केलेलीं उत्सव, मिरवणुकी, व्याख्यानें, मेळे, दौरे, ग्रंथप्रकाशनें वगैरे प्रचाराचीं प्रकट कार्ये या मित्रमेळ्याच्या सभासदांनाच करावी लागली. क्रांतीच्या गुप्त कार्याला सभासद मिळवण्यासाठीं हा प्रचार जरी

उपयुक्त झाला तरी तो थोडाफार बाधक झाला हेही नाकारतां येत नाही. पण परिस्थितीच अशी होती की, त्यावेळी हीं दोन्ही कार्ये एकाच मंडळाला करणे भाग होते. त्यातून सुटकाच नव्हती.

२.४ सुशिक्षितांत प्रक्षोभ

राष्ट्रभक्तसमूह किंवा मित्रमेळा ज्या परिस्थितींत स्थापला गेला ती परिस्थिति मात्र अशी होती की, सुशिक्षित तरुणांची मनें प्रक्षुब्धच व्हावींत. चाफेकरांनी केलेले र्‍यांड-आयर्स्टचे वध हे प्लेगप्रतिबंधक उपायांच्या नांवाखाली गोऱ्या सोल्जरांनी नि:शस्त्र आणि असहाय लोकांवर केलेल्या जुलुमाचा धडकबंद प्रतिकारच होता. आणि म्हणून लोकांना चाफेकर हे आदरणीय, पूजनीय वाटूं लागले होते. र्‍यांडच्या वधानंतर हा जुलूम थंडावला, हेच त्या वधाच्या विजयी सुपरिणामाचें प्रत्यक्ष गमक होते. त्या वधाच्या निमित्तानें टिळकांवर सरकारनें राजद्रोहाचा खटला भरून त्यांना १८ महीन्यांची सक्तमजुरीची शिक्षा दिली. हा लोकांना जुलूम तर वाटलाच; पण ‘वडाची साल पिंपळाला’ लावण्याइतकें इंग्रज सरकार मूर्ख व खुनशी आहे, हेही लोकांना समजलें. त्यामुळें विचारी मनें जळफळतच होती. मला आठवते की, आमच्या सरकारी हायस्कूलचे मास्तर रा. बेळगांवकर व गद्रे यांनी, सरकारच्या या असल्या कृत्याबद्दल, इतिहास शिकवतांना, अनेक वेळां जळजळीत राजद्रोहाचे उद्गार काढले होते. गद्रे मास्तरही अशाच राष्ट्रीयत्वाच्या गोष्टी मधून मधून आम्हांला सांगत. राष्ट्रीय शिक्षणाबद्दल पुढे १९०५ नंतर जी चळवळ झाली ती योग्यच होती. पण राष्ट्रीय शिक्षण हे गुरुनिष्ठ असते, केवळ दगडमातीच्या निर्जीव भिंतींतल्या संस्थेंत नसते, हे या उदाहरणांनीं आम्हांला सरकारी हायस्कुलांतल्या गुरुजींनीच शिकवलें होते. असो, या शिकवणीमुळें आम्हीं त्या वेळच्या तरुण मुलांनी ‘‘ऐक्यवर्धक संस्था’ म्हणून मित्रमेळ्यापेक्षां एक निराळी संस्थाही काढली होती. तिच्याही साप्ताहीक, पाक्षिक बैठकी भरत. त्यांत मी एक निबंध वाचलेलाही मला आठवतो. मित्रमेळ्याप्रमाणें गणेशोत्सवही आम्हीं त्या संस्थेमार्फत १-२ वर्षे केला. सारांश इतकाच की, सावरकरच काय पण इतरही शिक्षित गुरुशिष्यांच्या मनांत कालमाहात्म्यानेंच राष्ट्रीयत्वाची ज्योत पेटत होती.

२.५ तरुण क्रांतिकारकांचा संग्रह व शिक्षण

सावरकरांचें व माझें थोडेसें नाते असल्यानें बाबा हे प्रथम आमच्या घरी येऊं लागले. माझी आई व त्यांची आई या आतेमामे बहीणी. सावरकरांच्या आईचे वडील लौकरच वारल्यानंतर त्या दोघी माझ्या आजोळींच लहानाच्या मोठ्या झाल्या. त्यामुळें त्या सख्या बहीणींप्रमाणेंच वागत. सावरकरांची आई वारल्यानंतर माझी आई एवढीच त्यांना मावशी उरली. म्हणून नाशकास त्यांनीं बिऱ्हाड केल्यावर अधूनमधून ते आमच्याकडे येऊं लागले व आमचा घरोबा वाढला. १९०१ पर्यंत बाबाही मित्र-मेळ्यांत फारसें लक्ष घालीत नसत. पण या सुमारास त्यांचे मत निश्चित बनत चाललें होते. तात्यांचे अगोदरच ठाम ठरले होते. त्यामुळें होतकरू तरुण मुलें दिसलीं की, राजकीय स्वातंत्र्याच्या, देशाभिमानाच्या, गोष्टी सांगून ते अशा मुलांना मित्रमेळ्याचे सभासद करून टाकीत. १९०१ च्या सुमारास तात्यांचे लग्न झाले तेव्हां सावरकरांचा वऱ्हाडी म्हणून मी होतो. त्यावेळी केव्हांतरी तात्यांनीं मला मित्रमेळ्याची दीक्षा

दिली. त्यावेळच्या काही साप्ताहीक गुप्त बैठकींना मी उपस्थितही होतो. म्हसकर पागे गेल्यानंतर, आणि राष्ट्रभक्तसमूह हे नांवही विसरून जाऊं लागलें होते. आणि 'मित्रमेळा' हेच प्रचलित नाणें वापरण्यांत येऊं लागलें होते. १९०१ सालीं म्हणजे मित्रमेळ्याच्या पहील्याच वर्षी त्याच्यातर्फे पुण्याच्या धर्तीवर गणेशोत्सव साजरा झाला होता. श्रीशिवाजी महाराजांचा उत्सवही दुसऱ्या वर्षी मित्रमेळ्यानें मोठ्या थाटानें साजरा केला. या दोन्ही उत्सवांमुळें मित्रमेळ्याचें नांव नाशकास सर्वतोमुखीं झाले.

मित्रमेळ्याच्या साप्ताहीक गुप्त बैठकी कोणत्या तरी घरी प्रारंभी भरत. नंतर धोंडभट विश्वामित्रांच्या घरांत राहणारे गोविंदराव दरेकर, गोविंद कवि, हे शपथबद्ध सभासद झाल्यावर त्यांच्या घरीच त्या नित्यनेमानें भरूं लागल्या. हिंदुस्थानचे पराक्रमी वीर, स्वातंत्र्यसंपादक श्रीशिवाजीमहाराज, राणा प्रताप, बंडवाले नानासाहेब व तात्या टोपे, वासुदेव बळवंत फडके आणि श्रीकृष्ण, श्रीराम यांसारख्या देवदेवतांच्या चित्रांनी सभास्थान शृंगारलेलें असे. पाळीपाळीनें कोणी तरी एक विषय अभ्यासून तो मांडावा व नंतर त्यावर सभासदांनी चर्चा करावी, असा साप्ताहीक शैक्षणिक कार्यक्रम अखंड चालू होता. हेतू हा की, मित्रमेळ्याच्या सभासदांना प्रचारकार्य करण्यासाठीं अनेक विषयांचें, वक्तृत्वाचें, वादाविवादाचें, समयसूचकतेचें, सभाधीटपणाचें, लोकसंग्रहाचें, शिक्षण मिळावें; अनेक देशांनीं केलेल्या स्वातंत्र्ययुद्धाचें व त्यासाठीं लागणाऱ्या संघटना, काटकपणा, निष्ठा, स्वार्थत्याग, शिस्त, धैर्य, प्रसंगावधान, साहस या गुणांचें संवर्धन त्यांनी करावे; आणि अशा रीतीने मित्रमेळ्याचा सभासद बुद्धीनें, मनानें आणि शरीरानें सर्वतोपरी स्वातंत्र्ययुद्धाच्या कामी लायक पुढारी व सैनिक बनावा. अपेक्षेप्रमाणें सर्वच सभासदांना जरी हे गुण संपादतां आले नाहीत तरी त्या काळच्या इतर लोकांपेक्षा मित्रमेळ्याचा सामान्य सभासद हा साप्ताहीक बैठकीतल्या नुसत्या श्रवणभक्तीनें, वादविवादांत किंवा इतर बाबतींत, सहजच सरस ठरे. आमच्यापैकी पुष्कळांना समयसूचकता, साहस, बहुश्रुतपणा, वक्तृत्व, वादकुशलता, लेखनकौशल्य, सभाधीटपणा या गुणांचें शिक्षण या शाळेंतच मिळालें. आणि त्यामुळें आयुष्यांत सर्वांनाच, शाळांतून किंवा अन्यत्र न मिळणाऱ्या, या शिक्षणानें फारच फायदा झाला. मित्रमेळ्याचा व नंतरच्या अभिनव भारताचा हा कटाक्षच होता की, शाळा-कॉलेजांत काय किंवा इतरत्र काय, त्याच्या सभासदांनी शक्य तर पहील्या किंवा निदान दहा क्रमांकांत तरी वर्गांत असलेंच पाहिजे. देशभक्ति म्हणजे गांवगुंडांचा अखेरचा आश्रय (Patriotism is the last refuge of a scoundrel) हे जें जॉन्सनचें वाक्य त्याला मित्रमेळ्याचे सभासद अपवादच ठरले पाहिजेत, असा आमचा निर्धार होता.

२.६ अभिनव भारतांतील प्रसिद्ध व्यक्ति

या बौद्धिक उत्कर्षाच्या नियमानुसार बऱ्याच सभासदांनी आपापल्या परीं विविध क्षेत्रांत कोणते ना कोणते तरी मानाचें, विद्वत्तेचें स्थान पटकावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांतलीं काही नांवे येथे देतों :- स्वातंत्र्यवीर व त्यांचे दोघेही बंधु सावरकर, स्वातंत्र्यशाहीर कै. गोविंद कवि, वैद्यभूषण कै. वामनशास्त्री दातार, वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर, बडोद्याचे वकील व ज्योतिषाचार्य दाजी नागेश आपटे, सेवाग्रामचे आचार्य काका कालेलकर, १९४६-४७ तले कॉंग्रेसचे अध्यक्ष किरपालानी, मुंबईचे पंतप्रधान बाळासाहेब खेर, फर्ग्युसन कॉलेजचे कै. प्रो. डॉ. गुणे, जुनागड

कॉलेजचे प्रो. एच्. बी. भिडे, अमळनेरचे चिंचाळकर व पाठक वकील, साताऱ्याचे डॉ. आठल्यें, बालाघाटचे खाडिलकर वकील, खामगांवचे खोपकर वकील, सॉलिसिटर थत्ते, डॉ. थत्ते, बडोद्याचे कै. प्रो. केतकर, सरदार आबासाहेब मुजुमदार, कै. डॉ. आठवले, पुण्याचे कै. श्री. शि. परांजपे वकील, जुन्नरचे वकील ग. वा. जोगळेकर, उमरावतीचे माजी मंत्री ना. बाबासाहेब खापर्डे, नागपूरचे लॉ रिपोर्टरचे रा. चितळे, तेथले ॲडव्होकेट, कै. वि. वि. केळकर, नाशिकचे श्री. र. वर्तक वकील, महाबळ गुरुजी, श्रीकिसन तिवारी, हरिजनसेवक काकासाहेब बर्वे, कै. वामनराव खरे, दादासाहेब गद्रे, गोसावी, भाऊसाहेब अकूत वकील, सोलापूरचे रा. मोहोळकर, अंत्रोळीकर, खडकीकर व केळकर वकील, व रा. लिमये, ठाण्याचे ऐंजिनिअर घाटे, पंजाबचे सर शिकंदर हयातखान, जबलपूरचे बॅ. ग्यानचंद वर्मा, मद्रासचे व्ही. व्ही. एस्. अय्यर, पिले व डॉ. राजन् , गुरुकुल हृषीकेशचे महेश चरणसिंह, बॅ. मिर्झा अबास, मुंबई कॉर्पोरेशनचे अन्यालिस्ट कै. डॉ. जोशी, बॅ. भेदवार, आफ्रिकेंतले बॅ. फडके व पाथर अशीं शेकडों नररत्नें मित्रमेळा किंवा अभिनवभारताच्या छत्राखालीं येऊन, सुसंस्कृत होऊन, हिंदुस्थानांत माननीय म्हणून गणली गेलीं किंवा जात आहेत. कालौघाप्रमाणें कित्येकांची मते बदललीं आणि कार्यक्षेत्रेंही विविध ठरली. तरी या सर्व देशभक्तांनी देशसेवेचें कंकण जे 'अभिनव भारता'ची शपथ घेऊन बांधून घेतले, ते आजवरही सुटलें नाही. मित्रमेळा किंवा अभिनवभारत या संस्थांना याबद्दलचा अभिमान व गौरव वाटला तर त्यांत नवल ते कसले?

२.७ मरावें परी किर्तिरूपें नुरावें *!*

मित्रमेळ्याच्या साप्ताहीक गुप्त बैठकीतल्या व्याख्यानचर्चांचें मासिक समालोचन प्रारंभी काही काळ तरी करण्यांत येत असे. चिटणीसांनी ते लिहून वाचावें, आणि सभासदांच्या गुणदोषांचीही चर्चा त्या प्रसंगानें करावी, असा प्रघात होता. बरेच महीनेपर्यंत हा रिवाज चालूं होता आणि त्या मासिक समालोचनांचे दप्तरही बरेच मोठे झाले होते. पुढे पोलिसांच्या हातांत ते गुप्त दप्तर पडेल अशा भीतीने त्याचाही नाश नंतर करण्यांत आला. ज्या राज्यसत्तेविरुद्ध क्रांति करावयाची तिला प्रत्यक्ष लेखी पुरावा आपल्याविरुद्ध मिळूं नये म्हणून प्रत्येक देशांतल्या राज्यक्रांतिकारकांना आपापल्या कृत्यांचा व विचारांचा लेखी पुरावा असाच नष्ट करावा लागला आहे. आणि म्हणूनच कोणत्याही राज्यक्रांतीचा संपूर्ण इतिहास हा नेहमी अलभ्यच असतो. गुप्त क्रांतिकारक संस्थांची व व्यक्तींची ही ऐतिहासिक व ऐच्छिक जलसमाधीच होय. आणि याचें कारण प्रकट आणि गुप्त कार्य एकाच क्रांतिकारक व्यक्तीनें किंवा समूहानें करूं नये, हे जसे कार्यसुरक्षिततेच्या दृष्टीनें अवश्य, तसेच आपल्या हातानें लेखी पुरावा न ठेवणें हेही गुप्ततेच्या, सुरक्षिततेच्या आणि कार्यसिद्धीच्या दृष्टीनें अवश्य. त्यामुळें वैयक्तिक किंवा सामुदायिक महत्त्वाकांक्षेचा व कार्यप्रसिद्धीने मिळणाऱ्या कीर्तीचा चक्काचूर होतो ही गोष्ट खरी. पण त्याला इलाज नाही. 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें' हा मनुष्यस्वभाव असला तरी असल्या कार्यांत ''मरावें परी कीर्तिरूपें नुरावें'' हाच उलट दंडक असतो. मनुष्य एकवार प्राणत्यागही सुखानें ध्येयासाठीं करील, पण कीर्तीचा त्याग करणे हा महत्तम त्याग आहे. तो करणारीं माणसें फारच थोडी असतात. कीर्तिलोलुप असणारेच पुष्कळ. आणि आम्हांला ही कीर्तिलोलुपताच कशी नडली, याचें वर्णन पुढे येईलच.

२.८ मित्रमेळ्याची प्रगति

यानंतर पुन्हा आपण १९०२ च्या कालाकडे वळूं. मित्रमेळ्यांत आतां बरेच नवे तरुण सभासद झाले होते. त्यांत शंकरराव वाघ आणि गणपतराव व गंगाराम मगर हे तिघे न्हावी होते. तुकाराम खाडे, शंकरगीर गोसावी, खुशालसिंग, गोपाळसिंग, व देवीसिंग परदेशी, सखाराम सरोदे, गणपतराव ओक, पुढे सबजज्ज झालेले बाळकृष्णपंत गोडबोले, सखारामपंत गोऱ्हे, विष्णु शास्त्री, केळकर, जयवंत, खोपकर, काशीकर, बाबासाहेब खरे वकील, माधवराव गाडगीळ, दामूअण्णा चंद्रात्रे, आबा गायधनी वगैरे मंडळी प्रमुख होती. शंकरराव वाघ हे आपल्या धंद्यात फारक कुशल असल्यानें त्यांना श्रीसयाजीराव गायकवाड या बडोदानरेशांनी, ‘व्ही फ्युझाईल’ या मुंबईतल्या इटालियन कंपनींत शिकवावयाला ठेवून, त्यांना आपल्या धंद्यात तरबेज केले, व नंतर आपल्याजवळ ठेवून घेतले! श्मश्रुकाराच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणें हे श्रीसयाजीमहाराजांपर्यंतही कधी कधी मित्रमेळ्याच्या गोष्टी हळूच पोहोंचवीत. पण हे लौकरच कालवश झाले. दुसरे आमचे सभासद गणपतराव मगर यांनी पळण्याची संवय इतकी केली की, ते नाशिक ते त्र्यंबक मधलें १९ मैल अंतर १। तासांत तोडीत व त्याच द्रुतगतीनें परतही येत. कोणत्याही अडीअडचणीच्या कामाला त्यांचा या दृष्टीनें फारच उपयोग होई. बुवा गोसावी, खुशालसिंग, खाडे, सरोदे, देवीसिंग हीं माणसें अत्यंत विश्वासू, कर्तबगार व एकनिष्ठ होती. त्यांच्या अंगावर कोणतेही काम सोंपवा की ते झालेच म्हणून समजावें, इतके ते कार्यतत्पर होते. त्यांतही देवीसिंगांच्या नेतृत्वाखालीं एक तालीम असल्यानें ते वस्ताद म्हणून बरेच उपयोगी पडत. दांडपट्टा, लाठीकाठी वगैरे मर्दानी खेळांत हे लोक प्रवीण होते. आणि जुनीं हत्यारें - बंदुका, तरवारी, जंबिये, भाले वगैरे - मोठ्या प्रमाणावर गोळा करण्याचाही यांनी धंदा चालविला होता. इतर सभासदही मिळेल तेथे खाजगी किंवा सरकारी नोकरी करून बाकीचा वेळ पडेल त्या देशकार्याला देत. बाबासाहेब खरे हे नाशकांतले त्यावेळचे नामांकित वकील व पुढारी. त्यांच्या वशिल्यानें नंतर दादासाहेब गद्रे, भाऊसाहेब अकूत हेही प्रसिद्ध वकील मित्रमेळ्याचे शपथबद्ध सभासद झाले. अशा रीतीनें हळूहळू मित्रमेळ्याचें बस्तान खालच्या व वरच्या थरांत बसत चाललें होते; आणि त्यामुळें त्याच्या बाह्य प्रचारकार्याला बाळसेंही चांगले चढलें.

२.९ इंग्रजांची नोकरी, नव्हे नाकेबंदी व हेरगिरी

आमच्यापैकी रामभाऊ दातार, त्र्यंबकराव वर्तक, सखारामपंत गोऱ्हे, हरि अनंत रिसबुड, लक्ष्मणराव डांगे, सखारामपंत सरोदे, गणपतराव ओक वगैरे काही मंडळी सरकारी नोकरींतही होती. राजकीय चळवळ, आणि तीही इंग्रज राज्यकर्त्यांना सिंहासनावरून खालीं ओढणारी चळवळ, इंग्रज सरकारच्या नोकरांनीं करणे हे थोडें अवघड होते. पण ते पोटासाठीं करणे भाग होते.

मागे सांगितलेच आहे की, ‘राष्ट्रभक्त-समूहाचे’ तिघांपैकी दोन उत्पादकच सरकारी नोकर होते. पुढे अनेक सभासदांना पोटाकरितां सरकारी नोकऱ्या धराव्या लागल्या. उलट काही सरकारी नोकरच या राजद्रोही संस्थेचे सभासद झाले. जसजसें राजकीय चळवळीचें तारूं मवाळांच्या राजनिष्ठेच्या किनाऱ्यावरून, राजद्रोहाच्या सागरांतून, राज्यक्रांतीच्या उद्दिष्टाकडे चालूं लागलें, तेव्हां सरकारी अधिकाऱ्यांनीं ‘सरकारी नोकरांनीं कोणत्याही राजकीय चळवळीशीं संपर्क

ठेवूं नये' असे सक्त नियम केले. राजकीय विषयांचा वास असलेल्या साध्या सभांना सुद्धां हजर राहूं नये, राजद्रोही वृत्तपत्रें घेऊं नयेत, असे हुकूम फर्मावले गेले. चोरूनमारून, किंवा चुकूनमाकून, एखाद्या अशा सभेला हजर राहणारांविरुद्ध कडक उपाय योजण्यांत आले. कोणी बडतर्फ झाले, कोणाची बहाली-बढती रद्द झाली, कोणाला सक्तीनें निवृत्त करण्यांत आले, कोणाचें निवृत्तवेतनही खालसा झाले. अशा अनेक शिक्षांच्या कांटेरी लगामांनी सरकारी नोकरांना मारूनमुटकून राजनिष्ठं बनवण्याचा सपाटा सुरू झाला. त्यामुळें राजकीय चळवळींत, आणि तेही राजद्रोही चळवळींत, गुप्तपणे शिरलेल्यांना मोठाच पेंच पडला. इंग्रजांच्या नोकरीशिवाय उदरभरणाची सोय नाही, आणि राष्ट्रसेवेशिवाय मनाचें समाधान नाही; व्यक्तीच्या संसारासाठीं राजसेवा व राष्ट्राच्या संसारासाठीं राजद्रोह, असा हा नित्य व्यवहारांतला, पण काहीसा नैतिक विरोधाचा भास उत्पन्न करणारा, प्रश्न होता. दुर्बल, भेकड मनाच्या कैक लोकांना त्यानें भेडसावून टाकलें आणि राष्ट्रसेवेपासून सपशेल परावृत्त केले. अर्थात् परस्परविरोधी दिसणाऱ्या या व्यवहारांत फार सावध, खंबीर, व तारेवरची कसरत करण्याइतकी दक्ष व कुशल माणसें ही थोडींच असणार. पण तींच आम्हांस हवीं होती. सरकारच्या गोटांत नाकेबंदी हेरगिरी करणारे देशसेवक हे प्रत्येक देशाला हवेच असतात. तसेच हे होते. आणि केवळ या हेरगिरीच्या भूमिकेवरून पाहीलें तरी आम्हांस आमचीं विश्वासू माणसें सरकारी नोकरींत मुद्दाम पेरणें, किंवा अगोदरच सरकारी नोकर असलेल्यांना आमच्यांत ओढणें, हे प्राप्त कर्तव्यच होते. याचा फायदा कसा झाला याचीं काही उदाहरणें पुढे येतीलच.

२.१० मित्रमेळ्याचें प्रचारकार्य

असो. अशा रीतीनें आमच्या संस्थेंत शेंकडो लोक गोंवले गेले. त्यांत सरकारी नोकर, तरुण विद्यार्थी व अठरापगड जातींचे लोक होते. सावरकरांचे व गोविंद कवींचे पोवाडे, मेळे, मेळ्यांतील पदें, व्याख्यानें, ऐतिहासिक, व स्वराज्यसंपादक व रक्षक विभूतींचे उत्सव, मिरवणुकी, सभा, या प्रचाराच्या साधनांनी नाशिक शहर १९०१ ते १९०८ पर्यंत सारखे गरजलें होते. त्यांतही वंगभंगाच्या चळवळींत प्रसृत झालेल्या राजकीय चतु:सूत्रीचा - स्वराज्य, स्वदेशी, बहीष्कार, राष्ट्रीय शिक्षण यांचा - प्रचार सर्व हिंदुस्थानभर दुमदुमला. मित्रमेळ्यानें १९०७ मध्ये त्यातही लक्ष घालून, वामनराव खरे वकील व दातार शास्त्री यांना सर्व जिल्हाभर दौरे काढावयास लावून, व्याख्यानें देऊन सर्व जिल्हा हलवून सोडला. कै. बाबासाहेब खरे व दातार शास्त्री यांची ही कामगिरी अत्यंत प्रभावी झाली. या सर्व प्रचारकार्याचे सूत्रधार बाबा सावरकर हेच असत. स्वतः प्रसिद्धिपराङ्मुख राहून त्यांनीं १९०२ ते १९०९ पर्यंत अभिनव भारताच्या प्रत्येक चळवळींत तनमनधन वेंचलें. १९०९ मध्ये जन्मठेपीच्या शिक्षेनंतर अंदमानांतही जसे ते देशहीतार्थ झिजले तसेच रात्रंदिवस ते या स्वातंत्र्ययज्ञांत आपल्या प्राणांची कणशः क्षणशः आहुति टाकीत होते.

त्यांच्याबरोबरच आमचे पांगळे कवि गोविंदराव दरेकर यांनीही या रणयज्ञांत उडी घेतली होती. त्यांनी काव्यप्रतिभेच्या जोरावर तरुण वर्गावर आपल्या पदांनी इतकी मोहनी घातली होती की, नाशिक हायस्कुलांतील व मराठी शाळांतील मुलें त्यांचीं देशभक्तिप्रचुर काव्यें रात्रंदिवस गुणगुणत असत. आमच्या मित्रमेळ्यांतील गोविंदांची पदें पुण्यास लोकमान्य टिळक

व काळकर्ते परांजपे यांनीही मुक्तकंठानें प्रशंसिली होती. खुद्द श्रीशिवाजी उत्सवाच्या वेळी, निमंत्रणावरून, रायगडावरही या मेळ्याच्या मुलांनी आपल्या स्वातंत्र्यगानाचा नजराणा अर्पिला होता व अखिल महाराष्ट्राचें मन आकर्षून घेतले होते.

२.११ मित्रसमाज

हीं पदें म्हणणारीं मुलें हायस्कुलांत उच्च वर्गांत शिकत होती. शिवाय मित्रमेळ्याच्या धर्तीवर त्यांनींही आपापल्या वर्गांतल्या तरुणांची गुप्तसंस्था 'मित्रसमाज' या नावांनें काढली होती. त्यापैकीच आज प्रौढ झालेले रा. श्रीधरपंत वर्तक, वकील, लिहीतात की, ''मित्रमेळ्याच्या धर्तीवर नाशिक हायस्कूलमधील प्रत्येक वर्गांत अशी गुप्त संस्था काढाळी, असे आमच्या मनानें घेतले; बाळ (आता कै. डॉक्टर) सावरकर व (आता कै.) दत्तू केतकर (नंतर बडोघास प्रोफेसर झालेले) यांनी त्यांच्या वर्गांत त्याप्रमाणे गुप्त संस्था काढल्या. मीही रा. (आता कै. बापूराव खरे, नंतर इंपीरिअल सेक्रेटरीएटमध्ये असलेले), बा. ज. मराठे, चितळे (पोस्टल सुपरिटेंडंट), दीक्षित, बर्वे यांच्या सहकार्याने एक गुप्त संस्था काढली.' या सर्व संस्थांचा मेळावा म्हणजेच मित्रसमाज होता. त्यावेळी हायस्कुलांत असलेल्या ३०० मुलांपैकी हीं शेंदीडशें तरुण मुलें दांडपट्टा, तरवार, बोथाटी, फरीगदगा, कुस्ती वगैरे शारीरिक शिक्षण नियमानें घेत. शिवाय रात्री-बेरात्रीं किल्ल्यावर, अरण्यांत, मैदानावर, लटकी लढाईही खेळत. त्यांच्या या शिक्षणासाठीं बडोद्याहून प्रो. माणिकरावांनी इब्राहीमभाई म्हणून एक मल्लविशारद पाठविला होता. त्यानें आपली कामगिरी चोख बजावली होती. नाशिक शहरांतल्या उच्च वर्गांतले सुशिक्षित तरुण हे याप्रमाणें कोठें तरी अभिनव भारताच्या कक्षेखालीं आले होते. यांतच पुढेखुनासाठी फाशी गेलेले हुतात्मे कृष्णाजी गोपाळ कर्वे व विनायक नारायण देशपांडे हेही होते. आणि राज्यक्रांतीच्या कटांत गोवले गेलेले अनेक तरुण - पुरुषोत्तम लक्ष्मण दांडेकर (५वर्षे शिक्षा झालेले), सदाशिव दांडेकर, गोपाळ गोविंद धारप (३ वर्षे शिक्षा), शंकर रामचंद्र सोमण (जन्मठेप शिक्षा), काथे, मनोहर अंबेडकर, व इतर होते. (वर्तक व धारप यांच्या लेखांवरून)

मित्रमेळ्याच्या धर्तीवर नाशकास स्त्रियांनीही एक समाज स्थापला होता; पण तो फार दिवस टिकला नाही. मित्रमेळा किंवा अभिनव भारताचा हा कटाक्ष असे की, शक्यतों शाळाकॉलेजांतले भावी तरुण आपल्या कक्षेत, चांगले परीक्षून, ओढावेत. कारण हेच पुढेराष्ट्राच्या स्वातंत्र्यसंग्रामांतले नेते, सैनिक किंवा सहानुभूतिक होणार. म्हणून विद्यार्थी, शाळामास्तर, प्राध्यापक यांच्यावर क्रांति-विचारांचें जाळें टाकण्यांत येई. आणि परिस्थितीच अशी होती की, इंग्रजांविरुद्ध सुशिक्षित समाजांत धुमसत असलेल्या असंतोषाला क्रांतिकारक विचारांचें इंधन मिळालें की, ते क्रांतीची ज्योत भडकवूनच उठे. म्हणून मराठी- इंग्रजी शाळांतले प्रौढ विद्यार्थी व शिक्षक, आणि कॉलेजांतले तरुण विद्यार्थी ह्यांच्यांतून आमचे 'रंगरूट' मिळत. शाळा, हायस्कुलें, व कॉलेजें ह्या आमच्या मोक्याच्या जागा. तसेच सरकारी नोकरांपैकी पोलीस, न्यायखाते, तारखाते, लष्कर, तुरुंग, रेल्वे वगैरे खात्यातूनही अभिनव-भारतांत शक्य तर भरती करावी, किंवा उलट अभिनव-भारतीयांनी त्या मुख्य मोक्याच्या खात्यांत शिरावें, व अभिनव-भारताला शक्य ती माहिती पुरवावी, आणि तीं खातीं शक्य तेवढीं आत्मसात करावीं, या प्रयत्नांना बरेंच यश येत चाललें होते. आमच्याप्रमाणेंच विचारसरणी असणारे इतर विचारी सुज्ञ

तरुण याप्रमाणेंच वर्तत होते. अभिनव-भारताशीं समांतर चाललेल्या बंगाल, पंजाब, व महाराष्ट्रांतल्या इतर संस्था हाच कार्यक्रम आंखून तो अमलांत आणीत होत्या. अर्थात् प्रत्येक संस्था गुप्तपणें आपापले कार्य करीत असल्यानें एकमेकांची माहिती एकमेकांना फारशी नसे; पण कार्य मात्र तेच चाले.

२.१२ मुख्य प्रकट कार्ये

वर निर्दिष्ट केलेल्या रिक्रूट-भरतीच्या कामी प्रकट कार्य करावेच लागे. मित्रमेळ्याने (नंतर अभिनव भारताने) त्यासाठी सभा, व्याख्याने, प्रकाशने, उत्सव, मेळे हे कार्यक्रम ठरवले होते. आमच्या आधीच हे उत्सव लो. टिळकांनी दूरदर्शीपणाने सुरू केले होते. त्या प्रसंगी आम्ही नाशकास दरवेळी बाहेरच्या कोणा ना कोणा तरी प्रसिद्ध देशभक्तांना व्याख्यानासाठी बोलवत होतो. नाशकास तदर्थ वाईचे काशिनाथशास्त्री लेले ('वर्मा'चे संपादक), धुळ्याचे समर्थभक्त शंकरराव देव, दिल्लीचे सय्यद हैदर रेझा, पुण्याचे देशभक्त काळकर्ते अण्णासाहेब परांजपे, लोकमान्य टिळक यांना व्याख्यानासाठी आम्हीं बोलावले होते. बाबा सावरकरांच्या चरित्रांत त्यांचे वर्णन आढळेल. धर्मकार लेलेशास्त्री यांना केवळ बाबांनीं ते धर्मिष्ठ म्हणूनच बोलावले होते. आणि ते शास्त्रीही एवढे कर्मठ की त्या वेळी (१९०३/४) वाईहून नाशकास येतांना ३६ तासांच्या प्रवासांत, आगगाडींत पाणी पितांना पाण्यास अब्राह्मणांचा स्पर्श होईल या भीतीनें, शास्त्रीबोवा पाणीही प्यायले नाहीत! अर्थात् बाबांव्यतिरिक्त आम्हां इतरांना इतका कर्मठपणा आवडला नाही. आणि शास्त्रीबोवा आपला हा सनातनी पराक्रम मिटक्या मारून वर्णन करीत असतां आम्ही सर्व कुचेष्टेनें हंसत होतो! विनायकराव सावरकरांनीं तर शास्त्रीबोवांची थोडीफार कुचाळीही केली; पण बाबांच्यासाठीं नंतर आम्हीं ते आवरते घेतले. पुढे बाबांनीच हे असले सनातनी विचारही सोडून दिले. ते इतके की, नंतर त्यांना गणपति-उत्सवांत, हिंदु-मुस्लिम-ऐक्य दर्शविण्यासाठी, आणि त्या उत्सवाचा केवळ राजकीय हेतू प्रस्थापण्यासाठी, सय्यद हैदर रेझा हे मुलसमान पुढारीही पसंद व पचनी पडूं लागले. असो. या दोन टोकांशीं असलेल्या या पुढाऱ्यांनी देशभक्तीचा संवादी सूर मात्र आपापल्या व्याख्यानांतून काढला होता. आणि जनसमूहालाही हे उत्सव राजकीय क्रांतिप्रवण आहेत हे, या हिंदु-मुसलमान पुढाऱ्यांच्या गणेशोत्सवांत झालेल्या व्याख्यानांनी, पटले होते. या सर्व पुढाऱ्यांच्या व्याख्यानांतून 'स्वातंत्र्य' हा शब्द, की कल्पना, ध्वनित सूचित केली जाई. स्पष्टपणे ती बोलण्याची सोयच तेव्हां नव्हती. दे. भ. शंकरराव देवांनीं आपले ध्येय हे 'अनिर्वाच्य', पण सर्वांना माहीत आहे असे आहे, असे त्याचे वर्णन केल्याचे मला अजून आठवते. अण्णासाहेब परांजप्यांची व्याख्याने तर त्यांच्या अत्यंत सुंदर वक्तोक्ति, व्याजोक्ति, उपहास, उपरोध वगैरे अप्रतिम काव्यगुणसमुच्चयाने इतकी लोकप्रिय झाली की, त्यांच्या व्याख्यानांना हजारो लोकांचा समुदाय जमत असे. आणि तीन-तीन तास तो चित्रासारखा तटस्थ राही. त्यांच्या 'काळां'तल्या लेखांनीं, व या असल्या वक्रोक्ति व उपहासपूर्ण व्याख्यानांनी, इंग्रज सरकारचे कातडे सोलल्याप्रमाणे होई. इंग्रज अधिकारी जळफळत, पण त्यांचा इलाज नसे. हिंदी अधिकारी मात्र मनांतल्या मनांत खूष असत पण वरकरणीं दाखवीत नसत. शिवाय मराठी लघुलेखकही फारसे नसल्यानें सरकारला काय किंवा परस्थांना काय, असल्या ज्वलंत व्याख्यानांच्या सारांशाच्या ताकावरच आपली तृप्ती करून घेणे

भाग पडे. शिवरामपंतांचीं सर्व व्याख्यानें जर मराठी लघुलेखकांनीं टिपून प्रसिद्ध केली असती तर वक्तृत्वकलेत प्रतिभेचा पूर्ण विलास व नवविकासच दृष्टीस पडला असता.

टिळकांच्या व्याख्यानसंबंधाने बोलणे, लिहीणे म्हणजे सूर्याला निरांजन दाखवणेंच होय. जनतेवरचा त्यांचा पगडा अलौकिक होता. ते म्हणतील ती पूर्व दिशा अशी लोकांची भावना होती. त्यांच्या व्याख्यानांच्या परिणामांबद्दल मी काय व किती लिहावें? आमच्या उतास चाललेल्या घाईला त्यांनींच १९०६ मध्ये त्याचवेळी पायबंद घातला होता. त्यांच्या मार्गदर्शनासाठीं आम्हीं एक गुप्त बैठक घेतली होती. त्यांत त्यांनी सांगितले होते की, 'आम्हीही अशा गुप्त चळवळी, शस्त्रास्त्रांची जमवाजमव, केली होती. तुम्ही उतावळेपणानें फार घाई करूं नका. कार्य योग्य आहे. पण धिमेपणानें शिस्तीनेंच चला.'

२.१३ वार्षिक वा अर्धवार्षिक बैठकी-संमेलने

प्रतिवर्षी एकदां किंवा दोनदां निवडक प्रतिनिधींची गुप्त षण्मासिक वा वार्षिक बैठक कोणत्या तरी ठिकाणीं आम्ही भरवीत होतो. उद्देश हा की, वर्षांत झालेल्या कार्याचा आढावा काढतां यावा, नव्या योजना आंखतां याव्या, आणि कोठें अडचणी व चुका होत असतील तर त्या कशा दुरुस्त कराव्या, हे ठरवतां यावें. नव्या निवडक शपथबद्ध सभासदांची दाट मैत्री व्हावी हाही उद्देश सांगावयास नकोच. पहीली बैठक १९०३ मध्ये धुळ्यास रा. रणदिवे वकील यांच्या घरी आम्ही भरवली. त्यांचे बंधु व ते आमच्या संस्थेत होते. या सभेस वऱ्हाडातले वीर वामनराव जोशी, बाबासाहेब खापर्डे, पृथ्वीराज व्यास, सदाशिवराव बल्लाळ, रा. पांडे वगैरे मंडळी हजर होती असे आठवते. पुणें, नाशिक, कोठुरे, त्र्यंबक, भगूर वगैरे ठिकाणचे ६०-७० निवडक सभासद उपस्थित होते. फर्ग्युसन कॉलेज आणि डेक्कन कॉलेज, व धुळ्याचे ट्रेनिंग कॉलेज यांतले बरेच सभासद होते. पहीलीच बैठक ही असल्याने एकमेकांच्या कार्याचा आढावा घेण्यापलीकडे आणि परस्पर विचारविनिमयापेक्षा अधिक काही कार्यक्रम नव्हता. तरी तो पार पाडावयास दोन दिवस लागले.

२.१४ मित्रमेळ्याचे 'अभिनव भारत' झाले

नंतर १९०४ मध्ये आम्ही नाशकासच, मी रहात होतो त्या भागवतांच्या वाड्यात, जमलो होतो. दोनशे प्रतिनिधि सभासद अजमासें असतील. त्यात सभेंत मित्रमेळ्याचे नवे नामकरण 'अभिनव भारत' हे झाले. इटालीच्या 'तरुण इटली' या माझिनीच्या संस्थेची हकीकत सांगून त्या धर्तीवर आपण ही काढीत आहों, असे विनायकराव सावरकरांनी सांगितले. इतरही वक्त्यांनी ज्वलज्जहाल भाषणें करून सशस्त्र क्रांतीची आवश्यकता पटवली. या सभांस मुंबई, पुणें, सोलापूर, खानदेश, वऱ्हाड व इतर जिल्ह्यांतील प्रतिनिधि आले होते. १९०५ मध्ये कोठुऱ्यास हा वार्षिक मेळावा भरला होता. १९०६ मध्ये मुंबईस शीव येथे खिमजी आसरवीरजी यांच्या बंगल्यांत ही बैठक भरवली होती. १९०७ मध्ये सुरतेस कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या निमित्तानें आम्ही जमलो होतो. त्यापूर्वी मी व बाबासाहेब खरे वकील असे १९०६च्या डिसेंबरात कलकत्त्यास कॉंग्रेसच्या बैठकीस गेलो होतो, आणि तेथल्या गुप्त मंडळ्यांशीं संधान जमवून आलो होतो. अनुशीलन समिति, स्वाधीन भारत वगैरे संस्थांच्या प्रमुखांशी ५।६ दिवस

वाटाघाटी केल्या व सर्वांनी मिळून, एकाच वेळी, हिंदुस्थानांत सशस्त्रक्रांतीची उठावणी करावी, अगोदर काही करूं नये, असे ठरवून आलो होतो. बाबांनीं त्यांचे एक मित्र सदाशिवराव (इष्टगुंडू) यांनाही बंगल्यांत पाठवले होते. बंगाली पुढाऱ्यांपैकी बरेच बॅरिस्टर, वकील, डॉक्टर वगैरे सुशिक्षित मंडळी गुप्तपणाने या कार्यास बरीचशी मदत करीत होती. ही मंडळी १९०७च्या सुरतेच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनास आली होती. म्हणून त्यांच्या पुनर्भेटीसाठी आम्ही सुरतेस मुद्दामच गेलो होतो. तेथल्या गुप्त बैठकीत दोन-तीनशे माणसें निरनिराळ्या प्रांतांतलीं आली होती. सुप्रसिद्ध बाबू अरविंद घोष, त्यांचे बंधु बारिंद्रकुमार घोष वगैरे प्रसिद्ध क्रांतिकारक तेथे जमले होते. मद्रासचे क्रांतिकारक चिदंबरं पिले हे तेथेच अभिनव भारताचे सभासद झाले. या आमच्या वार्षिक अधिवेशनांत गतकार्याचा आढावा घेऊन किती सभासद, किती शाखा, कोणकोणतीं शस्त्रास्त्रें जमवलीं, याचा अंदाज घेतला जात असे. नवीन काय करावयांचें तेही ठरवीत असूं. निरनिराळ्या जिल्ह्यांतल्या, प्रांतांतल्या, सुशिक्षित पुढाऱ्यांची आपल्यासारखीच विचारसरणी व कार्यप्रणालि आहे, असे सदस्यांना समजल्यावर त्यांचा उत्साह द्विगुणित होई, निष्ठा स्थिर होई, आणि कार्याची जगङ्व्याळ कल्पनाही येई. या दृष्टीनें हे मेळावे फार उपयुक्त होत असत. सावरकर विलायतेला जाण्यापूर्वी अभिनव भारताचें अध्यक्षस्थान त्यांच्याकडेच असे. ते गेल्यावर मी किंवा मि. दाजी नागेश आपटे (बडोदें) यांपैकी कोणास तरी ते द्यावें, असा त्यांचा मानस होता. पण शेवटीं आम्हां दोघांनाही वगळून रा. हरि अनंत थत्ते (आतां सॉलिसिटर) यांच्याकडेच ते सोपवण्यांत आले. त्यांना निवडण्याचा हेतू एवढाच होता की, त्यांचे आश्रयदाते खिमजी आसरवीरजी शेट यांच्याकडून ते काही आर्थिक मदत अभिनव भारत संस्थेला मिळवून देतील. पण ती मिळाली नाही.

या वार्षिक आढाव्यांत असे दिसून येई की, अद्यापही प्रचारकार्य अपुरेच पडत आहे. म्हणून उत्सव, व्याख्यानें व सभा यांच्या जोडीला अधिक व्यापक अशी प्रकाशनें उपयुक्त होतील, या हेतूनें ती शाखा जोराने चालवावयाचे ठरले आणि त्याप्रमाणे बाबांनी सुरवातही केली.

२.१५ मित्रमेळ्याची प्रकाशने

मित्रमेळ्याचे मोठे प्रचारकार्य म्हणजे लहान व मोठी प्रकाशने होत. सावरकर व गोविंदकवींचे पोवाडे व मेळ्याची देशभक्तीने रसरसलेली पदे ही प्रारंभीची लहान नऊ प्रकाशनें होती. म्हणून त्यांना 'लघु अभिनव भारतमाला' हे नांव देऊन बाबा सावरकरांनीं ती प्रसिद्ध केली. त्या काळात महाराष्ट्रांत बहुतेक प्रमुख शहरी श्रीशिवाजी व गणेशोत्सवांत पुण्या-नाशिकच्या अनुकरणाने मेळे काढण्याचा प्रघात होता. पुण्याचा सन्मित्रसमाज मेळा हा प्रथम फारच लोकप्रिय झाला होता. आमच्या राज्यक्रांतीच्या कटाच्या खटल्यांतले (आतां कै.) शंकर पांडुरंग महाजन हे या मेळ्याचे पद्यकार व सूत्रधार कित्येक वर्षे होते. त्यांनी पदांच्या रूपाने देशभक्ति व सामाजिक अनिष्ट रूढींवर जहरी टीका सर्व समाजांत गाजवली. ते पाहूनच नाशकास मित्रमेळ्यानेही त्यांचे अनुकरण करून सवाई कामगिरी केली. गोविंद कवींनीं या मेळ्याकरितां पदें करून दिली. काही सावरकरांनींही केली होती. रा. दाजी नागेश आपटे व 'चपाधर' मोघे यांनीही एकेक पोवाडा केला होता. तुलनाच केली तर गोविंदकवि व सावरकर या द्वयाचीं पदेंच

इतर त्यावेळच्या सर्व पदांपेक्षां अतिशय तेजस्वी, आणि इंग्रज सरकारचे वाभाडे काढणारी, होती. पुण्यास लोकमान्यांच्यासमोर जेव्हां सन्मित्रसमाज व मित्रमेळा यांचीं पदें एकाच रात्रीं म्हटलीं गेलीं, तेव्हां हा फरक स्पष्टच दिसून आला. तेजस्वी, ओजस्वी, देशप्रेमाने ओथंबलेली, राज्यक्रांति ध्वनित करणारी आणि वक्रोक्तीनें इंग्रज सरकार व त्यांचे तोंडपुजे यांचे स्वरूप उघडेंनागडें करून त्यांना बोचबोचून शरमवणारीं मित्रमेळ्याची पदें, आणि ती साभिनय गाऊन दाखवणारे बाळ सावरकर, वर्तक, केतकर, खुशालसिंग यांच्यासारखे १८/२० वयाचे देशभक्त प्रौढ विद्यार्थी, असा संगम जमल्यावर प्रचंड समुदाय नागासारखा डोलूं लागत असे, हे मी पाहीले आहे. टिळकांनी मित्रमेळ्याची तोंड भरून स्तुति केली, आणि मेळ्यांतल्या चढाओढींत मित्रमेळ्यास पहीला क्रमांक देऊन त्याला त्यांनी सुवर्ण पदकही दिले, असे रा. वर्तक वकील, व या मेळ्याची सर्व व्यवस्था ठेवणारे रा. हरि अनंत रिसबूड लिहीतात. याच पदांच्या प्रसिद्धीकरणानें तीं महाराष्ट्रात सर्वतोंमुखीं झालीं. या लघुमालेनंतरचें मोठे प्रकाशन म्हणजे बॅ. सावरकरांनीं लिहीलेलें ‘माझिनीचें चरित्र’ हे होय. हा ग्रंथ विशेषतः सावरकरांची त्यांतली प्रस्तावना, इतकी लोकप्रिय झाली की, शिखांच्या ग्रंथसाहेबाप्रमाणें काही ठिकाणीं त्या ग्रंथाच्या मिरवणुकीही निघाल्या! हा ग्रंथ म्हणजे क्रांतिकारकांची भगवद्गीताच होती. याच्या दोन हजार प्रती तीनच महीन्यांत चुटकीसरशा खपल्या! यानंतरचें संकल्पित प्रकाशन म्हणजे तात्या सावरकरांनीं लिहीलेलें ‘१८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध’ हे होते. पण सरकारने ते तेव्हां छापू दिले नाही. (क्रांतिवीर बाबाराव सावरकरांचे चरित्र पृ. ११२ पहा.) आतां ते भाषांतरित स्वरूपांत प्रसिद्ध झाले आहे, व मूळ प्रतही मिळाली आहे. हे सर्व वाङ्मय इंग्रज सरकारास इतके विषारी, विदाही, वाटत होते की, त्यांनी ते सर्व प्रेस ऍक्टच्या इंद्रायणींत कित्येक वर्षे बुडवून टाकले होते! आतां स्वराज्य आल्याने ते सर्व बंधमुक्त झाले आहे. त्याच्या सशस्त्रक्रांतिप्रवणत्वाचे गमक हेच की, अहिंसावादित्वानें हुरळून गेलेल्या १९३७ च्या कॉंग्रेससरकारने सुद्धां ते सर्वच्या सर्व बंधमुक्त केले नव्हते!

२.१६ गोविंद-काव्य

गोविंदांच्या काव्यांत प्रारंभी पौराणिक व ऐतिहासिक घटनांचा बुरखा असे. उदाहरणार्थ, रावण-बिभीषण संवाद, अंगद शिष्टाई, शिवाजी-मावळ्यांचा संवाद, गणरायाची प्रार्थना वगैरे पौराणिक वा ऐतिहासिक मथळे देऊन, त्यांत गोविंद कवि सुचवितात की, आम्ही इंग्लंडच्या राजाला राजाच मानीत नाही (राजा नाही, राजद्रोह मग कैसा रे व्हावा ।). आम्ही फक्त आमचाच राजा असेल तो मानू (भूप हिंदुचा, बंधु आमचा, कोठें मज दावा?) आणि जो आमचा राजाच नव्हें त्याबद्दलचा द्रोह राजद्रोहच होऊं शकत नाही. राजा मान्य नसतांही जर कोणी राज्य करीत असेल तर तो चोर, लुटारू. त्याच्याशीं द्रोह करणे, आणि सामदामादि उपायांनी, नाही तर शेवटीं क्रांतीही करून, त्याला हाकलून देऊन स्वतंत्र होणे, हे राष्ट्रभक्तांचें कर्तव्यच ठरते, अशी त्यांची शिकवण होती. यापायीं तुरुंगवासादि दिव्यें करावीं लागली तर राष्ट्रभक्तांना त्यांची खंत नाही (बंदीशाळा लोहशृंखला तदीय शृंगार ।). आणि अशा हातावर शिर घेऊन निघालेल्या हजारो राष्ट्रभक्तांना तुरुंग तरी कसे पुरणार (कितीक जणांना दाविशील तूं मूर्खा बंदीधाम रे?) अर्ज विनंत्या, शिष्टाचार वगैरे मवाळांनी साधनें निरुपयोगी रली, म्हणून कवि गणरायास म्हणतो -

''देवा घे हातीं तरवार रे, हो संगरा तयार ।।धृ।।

नाकदुऱ्यासह अर्जविनंत्या झाल्या वारंवार रे ।

हा (इंग्रज) न वळेचि औंभवतीला अधमाधम साचार रे ।।

उपाय आतां एकचि उरला समशेरीचा मार रे ।

नानायत्नें यां दुष्टांचा करावाच संहार रे ।''

आणि त्यासाठीं आम्ही थोडे आहोंत, इंग्रजांचे सैन्य अफाट आहे, म्हणून

''गनिमीकावा स्वीकारावा तोच लघुबलाधार रे ।

गुप्त रूपानें मसलत सारी ही पाडावी पार रे ।''

पुढे १९०६ मध्ये हा पौराणिक बुरखाही गोविंदांनीं फेकून दिला आणि सरळ सांगितले की,

रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना ।

असा भूतकालीन सिद्धांत जाणा ।।

स्वराज्येच्छुनें पाहिजे युद्ध केले ।

रणावीण स्वातंत्र्य कोणां मिळालें ? ।।

अर्थातच ही असली उघडी सशस्त्रक्रांतीची शिकवण इंग्रज सरकारास पचणे शक्यच नव्हते. त्यांनी, १९०९ मध्ये बाबांनीं, ती प्रसिद्ध केली होती म्हणून त्यांना पकडून दंडविधीच्या (पीनल कोडाच्या १२१) कलमाप्रमाणें ''इंग्रज सरकारविरुद्ध युद्ध करण्यास चिथावणी देणें'' या गुन्ह्याबद्दल जन्मठेप व सर्वस्व हानि ही शिक्षा ठोठावली. आणि त्यामुळे हे प्रकाशनाचे प्रकट कार्य कायमचेच थांबले.

या प्रकाशनाबाबत मला अद्यापही एका गोष्टीचा अचंबा वाटतो. इंग्रजांच्या कायद्याप्रमाणे ही पद्ये उघड उघड राजद्रोही होती होती. पण ती १२१ या दंडाविधीच्या कलमाखाली येतील, असे आमच्यांत त्यावेळी असलेल्या कोणाही वकिलाने सुचवले नाही! १२४अ या राजद्रोहाच्या कलमाखाली काही वर्षे शिक्षा होईल, ही कल्पना बाबांना होती. पण १२१ कलमाची कल्पना त्यांना, व त्यावेळी आम्ही कोणीच तरुण विद्यार्थी वकील (एल्.एल्.बी.) झालो नसल्याने आम्हांला, नव्हती. पण त्यावेळी जे वकिली करीत होते, त्यांना तर ती अवश्य असावयास हवी होती. पण, इतका कायद्याचा अभ्यास करतो कोण? खरेदीखत, गहाणखत, वचन चिठ्या, चोऱ्या, दरोडे, खून, मारामाऱ्या इत्यादी मामुली व्यवहारांपुरतेच त्यांचे ज्ञान. त्यामुळे त्यांनी आम्हां कोणालाही याबद्दल समज दिली नव्हती. जेव्हां बाबा लो. टिळकांना माझिनीचें हस्तलिखित दाखववायास गेले होते, तेव्हां त्यांनीं मात्र हा स्पष्ट उलगडा केला होता. आणि निदान प्रस्तावना तरी गाळा, असा सल्ला बाबांना दिला होता. अर्थात् बाबांनी तो मानला नाही, ही गोष्ट वेगळी. पण कायद्याचे ज्ञान त्यावेळी सामान्य वकिलांना किती असे, यासाठींच हे दिग्दर्शन केले आहे. क्रांतीकरितां असिधाराव्रत आम्हीं घेतले होते. जाणूनबुजून हे विदाही विदारक प्रचारकार्य आम्ही करीत होतो. म्हणून आम्ही त्याच्या होणाऱ्या परिणामांना तोंड देण्यास तयार होतो, ही गोष्ट निराळी.

२.१७ समान गुप्त संस्था आणि त्यांचे संघराज्य

नाशिकप्रमाणे इतर जिल्ह्यांत, महाराष्ट्रांत, क्रांतिकारकांचे अनेक फड व प्रयत्न चालू होते. जेथे जेथे अभिनव-भारताचा सभासद जाई, तेथे तेथे तो राज्यक्रांतिकारक संस्थेचा प्रचारकच बने. अनुकूलता बरीच दिसल्यास तो तेथे गुप्त-संस्थाही स्थापून येई. नाशिक जिल्ह्यांत अशा शाखा त्र्यंबक, भगूर, ओझर, कोठुरें, निफाड, येवले, इगतपुरी, वणी, धोडप इत्यादी ठिकाणी स्थापन झाल्या होत्या. शिवाय पुणे, जुन्नर, मुंबई, पेण, सातारा, नगर, सोलापूर, धुळे, कोल्हापूर, बडोदे, इंदूर, ग्वाल्हेर, औरंगाबाद, हैदराबाद इत्यादी बृहन्महाराष्ट्राच्या नाक्यानाक्याच्या ठिकाणी अभिनव भारताची कैंद्रे होतीच. सातारचे डॉ. आठल्ये हे कळवतात की, ''१९१० मध्ये सरकारी अभिनव भारताचेही सभासद होतेच.'' आणि कोल्हापूरच्या गुप्तसंस्थेचेही काही सभासद अभिनव-भारताचे सदस्य झाले होते. ग्वाल्हेरला तर मोठीच शाखा असून तेथे राज्यक्रांतिकारक कटांच्या खटल्यांत प्रो. डॉ. हरि रामचंद्र दिवेकरांसारखे गृहस्थही गोवले गेले होते.

समान परिस्थितीत विचारी लोकांच्या विचारसरणीला बहुतेक सारखेच वळण लागते. १९०० ते १९१० चा कालखंडच असा होता की, त्यांत राज्यक्रांतीचेच विचार सुशिक्षितांच्या मनांत धुमसत रहावे. आणि ही राज्यक्रांति गुप्त संस्थांमार्फतच केली पाहिजे, हेही तरुण विचारी पिढी जाणत होती. त्यामुळे जेथे अभिनव भारताचा प्रत्यक्ष संबंध नव्हता तेथेही गुप्तमंडळ्या निघतच होत्या. आमच्या कटांत १० वर्षे शिक्षा झालेले रा. त्र्यंबकराव मराठे लिहीतात, ''१९०४ साली मी ट्रेनिंग कॉलेजमध्ये असतांना पुण्यांतल्या एका गुप्त संस्थेमध्ये ट्रेनिंग कॉलेजमधील काही मंडळी सामील झाली होती. (*मला वाटते ही आमची फर्ग्युसन कॉलेजमधलीच संस्था असावी. कारण त्यांत एका बैठकीस ही मंडळी आल्याचें मला आतां स्मरते.*) ट्रेनिंग कॉलेजच्या मंडळींत सातारा जिल्ह्यांतली मंडळी जास्त होती. त्यात कृष्णाजी मारुती कळंबे हे मराठा गृहस्थ होते. पुढे फेण येथेही बरेच क्रांतिकारक मला एकत्र आणतां आले. महाराष्ट्रांत ही चवळवळ निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या लोकांनी सुरुं केली होती. मराठी-इंग्रजी शाळेंतले विद्यार्थीही एकत्र जमून अशाच तऱ्हेचीं खलबते करीत. अशा अनेक संस्थांचा संबंध अभिनव भारताशीं आल्याचें दिसलें नाही.' सेनापति बापटांनींही १९०३ मध्ये स्वतंत्रपणेंच तरवारीवर हात ठेवून क्रांतियुद्धाची शपथ आत्मप्रेरणेनें घेतली होती.

पुण्याला अशा गुप्त संस्था बऱ्याच होत्या. आमच्या कटाच्या खटल्यांतील कै. शंकर पांडुरंग महाजन, भावे, गोपाळराव ओगले (नागपूरचे महाराष्ट्राचे संपादक), व आगाशे हे एका गुप्त संस्थेचे सभासद होते. पण या समान व समांतर चाललेल्या बऱ्याच संस्था अभिनव भारताशी नंतर कोठेंतरी कोणातरी सभासदामार्फत चिकटलेल्या होत्या. पेणच्या संस्थेंतले चालक रा. त्र्यंबकराव मराठे हेच अभिनव भारताचे सभासद कै. गोपाळराव पाटणकर यांच्याशी संबद्ध होते. नाशिकच्या अभिनव भारताशीं संलग्न असलेल्या मित्र-समाजाचे कान्हेऱ्यांच्या बरोबर फाशी गेलेले कृष्णाजी गोपाळ कर्वे हे सभासद होते. कर्व्यांनी पुढे नाशकास व मुंबईस आणि इतरत्रही निराळ्या गुप्तसंस्था काढल्या. त्यांच्या मुंबईच्या शाखेत आमचे गोपाळराव पाटणकर होतेच. १९०८ नंतर माझा व कर्व्यांचा दाट संबंध होता. शिवाय आमच्या अभिनव भारताचे सदस्य आणि स्फोटकास्त्राच्या (बॉम्बच्या) कारखान्याचे चालक रा. रामभाऊ भाटे

यांच्याशीही कर्व्यांचा व खऱ्यांचा संबंध होता. पुण्यास तर सावरकरांनी स्थापलेली अभिनव भारताची शाखा आमच्यानंतर रा. गणपतराव जोगळेकरांनी डेक्कन व फर्ग्युसन कॉलेजांत चालवलेली होती. तिच्याशीं बॉम्बची कृति शिकवणारे रा. कृष्णाजी गोपाळ खरे, वकील, हे मिळूनमिसळून होते. कर्व्यांच्या नाशिक शाखेंतले सभासद व बॉम्बकरितां पिक्रिक ॲसिड तयार करणारे दामुअण्णा चंद्रात्रे हे मूळचे अभिनव भारताची दीक्षा घेतलेले होते. कर्वे व खरे हे नाशिक, मुंबई, पुणे येथल्या स्वतंत्र शाखांचे काम संभाळून अभिनव भारताच्या काही सभासदांशी मिळूनमिसळून राहात. ते कर्तबगार पुढारी असल्याने त्यांना सर्वांशी वेळप्रसंगी मिळते घ्यावेंच लागे.

आमच्यावरील १९१० च्या सशस्त्र राज्यक्रांतीच्या खटल्यांत पुण्यास ३, नाशिकास ३, पेणेस १, येवल्यास १, औरंगाबादेस १, हैदराबादेस १, मुंबईस २, वसईस १ अशा शाखांचे प्रकटीकरण झालेच होते. पुण्यास अभिनव भारताशिवाय, कै. ब्रह्मगिरीबुवांची एक शाखा व डावऱ्यांची एक शाखा अशा ३ संस्था होत्या. नाशकास सावरकर, कर्वे व धारप यांनी काढलेल्या ४ शाखा होत्या. पेणच्या शाखेत रा. मराठे, बापट, कोल्हटकर, जोग, गोखले इत्यादी मंडळी होती. येवल्याच्या शाखेंत कै. काशिनाथ दाजी टोणपे, कै. विनायक सदाशिव बर्वे, नारायणराव जोशी, त्र्यंबकशेठ गुजराथी, शिवराम शेट सोनार, प्रभृति मंडळी होती. औरंगाबादेस नाशिकचे धारप यांनी शाखा काढली होती. ज्याक्सनचा वध करणारा हुतात्मा अनंता कान्हेरे याला येवल्यास टोणप्यांनी अभिनव भारताची शपथ व दीक्षा दिली होती. हैदराबाद (मोंगलाई) येथे रा. विनायक गोविंद तिखे हे कार्यचालक होते. मुंबईस अभिनव भारताच्या शाखेचे काम मजकडे होते. त्यांतच पंतप्रधान बाळ गंगाधर खेर, कै. डॉ. गुणे, चंदावरकर, मुर्डेश्वर वकील, जज्ज झालेले गुंडील, डॉ. सोनपार, सॉलिसिटर थत्ते, डॉ. मंडळी होती. त्यांशिवाय कर्व्यांच्या शाखेत व्यंकटराव नागपूरकर (७ वर्षे शिक्षा भोगलेले), दुगल, ऐंजीनिअर मोघे (इंदूर), गोरे वगैरे सदस्य होते. वसईच्या शाखेत डॉ. परुळेकर, वाघ, गोखले, भाटे वगैरे मंडळी होती (भाटे यांचा लेख). रा. भाटे यांनी आठवतील तेवढी नांवे त्यांच्या निवेदनांत दिली आहेत. साताऱ्याचे डॉ. आठल्ये हेही अभिनव भारताशी संबद्ध होते. ग्वाल्हेरच्या शाखेत प्रसिद्ध डॉ. प्रो. हरि रामचंद्र दिवेकर, देसाई वगैरे ४०-५० मंडळी होती. बडोद्याच्या शाखेत बॅ. केशवराव देशपांडे, प्रो. दत्तोपंत केतकर व राजरत्न माणिकराव यांचा समावेश झाला होता. अशा कैक शाखा अभिनव भारताच्या तर होत्याच, पण कित्येक अगदी स्वतंत्रही संस्था होत्या. सर्वांचें उद्दिष्ट एकच असल्यानें 'समानशीले व्यसनेषु सख्यं' या न्यायानें कोठेंना कोठें तरी, केव्हांना केव्हां तरी, एकमेकांशीं अचानक संबंध येई. आणि एकाच नावेंत आपण प्रवासी आहोंत, हे कळल्यावर जो आनंद होई त्याला तुलनाच नसे. प्रत्येक शाखा स्वतंत्र असून फक्त अध्यक्षामार्फत दुसऱ्या शाखेशी संलग्न असे. गुप्त संस्थांचे असे हे आमचें संघराज्य (confederation) होते. आयर्लंड व रशियांतल्या गुप्त संस्थांच्या धर्तीवर या गुप्त संस्थांचा - सुरक्षिततेसाठीं - एकमेकांचा संबंध फक्त एक-दोन कर्त्या व्यक्तींपुरताच मर्यादित असे. त्यामुळें व्यक्तिशः सर्व संस्थांतील सभासदांची ओळख असणेच शक्य नव्हते; नव्हे ते कटाक्षानेच टाळले होते. आणि या कडक नियमाची अंमलबजावणी कसोशीने पाळण्यांत आली म्हणूनच इतक्या थोड्या लोकांच्या बलिदानावरच इतर कैक संस्था व हजारो सभासद व शस्त्रास्त्रे सुरक्षित राहीली. आज त्यांपैकी कित्येकांची नांवेही आम्हांस माहीत नाहीत. पण त्यांचा अज्ञात त्याग व गुप्त सेवा ही अविस्मरणीय

आहेत. गुप्त संस्थातील सभासदांच्या प्रचंड त्यागाचे व देशभक्तीचे नगारे कधीच वाजवले जात नाहीत. त्यांची तशी इच्छाही नसते. ते शक्यही नसते. पण म्हणूनच ही कीर्तिविन्मुख सेवा अमोल आहे. असो. आपण आतां मूळ विषयाकडे वळूं.

२.१८ इतर प्रांत मंद व थंड

प्रकट कार्य आमच्याप्रमाणेच इतर प्रांताप्रांतांतून चालूंच होते. पण त्यांतही तर-तम भाव तत्रस्थ पुढाऱ्यांच्या व जनमनाच्या मगदुराप्रमाणे असे. प्रकट चळवळीचा परिणाम म्हणजे प्रत्यक्ष राज्यक्रांतिकारक कार्य. त्यांत वंगभंगामुळे बंगालचा नंबर पहीला लागतो. त्याच्या खालचा फक्त महाराष्ट्र! मुंबई प्रांत नव्हे. कारण त्यावेळच्या मुंबई प्रांतांत सिंध, गुजराथ, महाराष्ट्र व कर्नाटक इतके प्रांत समाविष्ट होते. ह्या ४ पैकी ३ विभागांत अगदीच सामसूम होते. गुजराथ तर त्यावेळी मवाळांचा अड्डा. त्यासाठीं तर त्या प्रांतांत सुरतेस १९०७ साली मवाळांनीं कॉंग्रेस भरवली. गुजराथेंतल्या देशद्रोही भांडवलवाल्या बनियांनी तर बंगालने पेटवलेल्या स्वदेशी चळवळीच्या निखाऱ्यांवर विलायती माल, देशी म्हणून, विकून चांगल्या गडगंज फायद्याच्या पोळ्या भाजून घेतल्या होत्या. ह्या भांडवलवाल्या प्रांतांत देशभक्ति ही, आतां व तेव्हाहिं, व्यापाराकरतां, स्वार्थाकरतांच, राबवली जात होती! आजही ‘काळाबाजार’ माजवणारे, आणि लाखों कंगालांना अन्नान्न आणि नागडे करीत हिंडवणारे हरीचे लाल १९०७ ते १९४७ पर्यंत पिढ्यान् पिढ्या या भांडवलदार बनियांतच आहेत. असो. इतर प्रांतांत शांतताच होती. राजद्रोह कमिटीनें आपल्या अहवालांत हेच मत दिले आहे. आणि ह्या जाडमूढ प्रांतांची कर्तृत्वशून्यता ध्यानीं न घेऊन बंगालनें, व काहींसे महाराष्ट्रानें, सबंध हिंदुस्थानला मुक्त करण्यासाठी, क्रांति करावयाचें उतावळेपणानें ठरवले होते! बंगाल व महाराष्ट्र यांतले तरुण या क्रांतीच्या मदानें इतकें धुंद झाले होते की, त्यांना सबंध हिंदुस्थानापैकी ५/८ हिंदुस्थान आपल्या पाठीशीं नाही, हे दिसतच नव्हते. बॉम्बसारखें शस्त्र हातातं आल्यानें आपण इंग्रज सरकारला दे माय धरणी ठाय करूं अशी अननुभूत आणि म्हणून दिव्य भव्य विशाल आशा आम्हांला पुढेपुढे खेंचीत होती. आमचें रम्य स्वप्न होते ते. बंगालच्या तत्कालीन क्रांतिकारकांनी या रम्य पण फसव्या स्वप्नांतच क्रांतीला प्रारंभ केला. ‘राजनैतिक कारस्थान’ या त्यांच्यापैकीच एकानें लिहीलेल्या ग्रंथांत या घाईचा व फसवणुकीचा पुरा परामर्श घेतला आहे. असो.

या प्रकट प्रचारकार्यानंतर आपण अभिनव भारताच्या पुण्या-मुंबईच्या गुप्त व मुख्य कार्याकडे वळूं. ते कार्य म्हणजे संघटनेबरोबर शस्त्रास्त्रांची जमवाजमव व तयारी हे होय.

३ पुण्यातून क्रांतिकार्याचा महाराष्ट्रभर प्रसार

मित्रमेळ्याने नाशकास काय कार्य केले याचा इतिहास बॅरिस्टर व बाबा सावरकर यांच्या चरित्रांत यापेक्षांही तपशीलवार आला आहे. शिवाय विषयानुरोधानें त्याचा उल्लेख वारंवार पुढे येईलच. म्हणून सावरकर बंधूंच्या चरित्रांत फारशी न आलेली, पुणे व मुंबई केंद्रांतली, मला आठवते तितकीच, माहिती येथे संकलित करून देत आहे.

३.१ पुण्यांतल्या मित्रमेळ्याच्या शाखा

तात्याराव सावरकर मॅट्रिक पास झाल्यावर पुण्यास १९०१-२ मध्ये फर्ग्युसन कॉलेजमध्ये उच्च शिक्षणासाठी गेले. लो. टिळकांनीं ते कॉलेज स्थापलें असल्यामुळे त्या नांवांतच देशभक्तीची जादू भरलेली होती. कॉलेजचे चालक मात्र ना. गोखल्यांचे अनुयायी असल्यानें, आणि कॉलेजच्या नियामक मंडळांत काही इंग्रजनिष्ठ राजेरजवाडे होते म्हणून, अगदींच 'मवाळ' होते. त्यामुळेंच त्यांचा व स्वातंत्र्य-लालसेनें भारलेल्या तरुण विद्यार्थ्यांचा वारंवार खटका उडे. पण फर्ग्युसनमध्ये शिकवणारे रँग्लर परांजपे, राजवाडे, भाटे, अभ्यंकर वगैरे अध्यापकांच्या स्वार्थत्यागाची भूमिका स्वदेशभक्तीचीच होती यांत शंका नाही. त्यांच्या या खोल दडलेल्या देशभक्तीची व त्यागाची जाणीव विद्यार्थ्यांना होती; आणि म्हणूनच देशप्रेमानें रसरसलेले पण सामान्यतः मध्यम वर्गातले विद्यार्थी या फर्ग्युसन कॉलेजांतच येत. त्यांत महाराष्ट्र, मध्यप्रांत, वऱ्हाड, व कर्नाटक यांतील विद्यार्थ्यांचा भरणा असे. सावरकरांनीं पहील्याच वर्षांत आपल्या अमोघ वक्तृत्वानें व चळवळ्या स्वभावामुळें विद्यार्थ्यांचीं मनें आकर्षून घेतलीं. प्राध्यापकांनाही त्यांच्या बिनचूक तर्कशुद्ध वादपटुत्वाचें व वक्तृत्वाचें कौतुक वाटे. मित्रमेळ्याच्या प्रकट कार्याला या त्यांच्या अलौकिक गुणांचा अतिशय फायदा होई. साखरेला मुंग्या लागाव्या त्याप्रमाणें त्यांच्याभोंवतीं गुणज्ञ विद्यार्थ्यांचीं मनें आपोआप आकर्षिली गेलीं; आणि त्यांनी त्यांच्यापैकी योग्य तरुणांची निवड करून १९०२ मध्ये फर्ग्युसन कॉलेजमध्येच मित्रमेळ्याची एक शाखा स्थापली. त्यावेळी सावरकर, सोलापूरचे (आता कै.) ग. वि. रानडे, जुन्नरचे ग. वा. जोगळेकर (वकील), रा. अथणी, ओक, गोडबोले, दाजी नागेश आपटे, पानसे, थत्ते हे व इतर कांही या शाखेचे पहीले शपथबद्ध सभासद झाले.

१९०२ च्या अखेरीस माझीही मॅट्रिक्युलेशन परीक्षा उतरून मीही १९०३ मध्ये फर्ग्युसनमध्येच प्रविष्ट झालो, आणि १९०५ अखेरपर्यंत सावरकरांचा सहाध्यायी व सहवासीच होतो. चतुःशृंगीच्या अलीकडील टेकडीवर किंवा फर्ग्युसनच्या मागच्या टेकडीवर, आमच्या या मित्रमेळ्यांतल्या शपथबद्धांच्या साप्ताहीक बैठकी भरत; आणि त्यांत एका कोणत्या तरी उपयुक्त विषयावर चर्चा, वादविवाद होई. लेखनाचा सराव असावा म्हणून चौथ्या क्लबांत त्या वेळी आम्ही एक हस्तलिखित साप्ताहीकही चालवीत असूं. सावरकर, आपटे व मी हेच बहुतेक त्यांत कोणत्या तरी देशविषयक प्रश्नावर निबंध वा कविता लिहीत होतो. सावरकरांची श्रीशिवाजीची भूपाळी यांतच प्रथम प्रसिद्ध झाली. आमच्या या शाखेंत नंतर बऱ्याच नवयुवकांची भरती झाली. काळकर्ते परांजपे यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्रीकृष्ण शिवराम परांजपे, वकील; दत्तात्रय परशराम चिंचाळकर, अमळनेरचे वकील; ह. ब. भिडे (पुढे सामळदास कॉलेजमध्ये अध्यापक);

वासुदेवराव मोहोळकर, वकील; सोलापूरचे अंत्रोळीकर, वकीलबंधुः पुढे डि.डे.कलेक्टर झालेले संत, काका कालेलकर, गोविंदराव थत्ते, दत्तोपंत तर्खडकर, (पुढे डेप्युटी ए. इन्स्पेक्टर); हरि अनंत रिसबूड, काका गोखले, बी.ए. (सरकारी नोकर); पाटणकर वगैरे नवीन मंडळी जुन्यांच्या भरतीला येऊन शाखेला चांगलेच बाळसें चढलें.

३.२ ट्रेनिंग कॉलेजांतील शाखा

आमच्यापैंकी काही जे गांवांत राहात होते त्यांनीं गांवांतच नंतर शाखा काढल्या. आम्हांखेरीज स्वतंत्र अशाही काही तरुणांनी या एकाच उद्देशानें स्वतंत्र संस्था चालवल्याच होत्या. त्यांपैकी माझे नातलग (आता कै.) शंकर पांडुरंग महाजन, सन्मित्र-समाज मेळ्याचे पुरस्कर्ते - यांचीही एक संस्था होती. शिवाजी-उत्सव, गणेशोत्सव व इतर चळवळींत जी व्याख्यानें होत त्यांच्यांतूनही या संस्थांना उत्तेजक असा स्वातंत्र्यप्राप्तीचाच सूर निघे. 'केसरी', 'काळ', भोपटकर-बंधूंचा 'भाला' या साप्ताहीकांतून 'स्वातंत्र्यप्राप्तीशिवाय हिंदुस्थानास तरणोपाय नाही, क्रांतीशिवाय ती गोष्ट होणे शक्य नाही, इंग्रज येथून गेल्याशिवाय किंवा घालविल्याशिवाय सर्व प्रयत्न व्यर्थ आहेत, मवाळांच्या धोरणानें काहीच साध्य होणार नाही,' या तत्त्वांचेंच लोणी, इतिहासाचें ताक घुसळून निघत होते. काळाचें तर 'पारायण'च चाले. परदेशांतल्या क्रांतिकारकांची उदाहरणें देऊन 'काळ' सशस्त्र क्रांतीचा जाळ भडकवीत होता. तरुणांची मनें त्याच्या आचेनें तापून निघत होती. आणि मित्रमेळ्यांत किंवा इतर क्रांतिकारक संस्थांत आपोआप ओढली जात होती. फर्ग्युसन कॉलेजप्रमाणे मराठी शाळामास्तरांकरितां काढलेल्या ट्रेनिंग कॉलेजमध्येही अशीच क्रांतिकारकांची शाखा होती हे मागे सांगितलेच आहे.

३.३ डेक्कन कॉलेजांतला प्रसार

त्या कालखंडांत ज्यूनिअर बी.ए.मध्ये असतांना फर्स्ट एल्.एल्.बी.ची परीक्षा उत्तीर्ण होण्याची सवलत होती. १९०४ मध्ये सावरकर, व १९०५ मध्ये मी, त्या परीक्षेसाठी टर्मस् भरण्यास डेक्कनमध्ये संध्याकाळी जात असूं. तेथे तेव्हां शिळोप्याच्यां वेळी सरकारी वकील रा. व्यंकरटाव आम्हांस एक तास रोमन लॉ व ज्युरिसप्रूडन्स या विषयांवर व्याख्यान झोडीत असत. त्यांच्या व्याख्यानाकडे अर्थात् कोणाचेंच फारसें लक्ष नसे, हे त्यांनाही कळत होते. पण पगारासाठी ती उठाठेव करणे त्यांना भागच होते. आम्ही परीक्षा उत्तीर्ण व्हावें, ही मात्र त्यांची मनापासून इच्छा असे. आणि म्हणून आम्हां चुकारतट्टूंना ते शेवटीं त्यांच्या विषयाची एक सुबोध जंत्री करून छापून वाटीत. कित्येक विद्यार्थी तर ती घोकूनच उत्तीर्ण होण्यापुरते गुण मिळवीत. पूर्वपरीक्षेंत (प्रिलिमिनरी) तर प्रश्नांच्या उत्तरांऐवजी काहीही लिहीले, किंवा न लिहीतां चित्रेंही काढलीं, तरी सर्वच विद्यार्थी योग्य ठरून व्यंकटराव आम्हांस परिक्षेसाठीं पाठवीत! विश्वविद्यालयांत मात्र अर्थातच अभ्यासाच्या मगदुराप्रमाणें निकाल होत. या परीक्षेंत सावरकर १९०४ मध्ये उत्तीर्ण झाले. दाजी नागेश आपटे व मी १९०५ मध्ये यथाक्रम पहील्या वर्गांत आलों.

हे सांगण्याचा मुद्दा एवढाच की, आम्ही फर्ग्युसनचे विद्यार्थी असतांच, आम्हांस डेक्कन कॉलेजांत प्रवेश मिळण्याची संधी सहज आली. आणि आम्हीं तेथेही आमचें जाळें पसरण्याचा

उद्योग चालूं केला. रा. बाबासाहेब खापर्डे, रणदिवे, पांडे, बापट हे त्यावेळी तेथे होते. त्यांचा परिचय तेथे अनायासेंच झाला. डॉ. सेल्बी व प्रो. बेन यांच्यासारखे इंग्रज लोक प्राध्यापक असताना डेक्कन कॉलेजांतही क्रांतिवृक्षाचीं मुळें रुजलीं होती. सेनापति बापटांनी १९०३ मध्ये तरवारीवर हात ठेवून तेव्हांच स्वातंत्र्यप्राप्तीची शपथ घेतली होती. रा. देवभानकर व आतांचे सर गुरूनाथ बेवूर हे बापटांप्रमाणेंच तेव्हां ज्वलंत देशभक्त गणले जात असत. फर्ग्युसन कॉलेज, ट्रेनिंग कॉलेज, डेक्कन कॉलेज या तिन्ही उच्च शिक्षणाच्या पीठांतून आमच्या क्रांतितत्त्वांचा प्रचार, आणि क्रांतिकारकांचा परिचय, याप्रमाणें १९०२ पासून तों १९०७ पर्यंत अखंड चालू होता. १९०५ मध्ये सावरकर बी.ए. होऊन मुंबईस दुसऱ्या एल्‌एल्‌.बी.च्या अभ्यासास १९०६ च्या प्रारंभी गेले. मी बी.ए. साठीं पदार्थविज्ञान (फिजिक्स्) आणि रसायनशास्त्र हे विषय ऐच्छिक म्हणून घेतले होते. फर्ग्युसनमध्ये या विषयांचे तेव्हांचे आमचे प्राध्यापक रा. केशवराव कानिटकर हे होते. पण त्यांना १९०६ मध्ये, एम्‌.ए.च्या परीक्षेस बसावयाचें असल्यानें, आम्हांस शिकवण्यास मुळींच वेळ नसे व त्यांचे लक्षही नव्हते. म्हणून मीही मुंबईस विल्सन कॉलेजमध्ये, या विषयांच्या अभ्यासासाठीं, १९०६ च्या प्रारंभी गेलों. आणि फर्ग्युसन शाखेचें काम रा. गणपतराव जोगळेकर यांच्या अंगावर त्यानंतर पडलें.

३.४ विलायती कपड्यांची चिता

सावरकर हे १९०५ मध्ये बी.ए.च्या वर्गात असतांना वंगभंगाची चळवळ सुरू होऊन स्वदेशी, बहीष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही चळवळीची चतुःसूत्री तेव्हां फोफावत चालली होती. स्वदेशीचा माल शक्य तोवर, त्याग सोसूनही, वापरावयाचा व इंग्रजी मालावर बहीष्कार टाकावयाचा, हे त्या चळवळीचें प्रधान सूत्र होते. इंग्रजांबद्दल पेटत चाललेल्या द्वेषाच्या स्फोटास बहीष्काराची कल्पना फारच अनुकूल होती. त्या द्वेषाचे प्रतीक म्हणून विलायती वस्तु जाळून टाकण्याची, त्यांच्या होळ्या पेटवण्याची, कल्पना निघाली. मवाळ, व रु. आ. च्या पैच्या हीशेबानें देशाभिमान व पारतंत्र्याबद्दलचा जळजळीत द्वेष या तत्त्वांना पारड्यांत घालून तोळामासा करणारे पुढारी, अर्थातच या होळ्यांच्या विरुद्ध होते. पण सर्वस्वावर, प्राणावरही, उदक सोडणारे उदार तरुण या घेलाशेटी हीशेबांना थोडेच जुमानणार? पुण्यासही विलायती कापडाची, कपड्यांची, टोप्यांची होळी झालीच पाहिजे, हा आग्रह सावरकरांच्या अनुयायांनी धरला. आणि त्याप्रमाणें शिवरामपंत परांजप्यांच्या अध्यक्षतेखालीं, फर्ग्युसनच्या जवळच्या मैदानांत, विलायती कपड्यांची चिता पेटवून इंग्रजी मालाचें चिताभस्म अंगास लावून, आम्ही कृतकार्यही झालो !

३.५ सावरकर-जोगळेकरांची हद्दपारी

पण याचेंच निमित्त कॉलेजच्या चालकांपुढे ठेवून सावरकरांना काही तरी शिक्षा करा, असा नेट सरकारनें चालकांना लावला. आणि सरकारच्या त्या इच्छेला मान तुकवून फर्ग्युसनमधून सावरकरांना १०रुपये दंड करून हद्दपार करण्यांत आले! सावरकरांचें त्यामुळे फारसें नुकसान काहीच झाले नाही. परीक्षेस बसण्याइतक्या त्यांच्या टर्म्स भरल्या होत्या. उपान्त्य परीक्षा होऊन त्यांना परीक्षेस फॉर्मही मिळाला होता. म्हणून ते परीक्षेस बसूं शकले व उत्तीर्णही झाले.

सरकारच्या या कृत्यामुळें सावरकरांची लोकप्रियता मात्र शिगेस पोंचली. या हद्दपारींत रा. हरिभाऊ रिसबुडांकडेच सावरकर राहात होते.

फर्ग्युसनमध्ये असतांना मित्रमेळ्याचें मन:क्रांतिकार्य जें चालूं होते ते काहीसे गुप्त व पुष्कळसें प्रकट असे परस्परविरोधी होते, ही गोष्ट खरीच. आणि यामुळेंच काही क्रांतिकारक आमच्यापासून फटकून वागत. त्यांतच पुढे आमचे बॉम्बच्या कारखान्याचे सूत्रचालक रा. कृष्णाजी गोपाळ खरे, हरिभाऊ भागवत, आतांचे मुंबई प्रांताच्या विधिमंडळाचे अध्यक्ष रा. कूंदनमल सो. फिरोदिया हे होते. सावरकर व मी फर्ग्युसन सोडून जाईपर्यंत त्यांनी आपल्या विरोधाला वाचा फोडली नव्हती. पण पुढे रा. गणपतराव जोगळेकरांच्या हातीं सूत्रें गेल्यानंतर त्यांनी जोगळेकरांना व काका कालेलकरांना रात्रींच्या वेळी, त्यांच्या धैर्याची व प्रतिकारक्षमतेची कसोटी पाहण्यासाठीं, टेकडीवर गुप्त खलबत करण्याच्या मिषानें बोलाविलें. आणि ते तेथे पोंचल्याची चाहूल लागतांच वेष पालटून खरे, आवटी, अमळनेरचे फाटक व फिरोदिया यांनी त्यांच्यावर हल्ला केला व चांगलाच मार दिला, असे रा. जोगळेकर आपल्या माहितीपत्रकांत म्हणतात. खरे व फिरोदिया यांच्या कसोटीस जोगळेकर व काका कालेलकर उतरले की नाही हे माहीत नाही. पण हा प्रसंग घडला खरा. नंतर खरे मुंबईस रसायनशास्त्राचा विषय घेऊन एम्.ए. होण्यासाठीं आले. फिरोदियाही नंतर वकील होऊन क्रांति-कार्यापासून अलग झाले (जोगळेकरांची माहिती).

सावरकरांना जसें फर्ग्युसनच्या चालकांनी हद्दपार केले त्याचप्रमाणें रा. जोगळेकरांवरही तोच प्रसंग नंतर ओढवला. पण मौज ही की, फर्ग्युसनच्या चालकांनी राजद्रोही ठरविलेला हा विद्यार्थी खुद्द सरकारच्या डेक्कन कॉलेजमध्ये प्रो. बेन यांनी घेतला! फर्ग्युसनच्या अतिरेकी मवाळपणाचें हे भडक दर्शनचिन्ह होते. डेक्कनमध्ये गेल्यावर जोगळेकरांनी आतां कलेक्टर असलेले मोडक, आवटी, अमळनेरचे फाटक व इतर तरुण देशभक्तांना जमवून तेथेही आपल्या क्रांतिकारक शाखेचें काम चालविलें होते. क्रॉंग्रेसचे नुकतेच अध्यक्ष झालेल्या किरपालानींना जोगळेकरांनींच ‘अभिनव भारतां’त आणलें होते. पुढे जोगळेकर वकिलीच्या अभ्यासासाठी मुंबईस आल्यावर, व सरकारच्या उग्र व क्रूर धोरणानें टिळक-परांजपे यांच्यावर खटले करून त्यांना कठोर शिक्षा १९०८ मध्ये दिल्यावर, पुण्याची शाखा अस्तंगत झाली.

३.६ इतर कार्यें

पुण्यास आमचें क्रांतितत्त्वप्रसाराचें काम चालू असतांच सावरकरांनीं दोन महत्वाच्या गोष्टी केल्या. एक म्हणजे काळकर्ते अण्णासाहेब परांजपे यांना १९०५ मध्ये गणेशोत्सवाच्या निमित्ताने नाशिकचे आमंत्रण देऊन नाशिकचे क्रांतिकार्य त्यांच्या नजरेखालीं घातले ही होय. आणि दुसरी म्हणजे नाशिकच्या मित्रमेळ्याच्या गणेशोत्सवासाठीं तयार केलेला मेळा पुण्यास लो. टिळकांच्या गायकवाड वाड्यांतील उत्सवासाठी आणवून तेथे कै. गोविंदकवींनीं व सावरकरांनीं केलेलीं क्रांतिकारक पदें त्यांच्या पुढे गाऊन दाखवून त्यांची शाबासकी मिळवली ही. या दोन्ही लोकोत्तर महाभागांनी आमचें क्रांतिकार्य पाहून जे धन्यवाद दिले त्यामुळें आम्हां नवजवानांना मूठभर मांस चढलें असल्यास नवल नाही.

आमच्या पुण्याच्या शाखेपैकी एक उत्तम लेखक म्हणून रा. दाजी नागेश आपटे हे प्रसिद्ध होते. त्यांनीं ‘नरकाचा दरबार’ हा लेख टोपण नांवानें ‘भाला’ पत्रांत प्रसिद्ध केल्यामुळें भालाकार भास्करराव भोपटकरांवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना शिक्षा झाली. आपल्यामुळे दुसऱ्यास शिक्षा झाली या कल्पनेनें ते फारच खट्टू झाले; आणि त्यानंतर त्यांनी क्रांतिविषयांत लेखणीला जो विराम दिला तो कायमचाच ठरला. सरकारला ही बातमी कळलीच होती. त्यामुळें त्यांचा छळही पुष्कळ झाला आणि त्यामुळें त्यांना प्रांतांतरही करावे लागलें.

३.७ सिंहगडावरील सफर

पुण्याच्या या आमच्या वास्तव्यांत आम्ही क्रांतिकारकांनी मिळून सिंहगडावर केलेली सफर स्मरणीय होती. श्रीशिवछत्रपतींच्या क्रांतिकार्यांत कायावाचमनें करून धारातीर्थि पतन पावलेल्या तानाजीचें दर्शन घेऊन, आम्हा आमच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या शपथांना त्यांच्या समाधीवर हात ठेवून पुनः तीक्ष्ण धार चढवली. तेथली आमची सभा, त्यांतलीं आवेशयुक्त भाषणें, तेथे केलेल्या आमच्या प्रतिज्ञा, सर्वच काही इतकें हृदयंगम होते की, त्याची स्मृति आज जवळ जवळ ५० वर्षांनंतरही ताजी आहेशी वाटते. श्रद्धाळू लोक ज्या भक्तिभावानें काशीरामेश्वरास जातात त्याच भक्तिभावानें आम्ही सिंहागडावर गेलो होतो. आणि त्या वीरपुरुषाच्या समाधीवर डोकें ठेवून जेव्हां आम्ही आमच्या क्रांतिकार्यास त्या अदृश्य नरवीराचा आशीर्वाद मागत होतो तेव्हां तो नरशार्दूल जणुं काय आमच्या समोर उभा आहे, असेच आम्हांस तेव्हां वाटत होते. तारुण्यसुलभ अशा आमच्या क्रांतिकार्याच्या आशा व आकांक्षांना त्या सफरीमुळे फारच बहर आला होता.

३.८ बृहन्महाराष्ट्रभर क्रांतिकारकांचा प्रसार

पुणें हे उच्च शिक्षणाचें एक अत्यंत महत्त्वाचे असे महाराष्ट्रांतले केंद्र असल्यानें पुण्यास आमच्या क्रांतितत्त्वप्रसाराच्या कार्यास पुष्कळच वाव मिळाला. बृहन्महाराष्ट्र व कर्नाटक यांतले होतकरू तरुण विद्यार्थी या शहरांतल्या उच्च विद्यालयांत येत असल्यानें, आणि येथला विद्याभ्यास संपवून ते आपापल्या ठिकाणीं विखरून जाऊन सुप्रतिष्ठित होत असल्यानें, त्यांच्यातूनच क्रांतिकार्योन्मुख तरुण हुषार विद्यार्थी निवडणें हे आम्हांस इष्ट व सुलभ होते. त्यांच्या निवडीनंतर त्यांना क्रांतितत्त्वांची दीक्षा देणें, विद्याभ्यासाबरोबर प्रबोधशक्तीचीं उत्कृष्ट साधनें म्हणजे वक्तृत्व, लेखन व वादकुशलता यांत त्यांना तरबेज करणे, रोजच्या व्यायामानें त्यांचीं शरीरेही मनाबरोबरच सदृढ करणे हे येथे आम्हांस फारच सोयीचें झाले. ट्रेनिंग कॉलेजांत शिकून खेडोपाडीं शाळेवर जाणारे शिक्षक हे तर आमच्या क्रांतिकार्याला फारच उपकर्ते झाले. त्यामुळें शेंकडो खेड्यांतून क्रांतिकार्याचा प्रसार होईल, अशी आमची आशा दुणावत होती. केसरी, काळ, भाला, विहारी यांसारखीं क्रांतितत्त्वप्रचारक वृत्तपत्रें, आणि ती खेडोपाडीं तिखटमीठ लावून शिकवणारे समाजवणारे शिक्षक, यांचा संयोग क्रांतिप्रचाराला फारच अनुकूल होता. डेक्कन, फर्ग्युसन व इतर कॉलेजांतून पदवीधर होणारे तरुण हे जर येथेच क्रांतितत्त्वाने भारले गेले तर हे तरुण आपापल्या शहरांतून नवीन नवीन क्रांतिकेंद्रें निर्माण करतील अशी आम्हांस प्रबळ आशा वाटें. म्हणून पुण्यांतलीं हीं महत्त्वाचीं शिक्षण केंद्रे हींच आमच्या क्रांतिकार्याची केंद्रे

आम्ही ठरवून त्या उद्योगाला अहर्निश लागलों होतो; आणि आमच्या अपेक्षेप्रमाणें आम्हांस थोडेंबहुत यशही मिळालें होते. महाराष्ट्रांतलें असे महत्त्वाचे शहर किंवा गांव नव्हते की, जेथे या आमच्या केंद्रांतून आमचा एखाद-दुसरा तरी क्रांतिदीक्षा घेतलेला तरुण नव्हता. पुणें, मुंबई या शहरांखेरीज उच्च शिक्षणाचीं कॉलेजें इतर ठिकाणीं तेव्हां नव्हतीं. त्यामुळे या दोन शहरांतलीं हीं मोक्याचीं ठिकाणें काबीज करणे, तेथल्या योग्य तरुणांना क्रांतिदीक्षा देणें, त्यांची शारीरिक, मानसिक, बौद्धिक तयारी करून त्यांना ठिकठिकाणीं क्रांतिकेंद्रें निर्माण करण्यास प्रवृत्त करणे, हे त्या वेळचें आमचें फारच मोठें कार्य होते; आणि आम्ही ते यथाशक्ति करीतही होतो. अपेक्षेप्रमाणें सर्व गोष्टी घडत गेल्या असत्या तर महाराष्ट्रांतील आमच्या कार्यकर्त्यांची करामत दिसूनही आली असती. पण भवितव्य निराळी होती. हे सर्व कार्य गुप्ततेनेंच चाललें असल्यानें त्याचा उदयास्तही अखेरीस गुप्तच झाला. या अनिवार्य गुप्ततेमुळेंच आमच्या कार्याची महती, त्याचा व्याप, विस्तार आणि प्रसार, यांची कल्पनाही आतां करून देणें अशक्य आहे. पण आम्हीं आमचें कर्तव्य केले, एवढेंच समाधान आम्हांस पुरेसें आहे.

४ मुंबईतल्या प्रकट व गुप्त चळवळी

१९०६ मध्ये सावकर व मी मुंबईस गेल्यानंतर तेथेही आम्ही आमच्या क्रांतिप्रचाराचे कार्य सुरू केले. त्यावेळी 'विहारी' हे मुंबईस निघणारे वृत्तपत्र सावरकरांच्या हाती आल्याने क्रांतिप्रचाराचें नवे दालन त्यांनी त्यांत उघडले. प्रथम ते पत्र आमच्या क्रांतिकारकांपैकीच एक असलेले, व 'संपूर्ण विवेकानंद' व 'रामतीर्थ' या ग्रंथमालांचे कर्ते, रा. भास्कर विष्णु फडके हे काढीत असत. मूळचें ते रा. फाटक यांचें. पण ते नुसते व्यवस्थापक असत, लेखक नव्हते. सावरकर त्यांत लिहूं लागल्यापासून ते फारच जहाल व लोकप्रिय झाले, आणि त्याचा खपही खूपच वाढला. त्या 'विहारी'च्या लेखांत सावरकरांचें काही सर्वोत्कृष्ट लेख आलेले मला अद्याप आठवतात. दुर्दैवाने त्याच्या फायलीही राहीलेल्या कोठें आढळत नाहीत. त्या सांपडल्या तर सावरकरांच्या काव्यप्रतिभेचा उत्कृष्ट विलास व नर्तन त्यांत सांपडेल. सावरकरांच्या विलायतेच्या प्रयाणानंतर मीही 'विहारी'त काही लेख लिहीत होतं. पण त्या पत्रांतले काही लेख राजद्रोही ठरवून सरकारनें भास्कररांव फडक्यांना, व पुढेरा. रामभाऊ मंडलिकांना, शिक्षा ठोठावल्या, आणि त्यामुळें त्या पत्राचा अंत झाला.

या पत्रलेखनाबरोबर आम्ही मुंबईच्या नवयुवकांना गांठून अभिनव भारताची त्यांना शपथबद्ध दीक्षा देण्याचें कार्य व साप्ताहीक गुप्त सभांचे कार्यक्रम चालूंच ठेवले होते. मी त्या वेळी विल्सन कॉलेजांत गेलों होतो व सावरकर लॉ-क्लासमध्ये होते. विल्सन कॉलेजमध्ये त्यावेळी आतांचें पंतप्रधान रा. बाळासाहेब खेर, पुढे संस्कृत विषयांत डॉक्टरेटची पदवी मिळालेले (आतां कै.) डॉ. प्रो. गुणे, धारवाडचे चंदावरकर, पुढे डिस्ट्रिक्ट जज्ज झालेले रा. गुंडिल, मुंबईस वास्तव्य करून राहीलेले नामांकित वकील मुर्डेश्वर, वगैरे माझे सहाध्यायी होते. या सर्वांना आम्ही अभिनव भारताचे सभासद करून घेतले होते, हे मागेच सांगितले आहे. नेहमीच्या आमच्या काही साप्ताहीक बैठकी चिखलवाडीतल्या चाळीत, काही शास्त्री हॉलमध्ये, काही आम्ही राहात होतो त्या लॉजमध्ये, काही इतर ठिकाणी आम्ही भरवीत होतो. आमच्या बरोबर मुंबईस विद्याभ्यासासाठीं आलेले रा. थत्ते, आपटे वगैरे फर्ग्युसनमधील मित्रही होतेच. त्यांखेरीज डॉ. थत्ते, बडोद्याचे सरदार मुजुमदार, डहाणूचे करंदीकर, रा. भाटे, पाटणकर, गोरे, शिवरामपंत अभ्यंकर, डॉ. भडकमकर, डॉ. आठवले, ग. र. वैशंपायन (हिंदी कोशकर्ते) व रा. आबासाहेब सहस्रबुद्धे (बेलापूर) हेही या गोटांत दाखल झाले होते.

४.१ माधवाश्रमांतला आमचा अड्डा

१९०६ च्या उत्तरार्धांत, सावरकरांना शामजी कृष्णवर्मांची शिष्यवृत्ति मिळून ते विलायतेस बॅरिस्टर होण्यासाठीं गेल्यावर, मुंबईच्या शाखेचें काम माझ्या अंगावर पडलें. त्या वर्षाच्या अखेरीस मी बी.ए.च्या परीक्षेत उत्तीर्ण होऊल लॉ-कॉलेजमध्ये एल्‌एल्.बी.च्या टर्म्स भरूं लागलो. त्यावेळी १९०७ मध्ये मी माधवाश्रमांत (मोहन बिल्डिंगमध्ये) राहात होतो. आमच्या कार्याचा तोच अड्डा झाला. सकाळ-दुपार मेडिकल कॉलेजांत, आणि संध्याकाळी लॉ-क्लासमध्ये, अशा दुहेरी अभ्यासक्रमांत माझा बराच वेळ जाई. पण एल्‌एल्.बी. होऊन वकील झालो, व क्रांतिकार्यांत पडलेला म्हणून जर सरकारने वकिलीची सनद रद्द केली, तर वकिलीची व

संसाराची धुळधाणच होणार, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट होती. कित्येक राजद्रोही वकिलांच्या सनदा सरकारने हायकोर्टामार्फत रद्द केल्याच होत्या. ते उदाहरण डोळ्यापुढे असल्याने, व या क्रांतिकार्यांत केव्हां तरी सरकारचा रोष होणारच हेही नक्की असल्याने, मी एल्एल्.बी.बद्दल फारसा उत्सुक नव्हतो. पण माझाही शिक्षणक्रम सावरकरांप्रमाणेंच माझ्या श्वशुरांच्या मदतीवर अवलंबून होता. आणि एम्.बी.बी.एस्. चा शिक्षणक्रम महागडा असल्याने कदाचित् तो अपुराच राहील अशी भीती होती. म्हणून फर्स्ट एल्एल्.बी. पास झालोच असल्याने दुसऱ्या एल्एल्.बी.च्या टर्म्स तरी पदरांत पाडून घेऊन, साधल्यास ती परीक्षाही देऊन ठेवावी या उद्देशाने हे दुप्पट ओझे मी पत्करले होते. आणि माझ्या अपेक्षेप्रमाणे मला शेवटी तुरुंगवासानंतर डॉक्टरीचाच आधार मिळाला. असो.

४.२ बंगाली क्रांतिकारकांशी नाते जुळवले

लॉ-क्लास व मेडिकल कॉलेजमध्येही माझे क्रांतीला अनुकूल असणाऱ्या तरुणांचा लोकसंग्रह करण्याचे कार्य चालूंच होते. १९०६ ते १९०८ ही वर्षें ही हिंदुस्थानांत फारच धामधुमीची होती. १९०६ त क्रॉग्रेसमध्ये जहाल पक्ष प्रबळ होत चालला होता. त्या डिसेंबरांत कै. दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्त्यास कॉंग्रेसचे अधिवेशन होऊन त्यांत स्वराज्यप्राप्तीचा ठराव पास झाला होता. स्वदेशी, बहीष्कार व राष्ट्रीय शिक्षणाबरोबर, वंगभंगामुळें संतप्त झालेल्या बंगाली लोकांच्या आग्रहामुळें, स्वराज्याचा ठराव करणे कॉंग्रेसला भागच झाले होते. राज्यकर्ते ठरावाने चिडतील व आपले कोणतेच म्हणणे ऐकणार नाहीत, असे मवाळांना वाटे म्हणून त्यांना हे पसंत नव्हते. आणि त्यामुळे ते स्वराज्याच्या ठरावाविरुद्ध होते. यानंतर बंगाल, मध्यप्रांत व महाराष्ट्र या प्रांतांत राजकीय चळवळ फोफावतच गेली. बंगालच्या वृत्तपत्रांवरून तर तेथे क्रांतिकारकांची हालचाल चालूं असलीच पाहिजे, असा संशय सरकारास, व आम्हां इकडच्या क्रांतिकारकांसही, येऊ लागला होता. तेथे होणारी राजद्रोही व्याख्याने व वृत्तपत्रांतले राजद्रोही लेख यांच्यावर जे खटले सरकार करीत होते त्यांत सशस्त्र राज्यक्रांतीचा सूर स्पष्टपणे दृग्गोचर होत होता. ‘युगांतर’, ‘संध्या’, ‘वंदे मातरम्’ यांसारखीं वृत्तपत्रें तर उघडउघड राजद्रोहाचा व सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करीत होती. ‘अनुशीलन-समिति’, ‘स्वाधीन भारत’ हीं साधीं नांवे धारण करणाऱ्या गुप्त संस्था तेथे क्रांतिकार्यांत मग्न होत्या, हेही आम्हांस कळलें होते. बाबा सावरकरांचे मित्र सदाशिवराव पालेकर (इष्टंगुंडू) यांना बाबांनी मुद्दाम तेथे पाठवून तेथल्या क्रांतिकारकांत प्रवेश करून घेतला होता. म्हणून तेथे प्रत्यक्ष जाऊन, तेथल्या क्रांतिकारकांच्या कार्याचा व्याप किती आहे, शस्त्रास्त्रें व इतर साधनें किती जमवली आहेत हे पहावें, तेथल्या क्रांतिकारकांशीं गाढ स्नेह जोडावा, आणि सहकार्यानेंच साऱ्या देशभर, निदान बऱ्याच प्रांतांत तरी, एकदम सशस्त्र क्रांतीचा उठाव करण्याची योजना आखावी, या हेतूनें मी व नाशिकचे त्या वेळचे पुढारी रा. बाबासाहेब खरे, वकील, या कॉॅंग्रेसच्या अधिवेशनाचें निमित्त करून, कलकत्त्यास गेलों आणि ८-१० दिवस तेथे राहून तेथल्या ‘स्वाधीन भारत’, ‘अनुशीलन-समिति’ वगैरे गुप्त संस्थांच्या चालकांशी संधानें बांधून, तेथल्या व्यापाची कल्पना घेऊन परत आलों.

बंगालमधली तयारी आमच्याप्रमाणेंच, पण अधिक मोठ्या प्रमाणावर, चालली होती. शेकडो क्रांतिकारक तरुण गुप्त संस्थांतून क्रांतीचे जाळे भरगच्च आणि घट्ट विणीत होते. बंगालवर कर्झनशाहीचा कडक अंमल इतका चालू होता की, साधे 'वंदे मातरम्' हे शब्द उच्चारण्यासही बारिसाल जिल्ह्यांत प्रतिबंध होता. ले. गव्हर्नर फुल्लर हा 'गोळ्या घालून मारूं' अशी लोकांस धमकी देत होता. बंगल्यांतील नामांकित कार्यकर्ते हद्दपार होत होते. नवे दडपशाहीचे कायदे कर्झन पास करून घेत होता. त्यामुळें बंगाली क्रांतिकारक तर सारखे आग ओकीत होते. राजद्रोही म्हणून शाळा-कॉलेजांतून हद्दपार केलेले विद्यार्थी व शिक्षक राष्ट्रीय शाळा काढून त्यांत सशस्त्र क्रांतीचें, गुप्त संस्थांचे, शिक्षण देत घेत होते. याप्रमाणे सर्व बंगालभर वंगभंगानें क्रांतीच्या विचारांचा वणवा पेटवून दिला होता. प्रमथनाथ बानर्जी, चित्तरंजन दास, सेनगुप्त, चटर्जी, चक्रवर्ती वगैरे बॅरिस्टर, डॉक्टर, काही जमीनदार हे या क्रांतिकारकांना कांहीशी गुप्त मदत करीत. पण पुरेसे पैसे मिळत नव्हते. म्हणून क्रांतिकारकांनी खजिने लुटणे, राजनिष्ट जमीनदारांच्या घरांवर दरोडे घालून पैसा आणणे, हेही प्रकार चालू केले होते.

४.३ मुंबईंतला गुप्त प्रचार

बंगालमधली ही परिस्थिती पाहून आल्यावर आम्हीही दुप्पट जोरानें आमच्या कार्यास सुरुवात केली. सरकारचा दडपशाहीचा वरवंटा जोराने रगडीत चालला होता. सावकारांच्या इतका मी फारसा प्रसिद्धीस आलो नसल्याने, आणि प्रत्यक्ष गुप्त कार्याच्या सुरक्षिततेसाठी, यानंतर मी प्रकटपणे कोणत्याही चळवळीत पडेनासा झालो. सावरकरांचा पत्रव्यवहार फुटतो अशी शंका आल्याने मी त्यांच्याशी पत्रव्यवहारही बंद ठेवला. १९०७ च्या अखेरीस मला पहील्या एम्.बी.बी.एस्.ला बसावयाचे होते म्हणूनही मला वेळ हवा होता. या सर्व कारणांनी बाह्य चळवळी मी आखडत्या घेतल्या. शिवाय आमची इतर मंडळी कार्यतत्पर झाली होती. नासिकचे 'मित्रसमाज' या गुप्त संस्थेंतले रा. कृष्णाजी गोपाळ कर्वे हे यावेळी मुंबईस शिक्षणासाठी आले होते. एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये त्यांचीही काही गुप्त मंडळी होती. आमच्यापैकी रामभाऊ भाटे हे मुंबईच्या आर्ट स्कूलमध्ये अभिनव भारताचें कार्य करीत होते. दुसरे एक आमचे क्रांतिकारक मित्र घनश्याम सदाशिव केळकर हे व्हि. जु. टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये क्रांतीचें बीजारोपण गुप्तपणे करीत होते. फर्ग्युसनमधले रा. कृष्णाजी गोपाळ खरे हे बॉम्बच्या तयारीचे शिक्षण, प्रो. गज्जरांच्या लॅबोरेटरींत, एम्.ए.च्या अभ्यासाचे निमित्त करून, घेत होते. याप्रमाणे एल्फिन्स्टन, विल्सन व मेडिकल कॉलेजे, लॉ-क्लास, व्हि. टेक्निकल इन्स्टिट्यूट, गज्जरांची प्रयोगशाळा, आर्ट स्कूल वगैरे जेवढ्या उच्च शिक्षणाच्या संस्था होत्या त्यांत आमचे व इतर कार्यकर्ते आपापलीं क्रांतिप्रवण कार्ये करीतच होते. मागे वर्णिल्याप्रमाणें भावी तरुण पिढी क्रांतीला अनुकूल करण्यासाठी सर्व शैक्षणिक केंद्रे हस्तगत करण्याची जी आमची योजना होती त्याप्रमाणें आमचे क्रांतिकार्य अविरत पण गुप्तपणे चालूंच होते.

याशिवाय रेल्वे, पोस्ट, कस्टम्स, हायकोर्य, सेक्रेटरिएट, तार ऑफिस, हवामान खाते, हाफकीन इन्स्टिट्यूट वगैरे सरकारी केंद्रांतूनही आमच्या क्रांतिकारकांनी चंचुप्रवेश केला होता. क्रांतीच्या तयारीचें हे अंग फार महत्त्वाचे असते. सरकारी खात्यांतून आपले लोक ठेवल्याने सरकारच्या हालचालींवर, धोरणावर, नजर राहते, आणि कित्येक वेळां या हेरगिरीने अचानक

फायदाही मिळतो. आम्हांस या हेरगिरीचा बराच फायदा मिळे. रेल्वेंत आमचे लोक असल्याने त्यांना हवे तेव्हां, हवे तेथे, गुप्त कार्याकरिता पाठवता येई. टिळकांच्या १९०८ च्या खटल्यांत आम्हीं तारखात्यांतून कशा बातम्या मिळवल्या, त्याची हकीकत 'अभिनव भारतावरील हल्ले' या प्रकरणांत पुढे येईलच. ठिकठिकाणी आमचे क्रांतिकारक सरकारी नोकरींत तर होतेच, पण आमचे भास्करराव खरे हे तर दिल्लीस इंपीरिअल सेक्रेटरिएटपर्यंत पोंचले होते. अर्थात् हे सर्व लोक क्रांतिकारक होते, हे आमच्याखेरीज इतर कोणासही माहीत नव्हते. सरकारी नोकरांनी कोणत्याही राजद्रोही चळवळींत उघड वा गुप्त भाग घेऊं नये या धोरणाचे चिलखत सरकारचें अंगावर असले तरी आम्ही त्याला शतशः भोकें पाडूं शकलों होतो.

४.४ देशभर एकदम उठावणीची योजना

१९०७ च्या अखेरीस जी सुरतेस कॉंग्रेस भरली तिला बंगालचे बाबू अरविंद घोष, बिपिनचंद पाल वगैरे प्रकट व गुप्त संस्थांचे पुढारी येणार, असे कळल्यावरून त्यांना भेटण्यासाठीं आमच्यापैकी मी व इतर काहीजण असे मुद्दाम गेलो होतो. नाशिकहून बाबा सावरकर, बाबासाहेब खरे, गद्रे वकील व इतर मंडळिही बंगालच्या गुप्त संस्थांच्या पुढाऱ्यांस भेटण्यास आलीं होती. कॉंग्रेसला हजर राहणें हे नुसते निमित्त होते. बडोद्याच्या आमच्या शाखेतूनही बं. देशपांडे वगैरे पुढारी आले होते. तेथे आमच्या व बंगालच्या क्रांतिकारक पुढाऱ्यांच्या गाठी-भेटी झाल्या आणि एक गुप्त बैठकही झाली. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार, सर्व हिंदुस्थानभर सशस्त्र क्रांति करण्याची तयारी पुरी होईपर्यंत, कोणीही उतावळेपणानें उठावणी करूं नये, असे पुन्हा एकवार, एकमेकांच्या गुप्त तयारीच्या माहितीची देवाण-घेवाण झाल्यावर, ठरले. त्या अधिवेशनास मद्रासचे तत्कालीन पुढारी चिदंबरम् पिले व पंजाबचे काही तुरळक क्रांतिकारक आले होते. या बैठकीत दिल्या घेतलेल्या माहितीपैकी खरी तयारी याबद्दल मात्र उभयपक्षीं शंका घेण्यास जागा होती. कारण पुढे मद्रासकडे फारसे कार्य दृष्टीस पडलेच नाही. सुरतेस कॉंग्रेसमध्ये फूट पडली. आम्ही मात्र आमचे उद्दिष्ट सफळ झाल्याचे समाधन मानून परत फिरलो.

बंगालमध्ये १९०७ च्या उत्तरार्धांत हेमचंद्र दास हे बॉम्बची विद्या हस्तगत करून विलायतेहून परत आल्याबरोबर त्यांनी त्याचे प्रयोग करण्यास सुरुवात केली. आणि ले. गव्हर्नरची गाडी, रुळाखाली बॉम्ब ठेवून, उडवण्याचा प्रयोगही झाला. तो त्याच्या शिकंदर नशिबानें फसला म्हणूनच वांचला. पिस्तुलांच्याही इंग्रजांवर फैरी झडावयास लागल्या. बंगालचे हे धाडस पाहून आमच्या मुंबई प्रांतांतल्या क्रांतिकारकांतही पिस्तुलें, तलवारी, बंदुका मिळवण्याची व बॉम्ब तयार करण्याची तयारी झाली. त्यासाठीं दोन प्रकरणे पुढे स्वतंत्र दिली असल्याने येथे इतकेंच सांगून ठेवतों की, आमची, सर्व देशभर, ठिकठिकाणी, एकदम उठाव करण्याची योजना जर फसली नसती तर देशांत आगामी क्रांतीचे भयसूचक बॉम्बचे स्फोट, व कित्येक अधिकाऱ्यांचे वध, एकाच वेळी घडवून आम्ही इंग्रज सरकारास, विशेषतः अधिकाऱ्यांस, त्राही भगवान् करून सोडण्याइतकी सामुग्री आमच्याजवळ जय्यत तयार होती. वसईचा आमचा बॉम्बचा कारखाना म्हणजे ठिकठिकाणच्या विश्वासू क्रांतिकारकांना बॉम्ब तयार करण्याची कृति शिकवण्याची एक गुप्त शाळाच झाली होती.

५ अभिनव भारताचे विलायतेतले कार्य

विलायतेत गेल्यावर सावरकरांनी 'इंडिया हाऊस' हे क्रांतिकारकांचें एक केंद्रच निर्माण केले. विलायतेत असलेल्या त्या वेळच्या बऱ्याचशा हिंदी तरुणांना त्यांनी अभिनव भारताच्या माळेत ओंवले. सेनापति बापट हे त्यावेळी विलायतेतच होते. पुढे पंजाबचे मुख्य प्रधान झालेले सर शिकंदर हयातः मद्रासचे आतांचे सचिव डॉ. राजन्, पिले, अय्यर; दक्षिण आफ्रिकेतले पुढारी बॅ. पाथरः कर्झन वायलीला ठार करणारा मदनलाल धिंग्रा; कीनियामध्ये काही वर्षे एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर झालेले बॅ. फडके; कोरगांवकर इंजिनिअर, उत्तर हिंदुस्थानांतले बॅ. मिर्झा अब्बास, बॅ. ग्यानचंद्र वर्मा, सरोजिनी नायडूंचे बंधू वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, पंजाबचे विख्यात क्रांतिकारक लाला हरदयाळ, भाई परमानंद, हरनामसिंह, पॅरिसचे राणा, मॅडम कामाबाई, गुरुकुलांतले महेशचरणसिंह, मुंबई कॉर्पोरेशनचे काही वर्षे केमिकल अन्यालिस्ट असलेले डॉ. जोशी (ख्रिस्ती), डॉ. एरुळकर, हेमचंद्रदास, नीतिसेन द्वारकादास, डॉ. मेधा, डॉ. मुथू, बिपिनचंद्रपालांचे चिरंजीव निरंजनपाल, डॉ. देशमुख, प्रो. मोहोकर, प्रो. कुटिन्हो वगैरे शेकडो हिंदी तरुण अभिनव भारताच्या क्रांतिछत्राखालीं लंडनमध्ये राजद्रोहाने मुसमुसत होते. हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या प्रांतांतून बॅरिस्टर, आय्.सी.एस्., इंजिनिअर, डॉक्टर होण्यासाठी त्या कालांत बरेच विद्यार्थी जात. ते जर क्रांतीला अनुकूल होऊन सशस्त्र क्रांतीचा धुमधडाका आपापल्या प्रांतांत उडवण्यास उद्युक्त झाले, तर अखिल हिंदुस्थान एकाच हुकमी क्रांतिछत्राखाली येऊन एकदमच उठावणी करील, ही सावरकरांची अपेक्षा व योजना होती. आणि त्या हेतूनेच त्यांनी प्रयत्न चालवले होते. विलायतेत शस्त्रांचा कायदा सौम्य असल्यानें पिस्तुले पोस्टाच्या तिकिटाप्रमाणें मिळत. हे सर्व तरुण त्याचा फायदा घेऊन नेमबाजीत तरबेज झाले होते. रशियांत त्यावेळी बॉम्बसारखे प्रभावी साधन क्रांतिकारकांनी योजलें असल्यानें या तरुणांपैकी काहींनीं (विशेषतः सेनापति बापट, होतिलाल वर्मा व हेमचंद्र दास यांनी) त्याचा अभ्यास व प्रयोगाचें शिक्षण रशियन क्रांतिकारकांकडून घेतले. व त्याची कृति वर्णन करणारे एक चोपडे घेऊन, नांव बदलून, बापट हिंदुस्थानांत येऊन पोंचले; हेमचंद्र कलकत्त्यास परतले, होतिलाल वर्मा हे अमेरिका, जपान, चीनमार्गे परतून पुण्यास आल्यावर त्यांनी बॉम्बच्या कृतीचे पुस्तक लो. टिळकांना अर्पण केले. हॉंगकॉंगला सैन्यांत राजद्रोह पसरवल्याबद्दल पुढे यांना शिक्षा झाली.

हे सर्व उद्योग चालूं असतांनाच सावरकरांनी इटलीचा रामदास व प्रसिद्ध क्रांतिकर्ता जोसेफ माझिनी याचें अत्यंत सुंदर चरित्र लिहीले. नंतर '१८५७ ते स्वातंत्र्ययुद्ध' व 'शिखांचा इतिहास' हींही पुस्तकें त्यांनीं लिहीली. पण ती त्या काळांत अप्रकाशितच राहीली. त्याबद्दलचा उल्लेख सावरकर-चरित्रांत आहेच. १८५७ चे हस्तलिखित १९४९ सालापर्यंत प्रो. कुटिन्हो यांनी पोर्तुगालमध्ये सुरक्षित ठेवून नंतर ते अमेरिकेत आपल्याबरोबर नेले. आतां ते त्यांनी सावरकरांकडे पुन्हा पाठविले आहे. शिखांच्या इतिहासाचा मात्र पत्ता नाही. असो.

विलायतेहून ते तरुण आपापले अभ्यास संपवून परत येत तेव्हां ते मुंबईस मला, व नंतर नाशकास बाबा सावरकरांना, भेटून तिकडील सर्व हकीकत इत्थंभूत कळवीत. त्यांच्याकडूनच बॉम्बच्या कृतीचें एक पुस्तक आम्हांस मिळालें होते. आणि तदनुसारच बंगालमध्ये व

महाराष्ट्रांत आमचें बॉम्ब करण्याचे प्रयत्न चालू होते. त्याचे एक स्वतंत्र प्रकरणच पुढे दिले असल्यानें येथे त्याचा नुसता निर्देशच पुरे.

सावरकरांनी युरोपखंडांत व अमेरिकेंतही क्रांतीला अनुकूल अशा चळवळी थोड्याफार चालूं केल्या होत्या. हरदयाळ व वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय यांची कॅनडा व जर्मनी यांसाठीं योजना झाली होती. शामजी कृष्णवर्मा, बॅ. राणा व इतर काही मंडळीं फ्रान्समध्ये खटपटींत होती. रशियन क्रांतिकारकांशींही या मंडळींनी संधान जुळवले होते.

विलायतेत सावरकरांनी ज्या खटपटी, योजना, तयार केल्या त्यांची संपूर्ण माहिती तेच लिहूं शकतील. सेनापति बापटांना ती लिहून पाठवण्याबद्दल मी विनंती केली होती. त्यांनीं एक लहानसें टाचणच पाठवले. त्यांच्या चरित्रांत ती थोडीशी आली आहे. म्हणून मी तिचा येथे पाल्हाळ करीत नाही. सावरकरांनीही ती लिहून काढली नाही हे दुर्दैव आहे. बाबांना जी माहिती होती ती त्यांच्या चरित्रांत प्रसिद्ध झालेलीच आहे. 'सावरकर-चरित्रांत'ही रा. करंदकरांनी ती वर्णिलेली आहे. मी वर दिली तेवढीच माझ्या स्मृतीच्या चाळणीत शिल्लक आहे. त्यांच्या सहकाऱ्यांपैकी मद्रासचे डॉ. राजन्, मुंबईचे डॉ. एरूळकर, व आफ्रिकेंतले बॅ. पाथर यांनाही पण मी लिहीले. पण फलनिष्पत्ति कांहीच झाली नाही. अगोदरच या सर्व गुप्त खटपटी. त्यामुळे ज्यांनी त्या केल्या त्यांनाच त्यांची पुरती माहिती असणार. त्यांपैकी हरदयार, परमानंद, अय्यरसारखे कांही कैलासवासीही झालेले. कांही परागंदा होऊन निराशेंत खचलेले. डॉ. राजन् सारख्या काहीची मते बदललेलीं. अशा विविधतेमुळे कोणीच ते प्रकरण लिहून ठेवलेही नाही आणि पाठवलेंही नाही. त्यामुळें आत्मचरित्राचा ह्या एक भाग, क्रांतीच्या चळवळीचा परिपाक म्हणून, सावरकरच जर तो लिहीतील तरच त्यांच्या व हिंदुस्थानच्या सशस्त्र क्रांतीच्या चळवळीचा एक अत्यंत रोमहर्षक खंड उजेडात येईल. सध्या तरी ते प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें लिहूं शकत नाहीत, असे त्यांच्या चिरंजीवांनी मला कळवले आहे. त्यामुळे हे विलायतचे क्रांतिप्रकरण येथेच अर्धवट किलकिले करून तसेच सोडणे मला प्राप्त आहे. इतके मात्र खरे की, त्यांचे हात विलायत, युरोपांतले काही देश, व अमेरिकेत कानडा या विशाल भूभागांवर पसरले होते. इंग्रज सरकारला त्याची माहिती होती. आणि म्हणून त्यांना बॅरिस्टरीची परवानगीही त्यांनी नाकारली. अखेर आत्मसंरक्षणासाठीं, व क्रांतिकार्य निर्वेध चालूं राहावे म्हणून, इंग्लंड सोडून त्यांनी फ्रान्समध्ये पुढे वास्तव्य केले. हिंदुस्थानांतली आमची चळवळ अचानक फसली म्हणून, आम्ही नको नको म्हणत असतां, त्यांस तशा सूचनाही पाठवल्या असतां, ते विलायतेस गेले आणि इंग्रजांच्या पाशांत सांपडले. करंदीकरांच्या 'सावरकरांच्या चरित्रांत' त्यानंतरची माहिती आलेलीच आहे.

६ अभिनव भारताची शस्त्रास्त्र-सिद्धता

अभिनव भारताच्या बाह्य पसाऱ्याच्या आंत, अंधारांत, गुप्त कार्याचा प्रचंड व्याप चालूच होता. ठिकठिकाणी पारखून घेऊन, शपथबद्ध झालेल्या तरुणांना गुप्तपणाने एकत्र आणून, त्यांच्या शाखा काढून, संघटनेचे व शस्त्रसंग्रहाचे काम चालूच होते. इंग्रज सरकाराविरुद्ध सशस्त्र सामना द्यावयाचा म्हणजे आपलीही प्रचंड संघटना हवी, आणि तीही सशस्त्र, समृद्ध आणि समर्थ हवी, याबद्दल वादच नव्हता. इंग्रज सरकाराइतके सशस्त्र सैन्य आपण स्वतंत्रपणें उभारू शकणार नाही; पण हिंदी सैन्यांत व पोलिसांत आपल्या मतांचा प्रसार करून, सैन्य व पोलिस फितवले म्हणजे तेच सैन्य अनायसे आपले होईल, अशा इतिहाससिद्ध क्रांतीच्या कल्पनेने आमचे उद्योग चालूं होते. पण सैन्यांत प्रवेश मिळणे, तेव्हां महादुर्घट काम होते. ठराविक जातींनाच तेव्हां सैन्यांत प्रवेश मिळे. पोलिस, रेल्वे, रेव्हिन्यु, न्याय, तुरुंग, तार, इंजिनिअरिंग वगैरे खात्यांत मात्र आपली माणसे गुंतवणें, किंवा त्यांतली आत्मसात करणे, हे त्यापेक्षा सोपे काम होते. आणि त्याला सुरुवात चांगलीच झाली होती. इंग्रज सरकारच्या राज्ययंत्रात पुष्कळशी माणसे आपलीच आहेत, तीच आपल्या मताची झाली की ते राज्ययंत्र, बाहेर क्रांतीची उठावणी होतांच, एकदम आपण आपल्या हातांत घेऊ शकूं, अशी आमची योजना होती. आंतून व बाहेरून असे हल्ले चढवले, व विशेषतः १८५७ प्रमाणें, किंवा १९४५-४७ मध्ये सुभाषचंद्रांच्या हाताखालीं, सैन्य फितले, तसे झाले तर इंग्रजांचे बारा वाजण्यास वेळ लागणार नाही, हे अनेक देशांच्या राज्यक्रांत्यांच्या इतिहासावरून आम्ही काढलेले निर्विवाद सत्य होते.

६.१ बौद्धिक व सैनिकी शिक्षण

गुप्तशाखेचा सभासद निवडण्यांत आम्ही बरीच दक्षता घेत होतो. समानशील मित्रांपासून सुरवात होई. त्यांचे आचारविचार, कुलशील, बुद्धिमत्ता, शरीरसामर्थ्य, स्वार्थत्यागाची तयारी, स्वभाव याची प्रतीति आली म्हणजे संस्थेंत त्याबद्दल कोणी तरी सभासद सूचना आणी. इतर सभासदांना त्याची ओळख पटली तर लौकरच त्याला शपथ घेऊन सभासद होतां येत असे. पण ओळख नसल्यास ३-४ सभासदांनीं त्याची ओळख पाडून, पुन्हा त्याची चांचणी होई. त्या सर्वांचें मत अनुकूल पडलें तरच त्याचा शपथविधि होत असे, नाहीतर नाही. श्रीरामकृष्ण, श्रीशिवाजीमहाराज यांच्यासमोर, त्यांच्या तसबिरीवर हात ठेवून, शपथ घ्यावी लागे. शपथेचा नमुनाही ठरलेला असे. शपथबद्ध झाल्यावर त्याला दर साप्ताहीक बैठकीत प्रवेश मिळे. पुढारीपणाच्या शिक्षणासाठी दर आठवड्यास काहीतरी ऐतिहासिक, पौराणिक, धार्मिक, सामाजिक विषयांवर वादविवाद होत. त्याला एखाद्या विषयावर बोलण्यासही आम्ही लावीत असूं. त्याच्या मानसिक उन्नतीसाठी निरनिराळ्या देशांच्या क्रांत्यांचे इतिहास, हिंदुस्थानांतल्या व जगांतल्या वीर पुरुषांची चरित्रे, त्यांनी सोसलेले देहदंड, त्यांचा निरुपम स्वार्थत्याग व प्रसंगावधान, त्यांची कर्तव्यनिष्ठा व तत्परता, त्यांचा दीर्घोद्योग या सर्वांचे परिणाम त्याच्या मनावर व्हावे म्हणून त्यास ग्रंथ वाचावयास देऊन त्याबद्दलची त्याची परीक्षाही थोडीबहुत घेत असूं. त्याच्या शारीरिक व सैनिक शिक्षणासाठीं प्रत्यहीं तालीम, पोहणें, धांवणें, डोंगरकडे चढणे-उतरणे, उपासमार, थोडेफार हत्यारांचे शिक्षण, नेमबाजी वगैरेंची सोय आम्हीं केली होती.

बडोद्याहून प्रो. माणिकरावांच्या तालमीतले इब्राहीम भाई हे यासाठी आम्ही मुद्दाम आणवले होते. ते या सर्व विद्या तरुणांना शिकवीत (वर्तकांचा लेख). तसेच जुन्नरकडचे एक जाधव नांवाचे गृहस्थही या कार्यासाठी नियोजित केले होते. डोंगरावर लुटुपुटीच्या लढाया, मर्दानी खेळ, धांवणे, पोहणे यांच्या शर्यती वगैरे सर्व प्रकार चालूं असत. याप्रमाणे शपथबद्ध सभासदांच्या शारीरिक, बौद्धिक व सैनिकी शिक्षणाची व्यवस्था आम्हीं केली होती. ही अगदी काटेकोरपणानें शक्य तितकी पाळली जावी म्हणून आमची योजना होती. पण आम्ही सर्व स्वयंसैनिक होतो. घरचे पोटापाण्याचे उद्योग किंवा शाळाकॉलेजांतलें शिक्षण वगैरे व्यवसाय संभाळून उरल्या वेळांत हे काम करावे लागे. पण ते सहसा कोणी चुकवीत नसे. प्रसंगविशेषीं तर रोजचे उद्योगधंदे सोडूनही मंडळी एकनिष्ठेनें कार्यतत्पर असत. क्रांतीचें काम मुख्य प्रचंड संघटनेचे. त्याला एकनिष्ठेची, एकदिलाची, बंधुप्रेमाची भावना जाज्वल्य असावयास पाहिजे. या देशबंधुप्रेमाचा परिणाम सभासदांवर इतका होई की, घरचीदारची भांडणें, भाऊबंदक्या, उखाळ्यापाखाळ्या सर्व नाहीशा होत. एकमेकांतून कधी विस्तवही जावयाचा नाही अशा कोर्ट-कचेऱ्यापर्यंतच्या भाऊबंदक्या या देशभक्तीच्या प्रेमाच्या भट्टींत पार वितळून जाऊन पुन्हा ते भाऊ भाऊ कायमचे एक झालेले आम्हीं पाहीले आहेत. उच्चनीच भावही आम्ही ठेवत नव्हतों. नुकतेच कैलासवासी झालेले नागपूरचे विश्वनाथराव केळकर यांनी तर आपल्या वडिलांनाही शपथ दिली होती! आणि मुलाकडून ती घेण्यांत त्यांनाही कमीपणा वाटला नाही. याप्रमाणे सभासदांची बौद्धिक, नैतिक व शारीरिक, उन्नती व्हावी, व अभिनव भारताचा सभासद अष्टपैलू, पुढारी असावा, म्हणून आम्ही शक्य तितकी व्यवस्था व खबरदारी घेत होतो आणि आमच्या या प्रयत्नांत यशही आले होते. सभासदांच्या निवडीत आम्ही जातगोत कांही मानीत नव्हतो. त्यामुळे सर्व जातींचे लोक आमच्यांत येण्यास हरकत नसे. तसेच आमच्या या भव्य व विशाल देशप्रेमाच्या कल्पनेने अठरापगड जातींचे खाणेपिणेही कधीकधी एकत्र एका पंक्तित होई. त्यामुळे जातिभेदाच्या विषारी भावनेपासून आम्ही मुक्त होतो. अशा शेकडो सभासदांच्या शाखा सर्व महाराष्ट्रभर, देशभर, उभाराव्या असे आमचे प्रयत्न चालूं होते.

बंगालप्रमाणेच संघटनेच्या गुप्ततेसाठीं फक्त शाखांच्या मुख्यांनीच एकमेकांची ओळख ठेवावी व संस्थेच्या कार्याबद्दल वाटाघाटी करावी असा सक्त नियम होता. सर्वच सभासदांची सर्वांनाच माहिती नसावी म्हणून हे तत्त्व आम्ही परोपरीनें अगदी कटाक्षाने पाळले होते. गुप्तता, सुरक्षितता, घटनासौकर्य या सर्व दृष्टींनी असे करणे इष्टच होते. त्यामुळें एखाद्या शाखेंत काही अनिष्ट प्रकार घडला तर त्याची झळ इतर शाखांना लागत नव्हती. पण हा नियम जसा संघटनेला अनुकूल तसाच तो प्रसंगी प्रतिकूलही होत असे. पण त्याला इलाज नव्हता आणि शेवटी त्याची प्रतिकूलताच आम्हांस भोंवली.

६.२ दरिद्रीनारायणांचा त्याग

गुप्तपणें हत्यारें मिळविणें, आणणें, सुरक्षित ठेवणें, बॉम्ब तयार करण्यासाठीं रासायनिक पदार्थ आणणें, गुप्त ठिकाणीं त्यांची भट्टी लावणें, वगैरे सर्व कार्यांस प्रचंड द्रव्यसाहाय्य हवें होते. आणि, आम्ही बहुतेक सर्व दरिद्रीनारायण असल्यानें, तेच आमच्याजवळ नव्हते. किरकोळ वर्गण्या व देणग्या यांनी काय कात होणार? तरीपण कै. बाबासाहेब खरे यांनी मधूनमधून

काही मदत दिली होती. धनाढ्यवर्ग आमच्यांत येत नव्हता. हिंदुस्थानच्या सशस्त्र राज्यक्रांतीची आवश्यकता व शक्यता त्यांना तेव्हां वाटत नव्हती. सरकारचा गदारोळ त्यांच्यावर फिरत नव्हता. उलट इंग्रज सरकार त्यांचे पाठिराखे होते. म्हणून त्यांच्याकडून फारसे काही मिळण्याची सोय नव्हती. बाबा थोडेफार पैसे जमवीत; पण ते बाह्य प्रकट कार्यालाच पुष्कळसे खर्च होत. एखादा क्रांतिप्रेमी श्रीमंत सावकार पैशाची लालूच दाखवी; पण काही अटींवर. त्या अटींपैकी उदाहरणार्थ एक अट म्हणजे टिळकांना शिक्षा देणाऱ्या सरकारच्या बगलबच्चा न्या. डावरला मारण्याची होती. ८ हजार रुपयांचे त्यासाठी बक्षीस होते. अण्णा कर्वे त्यासाठीं काही दिवस डावरवर टेहाळणी करीत होते. ब्रह्मगिरीबुवा व र. वि. भावे हेही त्या उद्योगांत होते; पण संधी सांपडली नाही. आणि अर्थात् ८ हजार रुपयेही मिळाले नाहीत. बंगालमध्येही क्रांतिकारकांना पैशांची अशीच पंचाईत पडली होती. 'राजनैतिक कारस्थानाच्या' पहील्या खंडांत बारींद्राला एक हजार रुपये, क्रांतिकारक संपादकांना शिक्षा देणाऱ्या किंग्जफर्ड मॅजिस्ट्रेटला मारण्यासाठीं कसे दिले, व ते काम न होतां चुकून दोन केनडी स्त्रियाच बॉम्बला कशा बळी पडल्या, आणि म्हणून बारींद्राला ती रक्कम पै-पैसा करून कशी परत करावी लागली, याची हकीकत दिली आहे. क्रांतीला पैसे देणाऱ्यांच्या या अटी पुऱ्या करणे अशक्य होते, हे त्या धनिकांना कळत नव्हते. पण आमच्यासारख्या भणंग-भिकाऱ्यांच्या इच्छेला विचारतो कोण? इच्छाभोजन कोण घालणार? (Beggars cannot be choosers). म्हणून भिक्षा, देणग्या, मागावयाला जावें तर ते म्हणत कार्य दाखवा. आम्ही म्हणत असूं की, कार्य दाखविण्यासाठींच अगोदर पैसे द्या. असा हा पेच होता. या शृंगापत्तींतून सुटणे कठिण होते. या पेचप्रसंगामुळेच सार्वत्रिक योजनेऐवजी निरनिराळ्या ठिकाणी उठावणी करणे, केवळ पैशासाठींच, अवश्य आहे, असे हेमचंद्र दास सेनापति बापटांना म्हणाले होते. आम्ही तरी आमच्या पोटाला चिमटा किती घेणार? बिचाऱ्या बंगाली क्रांतिकारकांनीं तर इतकें दारिद्र्य पत्करले होते की, भांड्यांचा सुद्धा खर्च लागूं नये म्हणून नारळाच्या करवंट्यांच्या वाट्या करून त्यांतून ते पदार्थ वाढीत व खात! मातीच्या सुरया व परळें हीं त्यांचीं अन्न रांधावयाचीं भांडीं होती! हेमचंद्र दासनें तर स्फोटकास्त्र (बॉम्ब) विद्या शिकावयास घरदार विकले होते! बाबांनी व त्यांच्या पत्नी येसूवहीनी यांनी जन्मभर अठरा विश्र्वें दारिद्र्यांत पिचत दिवस कसे काढले हे 'बाबाराव सावरकरांच्या' चरित्रांत रा. द. न. गोखले यांनी दाखविलेच आहे. विनायकराव सावरकर आणि मी आमच्या श्वशुरांच्या द्रव्यसाहाय्यावरच कॉलेजचा शिक्षणक्रम उरकीत होतो. त्यापूर्वी हायस्कुलांत तर माझ्या घरीं, दरमहा १० रुपयांपैकी अडीच रुपये हायस्कूलची फी देऊन, साडेसात रुपयांत मी, आजी व आई अशीं तीन माणसें आपला रूटुखुटू संसार करीत होतो! आबा दरेकर - गोविंद कवि - यांची आई तर भांडीं घासून गुजारा करी! अशी अठरा विश्वे दारिद्र्याने ग्रासलेल्या आम्हां अभिनव भारताच्या सदस्यांनीं काटकसर केली तरी किती पैसा जमणार? त्यांतही आमचे टिळक-परांजप्यांसारखे आधारस्तंभ तुरुंगांत गेलेले. सर्व पुढारी त्या धक्क्याने हतबल झालेले. अशा स्थितीत आम्ही होतो.

तरी पण अंगीकृत कार्य तडीस नेण्याचा आम्हीं संकल्प केलाच होता. काही काटकसर, काही उधारउसनवारी, काही देणग्या, आणि हेमचंद्र दासाप्रमाणें आमच्या परम स्वार्थत्यागी कांही मित्रांनी घरांतले कांही किडुकमिडुक मोडून काही पैसे उभारले. याच सुमारास आम्हांस १५० रु. बेळगांवचे तेव्हांचे क्रांतिकारक देशभक्त गंगाधरराव देशपांडे यांनी दिले होते. काही पिस्तुलें व

बॉम्ब तयार करण्याचें कच्चें सामान व उपकरणे घेण्यापुरती तरी आम्ही अभिनव भारताच्या सभासदांनी याप्रमाणें पैशांची तरतूद केली. मधुकरी, उसनवारी व चोरी (Beg, Borrow or Steal) या तीन साधनांपैकी आमच्या अभिनव भारताच्या मंडळींनी चोरी करून मात्र पैसा जमवला नव्हता. आणि पैशांची अतिशय तंगी झाल्यावर गोपाळराव पाटणकरांनी तशी सूचना केली असतां, आमच्या स्फोटकास्त्र शाखेच्या चालकांनींच (रा. भाट्यांनीं) ती हाणून पाडली. पैसे जमविण्याचें काम पाटणकरांनींच पत्करलें असल्यामुळे बिचाऱ्याने आपल्या घरचे कांही दागिने विकूनही ती गरज तात्पुरती भागविली. बंगाली क्रांतिकारकांप्रमाणें पुढे आम्ही सरकारी खजिने व आयतोबा नाठाळ श्रीमंतांचीं घरें लुटण्याचा मार्ग पत्करला नसताच असे मात्र नाही. शिवाजी महाराजांनीं सुरत लुटल्याचा, व हिंदी आणि पाश्चात्य क्रांतिकारकांनीं असलेच मार्ग पत्करल्याचे, ऐतिहासिक दाखले आमच्याजवळ भरपूर होतेच.

६.३ द्रव्यासाठीं वक्र उपाय

मागे सांगितलेच आहे की, अभिनव भारताची कर्व्यांची शाखा ही आमच्यापासून अलग होती. नाशिक, मुंबई, पुणें या मोठ्या तिन्ही शहरांत व इतरत्र तिच्या उपशाखा होत्या. सुरक्षिततेच्या दृष्टीनें फक्त शाखाचालकांचाच एकमेकांशी भेटीगांठीचा संबंध असावा, या गुप्त कार्याच्या आवश्यक नियमाप्रमाणे कर्व्यांच्या फक्त गोपाळराव पाटणकर व मी यांच्याशीच भेटीगांठी होत. त्यामुळें कोण कोठून कसे पैसे आणतो हे एकमेकांस काही माहीत नव्हते. पण कर्व्यांच्या नाशिक शाखेच्या रा. दांडेकर व आंबेडकर या सदस्यांनी, शस्त्रास्त्रें व बॉम्ब यांसाठी, काही लहान-सहान ४००-५०० रुपयांपर्यंत चोऱ्या केल्याचेही आमच्या वरील झालेल्या खटल्यांत उघडकीस आले. त्यात त्यांचा स्वार्थ यत्किंचितही नव्हता, हे सरकारी अधिकाऱ्यांनाही मान्य करावे लागले. त्यासंबंधी माझे मित्र व अण्णा कर्व्यांचे सहकारी गोपाळराव धारप आपल्या लेखांत लिहीतात -

''स्वातंत्र्यप्राप्तीकरिता... ज्यांच्याजवळ पुष्कळ संपत्ति आहे त्यांच्याकडून थोडी आपल्या प्रयत्नांच्या उपयोगाकरिता घेतल्यास - चोरी करूनही घेतल्यास - त्यांत पाप नाही, अशी समजुतीने, व सार्वजनिक हितबुद्धीने, प्रेरित होऊन मंडळींनी द्रव्य मिळविण्यास सुरवात केली. अत्यंत पापभीरु माणसांनींही त्यांत भाग घेतला होता. परंतु त्यांची स्फटिकाप्रमाणें असणारी प्रामाणिक बुद्धि त्यामुळें मलिन झाली नाही... या मार्गानें काही धन मिळविलेंही.''

६.४ शस्त्रास्त्रांची जमवाजमव

पैशांची याप्रमाणें कशीबशी तरतूद केल्यावर आम्ही शस्त्रास्त्रें जमविण्यास व स्फोटकास्त्र तयार करण्यास सरसावलो. काही पिस्तुलें, बंदुका, तरवारी, जंबिये, भाले, बरच्या वगैरे शस्त्रें आम्ही जमवली होती; परंतु आधुनिक काळांतल्या शस्त्रांपुढे त्यांचा काही उपयोग नाही, हेही आम्ही जाणून होतो. शस्त्रास्त्रांच्या किंवा स्फोटकांच्या कारखान्यावर सावध व दक्ष राहणाऱ्या लोकांना, हातघाईचा प्रसंग आल्यास, त्यांच्याजवळ त्यांपैकी एकेक तरी हत्यार ठेवणें भाग होते. देशी संस्थानांत शस्त्रास्त्रें मिळणें सुलभ होते म्हणून बाबांनी त्यांचा शिष्य विठ्ठल बाळकृष्ण ऊर्फ बापूराव जोशी याला ग्वाल्हेरला पाठवून तिकडून पिस्तुले आणण्याचा उपक्रम

सुरू केला होता; पण तो उघडकीस आला. मात्र माधवराव गाडगिळांनी शिताफी करून आणविलेले पिस्तुल नाशिकच्या गोदावरीच्या डोहांत टाकून दिले, अशी पोलिसांस लोणकढी थाप ठेवून दिली! बिचाऱ्या पोलिसांनीं मुंबईहून पाणबुडे आणवून गोदावरीतला सुंदरनारायणाचा सर्व डोह शोधला. त्यांत काही मोडक्या तरवारी व काहीशीं फुटकी भांडी वगैरे सामान मिळाले; पण पिस्तुल मिळालें नाही. त्यांत ते टाकलेंच नव्हते तर ते कोठून मिळणार? असो. पिस्तुल सापडत नाही, असा शेरा मारून ते प्रकरण पोलिसांनी निकालांत काढले व माधवरावांना, बापू जोशांच्या बरोबर, ६ महीने सरकारी पाहुणाचार 'स्वराज्याश्रमांत' (तुरुंगांत) खावा लागला. पण ते पिस्तुल सुरक्षित होते.

या पिस्तुलाच्या शोधावरून पोलिसांना ग्वाल्हेर-कटाचा मात्र सुगावा लागला. त्यांत तेथे अभिनव भारताच्या धर्तीवर निघालेल्या 'नवभारत' या क्रांतिकारक संस्थेपैकी २२ सभासद व अभिनव भारताचे १९ सभासद अशा ४१ सदस्यांवर स्पेशल ट्रायब्यूनल पुढे खटला चालून त्यांना तुरुंगाच्या शिक्षा मिळाल्या. यांतच ग्वाल्हेरचे सन्मान्य नागरिक व पुढे हिंगण्याच्या स्त्रियांच्या महाविद्यालयांतले प्राध्यापक प्रो. डॉ. हरि रामचंद्र दिवेकर, एम्.ए. हेही होते.

ग्वाल्हेरप्रमाणेंच बडोदें, इंदूर व मोगलाईत हत्यारें मिळवण्याचे प्रयत्न चालू होते. आणि त्याप्रमाणें आम्हांस बरीचशी हत्यारें मिळालीही होती. नाशिकच्या गोपाळराव धारपांचे बंधु औरंगाबाद येथे असल्याने त्यांनी शंकर सोमण व गणूस पत्र देऊन तेथे शस्त्रे मिळविण्यासाठी पाठविले. त्याप्रमाणे गणू वैद्य व ते तेथे खटपटीस गेले. पण शस्त्रांऐवजी देशभक्त अनंता कान्हेरे ह्या विलक्षण धडाडीच्या तरुण क्रांतिकारकाला गवसून ते परतले. पण त्यांनी तेथे आमचा शस्त्रास्त्रांचा प्रयत्न यशस्वी होण्याचा घाट चांगलाच घातला होता, हे आमच्यावरील खटल्यांत उघडकीस आले.

मोंगलाईत हैद्राबादेस रा. विनायकराव तिखे यांच्यामार्फतही शस्त्रास्त्रें जमविण्याची खटपट बाबा सावरकरांनीं केली होती; पण बाबाच पकडले गेल्याने तो बेत विसकटला.

६.५ सावरकरांनीं पाठविलेलीं पिस्तुलें

हे प्रयत्न चालू असतांच विलायतेहून तात्यांनी २० ब्राउनिंग पिस्तुले हिंदुस्थानांत पाठविण्याचे ठरविलें. बाबांना शिक्षा झाल्यावर मदनलाल धिंग्रा याने, इंग्रजांचा सूड घेण्याच्या उद्देशाने, कर्झन वायलीचा जेव्हां वध केला तेव्हां बरीचशीं ब्राउनिंग पिस्तुलें विलायतेतल्या अभिनव भारताच्या प्रचारकांनी पॅरिसला पूर्वीच खरेदी केली होती, असा सुगावा इंग्रज सरकारला लागला. दूरदृष्टि ठेवून, सावकरांनी मात्र ती स्वतः खरेदी केली नव्हती, असे विलायतेचा इन्सपेक्टर पार्कर याने साक्षीत सांगितले. त्यावेळी स्कॉटलंड यार्डच्या पोलिसांनी, किती पिस्तुले, कोठकोठून, हिंदी क्रांतिकारकांनी खरेदी केली, त्याचा तपास केला होता; आणि बरीचशीं पिस्तुलें त्यांनीं खरेदी केल्याचें त्या पोलिसांस कळलेंही होते. १९०९च्या प्रारंभींच किंवा १९०८ च्या अखेरीस ही खरेदी झाली असली पाहिजे. कारण १९०९ च्या मार्चमध्येच चतुर्भुज हीं २० पिस्तुलें घेऊन हिंदुस्थानांत आला. त्यावेळी आधुनिक पद्धतीने शस्त्रास्त्रे तयार करण्याचे शिक्षण घ्यावयास बेल्जममध्ये कोणा तरी क्रांतिकारक तज्ज्ञास पाठविण्याचे सावरकरांनी ठरविले होते, असेही या चतुर्भुजाने आपल्या साक्षीत सांगितलेले आहे. असो. तो येण्याच्या पूर्वी

८ दिवसच बाबांना माझ्या खोलीत मुंबईस अटक झाली होती. म्हणून ही पिस्तुले बाबंच्या हाती न पडतां मजकडे आली. ती घेण्यासाठीच बाबा मजकडे येऊन उतरले होते. सर शिकंदर हयातखान, चंजेरीरावर व एक इटालियन स्त्री यांच्यामार्फतही तात्यांनी इकडे पिस्तुलें पाठविली होती; पण ती आम्हांला पोंचण्यापूर्वीच आम्ही अटक झालो होतो.

तात्यांनी चतुर्भुजाला आधीच शपथ देऊन अभिनव-भारताचा सभासद केला होता. हा शिंपी होता; आणि इंग्लंडांत शिंप्यांच्या संस्थेंत शिक्षण घेऊन त्याने त्या कलेचे भलेंमोठे प्रमाणपत्रही मिळविले होते. पोटासाठीं तो 'इंडिया हाउस' या शामजी कृष्णवर्मांनी काढलेल्या संस्थेंत आचाऱ्याचे काम करी. त्याचे वास्तव्यही तेथेच होते. सावरकरांच्या गुप्त चळवळी, व प्रकट सभा-संमेलने, येथेच होत. या क्रांतिकारक वातावरणांत चतुर्भुज वावरत होता. तात्यांच्या टपाली कामांतही तो त्यांना मदत करी. त्यामुळे तो त्यांच्या विश्वासास पात्र झाला होता. म्हणून तो जेव्हां हिंदुस्थानांत यावयास निघाला तेव्हां त्याच्याबरोबरच त्यांनी २० पिस्तुलें पाठविण्याचे ठरविलें. त्यासाठीं त्यांनी व व्ही. व्ही. एस् अय्यर यांनी एक गुप्ततळाची बेमालुम पेटी तयार करवली होती. त्या तळांतल्या चोरकप्प्यांत त्यांनीं २० पिस्तुलें व हजारों काडतुसें व्यवस्थित रचून तो चोरकप्पा बंद केला व त्यावरच्या तबकडीवर अनेक पुस्तकें, पिकविक पेपर्स वगैरेंच्या मुखपृष्ठांच्या जाहीराती, ठेवून इतर सामान त्यांत भरले. हिंदुस्थानांत आल्यावर मुंबईस कस्टम कचेरींत प्रत्येक उतारूच्या सामानाची कसून झडती घेतात, हे तात्यांना माहीत होते. म्हणून त्यांनीं ही योजना केली होती. सुदैवाने चतुर्भुजच्या पेटीच्या झडतींत पेटीला तळकप्पा असेल ही कल्पना या अधिकाऱ्यांना आली नाही. म्हणून त्यांनीं 'बेकायदा काही वस्तु तपासांत सांपडली नाही' असे मोठे प्रमाणपत्र (सर्टिफिकीट) चतुर्भुजला दिले. ते घेऊन चतुर्भुज सरदारगृहांत येऊन उतरला.

तात्यांचे मुंबईंत पूर्ण विश्वासू, असे आम्ही दोघेजण, मी व अभिनव भारताचे तेव्हां अध्यक्ष असलेले हरि अनंत थत्ते, हे होतो. तात्यांनी चतुर्भुजजवळ, आमची ओळख पटावी म्हणून, आमच्या दोघांच्या नांवांचीं दोन परिचयपत्रें दिलीं होती. प्रथम त्यानें रा. थत्त्यांची चौकशी केली. पण ते गांवी गेले असल्याने तो माझ्याकडे आला, आणि पत्र देऊन पिस्तुलांची व्यवस्था करण्याबद्दल मला सुचवले. त्या आधी ८ दिवस पोलिसांच्या सक्त पहाऱ्यांतून झुकांडी देऊन आलेले बाबा माधवाश्रमांतल्या माझ्या खोलीत पकडले गेले होते. आणि, त्यांच्या जामिनाची वगैरे सर्व खटपट मीच नाशकास जाऊन केली होती म्हणून, माझ्यावरही पोलिसांची एकसारखी पाळत होती. अशा स्थितीत चतुर्भुजबरोबर जाऊन, पिस्तुले व काडतुसे ताब्यात घेऊन, मी घरी आणणे धोक्याचे होते. म्हणून माझे परम विश्वासू स्नेही गोपाळराव पाटणकर यांना पिस्तुलांची व्यवस्था करावयास त्याच्याबरोबर पाठवले; आणि पिस्तुले माझ्याकडे आणूं नका, तुमच्याच घरी तूर्त ठेवा, असे त्यांना बजावले. त्याप्रमाणें गोपाळराव त्यांपैकी १९ पिस्तुलें व काडतुसें घेऊन सुरक्षित घरीं आले. एक पिस्तुल व काही काडतुसें चतुर्भुजने आपल्याजवळच ठेवली. पिस्तुलें घरी आणल्याचे मला कळतांच मी गोपाळरावांना ती पिस्तुले ताबडतोब नाशकाशिवाय अन्य ठिकाणी ठेवण्याचे सुचविले. नाशिकची आमची अभिनव भारताची व इतर तरुण मंडळी काही तरी एकदम दिव्य करण्यास उत्सुक झाली होती. पिस्तुलें, काडतुसें त्यांच्या हातीं पडताच, मलाही न कळवता, उच्छृंखलपणें ते कोणाचा तरी अचानक

घात करतील, ही भीती मला पदोपदीं वाटत होती. म्हणून आमच्या, एकाच वेळी हिंदुस्थानभर, किंवा निदान बऱ्याच ठिकाणीं, क्रांतीचा भडका उडवण्याच्या योजना परिपूर्ण होईपर्यंत पिस्तुलें या उतावीळ तरुणांच्या हातांत पडूं देऊं नये, असे अभिनव भारताच्या मुख्य कार्यकारी मंडळाने - म्हणजे मी, पाटणकर, थत्ते, गोरे यांनी - ठरविले होते. आमची तरुण मंडळी उतावीळ झाली होती, याचे गमक मला माझ्या मेव्हण्याच्याच बाबतींत अनुभवास आले होते. तो केवळ पोलिसासारखा काचा मारी, व काळा फेटा बांधी, एवढ्यावरून आमचे नाशिकचे चिमा खडे, खुशालसिंग वगैरे मंडळींनीं त्याचा कांटा काढण्याचे ठरवले होते. त्यांचा बेत त्यांनी मला कळवला म्हणून बरे. नाहीतर तो बिचारा त्यांच्या अत्याचाराला बळी पडला असता. माझा मेव्हणा तो आहे असे कळतांच ते चकित झाले. असो. या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांच्या हाती पिस्तुलें न देण्याचे आम्ही ठरवले होते.

६.६ पिस्तुलांची रवानगी व प्रसार

नाशकास जर तीं पाठवावयाचीं नाहीत, तर मग तीं कुठें सुरक्षित ठेवावयाचीं, याची योजना नंतर आम्ही ठरविली. मुंबईजवळ पेणला आमची शाखा होती. पाटणकरांना मी सांगितले की, पिस्तुलें घेऊन तुम्ही पेणला जा आणि तेथे सरकारी जागेत, गांवाबाहेर, पण खुणेच्या ठिकाणीं, ती आपल्या खात्रीच्या एका सहकाऱ्याच्या हस्ते न गंजतील अशी व्यवस्था करून, तूर्त पुरून ठेवा. आपणांला जेव्हां लागतील तेव्हां ती आपण आणूं. या योजनेला ते अनुकूल झाले. आमचा हेतू हा की, कदाचित पिस्तुले उघडकीस आलींच, तर आपल्या सहकाऱ्यांवर ते बालंट येऊ नये. फार तर पिस्तुलें जातील, माणसें सांपडणार नाहीत. आमच्या अभिनव भारताच्या सदस्यांपैकी त्र्यंबकराव मराठे हे तेथल्या मराठी शाळेचे मास्तर होते. त्यांना विश्वासांत घेऊन गोपाळराव पाटणकरांनी ते काम चोख बजावले आणि सर्व व्यवस्था नीट झाली आहे असे मला कळविले. पण ज्या मूळ हेतूसाठीं, म्हणजे उतावीळ झालेल्या तरुणांच्या हाती तीं पडूं नयेत, आणि आमच्या देशभर अचानक एकदम क्रांतीचा भडका उडवण्याची योजना विफळ होऊं नये, म्हणून पिस्तुलें आम्ही पेणला पाठवली, तो हेतू मात्र सफळ झाला नाही. परिणाम हा झाला की, आमच्या कसलेल्या अभिनव भारताच्या मुख्य संस्थेपैकी उतावीळ झालेल्या तरुणांच्या हाती तीं न पडतां, आमच्या अण्णा कर्व्यांच्या शाखेंतल्या, अगदींच कच्च्या पण तितक्याच उतावळ्या व अनावर झालेल्या, तरुणांच्या हातीं त्यांपैकी काही पडलीं. त्याचे कारण असे.

६.७ हुतात्मा कर्व्यांचा संबंध

आम्ही (आता नाशिकचे पेन्शनर ड्रॉइंग मास्तर) रामभाऊ भाटे यांच्या मदतीनें वसईस बॉम्ब तयार करण्याच्या खटपटींत होतो. त्याचा उल्लेख पुढील प्रकरणीं येईल. बॉम्बच्याकरितां जी रासायनिक द्रव्यें व उपकरणे आम्हांस हवी होती त्यांच्यासाठीं आम्हांस पैसा हवा होता. मागे सांगितल्याप्रमाणे आम्ही तर निष्कांचन होतो. ब्रिटिश व जर्मन कंपन्यांशी आम्ही ती द्रव्यें व उपकरणे मिळण्याबद्दल संधान बांधले होते. साबणांचा कारखाना आम्हीं काढला आहे, म्हणून आम्हांस ही रासायनिक द्रव्यें लागतात, अशी आम्ही इंग्रजी कंपन्यांना प्रथम थाप दिली

होती. पण त्यांना संशय येतो असे दिसल्याबरोबर आम्ही आमचा मोर्चा जर्मन कंपनीकडे वळवला. त्यांनाही संशय आला नव्हता असे नाही. पण ते लोक इंग्रजांइतके चौकशी करीत नसत. तीं द्रव्यें मागतांच ते डोळे मिचकावून मात्र आमच्याकडे पहात. पण इंग्रज काय किंवा जर्मन कंपनी काय, आम्हांस ती उधार माल थोडाच देणार होती? त्यांना रोख पैसा हवा होता. मागे सांगितलेच आहे की, एकदां अडचणीच्या वेळी गोपाळरावांनी आपल्या घरचे दागिने विकून पैसा उभा केला होता. पण दरवेळी ते तरी पैसा कुठून आणणार? ते अण्णा कर्व्यांच्याही गुप्त संस्थेत होते. कर्व्यांना पिस्तुलें हवी होती व पाटणकरांना पैसा हवा होता. डावरचा खून करूं पहाणाऱ्या कर्व्यांनी गोपाळरावांना एक दिवस विचारलें की, पिस्तुलें कोठे विकत मिळतील काय? प्रयत्न करून पाहतो, म्हणून गोपाळरावांनी त्यांना उत्तर दिले. आणि पैशांच्या तंगीमुळे एक दिवस पेणला जाऊन त्या आमच्या पिस्तुलांपैकी काही पिस्तुलें घेऊन ते परत आले. अण्णा कर्व्यांची पुन्हां गांठ पडतांच त्यांनीं ती पिस्तुलें व काडतुसें दाखवलीं. बॉम्बकरितां पैसे हवे आहेत. ते देत असलात तर काही सवलतीनें पिस्तुलें तुम्हांस देतो, असे पैशाच्या अडचणीत सांपडलेल्या पाटणकरांनीं अण्णास विचारलें. अण्णांनीं १५० रु. देण्याचे कबूल केले. आणि मग अण्णांनी दांडेकरांच्या चोरीमुळे मिळालेले १५० रुपये देऊन ती पिस्तुलें व काडतुसें घेतलीं, आणि पाटणकरांनीं ते १५० रुपये बॉम्बच्या कारखान्याला लागणाऱ्या जिनसा खरेदी करण्याकरितां खर्च केले! इतक्या सर्व गोष्टी झाल्या तेव्हां मी मुंबईस नव्हतो. मी परत आल्यावर मग मला त्यांनीं त्या कळविल्या. बॉम्बच्या सामानाकरितां पैसे हवेच होते, आणि तेवढ्यासाठी आपण हे केले, असेही ते म्हणाले. शिवाय आपण देशभर जो स्फोट उडवणार आहोंत, त्या योजनेला कर्वे सर्वस्वीं कबूल आहेत, आपल्या संमतीशिवाय पिस्तुलांचा उपयोग स्वतंत्रपणें करून आपली योजना अकालींच ते बिघडविणार नाहीत, असेही अभिवचन अण्णांनी दिल्याचे त्यांनी मला सांगितले. पैशांच्या अडचणीकरितां पाटणकरांनी हे काम केले यांत शंकाच नव्हती. पण मला माझ्या उतावळ्या सहकाऱ्यांची जी भीती वाटत होती तशीच अण्णांच्या सहकाऱ्यांबद्दलही वाटत होती. ती त्यांच्या कानावर घालून आपली देशभर बॉम्बचा धूमधडाका एकदम उडवून क्रांतीची योजना दक्षतेनें ठरवण्यासाठीं मी कर्व्यांना भेटण्याचे ठरवले.

६.८ कर्व्यांची व माझी योजना व आणाभाका

त्यावेळी हल्लींच्या हॉफकिन इन्स्टिट्यूटमध्ये, म्हणजे जुन्या गव्हर्नमेंट हाऊसमध्ये, आमचे अभिनव भारताचे सभासद (आता कै.) डॉ. गोविंद बाबाजी गोखले हे काम करीत असत. त्यांचे वास्तव्यही तेथेच असे. प्रसिद्ध देशभक्त कै. भास्करराव फडके ('विहारी' पत्राचे व विवेकानंदांच्या ग्रंथमालेचे संपादक) यांचे ते सख्खे बंधु. दत्तक गेल्याने ते फडक्यांचे गोखले झाले होते. त्यांच्या घरी रात्री (१९०९ च्या ऑक्टोबर महीन्यांत असेल) मी, पाटणकर व अण्णा कर्वे यांनी भेटण्याचे ठरवले. त्याप्रमाणे रात्री आमची भेट झाली. त्या भेटीत आमची सर्व प्रांतभर, बंगाली व इतर क्रांतिकारकांच्या मदतीनें बंगल्यांत, आणि इतर प्रांतांतही, एकदम सरकारला दहशत, हादरा, बसेल अशा क्रांतीचा भडका उडवण्याची योजना मुक्रर झाली. एकाच वेळी, अनेक प्रांतांत, असे रोमांचकारी बॉम्बचे भडके उडाले म्हणजे एकाच ठिकाणीं सरकारला आपली शक्ति केंद्रित करतां येत नाही, अधिकाऱ्यांचीही भीतीने गाळण उडते, आणि आमचे जे काही क्रांतिकारक या योजनेंत बळी पडावयाचे त्यांच्याही आयुष्याचा भरपूर वचपा काढतां येतो,

आणि त्यामुळे लोकांनाही दुप्पट उत्तेजन मिळते, असे अनेक हेतू या योजनेने साधत असल्याने, तिच्या परिपूर्णतेसाठीं आपले सर्वस्व वेंचावयाचें असे आम्ही ठरविले. यांत रतिमात्रही फरक होणार नाही, मुंबई प्रांतांत काय करावयाचे ते आम्हीं दोघांनीं, म्हणजे कर्व्यांनी व मी, एकमेकांना कळवल्याशिवाय करावयाचे नाही, अशा आणाभाकाही तेथे झाल्या. मला बालंबाल खात्री पटावी म्हणून अण्णांनी त्यांच्या गुरूंच्या - पुण्याचे प्रसिद्ध रामानंद बीडकरमहाराज हे अण्णांचे गुरु होते - नांवेनेही शपथ घेतली. अण्णांची त्यांच्या गुरूंवर अतिशय श्रद्धा. अण्णा त्यांच्याजवळ सर्व काही सांगत. डावर जज्जाला मारण्याचा कटही अण्णांनी त्यांना सांगितला होता. कोणतेही कार्य करावयाचें म्हणजे गुरूंना ते अगोदर विचारीत. १९०८ साली ''तूं हवें ते काम कर, त्यांत तुला स्वतःला धोका नाही. १९०९ सालीं मात्र तूं काही प्रत्यक्ष चढाईचें काम करूं नकोस, केल्यास फुकट मरशील'' अशा आज्ञा बीडकरमहाराजांनी त्यांना केल्या होत्या. त्या त्यांनीं मला सांगितल्या; आणि ''एखादे वेळस मोहवश होऊन तुम्हांला दिलेली शपथ कदाचित् मोडीन, पण गुरूंच्या आज्ञेबाहेर जाणार नाही'' असा निखालस निर्वाळा त्यांनीं मला दिला होता. त्यामुळे मला कळवल्याशिवाय अण्णा कर्वे कोणतीही गोष्ट करणार नाहीत, याची आम्हां सर्वांना मनोमन खात्री पटली. आम्ही त्या बैठकीत एकमेकांशीं पूर्ण सहकार्याची वचनें देऊन घेऊन निश्चित योजनाबद्ध झालो. अण्णांचा सावरकरांच्याबद्दल थोडासा प्रतिकूल ग्रह होता हे मला माहीत होते. प्रकट व गुप्त कार्य एकाच माणसानें करूं नये, या मुद्यावरच फक्त तो होता. मागे त्याचा उल्लेख आलेलाच आहे. पण गुप्त व प्रकट कार्यासाठींच बाबा त्या वेळेस जन्मठेपेची शिक्षा घेऊन अंदमानच्या वाटेलाही लागले होते. त्या अमानुष शिक्षेचाही अण्णांच्या मनावर परिणाम झाला होता. प्रकट कार्य त्यामुळे स्थगित झाले होते. त्यांतही १९०६ त तात्या सावरकर विलायतेला गेल्यापासून मी प्रकट कार्यात कधी सहसा पडत नसे. इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष तात्यांना पत्रेही पाठवणे मी बंद केले होते. पत्र पाठवावयाचे तर विलायतेतल्या इतर दुसऱ्या कोणामार्फत ते मी पाठवी. या माझ्या वागण्यामुळे आमच्या अभिनव भारतापैकी माझ्याबद्दल अनुकूल ग्रह अण्णांचा होता. म्हणून अण्णा माझ्याशी मोकळ्या मनानें बोलत चालत असत. शिवाय आमची शस्त्रास्त्रांची जमवाजमव, बॉम्बच्या कारखान्याची स्थापना, या आम्ही सुरू केलेल्या प्रत्यक्ष कार्यात त्यांचे पाटणकर, गोरे, खरे, भाटे यांच्याशी सहकार्य चालूंच होते. आमच्या व अण्णांच्याही गुप्त मंडळींत ही मंडळी सामील असत. त्यामुळे अण्णांना आमच्या सहकार्याचीही जरूर वाटूं लागली होती. या बैठकीत त्या सहकार्यावर शिक्कामोर्तब झाले.

या बैठकीत सहकाऱ्यांच्या उतावळेपणाबद्दलही मी हडसून खडसून त्यांना बजावले होते. त्याबद्दलही अण्णांनी मला ग्वाही दिली होती. एकमेकांच्या गटांतले सभासद परस्परांस परिचित नसल्याने, केवळ पुढाऱ्यांच्या वचनांवरच या बाबतीत विश्वासणें भाग होते. त्यामुळे मला जे अनुभव आले होते तसेच त्यांनाही आले असतील, अशा कल्पनेने मी त्यांना त्याबद्दल दक्ष राहण्यास सांगितले. त्यांना त्यांच्या सहकार्यांची खात्री होती. पण हातांत शस्त्र आले की, ते वापरून पहाण्याची बुद्धी होतेच. केवळ हत्यारांच्या शिक्षणासाठी, नेमबाजीसाठी हत्यार वापरणे निराळे, आणि रागाच्या, द्वेषाच्या किंवा सूडाच्या भावनेला बळी पडून अकाली, अविचाराने ते वापरणे निराळे. बाबांना झालेल्या राक्षसी शिक्षेने तरुणांची मनें जळफळतच होती. इंग्रजांच्या अत्याचारांना ऊत आला होता. बंगालच्या क्रांतिकारकांचे रोमांचक प्रयत्न आमच्या तरुणांच्या

मनांत धगधगलेल्या आगीत तेल ओतीतच होते. अशा प्रक्षुब्ध मनोविकारांत तरुणांनी संयम राखणे कठीणच होते. पण आमच्या योजनेला परिपक्व रूप येण्यास काही महीने मनोविकारांना आळा घालणे भागच होते. म्हणून पिस्तुलें जरी घेतलीं तरी त्यांचा उपयोग तुमच्या सल्ल्याशिवाय तुमच्या अनुयायांना करू देऊं नका, असे मी त्यांना वारंवार हडसून-खडसून सांगितले. नाहीतर एखाद्या तरुणाच्या चुकीमुळें सर्वस्वाचा, सर्व योजनेचा, घात होईल; आणि एका घुंगरुटाला मारण्यापायीं आपल्या कैक सहकाऱ्यांचे बिनमोल प्राण व्यर्थ जातील, याची त्यांना पक्की जाणीवही करून दिली. अण्णांनी हे सर्व मान्य केले; आणि या बाबतीत कदापिही चूक होऊ देणार नाही अशी मला ग्वाही दिली. पण अण्णांना नकळतच ज्याक्सनच्या वधाचे प्रकरण नाशकास त्यांच्या सहकाऱ्यांनीं शिजत घातले होते, आणि त्यामुळे अखेरीस उतावळेपणाने घात व्हावयाचा तो झालाच. कसा ते पुढे येईलच. त्याचे वर्णन करण्यापूर्वी गुप्त कार्यापैकी स्फोटकास्त्राच्या (बॉम्बच्या) कारखान्याचे प्रकरण अगोदर घेऊ.

७ अभिनव भारताचे बॉम्बस्‌चे कारखाने

विलायतेत इतरत्र, व खुद्द लंडन शहरांत, अभिनव भारताचे जे जे सभासद होते त्यांना तेथे पिस्तुलें व बॉम्बचे सामान मिळण्यास हिंदुस्थानाइतकी अडचण पडत नसे. सावरकर विलायतेस गेले तेव्हां सेनापति बापट हेही विलायतेत होते. दोघांचा स्नेह लवकरच जमला आणि बापट हे अभिनव भारताचे सदस्यही झाले (सावरकर चरित्र पृ. १६२). सशस्त्र क्रांति हेच स्वातंत्र्यप्राप्तीचे इतिहासनिर्दिष्ट साधन खरे, पण ते उघडपणें सांगणे हे कोणतीही राज्यसत्ता करू देत नाही. त्यासाठी मग गुप्तपणे शस्त्रे गोळा करणे, त्यांचा उपयोग करावयास शिकणे, हिंदुस्थानांत त्यांची शक्य तेवढी निर्यात करणे, बॉम्बसारखी प्रभावी अस्त्रे तयार करण्याची विद्या व शस्त्रे तयार करण्याची कृति, कचाप्रमाणे, परदेशी जाऊनही शिकणे, त्याचे प्रयोग करून पाहणे, ज्यांना शस्त्रविद्या हेच चरितार्थाचे साधन आहे अशा सैनिकांत राजद्रोह पसरवून त्यांना सशस्त्र क्रांतीला उद्युक्त करणे, प्रांतोप्रांती आणि शहरोशहरी शस्त्रसंभार जुळवून ठेवणे, हे अभिनव भारताच्या सभासदांचे कर्तव्यच होते. बापट विलायतेत हे उद्योग १९०४ सालीच करूं लागले होते. पण त्यांचा खाक्याच निराळा. या पठ्ठ्याने एडिंबरो येथे हिंदुस्थानच्या परिस्थितीवर जे व्याख्यान दिले त्यांच्या शेवटी सशस्त्रक्रांति हाच स्वातंत्र्याच्या प्राप्तीचा उपाय सांगून, त्या साधनाचे प्रतीक म्हणून जवळ असलेले पिस्तूलच टेबलावर प्रेक्षकांपुढे ठेवले, असे बापटांनींच लिहून ठेवले आहे. रशियन राज्यक्रांतिमध्ये बॉम्बचा उपयोग तेथे क्रांतिकारक करीत असत. हे अस्त्र आपल्या उद्दिष्टसाधनाला फार उपयोगी आहे, हे अभिनव भारताचे सदस्य जाणून होते व त्या साधनाच्या प्राप्तीस्तव त्यांचे यत्नही चालू होते.

७.१ *बॉम्बचे पॅरिस येथे प्रयोग*

स्वतः बापट हे अत्यंत भावनाशील आहेत. एखादी गोष्ट पटली की, ती साध्य करण्यांस ते जिवाचे रान करतात. बॉम्बचा उपयोग त्यांना पटला. आणि ती विद्या हस्तगत करावयाचे त्यांनीं ठरवले. त्या वेळी फ्रान्सच्या राजधानीत पॅरीस (मधुपुरी असे बापट याला म्हणतात) येथे बरेच रशियन क्रांतिकारक येऊन राहीले होते. त्यांच्यापैकी काहीजण बॉम्ब तयार करण्यांत चांगलेंच तरबेज होते. हिंदुस्थानांतल्या तीन प्रांतांतून ही विद्या शिकण्यास बंगालचे हेमचंद्र दास, नाभा संस्थानचे मिर्झा अब्बास, आणि महाराष्ट्रीय बापट हे तेथे गेले. त्यांनी या रशियन क्रांतिकारकांशी चांगलेच सूत जमवलें. प्यारिसमध्ये एका साबणाच्या कारखान्यांत हे प्रयोग सुरू झाले. पण या कृतीची एक अधिकृत पुस्तिकाही त्यांना हवी होती. ती मिळवण्यास बापटांना, युक्त्य-प्रयुक्त्या करून, बर्लिनला जर्मनींत जावें लागलें. तेथे त्यांना ती पुस्तिका (र्स्ीहर्ल्ीत्) मिळाली. तिच्या पानापानांचे बापटांनीं फोटो घेतले, पण ती होती रशियन भाषेंत. आणि बापटांना तर रशियन येत नव्हते. अशा अडचणींत त्यांना त्यांच्या ओळखीच्या एडिनबरो येथे वैद्यकीचा अभ्यास करीत असलेल्या एका रशियन तरुणीची आठवण झाली. तिला त्यांनी बर्लिनला बोलावलें. तीही निरोपासरशी आली. बापटांनी तिला त्या रशियन भाषेतल्या बॉम्बच्या पुस्तिकेचें इंग्रजीत भाषांतर करावयास विनंती केली. आपली परीक्षाही बुडवून त्या थोर उदारचरित तरुणीनें त्याचें भाषांतर करून बापटांस लंडन येथे दिले. तेथे त्याच्या अनेक प्रती

सावरकर व बापट प्रभृति लोकांनी केल्या. त्यांपैकी एक प्रत होतीलाल वर्मांच्या बरोबर लो. टिळकांना अर्पण करण्यासाठी दिली होती. होतीलाल हे परत येतांना अमेरिका-जपानमार्गे आले. येतांना हॉंगकॉंगमधल्या हिंदी पलटणी फितविण्याचा उपक्रम त्यांनीं केला. इकडे आल्यावर वर्मांनीं ती बॉम्बची कृतीची प्रत टिळकांना पोचवली. दुसरी बापटांच्याजवळ होती. तिसरी हेमचंद्राजवळ दिली. तशीच एक बाबा सावरकरांकडे रवाना झाली. मिर्झा अब्बास व सर शिकंदर हयातखानांच्या बरोबर एक आली. याप्रमाणे निरनिराळ्या प्रांतांतल्या गुप्त मंडळांच्या प्रमुखांकडे तिच्या शेकडों प्रती वाटल्या गेल्या होत्या. त्या पुस्तिकेत वर्णन केलेल्या कृतीप्रमाणे बॉम्बचे प्रयोग प्यारीस येथेच प्रथम एका वृद्ध रशियन क्रांतिकारक रसायनशास्त्रज्ञाच्या देखरेखीखालीं करण्यांत आले. ते संपूर्णतया यशस्वी झाल्याची या लोकांनी खात्री करून घेतली. सावरकरांनींही तसे प्रयोग लंडनमध्ये करून पाहीले (सावरकर-चरित्र, करंदीकरकृत); आणि मगच बापट, हेमचंद्र आणि होतीलाल वर्मा हे हिंदुस्थानांत यावयास निघाले. होतीलाल वर्मा हे लागलीच हिंदुस्थानांत १९०७ मध्येच येऊन पोंचले. बापट अधिक हुषार. ते आपले नांव बदलूनच हिंदुस्थानांत आले. हेमचंद्र त्यांच्या अगोदरच येऊन पोंचले होते. या पुस्तिकेप्रमाणें उत्तम बॉम्ब करतां येतील असे आमच्यावरील नाशिकच्या क्रांतीच्या खटल्यांत कॅ. हायाम यांची जी स्फोटक-तज्ज्ञ म्हणून साक्ष झाली तिच्यांत त्यानें म्हटलें आहे. हिंदुस्थानांत ही पुस्तिका आल्यावर तिच्या शेंकडों प्रती करून आमच्या निरनिराळ्या शाखांकडे व परप्रांतांतही वाटल्या गेल्या होत्या. त्यांपैकीच एका पुस्तिकेवरून आमच्यांतले रसायनशास्त्री रा. कृष्णाजी गोपाळ खरे यांनी बॉम्बचे प्रयोग पेणला करून पाहीले, असे अभिनव भारताच्या पेणच्या शाखेचे अध्यक्ष रा. त्र्यंबकराव मराठे, मास्तर, यांनी आपल्या लेखांत म्हटलें आहे.

७.२ आमचे स्फोटकास्त्रतज्ज्ञ खरे गुरुजी

येथेच रा. खऱ्यांच्या बद्दलची थोडीशी माहिती देणे इष्ट आहे. कृ. गो. ऊर्फ बाबूराव खरे हे आमच्या बरोबरच फर्ग्युसन कॉलेजमध्ये होते. प्रथम प्रथम ते आमच्यांत मिसळत नसत. अत्यंत हुषार विद्यार्थी, पहील्या वर्गांत नेहमी पास होणारे, म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांनीं बी.ए.साठी रसायनशास्त्र हा ऐच्छिक विषय घेतला होता. आणि त्या परीक्षेंतही त्यांनी उच्चांक गांठला होता. फर्ग्युसनमध्ये ते, कै. हरिभाऊ भागवत, व नगरचे वेदमणी यांचा एक निराळाच गट होता. ते गंभीर, अबोल व किंचित् उग्र दिसत. आणि एखाद्या तपस्व्याप्रमाणे एकांतप्रिय असत. आमच्या पुण्याच्या शाखेत ते नसले तरी त्यांचे गुप्त राज्यक्रांतीचे यत्न चालूंच होते. सावरकरांच्या प्रकट-गुप्त अशा विरोधी कार्यपद्धतीबद्दल, अण्णा कर्व्यांप्रमाणें, त्यांचाही आक्षेप होता. शिवाय सावरकर नुसते व्याख्यानबाजी करतात, प्रत्यक्ष कार्य काही करीत नाहीत, हाही त्यांच्या विरोधाचा एक मुद्दा होता. सावरकर व मी फर्ग्युसन सोडून मुंबईस आल्यावर पुण्याच्या शाखेचे चालकत्व आताचे जुन्नरचे वकील रा. गणेश वासुदेव जोगळेकर यांच्याकडे गेले. ते प्रकट कार्यांत कधीच पडत नसत. त्यांनी खऱ्यांना सहकार्याची विनंती केली (जोगळेकरांचा लेख). खऱ्यांनी त्यांना जे आक्षेप सांगितले त्यांत अभिनव भारताचे सदस्य काही धाडसाचे काम करीत नाहीत, हा एक आक्षेप होता. त्याची प्रचीती घेण्यासाठी जोगळेकर व कालेलकरांना रात्री फर्ग्युसन कॉलेजच्या मागच्या टेकडीवर त्यांनी फाटक व फिरोदिया (हल्लीचे मुंबई

विधिमंडळाचे अध्यक्ष) यांच्या साहाय्याने वेष पालटून कसे तिंबले त्याची हकीगत मागे आलीच आहे. या प्रचीतीनंतर खऱ्यांची खात्री पटली असावी असे वाटते.

खरे नंतर बी.ए. झाल्यावर एम्.ए.च्या व वकिलीच्या अभ्यासासाठी मुंबईस आले. त्यांनी रसायनशास्त्र हा विषय घेतल्यामुळें प्रो. गज्जरांच्या प्रयोग शाळेत त्यांनी आपला प्रवेश करून घेतला. राज्यक्रांतीच्या उद्योगांत स्फोटकशास्त्राचा (बॉम्बचा) अभ्यास करण्यासाठीच त्यांनी हा प्रयत्न आरंभला होता. त्यांत त्यांचे सहकारी कर्वे, पाटणकर, विश्वनाथपंत गोरे, जमखिंडीचे रा. कुळकर्णी (लॉ क्लासचे विद्यार्थी), व्हि.टे.इ.चे विद्यार्थी व्यंकटेश परशराम नागपूरकर व मुकूंद पांडुरंग मोघे हे प्रामुख्याने होते. याच सुमारास विलायतेहून सावरकरांनी बॉम्बची पुस्तिका बाबांकडे हिंदुस्थानांत धाडली होती. हेमचंद्र दासने त्याप्रमाणे अलिपूरला प्रयोग करून बॉम्ब तयारही केले होते. या पुस्तिकेच्या प्रतींपैकी एक प्रत अण्णा कर्वे यांच्याकडे पाटणकरांमार्फत पोचली होती. त्या पुस्तिकेच्या आधारापूर्वीच आमच्या रसायनशास्त्री खऱ्यांनी बॉम्बकरितां लागणाऱ्या पिक्रिक ॲसिड व मर्क्युरी फल्मिनेट तयार करण्याचा चंग बांधला होता. मुंबईस त्यांनीं काही प्रयोग केले. पण मुंबई हे शहर गुप्त प्रयोगाला सोयीचे नव्हते म्हणून पेणला ते गेले व तेथे प्रयोग यशस्वी झाल्याचे आमचे अ. भारतचे सदस्य मराठे म्हणतात. रा. खऱ्यांना मी या सर्व कारस्थानाची साद्यंत हकीकत लिहीण्यास विनंती केली होती. पण प्रसिद्धिपराङ् मुखतेमुळें, किंवा हातून काही योजनेप्रमाणें घडलें नाही, सारी तपश्चर्या व्यर्थ जाणून सर्वच ओंफस् झाले, आणि वर १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागली, या सर्व घटनांनीं त्यांना जे नैराश्य आले त्यामुळेही असेल, त्यांनी हकीकत लिहीणे नाकारले, याबद्दल मला वाईट वाटते. रा. बाबूराव खऱ्यांनी या स्फोटाकास्त्राच्या बाबतीत जे निःसीम धैर्य, स्वार्थत्याग, कर्तृत्व, आणि बुद्धिसामर्थ्य दाखवले, त्यामुळे अभिनव भारताच्या एकंदर संघटनेत त्यांचे स्थान फारच उच्च आहे, यांत शंका नाही. हल्ली ते पुण्यास वकिली करीत आहेत. त्यांनीच हे सर्व सुसंगत लिहीले असते तर त्यांना आलेली संकटे, त्यांचा त्यांनी केलेला परिहार, या सर्वांवर फारच उत्तम प्रकाश पडला असता. पण आमचे दुर्दैव की, त्यांना, किंवा त्यांच्या सहकाऱ्यांना, मौनांतच समाधन आहे.

या त्यांच्या आणि कैकजणांच्या मौनवृत्तीमुळें माझा एक गैरसमज मात्र दूर झाला. आम्ही आधुनिक काळांतले लोक आमच्या पूर्वजांनी इतिहास लिहून ठेवले नाहीत, म्हणून त्यांना दूषणे देतो. त्या काळी लेखन व प्रकाशन साहीत्य दुर्मिळ असे. आतां ते सर्व भरपूर असतांही आम्ही अद्यापही इतिहासपराङ्मुखच आहोत. कोणी म्हणतील की पराजयांचा इतिहास काय लिहावयाचा? पण गेल्या महायुद्धांत इंग्लंडची जी सपशेल ससेहोलपट डंकर्कहून झाली तिचाही इतिहास इंग्रज लिहीतातच आहेत. बंगाली व इतर प्रांतीय क्रांतिकारकारंनी आपल्या पराजयांचेच इतिहास लिहीले आहेत. आम्ही मात्र ते करीत नाही ! क्रांतिकारकांचीं इतिहाससाधनें कशीं नाहीशीं करावीं लागतात, याचें वर्णन मागे आलेच आहे. पण साधनें नष्ट केली तरी माणसें तो पुन्हा लिहूं शकतात. तसे केल्याशिवाय इतिहास तरी कसे होणार ? पण आमच्यापैकी पुष्कळांनीं ही इतिहास-विन्मुखताच दाखविली आहे ! दुर्दैव ! यापेक्षां काय म्हणणार?

७.३ स्फोटकास्त्रविद्येतले अनेक शिष्य

असो. बाबूराव खऱ्यांनीं या स्फोटकविद्येत बरेच शिष्य तयार केले. फ्रान्सहून बापटांनी स्वतः प्रयोग करून पाहून आणलेली बॉम्बची कृतिच इतकी उत्तम होती की, अगदी सामान्य माणसेंही तो प्रयोग, प्रथम शिकून, वारंवार पाहून मग, हवा तेथे करूं शकत. बाबूरावांच्या व कर्वे यांच्या शिष्यांत आमचे नाशिकचे अभिनव भारताचे सदस्य रा. दामोदर महादेव चंद्रात्रे (भिक्षुक), आबा गायधनी (भिक्षुक), विनायक नारायण देशपांडे (फाशी गेलेले, साधे मराठी मास्तर), जन्मठेप शिक्षा झालेले शंकर रामचंद्र सोमण व त्यांचे बंधु (खानापूर), पुरुषोत्तम लक्ष्मण दांडेकर (हायस्कुलांतले विद्यार्थी), श्रीधर वामन बर्वे (मॅट्रिकपर्यंत शिक्षण), त्र्यंबकराव मराठे (मराठी ट्रेंड शिक्षक), रामचंद्र दिनकर भाटे, (चित्रकला शिक्षक) इत्यादी अगदी सामान्य शिक्षणाची माणसे होती. पण या सर्वांनी ती विद्या, रसायनशास्त्र येत नसतांही, हस्तगत केली! स्फोटकविद्या म्हणजे केवळ रसायन-तज्ज्ञांनींच करावी, ही जी एक भीतीयुक्त कल्पना होती, ती प्रत्यक्ष प्रयोग करून पाहून नाहीशी झाली. आणि पिक्रिक ऍसिड व मक्युरी फल्मिनेट करण्याचे कारखाने लंडन-प्यारिसप्रमाणें नाशिक, मुंबई, पुणे, कोठुरें, पेण, खानापूर, वसई (मुख्य केंद्र) येथे सुरू झाले! अनुभव हाच खरा गुरु असतो, असे जे म्हणतात, ते येथेही प्रत्ययास आले. बाबूरावांचे मुख्य पट्टशिष्य आमचे नाशिकचे रामभाऊ भाटे हे. स्फोटकद्रव्यें तयार करतांना जे धोके असतात ते टाळण्याची, रसायनशास्त्र न शिकलेल्या, या भाट्यांनींच युक्ती शोधली! आणि जेव्हां बापूराव खऱ्यांना ती कळली तेव्हां गुरूंनीं शिष्याची पाठच थोपटली (भाटे यांच्या स्मृति : पुढे पहा)! खुद्द सावरकरांनींही लंडनमध्ये इंडिया हाऊसमध्ये हे प्रयोग स्वतः केल्याचे त्यांच्या चरित्रांत नमूद आहेच. आणि एकदां तर त्यांचे प्राण धिंग्रांनींच वांचवले होते. हेमचंद्र दासांनीं बंगालमध्ये हे स्फोटकांचे काम चालूं केलेच होते. बॅ. मिर्झा अब्बास यांनी मात्र ते सुरू केल्याचें कोठे ऐकिवांत नाही. पण विलायतेहून हेमचंद्र दास, सेनापति बापट व बॅ. अब्बास या तिघा कचांनीं ही विद्या जी हिंदुस्थानांत आणली तिला उपर्युक्त ठिकाणीं असा बहर येऊं लागला होता. आणि या अस्त्राचा पुरवठा करण्यांत कर्वे यांचा गट व आमच्या अभिनव भारताचा गट यांचें संपूर्ण सहकार्य होते.

हे सहकार्य चालूं असतांही आम्ही एकमेकांच्या गुप्ततेबद्दल शक्य तेवढी दक्षता घेतच होतो. इतकी की, मुंबईस माझ्या खोलीत पिक्रिक तयार करण्यास अवश्य असलेले सामान - उपकरणे वगैरे - घेऊन आमचे कोठूरचे श्रीधरपंत बर्वे हे २-३ दिवस राहीले होते. पण त्यांच्या सामानांत काय आहे, हे त्यांनी शेवट पर्यंत मलाही कळूं दिले नाही. वास्तविक ते एक मोठें साहसच होते. बाबा माझ्या खोलीत पकडले गेल्याने माझ्यावर पोलिसांची टेहाळणी होतीच. काहीतरी निमित्त काढून हे आगंतुक रक्षक आमच्या खोलीवर मधून मधून पहारा करून जात. पण ते कधी फारसे आमच्या वाटेत आड आले नाहीत. जातांना बर्व्यांनी मला हे त्यांचे रहस्य सांगितले. तेव्हां मी त्यांच्या गुप्ततेच्या दक्षतेमुळें आनंदाने आश्चर्यचकितच झालो. पण ही साहसे करण्यासाठीच आम्ही बद्धपरिकर झालो होतो. असे प्रसंग यावयाचेच अशी खूणगांठ आम्हीं मनाशी बांधली असल्याने त्यांत विशेष काही वाटत नव्हते.

असेच अगदी कडक गुप्ततेचे दुसरे उदाहरण रामभाऊ भाट्यांनी आपल्या 'स्मृतींत' वर्णन केले आहे. बाबुराव खऱ्यांनीं रामभाऊंना ही विद्या शिकविली. वारंवार ते वसईस जाऊन कामावर

देखरेखही करीत. पण हे रसायनी गुरु कोण, कोठले, त्यांचे नांव, धंदा काय यांबद्दल बरेच दिवस भाट्यांनींही त्यांना कधी विचारले नाही, व बाबुरावांनींही त्यांना कळूं दिले नाही. गुप्ततेचे नियम आम्ही किती कसोशीने पाळत होतो, याचा वसईचा आमचा प्रचंड कारखाना हे प्रतीक होते. त्याबद्दलची हकीकत अतिशय उद्बोधक व मनोरंजक आहे. आमच्या गौप्यरक्षणाच्या स्वयंशासित कायद्याच्या या कडक अंमलबजावणीने, आमच्यावरील नाशिकच्या ज्याक्सन खुनाच्या व दुसऱ्या सशस्त्र क्रांतीच्या अशा दोन्ही सबंध खटल्यांत, आमचे अभिनव भारताचे शेकडों हजारों सभासद, शस्त्रास्त्रें यांचा व या कारखान्याचा मागमूसही आम्हीं पोलिसांना लागूं दिला नाही. तो आम्ही कसा टाळला हे पुढे ओघाने येईलच. ती सर्व हकीकत आमचे त्या कारखान्याचे चालक रामभाऊ भाटे यांना मी विनंती केल्यावरून त्यांनीच ती सुरसतेने लिहून पाठविली आहे. त्याबद्दल मी त्यांना शतशः धन्यवाद देतो आणि तीत फक्त स्पष्टीकरणापुरत्याच टीपा देऊन ती जशीच्या तशीच येथे देतों :-

७.४ बॉम्बकर्ते रामभाऊ भाट्यांच्या स्मृति

''स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं महाराष्ट्रानें काय प्रयत्न केले ते अलीकडील तरुणांस मुळीच माहीत नाहीत. त्यामुळें नव्या पिढीच्या तोंडून महाराष्ट्र म्हणजे कर्तृत्वशून्य, पराक्रमहीन व नादान अशा लोकांचा मुलुख आहे, असे वारंवार काढलेले उद्गार ऐकूं येतात. हा समज दृढ करण्यांत महाराष्ट्राचे परप्रांतांतील द्वेष्टे हातभार लावतात, व तिखट-मीठ लावून ते आपल्या प्रांतांतील लोकांच्या पराक्रमाचें वर्णन करतात; व ते ऐकून आमची हल्लीची 'चहाचिवडा चमनचाट' तरुण पिढी अधिकच अंधश्रद्धाळू, बेशिस्त आणि 'मवाली हुल्लडवाले' बनत चालली आहे.

''हे अज्ञान नाहीसें करण्याकरितां पूर्वीचा इतिहास लिहावा असे पुष्कळ मित्र-मंडळींनीं दे. डॉ. भाऊराव भट यांना विनंती केल्यामुळें त्यांनीं हे काम अंगावर घेतले आहे. प्रत्येक केंद्रांतील चालक व्यक्ति व कार्यकर्ते आज हयात आहेत असे नाही. असल्यास फारच थोडे लोक हयात आहेत. अशा विपत्तींत सर्व माहिती संगतवार मिळणें फार कठीण काम आहे.

''तथापि जितकी माहिती मिळेल तितकी एकत्रित करून पुस्तकरूपानें हल्लींच्या अंधश्रद्धाळू तरुणांच्या हातीं देऊन त्यांना त्यांच्या पूर्वीच्या पिढीचें सत्य स्वरूप दाखविणें अगत्याचें आहे. डॉ. भट यांनी सांगितल्यामुळेंच मी माझ्या केंद्राची हकीगत आज लिहीत आहे. ही वाचून पुष्कळांना आश्चर्याचा धक्का बसेल यांत संशय नाही. परंतु ते काही असो, ''महात्मा गांधीकी जय' असे म्हणणारी हल्लींची पिढी तर ही कल्पित कथा अगर कादंबरी लिहीली आहे असे समजेल. असो.

''माझे बरेचसे सहाध्यायी व मी नाशिक हायस्कूलमधील अभ्यासक्रम यशस्वी रीतीनें पार पाडून पुढील शिक्षणाकरितां १९०६ त मुंबईस गेलों. कोणी एल्फिस्टन कॉलेजांत, कोणी वुइल्सनमध्ये, तर कोणी इतर ठिकाणीं, शिकत होते. मी एकटाच सर, जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकत होतो. दुसरे २-३ नाशिकचे विद्यार्थी तेथे होते; परंतु ते आमच्या मंडळींपैकी नव्हते. नाशिकच्या मंडळींच्या भेटी 'राष्ट्रमत कचेरींत' होत असत. तेथेच मला प्रथम माहिती समजली की, आमचे मंडळींची खास बैठक दर रविवारी शास्त्री हॉलमध्ये भरत असते. (कधी ग्रांट रोडला चिखलवाडींत, कधी टोपिवाल्यांच्या चाळीत, कधी माधवाश्रमांतही बैठकी होत.)

त्यानंतर मी नियमितपणे तेथे जाऊ लागलो. तेथे खालील मंडळी बहुतेक नियमाने हजर असत. १. दे. तात्याराव सावरकर, २. भाऊराव भट, ३. (आतां सॉलिसिटर) हरीभाऊ थत्ते, ४. शिवरामपंत अभ्यंकर (आतां वकील, नाशिक), ५. कै. डॉ. गोखले (सरकारी नोकर होते), ६. 'विहारी'चे संपादक भास्करराव फडके वगैरे. बाकीच्यांचीं नांवें आतां आठवत नाहीत.

''मुंबईस असतांना मी (गिरगांव) कांदेवाडीत केशवजी नायकाच्या ३ नं. च्या चाळीत पहील्या माळ्यावर रहात असे. माझ्या शेजारच्या खोलीत रा. बाळकृष्ण रामचंद्र गोरे व त्यांचे दोघे बंधु राहत असत. बाळकृष्ण व मी लहानपणापासून सहाध्यायी असल्यामुळे आमचा घरोबा फार होता. गोऱ्हे यांचे मेव्हणे (आतां कै.) गोपाळ कृष्ण पाटणकर हे ४-५ खोल्या टाकून पलीकडच्या खोलीत राहत असत. सदरहू गृहस्थ शरीराने धिप्पाड व बळकट, रुबाबांत दुसऱ्यावर छाप टाकणारे, निःस्पृह व कळकळीचे देशभक्त असे आढळण्यांत आल्यामुळे मी त्यांना मुंबई शाखेमध्ये आणून दाखल केले. त्यांच्या अंगच्या अलौकिक शौर्याने व धडाडीने ते आमच्या वसई येथील शाखेचे सूत्रधार बनले.

७.५ वसईची शाखा

''माझा स्कूल ऑफ आर्टमधील अभ्यास पुरा झाल्यामुळे मी १९०८ साली नोकरीच्या शोधांत होतो. वसईजवळ पापडी म्हणून एक गांव आहे. तेथील ख्रिस्ती मिशनच्या इंग्रजी शाळेंत ड्राइंग मास्तर पाहिजे, म्हणून वर्तमानपत्रांत नोटीस आलेली वाचली. शाळेचे मॅनेजर मुंबईस राहत होते. त्यांचे नांव थॉमस बॅपटिस्टा. त्यांना जाऊन भेटलो. त्यांनी माझी नेमणूक ताबडतोब केली व मी वसईस जाऊन शाळेत कामावर रुजू झालो. रा. गोऱ्हे यांचे मेव्हणे रा. गोविंदराव गोखले यांनी खुद्द वसईस एक जुना पेशवाई वाडा खरेदी केला होता व तेथे ते राहत असत. मी गोरे यांच्याकडून पत्र घेऊन वसईस आलो व गोखले यांच्याच वाड्यात राहूं लागलो. हा वाडा हीच पुढे आमची कर्मभूमि झाली.

''येथे आल्यानंतर काही दिवसांनी नाशिकच्या 'अभिनव भारत मंडळा' ची शाखा येथे काढावी, असे मला वाटूं लागले व त्याकरिता मी प्रयत्नास लागलो. गांवांतील काही मंडळींना माझी कल्पना फार आवडली व त्यांनी साहाय्य करण्याचे कबूल केले. त्या मंडळींची नांवे खाली देतो.

''१. कै. डॉ. शिवराम भिकाजी परूळेकर, २. रा. नथु अप्पा मराठे, ३. रा. सिधूकाका मराठे, ४. रा. बापूराव वाघ, ५. रा. ठाकूर वकील, ६. रा. मुकूंदराव देसाई, ७ रा. गोपाळ मोरेश्वर गोखले, ८. रा. गंगाधर मोरेश्वर गोखले वगैरे.

(बरींचशीं नांवें विस्मृतींत गेल्यामुळें त्यांना नामनिर्देश करणे अशक्य झाले आहे. तरी त्यांनी मला क्षमा करावी.)

''वरील मंडळींच्या सहकार्याने व प्रोत्साहनाने शाखा स्थापन केली व देशभक्त तरुणांचा संग्रह करण्यास सुरुवात केली. शाळेतील मुलांचीही पारख करून निवडक मुले या संस्थेने निवडून निवडून घेतली. शनिवारी दुपारी बैठक भरे, व रविवारी संध्याकाळी शारीरिक व्यायाम, लाठी वगैरेचें शिक्षण देण्यांत येत असे. सदरहू मुले मोठी होऊन त्यांना मुले, नातवंडेंही झाली

असतील. त्यांचीं नांवें जी आठवलीं तीं खालीं देतों. मी त्यांचीं नांवे विसरलों. परंतु ते मात्र माझें नांव विसरलें नसतील याबद्दल खात्री वाटते. कारण त्यांना एकाच व्यक्तीचें नांव ध्यानांत ठेवावयाचें व मला अनेकांचीं नांवें स्मरणांत ठेवावयाचीं. तसेच या गोष्टीस आज ४० वर्षे झालीं! व वृद्धापकाळामुळें माझीही स्मरणशक्ति क्षीण झाली आहे. तरी ज्यांचीं नांवें मी लिहूं शकलो नाही असा विद्यार्थ्यांनीं राग मानूं नये.

७.६ विद्यार्थ्यांचीं नांवें :-

१. गोपीनाथ गुप्ते, २. प्रधान, ३. बेंद्रे, ४. वालावलकर, ५. कर्वे, ६. श्रीधर साने, ७. नेपोलियन राडि-क्स, ८. राजाराम शिंपी, ९. गुजराथी. नुसतीं आडनांवें अनेक स्मरतात तीं देण्यांत स्वारस्य काय असा प्रश्न पडतो, म्हणून यादी येथेच पुरी करतो.

७.७ बॉम्ब तयार करण्याचा निश्चय व योजना

''अशा रीतीनें आमची शाखा वाढीस लागली असतां एक दिवस कै. गोपाळराव पाटणकर वसईस मला भेटण्याकरितां आले. त्यांनी आपल्या बरोबर काही हस्तलिखिते व काही टाइपरायटरवर लिहीलेले कागद आणले होते. सदरहू कागदपत्रे बंगाली क्रांतिकारक देशभक्तांनी लिहून इकडे पाठविली होती. (हे कागदपत्र म्हणजेच विलायतेहून आलेल्या बॉम्बच्या पुस्तिकेची नक्कल होती. आणि ती बाबा सावरकरांकडून पुष्कळ ठिकाणी न कळत पाठविली गेली होती.) त्यांत बॉम्बगोळे तयार करण्याची कृति तपशीलवार दिली होती. बॉम्बगोळे तयार करण्यास पिक्रिक ॲसिड व फल्मिनेट ही दोन द्रव्ये तयार करावी लागतात. त्यानंतर कवच (shell) तयार करून त्यांत पिक्रिक वितळवून ओतावे लागते. तरी पूर्व तयारी म्हणून या दोन वस्तूंचा भरपूर साठा तयार करून ठेवावा व नंतर पुढची योजना करावी, असे ठरले. हे काम बरेच जोखमीचे होते; व ते करणारी माणसे धाडसी व गुप्तपणा राखण्यांत फार पक्की असली पाहिजेत. आत्मप्रौढी व प्रतिष्ठा सांगणारे असता कामा नये, फक्त प्रौढ व स्वतंत्र असलेल्या, व गुप्तपणा खात्रीने राखतील अशा मंडळींचा या कामी उपयोग करून घ्यावा असे ठरले. दुसऱ्या दिवशी माझ्या सहकाऱ्यांपैकी निवडक मंडळी एकत्र जमवून त्यांची गोपाळरावांशी ओळख करून दिली व सर्वांनी एकत्र बसून विचारविनिमय केला. सर्वानुमते खालील गोष्टी ठरल्या.

''१. मुंबईहून उपकरणे व साहीत्य आणावयाचे. त्यासाठीं डॉ. परुळेकर व मी दोघांनी मुंबईस जाऊन गोपाळरावांच्या सल्ल्याप्रमाणे खरेदी करावयाची.

२. या कामी लागणाऱ्या खर्चाची व्यवस्था गोपाळरावांनी करावयाची.

३. पुढची व्यवस्था वसईच्या मंडळींनीं सर्व करावी.

४. या कामी मार्गदर्शन करण्यासाठीं एखाद्या तज्ज्ञाची मदत पाहिजे होती. तो तज्ज्ञ गोपाळरावांनी प्रयोगाच्या पहील्या दिवशीं बरोबर घेऊन वसईस यावयाचें.

''याप्रमाणें सर्व बेत ठरल्यानंतर ठरलेल्या दिवशी आम्ही दोघे वसईहून निघून मुंबईस गेलो व गोपाळरावांस भेटलों. सामानसुमान व उपकरणे मिळविण्याच्या कामी बराच त्रास पडला. (बंगालमध्ये बॉम्ब पडूं लागले होते म्हणून) केमिस्ट लोक आमच्याकडे साशंक मुद्रेने

पाहात व आम्ही कोण? कोठे राहतो? काय उद्योग करतो? हे सामान कशाकरितां पाहिजे? वगैरे चांभारचौकशा कीरत. आम्ही त्यांना काही तरी समर्पक उत्तरे देऊन त्यांचा संशय घालविण्याचा प्रयत्न करीत असू. आम्ही साबूचे कारखानदार आहो. मोठ्या प्रमाणावर धंदा करण्याचा विचार आहे. जॉइंट स्टॉक कंपनी काढावयाची आहे. आमचे एक मित्र विलायतेत जाऊन या धंद्याचें पूर्ण शिक्षण घेऊन आले आहेत, वगैरे थापा देऊन वेळ निभावून नेण्याचे आमचे आंगवळणी पडून गेले.

७.८ बॉम्ब करण्याचे प्रयोग

''जरूरीपुरते सामान व उपकरणीं बरोबर घेऊन आम्ही दोघे वसईस येऊन दाखल झालो. दुसरे दिवशी गोपाळराव पाटणकर हे एक तज्ज्ञ (रा. कृष्णाजी गोपाळ खरे) बरोबर घेऊन आले. आमची वसईची निवडक मंडळी जमली व पहीली पिक्रिक ॲसिड तयार करण्याचा प्रयोग सुरू झाला!! हा प्रयोग करतेवेळी धूर (इल्से) फार निघतो व हा धूर श्वासनलिकेंत गेला तर श्वासनलिकांना सूज येते व हट्टी खोकला जडतो. पिक्रिक तयार करण्याची तपशीलवार माहिती सांगण्याचे हे स्थळ नव्हे, म्हणून जरूर तेवढीच माहिती दिली आहे. पिक्रिक तयार करण्यांत धुराशिवाय (इल्से) दुसरा कसलाही धोका नाही. जिवास धोका होण्याचा संभव बिलकुल नाही. परंतु पिक्रिकचा कारखाना गुप्त रीतीने चालविणे तितकेच कठीण आहे. हाताला पिवळे डाग पडतात ते ८-१० दिवस जात नाहीत. कापसाच्या कपड्यावर हा रंग बिलकुल टिकत नाही. धुतल्याबरोबर साफ निघून जातो. परंतु लोकरीच्या कपड्यावर अगर कातड्यावर तो वज्रलेप बसतो. कपडा अगर कातडें फाटून झिजून गेले तरी रंग जात नाही हे विशेष आहे.

''दुसऱ्या दिवशी तयार झालेले पिक्रिक बरणीत भरून ठेवले. त्याचा रंग फारच तेजस्वी व मनोहर 'केशरी पिवळा', सुरतेच्या केशरी बर्फीप्रमाणें, दिसतो. पिक्रिकचें नांव न घेतां 'केशरी बर्फी' म्हणावयाचे असे सर्वानुमते ठरले. नंतर दुसरा प्रयोग फल्मिनेट तयार करण्याचा झाला. त्याला पारा, नायट्रिक व सल्फ्यूरिक ॲसिडची गरज लागते. हा प्रयोग पिक्रिकसारखा निर्धास्तपणे करता येत नाही. जरा जास्त प्रमाणात मिश्रण टाकले गेल्यास धुराचा (fumes) लोळ उठतो. व फ्लास्कमधील द्रव्याचे आजूबाजूस थेंब उडतात व त्यामुळे भोंवताली बसलेल्या लोकांच्या कपड्यांस भोंके पडून कातडीपर्यंत चटका जाऊन पोहोचतो. तोंडावर व उघड्या अंगावर उडालेल्या ठिपक्यांमुळें तोंडावर देवीसारखे पण उठतात व ते बरेच दिवस राहतात. या प्रयोगांत कांचेचा चंबू (flask) फुटून त्याचे छर्रेही उडण्याचा संभव असतो. सदरहू दोन धडे शिकवून आमचे तज्ज्ञ गुरुजी परत मुंबईस गेले. परंतु सदरहू इसम कोण? किती शिकलेले आहेत? त्यांचे आंडनांव काय? वगैरेची माहिती कोणी विचारावयाची नव्हती व बोलण्या-चालण्यांतही तिचा थांगपत्ता तज्ज्ञानें लागूं दिला नाही! फक्त हे ब्राह्मण असावेत. बी.एस्सी. अगर एम्.एस्सी. असावेत असा आमचा तर्क होता.

७.९ प्राणसंकट

''पुढे कारखाना सुरू झाला. प्रथम प्रथम मंडळींचा उत्साह दांडगा होता व कामही कल्पनातीत झपाट्याने उरकूं लागलें. ''अतिपरियात अवज्ञा' या म्हणीप्रमाणें सर्वांना त्यांत

काहीच बाऊ वाटेनासा झाला व ''आज मी आपल्या हाताने प्रयोग करणार' असे म्हणून पुष्कळजण पुढे सरसावूं लागले. शेवटी एक प्रसंग असा आला की, त्यावेळी सर्वांना विश्वरूप-दर्शन घडलें! फ्यूम्सनें (फल्मिनेट्या धुरानें) खोली इतकी भरून गेली की, माणसास माणूस दिसेना! फ्लास्कमधील द्रव्याचे मोठमोठे थेंब अंगावर उडूं लागले व भिंतीपर्यंत लांब जात होते. ठरल्याप्रमाणे दरवाजास बाहेरून कुलूप घालून आमचा मनुष्य बाहेर निघून गेला होता. अशा प्रसंगी आतां स्फोट होणार अशी भीती वाटूं लागली. प्रयोगाचे फ्लास्क पाण्यानें अर्धवट भरलेल्या रुंद तोंडाच्या भांड्यांत ठेवलेले होते. ज्यांचे रक्षण करावयाचे असते त्यांना ईश्वर बुद्धि देतो. मी खाली बसून सरकत सरकत जवळ गेलो व फ्लास्कची मान हाताने पकडून आतील द्रव्य पाण्यांत ओतून दिले. अशा रीतीनें आलेला प्रसंग निभावला. या गोष्टीचा एक अनिष्ट परिणाम झाला. तो असा की, जो तो मागे मागे घेऊं लागला व पुढे कामास हजर राहीनासा झाला. डॉ. परुळेकर व मुकूंदराव देसाई हे मात्र डरले नाहीत; व पुढे आमच्या तिघांवरच कारखान्याच्या कामाचा बोजा पडूं लागला. बाकीची मंडळी धोका नसलेली इतर कामे खुषीनें करून आमच्याबद्दल आदर व सहानुभूति दाखवीत असत.

७.१० जर्मन कंपन्यांची सहानुभूति

''नंतर फल्मिनेटला लागणाऱ्या सर्व सामानाची सिद्धता केली. फल्मिनेट तयार करण्याच्या कृतींत थोडासा बदल करून पाहतां त्या प्रयोगांतील धोका जवळ जवळ नाहीसाच झाला. ही बातमी गोपाळरावांच्या मार्फत तज्ज्ञास (बाबूराव खऱ्यांस) मिळाली. तेव्हां हा चमत्कार काय आहे, तो पाहण्यास ते मुद्दाम वसणीस आले. त्यांना सर्व प्रयोग प्रत्यक्ष करून दाखविला. तेव्हा त्यांनीं फारच आश्चर्य व्यक्त करून ''महाराष्ट्रांत कल्पक व संशोधक लोकांची वाण आहे असे म्हणणारे खरोखरच गाढ अज्ञानांत आहेत' असे उद्गार काढले! त्या दिवसापासून तज्ज्ञांचा आमच्यावरील विश्वास फारच दृढ झाला. यापुढील प्रयोगांत आमचें सहकार्य घेण्याचे त्यांनी ठरविले. पुढचा प्रयोग म्हणजे आतां प्रत्यक्ष बॉम्बगोळे तयार करण्याचा होता. ते सामान इतर किरकोळ केमिस्टांकडे मिळणे शक्य नव्हते. म्हणून मुंबईंत असलेल्या जर्मन फर्म्सची माहिती मिळवून त्यांच्याकडे संधान लावले. दोघांतिघां गृहस्थांनी आम्हांस सर्व प्रकारे साहाय्य करण्याचे आश्वासन दिले. आम्ही त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकावा व खुल्या दिलाने सर्व खरी खरी हकीगत त्यांना सांगावी, असा त्यांचा बोलण्याचा भावार्थ असे. व आम्ही त्यांना डरतो, म्हणून मनमोकळें बोलत नाही, असे पाहून ते एकमेकांकडे पाहून गालांतल्या गालांत हसत. तथापि त्यांनी आम्हांस लागणारे सर्व सामान दिले व पुढेही लागेल ते, व लागेल तेवढे, सामान देण्याचे आश्वासन दिले.

७.११ पहीला बॉम्ब उडवण्याचा फसलेला प्रयोग

''सर्व सामान मिळाल्याच्या आनंदांतच आम्ही सर्वजण वसईस आलो. पिक्रिक वितळविण्यास ३०० डिग्री उष्णता (हीट) लागले. त्यासाठी स्टोव्हवर मोठे पातेले ठेऊन त्यांत ३-४ शेर तेल टाकले. तेल कढत झाल्यावर त्यांत थर्मामिटर व पिक्रिक ॲसिड घातलेले फ्लास्क ठेवले. उष्णतामान ३०० डिग्रीवर येतांच पातेले खाली उतरून घेतले. पिक्रिकही

वितळत आलेच होते. ते तज्ज्ञांनी आणलेल्या एका कवचामध्ये (शेलमध्ये) ओतले. (ही शेल्स तयार करण्याचे काम रा. व्यं. प. नागपूरकर व मु. पां. मोघे करीत). दुसऱ्या दिवशी थंडगार झाल्यावर त्यावर फल्मिनेट घालून वर सुरक्षिततेचा बंदोबस्त केलेलं ऍपरेटस् म्हणजे स्प्रिंग, रॉड व हॅंडल हे बसविले, व अशा रीतीने आमचा पहीला बॉम्बगोळा तयार झाला. दांडा धरून गोळा लांब फेकला असता तो गुरुत्वाकर्षणाच्या नियमाने दांड्यावर पडावयाचा व त्या धक्क्याने स्प्रिंगने दाबून धरलेला लोखंडी गज निसटून जोराने फल्मिनेटवर आदळून सर्वांचा स्फोट व्हावयाचा अशी योजना केलेली होती. स्फोट कसा होतो? त्याने किती लांबीपर्यंत मारा होऊ शकतो? वगैरे गोष्टींचा अंदाज पाहणे जरूरीचे होते. म्हणून हा पहीला बॉम्ब उडवून पाहण्याचे ठरले.

''या कामी सर्वांचीच जिज्ञासा जागृत झाली व प्रत्येकाला हा प्रयोग शक्य तितक्या लवकर व्हावा असे वाटूं लागले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी समुद्रकांठी फिरावयास सर्व मंडळी निघाली. जिकडे तिकडे सामसूम होईपर्यंत वाट पाहणे भाग पडलें. कारण वसईचा रमेदी हा भाग समुद्रापासून जवळ येतो व तेथे आवाज ऐकूं गेल्यास रहस्यस्फोट व्हावयाचा. पुळणीवर स्फोट होईलं की नाही याबद्दलं शंका उत्पन्न झाली. परंतु जवळपास कठीण जागा नसल्यामुळे शेवटी पुळणीवरच गोळा फेकला. परंतु त्याचा स्फोट झाला नाही. काही वेळ वाट पाहून मग जवळ जाण्याचा हीय्या केला. स्प्रिंगला पुरेसा झटका न मिळाल्यामुळें रॉड निसटूं शकला नाही. सर्व मंडळींचा हीरमोड झाला. तज्ज्ञ आपल्याबरोबर हे सर्व लचांड घेऊन मुंबईस गेले. ते लौकरच सर्व बंदोबस्त करून पुन्हा परत यावयाचे होते.

७.१२ यशस्वी प्रयोग

''मध्यंतरींच्या कालांत आमच्या मंडळींस तीव्र रुखरुख लागल्यामुळे स्वस्थ बसवेना. आम्ही अनेक उद्योग केले. शेलच्या ऐवजी आम्हीं नारळाचे कवच घेतले. त्याच्या डोळ्यास भोके पाडून त्यातून पाणी, खोबरे वगैरे कोरून काढले; आंत पिक्रक वितळवून शिरस्त्याप्रमाणे ओतले. वरचें ऍपरेटस् आमच्यापाशी नव्हते. त्याबद्दल रंजूक लाऊन फटाक्याप्रमाणे बार उडविण्याचे ठरले. डोळ्याच्या भोंकावर पितळेच्या डबीचें झांकण पक्के बसविले होते. योग्य संधी पाहून डॉ. परूळेकर व मी असे दोघेच वसईच्या झुलत्या पुलावरून अरबी समुद्राच्या काठावर गेलों. गांवांत सामसूम होईपर्यंत थांबून नंतर रंजूक पेटवून लांब पळालों. डॉक्टर दूरच बसले होते. बार होण्याची वाट पाहूं लागलों. परंतु बार होईना. मधून मधून रंजुकेची ठिणगी पडत असल्याचें दिसत होते. १०-१५ मिनिटें थांबूनही बार होईना!! आतां मात्र मोठी पंचाइतीची वेळ आली. जवळ जावे तर धोका! निघून जावे तरी पंचाइतीची! अशा स्थितीत आणखी १०-१५ मिनिटे गेली. नंतर जवळ जाऊन पाहतो तो रंजूक विझली होती. पुन्हा रंजुकीला बत्ती देऊन दोघेही पळालो. कानठळ्या बसतील येवढा मोठा आवाज झाला. आता जवळ जाण्यांत काहीच धोका नव्हता. आम्ही शक्य तितक्या त्वरेने जवळ गेलो. वाळूंत थोडा खड्डा झाला होता. तो पाहत असतांच डबीचें वर उडालेले पितळी झाकण आमच्यापासून थोड्या अंतरावर पडून त्याचा आवाज झाला. इतका वेळ ते झांकण वरून खाली येत होते हे उघड आहे.

‘‘अशा रीतीनें तयार झालेला माल पाटणकर दोन वेळा ट्रंकेत भरून मुंबईस घेऊन गेले. पण पुढे काही त्यांनी त्याचा काय उपयोग केला? तो कोठें नेला? या गोष्टींची चौकशी आम्हांस करण्यास संस्थेच्या नियमाप्रमाणे परवानगी नव्हती व आम्हींही केली नाही. एका खेपेचे हे सामान पुण्यास रा. कुलकर्ण्यांच्या मार्फत बाबूराव खरे पाठवणार होते.

‘‘दुसऱ्या खेपेस अण्णा कर्वे यांच्या मंडळींकडे तो माल गेला होता. रा. गोपाळराव यांचा संबंध बऱ्याच इतर शाखांशी होता, व महाराष्ट्राबाहेरही त्यांचा पुष्कळ लोकांशी घनिष्ठ संबंध असे. खर्चास लागणारे पैसे ते कोठून व कसे आणीत याची आम्हांस कल्पना नव्हती, व अद्याप पर्यंत मला तरी या गोष्टींचा उलगडा झालेला नाही. त्याचा उल्लेख मागे केलाच आहे.

७.१३ ग्रामकंटकांच्या चांभारचौकशा

‘‘आमचा कारखाना चालूंच होता. सामान आणण्याकरितां आमच्या वरचेवर मुंबईस खेपा होऊं लागल्या व गोपाळराव व तज्ज्ञ गुरुजी हे वरचेवर वसईस येऊं लागले. त्यामुळे वसईच्या मंडळीस हे काय गूढ आहे हे कळेना. रिकामटेकड्या ग्रामकंटकांची जिज्ञासा वाढीस लागली. काही मंडळींनीं आमच्यावर दुरून पाळत ठेवली व ते आमच्या मागोमाग मुंबईस आले व आमची पाठ सोडीनात! ही गोष्ट आमच्या ध्यानांत आली; व त्यांना हुलकावणी देण्याकरितां आम्ही, आमचें काम लांबणीवर टाकून ग्रँट रोडवरील थिएटरमध्ये ‘सफेद खून’ हा खेळ पाहावयास गेलों; व मधल्या सुटींत भोंवतालच्या हीन वस्तींतून फेरफटका करून पुन: थिएटरमध्ये आलों. या युक्तीचा इष्ट परिणाम झाला, व आमच्या मागचें लचांड सुटले. परंतु लोकांमध्ये आमच्याबद्दल बराच गैरसमज उत्पन्न झाला. या गैरसमजाचा डॉ. परुळेकरांच्या प्रॅक्सिटवरही परिणाम होतो की काय अशी भीती उत्पन्न झाली. मी अविवाहीत तरुण असल्यामुळे मला त्याची विशेष फिकीर वाटली नाही व ही एक इष्टापत्तीच आहे असे मला वाटले. मी रहात होतो त्या गोखले यांच्याकडे शिवराम या नांवाचा कोकणचा एक ब्राह्मण शागीर्द असे. भाटे मास्तरकडे डॉक्टर वरचेवर कां येतात? २-२, ३-३ तास त्यांचे काय चालते? वगैरे गोष्टींचा त्याला उलगडा होईना. तेव्हां त्यांनीं इतर मंडळींजवळ गुपचूप चौकशी चालविली व शेवटीं निष्कर्ष काढला की, हे लोक चैनी, बाहेरख्याली असल्यामुळे काहीतरी गुप्त रोगाने पछाडले असावेत. ‘करील तो भरील’, ‘कुत्ता जाने चमडा जाने’ आपणांस या गोष्टीशी काय कर्तव्य आहे? असे जाणून तो स्वस्थ राहीला.

‘‘सामानाचा विस्तार व कामाचा व्याप वाढत चालल्यामुळे कारखान्याकरितां एखादी निर्वेध व सोयीची जागा शोधणे भाग पडले. मुकूंदराव देसाई यांनी सूचना केली की, येथून जवळच पाणजू नांवाचे खेडेगांव आहे. तेथे कारखाना नेल्यास राहण्याची, जेवणाची व कामाला लागणाऱ्या निर्वेध जागेची मी सोय करतो; व गुप्तता राखण्याची सर्व जोखीम मी आपल्या शिरावर घेतो. ही कल्पना सर्वांना पसंत पडली. शाळेला मे महीन्याची सुटी असल्यामुळे मीही जाऊ शकलो. वसईच्या किल्ल्याच्या धक्क्यावरून होडींत बसून आम्ही तीन-चारजण पाणजूकडे जाण्यास निघालों. वसईच्या पुलाखालून २-३ मैल वर गेल्यावर एका खोचींत होडी वळली व तेथून आम्ही नव्या ठिकाणी पायी चालत गेलो. ज्यांच्याकडे आम्ही उतरलो होतो ती कुडाळ देसकर मंडळी होती. त्यांनी आमची व्यवस्था फारच उत्तम ठेवली होती. सुमारे ७-८ दिवस

आम्ही तेथे होतो. परंतु लौकर खेडेगांवच्या राहणीस कंटाळून आम्ही परत आलो. काम मात्र मनासारखे झाले नाही.

७.१४वसईकरांची मदत

''वसईतच दुसरी जागा शोधूं लागलों. या कामी रा. बापूराव वाघ यांची फार मदत झाली. त्यांनी स्मशानाच्या पलीकडे असलेल्या आपल्या बागेंत जागेची सोय केली. एक मोठा मंडप घातला होता व त्यांतच एक खोली सामानाकरितां व दुसरी प्रयोगांकरितां काढली होती. बाहेर बुद्धिबळाचे व पत्त्यांचे डाव चालत व आंत प्रयोग चालू असत. या ठिकाणी असताना गोपाळराव पाटणकर पाहणी करण्यास आले व त्यांनी समाधान व्यक्त केले. येथे वेळप्रसंग आल्यास आत्मसंरक्षणाचे काही तरी साधन आम्हांस अवश्य पाहिजे, अशी आम्हीं मागणी केल्यामुळे गोपाळरावांनी ऍटोमॅटिक सातबारी दोन पिस्तुले (सावरकरांकडून विलायतेहून आल्यांपैकी) माझ्या स्वाधीन केली व ३०-४० काडतुसेही दिली. ईश्वरकृपेने पिस्तुलांचा उपयोग करण्याची वेळ आमच्यावर आली नाही; व पावसाळा सुरू होण्याचे दिवस जवळ आल्यामुळे सर्व कारभार आवरता घेऊन आम्ही परत आपापल्या उद्योगास लागलो. पुढे गोपाळरावांनी एक पिस्तुल परत नेले व एक मजपाशी अखेरपर्यंत होते. शेवटी गोपाळरावांच्या इच्छेमुळे मला ते कसे परत द्यावे लागले त्याबद्दलची मनोरंजक हकीगत पुढे येईलच.

दे. बापूराव वाघ यांच्याबद्दल माहिती सांगणे जरूर वाटते, म्हणून त्यांच्याबद्दल थोडेसे लिहीतो. ते कुडाळे देशस्थ ब्राह्मण. त्यावेळी पन्नाशीच्या पुढे त्यांचे वय होते. आमच्या मानानें ते बरेच मोठे, म्हणजे आम्हांस वडिलांसारखे, वाटत. शरीराने पिळदार, प्रकृतीने खणखणीत व दिसण्यांत भारदस्त असे हे गृहस्थ होते. यांचा गांवांत फार दरारा असे. त्यांच्यापेक्षा धैर्यवान् माणूस वसईंत सांपडणार नाही असे लोक म्हणत. ज्याक्सनचा अकस्मात खून झाल्यामुळे, व लवकरच दे. पाटणकर यांना अटक झाल्यामुळे, आमची जी धांवपळ व तारांबळ झाली त्यावेळी बापूराव वाघांनीं जी बाजू सांभाळली व सर्व मालमुद्दा नाहीसा करून पुन्हा ''अरे, अबी डर तो पिछे रही' असे सांगून सर्व लोकांस धीर दिला, याबद्दल त्यांचे जितके धन्यवाद गावे तितके थोडेच आहेत!

''तसेच दे. काकासाहेब पाटील या नांवाचे एक सुखवस्तु वकील वसईस राहात असत. हे मोठा राजकारणी व मुत्सद्दी होते. ह्यांच्या चळवळीचा थांगपत्ता बहुधा कोणाला नसे; परंतु ह्यांच्या ओळखी फार असत व हस्ते परहस्ते देशकार्यास ह्यांची नेहमी मदत होत असे. अशा कार्यांत ह्यांचा हात सढळ असे. ह्यांची आमची प्रथम भेट झाली त्यावेळेस ह्यांना आमच्या बद्दल इत्थंभूत माहिती (कळण्याचें कारण देशभक्त गंगाधरराव देशपांडे यांच्यामार्फत या काकांची, लक्ष्मणराव छत्रे यांची व माझी आणि गोपाळरावांची ओळख झाली होती हे) असल्याचे पाहून आम्हांस फारच आश्चर्य वाटलें! त्यानंतर आमची त्यांच्याशी दाट ओळख झाली व आम्हांस अडीअडचणींच्या वेळी ह्यांचा सल्ला व मार्गदर्शन मिळत असे.

७.१५गुप्त अंक-लिपी

''ह्या कामांतील पत्रव्यवहारासाठीं आम्ही एक (कोड) लिपी बसविली होती व त्या लिपींतून पत्रव्यवहार चाले. लिपी आकड्यांची होती. दर्शनीं शाईनें सुवाच्य लिहीलेल्या पत्राच्या मागील बाजूस (पाठकोरे कागदाच्यावर) खरे पत्र उदाहरणासारखें पेन्सिलीने लिहीलेले असे. म्हणजे इतर कोणासही पाठकोऱ्या कागदावर पत्र लिहीले आहे असा भास व्हावा व पेन्सिलीने उदाहरण सोडविलेल्या पद्धतीनें लिहीलेल्या मुख्य पत्राकडे कानाडोळा व्हावा. शाईने लिहीलेल्या मजकुरातसुद्धां पाठीमागे लिहील्या मजकुरांचा बोध होण्यास सुलभ जावे म्हणून सांकेतिक भाषेत, म्हणजे विशिष्ट वस्तूस विशिष्ट नावें देऊन, आमचें म्हणणें कळवीत असूं; जसें नारायण म्हणजे नायट्रिक ॲसिड, सदाशिव म्हणजे सल्फ्युरिक ॲसिड, वगैरे. चि. नारायण बराच कृश झाला आहे हे वाक्य नायट्रिक ॲसिड संपुष्टांत आले आहे ह्या अर्थानें लिहीले जात असे. 'चि. सदाशिव ह्याची तब्बेत ठीक असून, अभ्यास चांगला करतो आहे. त्याची काळजी नसावी.' ह्यावरून सल्फ्युरिक ॲसिड पुरेसें असून चांगलें काम देत आहे, त्याबाबत काळजी करूं नये असा बोध होत असे. तसेच सुरती बर्फीचें पार्सल मागविलें आहे, ते दोन-चार दिवसांत येईल. त्या सुमारास तुम्ही आल्यास तुमचा वांटा तुम्हांस मिळेल. ह्यावरून पिक्रिक ॲसिड दोन-चार दिवसांत बरेचसें तयार होईल, तुम्ही यावें, कारण ते वेळेवर हलविलें पाहिजे, असा अर्थबोध होत असे.

''होतां होईतों पत्रव्यवहार करण्याचे आम्ही टाळीत असू. परंतु विशेष जरूरी लागल्यास पत्रव्यवहार करण्याचे काही तरी गुप्त साधन असावे म्हणून आम्हीं ही गुप्त (कोड) लिपी बसविली होती. पत्र इंग्रजीत अगर मराठींत कोणत्याही भाषेंत लिहावें. मराठींत पत्र लिहीले असल्यास त्यांचे प्रथम रोमन मराठींत रूपांतर करावे लागे. नंतर प्रत्येक अक्षराची संज्ञा त्या ठिकाणीं लिहावयाची. संज्ञा खालीलप्रमाणें होत्या.

संज्ञा

A	B	C	D	E	F	G	H	I	J	K	L
११	१३	१५	१७	१९	३१	३३	३५	३७	३९	५१	५३
M	N	O	P	Q	R	S	T	U	V	W	X
५५	५७	५९	६१	७१	७३	७५	७७	७९	९१	९३	९५
Y	Z	.	?	!	Sign of Exclamation						
९७	९९	२२	४४	६६							

शब्द वेगवेगळे लक्षांत यावे म्हणून अधिक, उणें, गुणिलें, भागिलें या संज्ञांचा फार उपयोग होत असे.

''साधे मामुली खुशालीचे पत्र शाईने लिहावयाचे व त्याच्या पाठीवर पेन्सिलीने कोडलिपीत खरे पत्र लिहीत असू. पेन्सिलीने लिहीलेल्या आकड्यांना व्यवहारी अपूर्णांकाचे अगर दशांश अपूर्णांकांत लिहीलेल्या उदाहरणाचे रूप आणावयाचे. म्हणजे पत्र लिहीण्यास पाठकोरा कागद घेतल्याचा भास व्हावा. ह्या युक्तीमुळे आमची फार सोय झाली. इकडून तिकडे व

तिकडून इकडे व्यवस्थेशीर रीतीनें कालाचा व पैशाचा अपव्यय न होतां संदेश जाऊं येऊं लागले. पत्र हातीं पडल्याबरोबर प्रथम २२, ४४ व ६६ या सम आकड्यांबद्दल त्यांची चिन्हे करून हे आंकडे खोडून टाकावयाचे. कोडलिपीत कोणतेही इतर सम आकड्यांचा समावेश नाही. म्हणून कोड उलगडून पाहण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्याची पूर्ण दिशाभूल करण्याकरितां पाहिजे तितके सम आंकडे पत्रांत लिहीण्यास पूर्ण मोकळीक मिळे. विराम चिन्हें मुक्रर केल्यानंतर दुसरें अगत्याचें काम म्हणजे सर्व सम आंकडे खोडून टाकणें. नंतर उरलेल्या विषम आंकड्यांवरून पत्रांचा अर्थ तात्पुरते कोड स्मरणानें कागदावर लिहून काढून लावणें. नंतर ते पत्र व लिहीलेले कोड यांचा ताबडतोब नाश करणे.

परशराम पारा नथू नॅफ्थलीन वगैरे अशी परिभाषा असे. असो.

७.१६ ज्याक्सनचा *वध* व निरवानिरव

''कामाचा व्याप वाढल्यामुळे यापुढे मी शाळेच्या नोकरीत गुंतून राहूं नये, असे सर्वानुमते ठरल्यामुळे मी नोकरीचा राजीनामा दिला व मोकळा झालो. काही दिवस गोपाळरावांनी मला मुंबईस बोलावून घेतले होते. तेथून पुण्यास गोपाळरावांबरोबर गेलो. रा. मोरोपंत गोरे यांचे लग्न ठरत होते. आम्हीं दोघेही त्यांच्या वऱ्हाडी मंडळींत सामील झालो. लग्न ठरले. मुहुर्त ४-५ दिवसांवर होता. दे. भास्करराव फडके यांच्याकडेच मोरोपंताचा जानोसा होता. डॉ. गो. बा. गोखलेही लग्नाकरितां आले होते. (यांच्याच हाफकीन इन्स्टिट्यूममधल्या बिऱ्हाडी अण्णा कर्वे व मी खलबत करीत असू.) लग्न होईपर्यंत आम्हीं पुण्यासच राहावे असा सर्वांचा आग्रह पडल्यामुळे आम्हीं तेथेच राहीलो. असे २-३ दिवस गेले, आणि अचानक ज्याक्सनच्या खुनाची बातमी आमच्यापर्यंत येऊन थडकली. गोपाळराव ताबडतोब मुंबईस निघून गेले. आतां पुढे काय करावयाचे हा प्रश्न पडला. दे. फडके व डॉ. गोखले यांच्या विचारे मी ताबडतोब वसईस जावे व सर्व निरवानिरव करून बंदोबस्ताने राहावे असे ठरले; व मी रात्रीच्या गाडीने निघून मुंबईस आलो. केशवजी नायकाच्या चाळीत जाणे धोक्याचे वाटले म्हणून दुरून दुरून तपास केला. परंतु काही थांगपत्ता लागेना. नाशीकच्या लोकांवर इतकी कडक नजर होती की, खाणावळींत त्यांना जेवणखाण सुद्धां मिळणें अशक्य झाले होते! सदर्हू परिस्थिती पाहून मी ताबडतोब वसईचा रस्ता सुधारला. वसईच्या मंडळींना सर्व हकीगत सांगितली. ज्याक्सनच्या खुनाशीं आमच्या मंडळींचा अर्थाअर्थी काही संबंध नव्हता. परंतु दे. तात्याराव सावरकरांनीं पाठविलेल्या वीस पिस्तुलांपैकी एक (*एकमेकांच्या गटांतल्या लोकांची एकमेकांस ओळख सुद्धां असूं नये, ह्या सुरक्षितपणासाठीं केलेल्या नियमामुळे ज्याक्सनच्या खुनाशीं संबंध नव्हता असे या मंडळीस व आम्हां सर्वांस सहजच वाटलें.)* आमच्याकडे होते. सदरहू पिस्तुलें गोपाळरावांच्या मार्फत वाटली गेली होती व त्यांपैकी ४ पिस्तुलें दे. कान्हेरे, कर्वे वगैरे मंडळींपाशी नाशिकलाच मिळाली तीं पोलिसांनी जप्त केली होती. आतां सुतानें स्वर्गास जाणारे पोलीस आपला माग काढीत आज ना उघां येतील, असा जबरदस्त संभव होता. मुंबईस दूत पाठवून दररोज परिस्थितीत होणारे फेरबदल डोळ्यांत तेल घालून पाहणे भाग होते. २-३ दिवसांनी गोपाळरावांना अटक झाल्याची बातमी आली. आतां मात्र स्वस्थ राहणे धोक्याचे वाटूं लागले. रात्री दे. बापू वाघ यांच्या बागेत सर्वांनी जमून विचारविनिमय केला. जे. बापूंची हिंमत दांडगी. त्यांना हजारबाराशे रुपयांचा

माल नाश करून टाकणे पटेना. म्हणून त्यांनी सर्व माल जमिनीत गाडून टाकण्याचा बेत ठरविला. इतर मंडळींना 'सर्व माल समुद्रास्तृप्युतु' केला असे सांगून आम्ही चौघांनीं तो माल रात्री, ५-६ तास काम करून, जमिनींत गाडून टाकला! पिस्तुल डॉक्टरांनी बंदोबस्तांत ठेविले होते. व इतर सर्व लिखाणाच्या वह्या वगैरे दे. ठाकूर वकील यांनी जिवापलीकडे जतन करतो, असे आश्वासन दिल्यामुळें त्यांच्या स्वाधीन केल्या.

''अशा प्रकारें सर्व व्यवस्था करून मी भाइंदरास गोखले यांच्याकडे जाऊन राहीलो. कै. मोरो नारायण गोखले हे मला पुत्राप्रमाणे मानीत असत. त्यामुळे मला गोखले यांच्या घरी मुळीच परकेपणा वाटत नसे. मुंबईस घडणाऱ्या सर्व घटनांचा कानोसा रा. गोपाळ मोरेश्वर, व गंगाधर मोरेश्वर, हे दोघे गोखले बंधु घेत असत. त्यांच्या व्यापारानिमित्त वरचेवर मुंबईस खेपा होत. गोखले मंडळींनीं या वेळी मला जे सहाय्य केले त्याबद्दल मी त्यांचा कायमचा ऋणी आहे.

''दे. गोपाळरावांच्या मागे पोलीसांचा लकडा लागल्यामुळें काही गोष्टी त्यांना अखेर कबूल कराव्या लागल्या. त्यांना पकडलें त्या वेळी त्यांच्या हातावर (अंगावर व कपड्यावरही) पिक्रिक ऍसिडचे डाग होते. परंतु पोलिसांच्या ध्यानांत ही भानगड काय आहे ते आले नाही. पोलीसांच्या तत्कालीन बॉम्बबद्दलच्या अज्ञानाचा हा प्रत्यक्षच पुरावा होता. २० पिस्तुलांचा पत्ता लावून द्या म्हणजे आम्ही तुम्हांला त्रास देणार नाही, असे पोलिसांनी आग्रहाचे बोलणे लावले व 'सर्व नाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः' या न्यायाने, व अंगावर असलेला पिक्रिक ऍसिडचा पुरावा गुलदस्तांत ठेवण्याच्या उद्देशानें, त्यांनीं म्हणजे गोपाळरावांनी पोलीसचें म्हणणे कबूल केले व त्यांना घेऊन ते पेणेस गेले.

''पेण येथेही वसईसारखे एक केंद्र होते. त्याचे व्यवस्थापक मराठे - वर उल्लेखिलेले रा. त्र्यंबक गंगाधर मराठे - म्हणून होते. ते मराठी ट्रेन्ड शिक्षक असून पेणच्या सरकारी शाळेत नोकरी करीत होते. सदरहू मराठे व कोठूरचे दे. वामन श्रीधर बरवे हे, आमच्याकडे येऊन सर्व विद्या शिकून, आपल्या गांवी गेले असल्यामुळे आमचा त्यांचा दृढ परिचय होता. पेण येथे गोपाळरावांचा एक आतेभाऊ (विठोबा मराठे) रहात असे. तो २-३ महीन्यांपूर्वी मयत झाला होता. लपवून ठेवण्याकरितां त्याच्याजवळ पिस्तुलें दिलीं होती, असा गोपाळरावांनी बहाणा केला. परंतु त्या ८ पिस्तुलांपैकी दोन पिस्तुलें याच्याकडून त्याच्याकडे व त्याच्याकडून आणखी तिसऱ्याकडे अशी फिरत गेली होती. शिंदे व सदावर्ते असे दोघे पोलीस अधिकारी गोपाळरावांच्या बरोबर पेणला आले होते. मि. शिंदे यांनी या दोन पिस्तुलांकरितां ८ तरुणांना गुन्हेगार म्हणून गोवले. त्यांत मराठे मास्तर, विनायक कोल्हटकर, शंकर भट वगैरे मंडळी सांपडली गेली. शंकर भटाची तर, शिंद्यांनी एक थोबाडींत देतांच, इतकी गाळण उडाली की त्याने हात जोडून ''माझ्या पाशीं दोन आहेत ती देतो' असे सांगितले. शिंदे म्हणाले माणूस मागतो एक डोळा तर देव देतो दोन. वाहवा रे शूर ब्राह्मणा !!!

''अशा रीतीने ज्याक्सन खुनाच्या केसच्या तपासाला उग्र स्वरूप येत चालले. गोखले यांच्या घरी मी पकडला गेलो तर गोखले यांना फार त्रास होईल, व त्यांच्याकडून भरमसाठ पैसे उकळण्याचा पोलीस प्रयत्न करतील, अशी साधार भीती वाटू लागली. त्यामुळे मी पहाटेस उठून, फराळाचा डबा व पाणी पिण्याकरिता भांडे घेऊन, आजूबाजूच्या निर्जन प्रदेशांत अगर

रानावनांत सर्व दिवस काढीत असे व रात्री दहाची शेवटची मुंबईची गाडी येऊन गेल्यावर काही वेळाने घरी येऊन झोपत असे. परंतु अशा तऱ्हेनें भटकणे जास्त धोक्याचे वाटल्यामुळे मी पुन्हां वसईस येऊन राहीलो.

''महीना दीड महीना लोटला. आमचा थांग पत्ता अद्याप पोलिसांना लागला नव्हता. (आमच्या गुप्त कारस्थानांच्या परिपूर्णतेचा हा विजय होता.) परंतु केव्हा धाड येईल याचाही नेम नव्हता. पेणेस आलेल्या अनुभवाने गोपाळराव सावध झाले व त्यांनी आम्हांस धक्का न लागता पिस्तुल काढून घेण्याची मसलत मि. सदावर्ते यांच्या सहाय्याने रचली. (ही आम्ही नाशकास तुरुंगांत असतांच कशी रचली ती हकीकत पुढे येईल.) एके दिवशी दुपारी १२ च्या गाडीने रा. बाळकृष्ण गोरे वसईस माझ्याकडे आला. त्याने सर्व हकीकत सांगितली व पिस्तुलाची मागणी केली. पिस्तुल देण्याचे मी कबूल केले. परंतु (भित्रेपणाने) बाळकृष्णा ते स्वतः नेण्यास तयार नव्हता. तो मला मुंबईस आणून दे, असे म्हणूं लागला. त्यामुळे मला यांत काहीतरी दगा आहे असा संशय वाटूं लागला. म्हणून मी मुंबईस पिस्तूल बरोबर घेऊन जाण्याचे साफ नाकारले. बाळकृष्णाने माझी समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण मग तूं ते घेऊन कां जात नाहीस, याचे समर्पक उत्तर त्यास देतां येईना. अखेर हताश होऊन त्याने गोपाळरावांचे स्वदस्तुरचें पत्र मला दिले. गोपाळरावांना अशी काहीतरी भानगड उपस्थित होईल असे वाटल्यामुळे हे पत्र त्यांनी दिले होते. अगदी नाइलाज होईपर्यंत पत्र दाखवूं नको, पत्राशिवाय काम झाले तर पहा, असे बजावले होते. परंतु जिन्नस मिळाल्याखेरीज तेथून हालूं नको, अशी ही ताकिद दिली होती. सदरहू पत्र मी वाचले व डॉ. परूळेकरांच्या हाती वाचून पाहण्यासाठी दिले. पत्रांतील मजकूर खालीलप्रमाणें होता :- कोणत्याही तऱ्हेचा अविचार न करतां वस्तु (पिस्तुल) आमच्याकडे परत करावी. यांतच सर्वांचे कल्याण आहे. ज्यास्त लांबण लावल्यास, ज्या गोष्टी प्रकट होणे इष्ट नाही त्या प्रकट होतील, व वसई केंद्राची पेणसारखी धुळधाण उडेल. मी योजलेली मसलत उत्तम व बिनधोक्याची आहे; तरी तिचा फायदा घ्यावा व स्वतःचे- व सर्वांचे - रक्षण करावे. तुम्हीं तसे न केल्यास अनर्थ होईल. मी पूर्ण विचारपूर्वक ही योजना केली आहे. यापेक्षा ज्यास्त लिहीता येत नाही. ''तरी तुम्हीं अनमान करूं नये, तुम्हांला माझी शपथ आहे.''

पत्र वाचून आम्ही बरेच घोटाळ्यांत पडलों. काही वेळ डॉक्टरशीं एकीकडे विचारविनिमय करून बाळकृष्णास सांगितले की, आतां आमची समजूत पटली. मी चारच्या गाडीनें वस्तु घेऊन येतो. तूं खुशाल मुंबईस परत जा व ''मी येतों काळजी करूं नये'' असे गोपाळरावांना सांग.

''चारच्या गाडीने जाण्याच्या ऐवजी मी सव्वादोनच्या गाडीनें वस्तु (पिस्तुल) घेऊन निघालों; व वांद्र्यास त्या गाडींतून उतरून दुसरी फास्ट गाडी तयार होती तिच्यात बसलो व चर्नीरोडपर्यंत न जातां ग्रँटरोडला उतरून पायीपायी केशवजी नायकाच्या चाळीत गेलो. बाळकृष्ण एकटाच गॅलरींत सचिंत बसला होता. मला आलेला पाहून त्याला हायसे वाटले. गोपाळरावांना बरोबर घेऊन सदावर्ते (पोलीस इन्सपेक्टर) कोठे तरी गेले आहेत, असे बाळकृष्णाने मला सांगितले. त्यांनी दाखविलेल्या ठिकाणी वस्तु (पिस्तुल) ठेवून दिली व त्याच्या कानांत सांगितले की, ''पिस्तुलांत सात बार भरलेले आहेत. जरूर पडल्यास त्याचा

उपयोग करावा', असे गोपाळरावांना एकीकडे घेऊन सांग. त्यानंतर चहा घेऊन तेथून पाय काढला तो रात्रीं ८।। ला भाइंदरास आलों. गोखले मंडळीस सर्व हकीकत सांगून सावध राहण्याचा इशारा दिला व पुढच्या गाडीने वसईस येऊन दाखल झालो.

७.१७समद्रास्तृप्यंतु ।

''मुंबईस जाण्यास निघण्यापूर्वी मुख्य मुख्य मंडळीस बोलावून पुढची व्यवस्था ठरविली. यापुढे कोणतीही जोखम जवळ ठेवावयाची नाही असे निश्चित केले. ज्यांना ज्यांना म्हणून या कारखान्याची माहिती होती ते सर्व लोक वेठीला धरून त्यांच्या हस्ते सर्व माल रात्रीं समुद्रकांठीं वाहून न्यावयाचा व त्यांच्या समक्ष सर्वच्या सर्व वस्तूंचा नायनाट करून टाकावयाचा, लोभ बिलकुल धरावयाचा नाही, असे ठरवून हे काम डॉक्टरकडे सोपविले. त्यांनी ठरल्याप्रमाणें सर्व काम व्यवस्थित केले. अखेरीस अशा तऱ्हेने पिक्रिक ऍसिडच्या १५-१६ बरण्या, कॅरबालिकच्या ३०-४० बाटल्या, मोठी मोठी फ्लास्कस्, थरमॉमीटर, पारा वगैरे सर्व वस्तु खरोखरीच 'समुद्रास्तृप्यंतु' झाल्या.

''मी वसईस आल्याबरोबर दे. बापू वाघ यांच्याकडे गेलों. सर्वजण समुद्रावर गेले असल्याचे समजले म्हणून समुद्रावर गेलो. मंडळी रिकाम्या बरण्यांचें काय करावे या विचारांत होती. सबंध बरण्या पाण्यांत बुडविल्यास त्या उघडकीस येण्याची भीती होती. समुद्रकांठीं बरण्या फोडण्यास दगडही मिळण्यासारखा नव्हता. तेव्हां बरणीवर बरणी आपटून त्यांचे तुकडे तुकडे केले व समुद्रांत ठिकऱ्यांचा खेळ करून फेकून दिले. नंतर सर्वजण वेगवेगळ्या रस्त्याने घरोघर चालते झाले !

७.१८ बॉम्बचे कारखानदार सरकारी नोकर झाले!

''आतां यापुढेकाय करावयाचें असा विचार पडला. नाशिकहून वडिलांची (*वडिलांनाच काय पण आमच्याशिवाय कोणालाही रामभाऊ भाटे हे बॉम्बच्या कारखान्याचे चालक होते हे माहीत नव्हते. म्हणूनच त्यांना ही नोकरी मिळाली, टिकली व आज ते सरकारी नोकरींतून सेवानिवृत्त झाले आहेत.*) पत्रें नासिकला येण्याबद्दल येत होती. मार्च १९१० अखेर वडील पेन्शनमध्ये निघण्याचे निश्चित ठरले होते. म्हणून मी नोकरीकरिता डायरेक्टरसाहेबांकडे ताबडतोब अर्ज करावा, व पुण्यास जाऊन खटपट करावी, असे वडिलांचे आग्रहाचे पत्र आले. मीही दिङ्मूढ झालो असल्यामुळे वडिलांची आज्ञा मान्य करून पुण्यास वडील बंधूंकडे गेलो व पुढे तेथेच राहीलो.

''कर्मधर्मसंयोगानें मे. डायरेक्टरसाहेब - मि. शार्प - हे नाशिकला जातीनें आले. ह्या भेटीचा संबंध ज्याक्सन मर्डर केसशीं होता. ते काम उरकून ते नाशिक हायस्कुलांत आले. जाण्याच्या पूर्वी त्यांनी पेन्शनमध्ये जाणाऱ्या लोकांना भेटण्याकरितां बोलाविलें. 'तुला काही सांगावयाचें आहे काय', असे त्यांनीं वडिलांना विचारलें. तेव्हां वडिलांनीं सांगितले की, साहेब, मी अद्यापपर्यंत नोकरीकरितां अगर प्रमोशनकरितां अर्ज केलेला नाही!!! हा माझा पहीला व शेवटचाच अर्ज आहे. माझ्या एका मुलाला नाशिकची माझी जागा मिळावी व मला अखेरपर्यंत नाशिकक्षेत्री राहता यावे, म्हणून मी माझ्या मुलाला स्कूल ऑफ आर्टमध्ये ठेवून या जागेला

पूर्णपणे लायक (क्वालिफाइड) करून ठेवला आहे. त्यास माझ्या जागेवर नेमून मला उपकृत करावे असा अर्ज करतो. ह्या बोलण्याचा शार्पसाहेबांवर फार इष्ट परिणाम झाला. त्यांनी आपल्या डायरींत सर्व माहिती टिपून घेतली व वडिलांना आश्वासन देऊन साहेब पुण्यास परत गेले. दिलेले आश्वासन त्यांनीं अक्षरशः पाळलें व आलेले १००-२०० अर्ज बाजूस सारून माझी १ एप्रिल १९१० पासून नाशिक हायस्कूलमध्ये ड्रॉइंग मास्तर म्हणून नेमणूक झाली.'' (भाटे यांच्या स्मृति समास)

७.१९ दैवानें खैर केली

वसई केंद्राची, म्हणजे आमच्या अभिनव भारताच्या प्रचंड बॉम्बच्या कारखान्याची, अशी शेवटी विल्हेवाट लागली! त्यांत भाग्य इतकेच की, ह्या भयंकर गुन्ह्याबद्दल - इंग्रज सरकारच्या कायद्याप्रमाणे बॉम्ब तयार करणे हा त्यावेळी अत्यंत भीषण असा गुन्हा मानला गेला होता - या वसई केंद्रांतल्या कोणाही सभासदास यत्किंचितही तोशीस लागली नाही! याची कारणे अनेक आहेत. त्यांपैकी पहीले म्हणजे वसई केंद्राबद्दल माहिती असणाऱ्या आमच्यापैकी कोणीही आरोपितानें एक अवाक्षरही काढले नाही. अभिनव भारताच्या मूळ शाखेपैकी आम्ही जे पकडलो गेलो होतो, त्यांनी कोणीच कबुलिजबाब दिले नाहीत. गोपाळराव पाटणकर, अण्णा कर्वे, बाबुराव खरे, त्र्यंबकराव मराठे, व्यंकटराव नागपूरकर, मुकूंदराव मोघे यांनी व इतर काहीनीं, नाइलाजाने पोलीस-छळामुळे, कबुलीजबाब दिले होते. पण त्यांत प्राप्त संकट थोडक्यांत वारण्याइतकीच माहिती त्यांनी सांगितली होती. खरा धोका होता तो पाटणकर व कुळकर्णी (राजसाक्षी, ऍप्रूव्हर) यांच्या बाबतीत. कारण पाटणकर पकडले गेले त्या क्षणापूर्वी त्यांच्या घरी पिक्रिक ऍसिड, फल्मिनेट वगैरे बरेच होते. पेणला ते ते पाठवणार होते. त्याचे नीट बोचके बांधून ते त्यांनी (आतां कैलासवासी) गणपतराव काळे (आहीताग्नि राजवाड्यांचे चिटणीस) यांच्याबरोबर दिले होते. गणपतराव काळे ते घेऊन घराबाहेर निघालेही होते. केशवजी नायकांच्या चाळीला उतरावयाचे जिने दोन. नेहमी फक्त मोठ्या दरवाज्याच्या जिन्याने जाण्यायेण्याची वहीवाट असे. गणपतराव काळ्यांच्या व आमच्या सर्वांच्या नशिबाने म्हणा, काळ्यांना नेहमीच्या जिन्याने उतरण्याची बुद्धि झाली नाही! ते दुसऱ्या बाजूच्या जिन्याने उतरण्याच्या उद्देशाने उलट बाजूस निघाले! आणि नेहमीच्या जिन्याने नेमके, त्याच क्षणी, गोपाळरावांना अटक करण्यास पोलिस अधिकारी वर येत होते! ते अधिकारी वर आले आणि काळे उलट बाजूने खाली गेले. पण पोलिसास पाहताच चाळीत व खाली कुजबूज सुरू झालीच होती. ती पाहतांच ते बॉम्बचे बोचके घेऊन काळे जे निघाले ते तडक एकदम मिळाली ती व्हिक्टोरिया करून थेट बंदरावरच गेले आणि बोटीचा रस्ता धरला. समुद्रावर बोटींत चढल्यानंतर, व बरेच पुढे गेल्यावर, योग्य संधी साधून, तोल गेल्यासारखे सोंग करून, ते बोचके समुद्रांत त्यांनी टाकून दिले. अशा सुयोगानें ते स्वतः तर वाचलेच पण आम्हीही त्या संकटांतून अचानक वांचलो. आतां कै. रा. काळ्यांनींच ही सर्व हकीकत मी सुटून आल्यावर मला सांगितली. एक-दोन मिनिटांचाच उशीर होऊन काळे सांपडते तर आमच्या खटल्याचें स्वरूप भयंकर होऊन, आम्ही बहुतेक जण निदान जन्मठेप म्हणा, किंवा ८-१० वर्षे काळेपाणी म्हणा, भोगण्यास अंदमानांत तरी खास गेलो असतो. पण ते २-४ क्षण काळ्यांच्या व आमच्या

आयुष्यांतले अमोल ठरले! खुद्द गणपतराव काळ्यांनी मला जेव्हां ही गोष्ट सांगितली तेव्हां ते व मी आश्चर्यचकित होऊन ईश्वरी कृपेमुळे गंहीवरलोच. काळे या संकटांतून अजिबातच बचावले.

७.२०नियमच भोंवला

पण गणपतराव काळ्यांना बॉम्बची शिदोरी बांधून देतांना गोपाळरावांचें अंग व कपडे पिक्रिक ऍसिडनें पिवळे झाले होते. गोपाळरावांच्या पुढे तेवढ्यांत पोलिस येऊन उभे राहीले, आणि नासिकच्या ज्याक्सनच्या खुनासंबंधानें तुम्हांला अटक करण्यास आम्ही आलो आहो, असे त्यांना सांगितले. गोपाळराव एकदम दिङ्मूढच झाले! येथेही मागे उपकारक ठरलेला आमच्या गुप्तता व सुरक्षिततेचा नियमच आम्हांस भोवला. अण्णा कर्वे यांच्या गटापैकी अनंतराव कान्हेरे यांनी २१ डिसेंबरला (१९०९) ज्याक्सनचा बळी घेतला होता. नियमाप्रमाणें आम्हांला फक्त कर्व्यांची ओळख होती. अनंताची नव्हती. त्यामुळे ज्याक्सनच्या खुनाशी आपला काही कोठे संबंध येईल, ही कल्पनाही गोपाळरावांना, व मलाही १ जानेवारी १९१० पर्यंत, नव्हती. वृत्तपत्रांत तोवर फक्त कान्हेऱ्यांचे नांव आले होते. कर्व्यांचे नव्हते. शिवाय माझ्या व अण्णा कर्व्यांच्या ऑक्टोबर १९०९ च्या गुप्त बैठकीत ठरल्याप्रमाणे एकमेकांना कळविल्याशिवाय खुनासारखे काही कृत्य करावयाचे नाही, असे शपथा घेऊन ठरले होते. त्यामुळे या खुनांत अण्णा कर्व्यांचे अंग असेल, अशी आम्हांला व गोपाळरावांना कल्पनाही नव्हती. कारण खुनाची बातमी प्रसिद्ध झाल्याबरोबर पेणचे त्र्यंबकराव मराठे तडक मुंबईस येऊन गोपाळरावांना जेव्हां भेटले तेव्हां ''या खुनार्शी आपला काही संबंध नाही'' असे पाटणकर स्पष्ट म्हणाल्याचे मराठेच सांगत आहेत (मराठे यांच्या आठवणी). विष्णुशास्त्री केळकर तर नाशिकचे राहणारे. त्यांनाही कर्व्यांचें अंग यांत असेल अशी कल्पना नव्हती, असे ते आपल्या लेखांत म्हणतात. म्हणून अण्णा कर्व्यांवरच्या पूर्ण विश्वासामुळें गोपाळराव व आम्ही सावध पण निश्चिंतच होतो. पण दुर्दैव असे की, ही आमची कल्पना अनाठायी ठरली! आणि गोपाळरावांचे नांव अण्णा कर्व्यांनाच प्रथम, पोलिसास, पिस्तुलें त्यांच्याकडून घेतली म्हणून, सांगावे लागले. त्या अनुरोधाने गोपाळरावांना अटक झाली. अण्णांनी पाटणकरांचें नांव कां सांगितले ते पुढच्या प्रकरणांत येईल. येथे फक्त बॉम्बच्या प्रकरणापुरतेच विवेचन असल्याने ते सूत्रच पुढे चालवूं.

७.२१पाटणकरांना पडलेला भयंकर पेचप्रसंग

अटक झाल्यावर गोपाळराव पाटणकरांना नाशकास आणले. त्यावेळी पोलिसांकडून पकडलेल्या लोकांनी कबुलीजबाब देऊन पोलिसांचे काम सुलभ करावे म्हणून सर्व तऱ्हेच्या सामदामदंडभेदाच्या अघोर कारवाया चालूं होत्या. गुन्हा कबूल न करणाऱ्यांना पोलीस अधिकारी अत्यंत निर्दयतेनें मारीत, छळीत. या मारण्याच्या तंत्रासाठीं अल्लीखान या नांवाचा चोरीदरवडेखोरीसाठीं ७ वर्षे शिक्षा भोगून आलेला एक बदमाष माणूस 'सबईन्स्पेक्टर' म्हणून नेमलेला होता. त्या हरामखोराला सहीशिवाय लिहीतांही नीट येत नव्हते. छळ करणे एवढेंच त्याचे काम. तो आरोपींना बेदम मारी. आमच्या खटल्याचा सूत्रचालक गायडर हा डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस (सी.आय.डी.) होता. त्याने या अल्लिखानाला आरोपींना हवे तितके छळण्याची मुभा दिली होती. आमच्या विष्णुशास्त्री केळकरांना तर याने, ते कबुलीजबाब

देत नव्हते म्हणून, इतके मारले होते की, त्याला काही सीमाच नव्हती. यांपैकी कोणी आरोपी या छळाने मेला तर कॉलेऱ्यानें मेला म्हणून जाहीर करूं, असेही गायडर म्हणाला होता. त्यामुळे बहुतेक आरोपींनी या छळाला त्रासूनच कबुलीजबाब दिले होते. एवढे मात्र खरे की, ज्याच्या गुन्ह्याबद्दल गायडरची खात्री झाली होती, पण तो कबूल होत नव्हता, त्यासच तो अल्लीखानच्या ताब्यांत 'सीधा करण्याकरितां' देई. इतरांना तो फारसा त्रास देत नसे. असो. गोपाळरावांना पकडून आणल्यानंतर त्यांनीं हा सर्व प्रकार पाहीला. गायडरनें त्यांना कर्व्यांच्या समोर नेलें. तेथे कर्व्यांनीं 'यांच्याजवळून पिस्तुलें घेतलीं' असे गायडरला सांगितले. गोपाळराव हा सर्व देखावा पाहून क्षणभर सर्दच झाले! ज्या कर्व्यांच्यावर अलोट विश्वास, त्यांनींच आपल्यासमोर असे म्हणावें, हे शल्य त्यांच्या जिव्हारी लागले. पण त्या परिस्थितीत करणार काय? कबूल न करावे तर छळ होणार. आणि छळाला सुरुवात झाली म्हणजे पिस्तुलांचे लचांड तर गळ्यांत पडणारच, पण आपल्या अंगावरचे पिक्रिकचे डाग, आणि त्यानेच रंगलेला आंतला शर्ट, उघडकीस येऊन सर्व वसईच्या बॉम्बच्या कारखान्याचे प्रकरण अंगावर शेकणार! अशा शृंगापत्तींत वसई वाचवावयाचीच असा तत्क्षणींच निकाल ठरवून पाटणकरांनीं पिस्तुलांची सर्व माहिती सांगण्याचे कबूल केले. 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः' या न्यायाने त्यांनीं केले तेच योग्य केले, यांत शंका नाही. पण त्यांनीही त्या बावरलेल्या स्थितीत, पिस्तुलासाठीं माझे व चतुर्भुजचे नांव सांगितले. कारण चतुर्भुजने विलायतेहून आणलेली पिस्तुलें माझ्यासाठी पाटणकरांनींच आणून पेणला पाठवली होती. यावेळी पाटणकरांनीही ठराविक युक्ती योजली असती तर पुढील अनर्थ टळला. असा काही प्रसंग आला म्हणजे कोणातरी नुकत्याच २-३ महीन्यांपूर्वी मेलेल्या स्नेह्याचें नांव मध्ये घालून त्याच्याकडून ही पिस्तुलें वगैरे सामान घेतले असे सांगावे, असे मी त्यांना कित्येक महीने अगाऊच निक्षून बजावून सांगितले होते. अशा युक्तीने सांखळी तुटते, व पुढच्या सर्व माणसांचा बचाव होतो. पण पाटणकर गोंधळल्यामुळे म्हणा, किंवा त्यांच्या उपजत विसराळूपणाने म्हणा, ही युक्ती योजण्याचे ते नेमके त्यावेळी विसरले. ती युक्ती त्यांनी पेणला पिस्तुलें ठेवली होती तेथे अर्धवटपणाने योजली. त्याचा उल्लेख भाट्यांच्या वरच्या लेखांत आलाच आहे. पण तीही वायां गेली. असो. या युक्तीचा उपयोग केला असता तर कदाचित् पुढची सगळीच सांखळी तुटली असती, आणि पाटणकरांपर्यंतच सर्व प्रकरण थांबले असते. म्हणजे मी, थत्ते, चतुर्भुज, तात्या सावरकर, पुणे गटातले खरे व इतर मंडळीं, पेणची सर्व मंडळीं, या खटल्यांतून सहज वांचलो असतो. पण, बीडकरमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे, भवितव्यताच आमच्या विरुद्ध होती! अण्णा कर्व्यांच्या सारख्या धुरंधर पुढाऱ्याला आपल्या सहकाऱ्यांची नांवे सांगावी लागल्याने सर्वांचाच धीर खचला होता. ही सर्व पिस्तुले न सांपडली तर निदान २० अधिकाऱ्यांचे खून होतील अशी धास्ती गायडरला होती. म्हणून त्यांनी हवे ते करून ही विलायतेतून आलेली २० पिस्तुलें प्रथम हुडका व ताब्यांत घ्या, अशी सक्त आज्ञा खालच्या अधिकाऱ्यांस केली होती. त्यामुळें वाटेल तो छळ करण्यास पोलीसही मागेपुढे पहात नव्हते. त्या कारणाने पकडलेली मंडळी अगदी अगतिक झाली होती. छळ तर इतका होत होता की, आंबेडकरासारख्या कोंवळ्या १६ वर्षांच्या मुलाच्या दोन्ही पायांत पोलिसांनीं हातांतली हातकडी घालून त्याला दिवसभर जेरबंद करून टाकण्यासही मागे-पुढे पाहीले नाही! पण तरीही त्याने कबुलीजबाब दिला नव्हता. यावरून पोलिसांचा जुलूम कोठल्या थराला चालला होता याची कल्पना येईल. या जाचामुळे विविश होऊन काहीजण 'तुला

सोड्न देऊं, माफी देऊं' या फुसलावणीला बळी पडून गुन्हा कबूल करून जबाब देत होते. पण अशाही भेसूर परिस्थितीत, अवश्य तेवढीच माहिती सांगून, शक्य तेवढे इतरांस वांचविण्यास सर्वच झटत होते. खुद्द हायकोर्टाच्या स्पेशल ट्रायब्यूनलनेंही आपल्या निवाड्यात आरोपी व साधे साक्षीदारच काय, पण माफीचे साक्षीदारही सर्व माहिती सांगत नाहीत, असा शेरा मारला आहे! असो. गोपाळराव पाटणकर या पेचात सापडून गोंधळून गेले होते. वसईचे प्रकरण वांचविण्यासाठी त्यांनी पिस्तुलांचे प्रकरण कबूल करून छळातून आपली सुटका करून घेतली. रात्री झोपेचे सोंग करून, डोक्यावरून पांघरूण घेऊन, आपला पिक्रिकने पिवळा झालेला शर्ट उंदराप्रमाणें दाताने कुरतडून त्यांनी त्याच्या चिंध्या केल्या, आणि त्या लपवून दुसरे दिवशी सकाळी शौचास गेल्यावर शौचकुपात टाकून दिल्या. याप्रमाणे एक पुरावा त्यांनीं बेमालूम नाहीसा केला. अंगावरचे डाग धुवून पुसून टाकले.

७.२२ पाटणकरांनी मला गोंवले

पण पिस्तुलांचें प्रकरण कबूल करतांना त्यांनी माझे व चतुर्भुजचे नांव सांगितले होते. त्यामुळे आम्हां दोघांना अटक झाली. आणि या मिळालेल्या व चतुर्भुजच्या पुराव्यावर विलायतेस सावरकरांवरही पकडवारंट सुटले, आणि तेही, निष्कारण फ्रान्सहून परत आल्यामुळे, अटकले गेले. त्यांना हिंदुस्थानांत आणावयास बराच वेळ लागला. मला पकडून नेले तेव्हांच, कर्व्यांनीं सांगितल्यावरून, बॉम्बचे कवच करणारे म्हणून, व्यंकटराव नागपूरकरांनाही पकडून आणले होते. नाशिकास नेल्यावर मला गायडरने या बाबतीतला माझा संबंध कबूल करण्यास दटावले. मला तो म्हणाला, ''भट, मी तुम्हांला बरेच दिवसापासून पाहतों आहे. तुम्ही या फंदांत असाल असा माझा तर्क होता. पण तुम्ही तो नाकबूल करीत होतां. (याची हकीकत अशी :- बाबांना माझ्या घरीं मुंबईस पकडले तेव्हां मलाच त्यांच्या खटल्याबद्दलची सर्व व्यवस्था करावी लागली होती. कारण सावरकरांचे माझ्याशिवाय कोणीही नातलग ती करण्यास तयार नव्हते. त्यामुळे मजवरचा पोलिसांचा संशय दृढ झाला होता. एके दिवशी गायडर नाशकास माझ्या श्वशुरांकडे आला. ते सेवानिवृत्त डेप्युटी कलेक्टर होते. त्यामुळे, त्यांचे वजन मजवर पडेल अशा समजुतीने, त्याने मला त्यांच्याकडे बोलावून घेतले. आणि ''सावरकरांच्या कटांत राहूं नका. त्यामुळे तुम्ही संकटांत पडाल. त्यांच्याबरोबर काय काय करीत होतां ते आम्हांला सर्व सांगा. आम्ही तुमचा बचाव करूं. तुम्ही एल.एल.बी., एम.बी.बी.एस. होणार असल्याने तुमचे भावी आयुष्य अत्यंत सुखांत, सरकारच्या कृपेत, जाईल. म्हणून तुम्ही या भानगडीत पडूं नका. हा महत्त्वाचा सल्ला माझ्याप्रमाणेच तुमचे श्वशूरही देतील. तरी काय ते मला सांगा.'' असा उपदेश त्यानें चालविला. तेव्हां मी सर्व गोष्टी साफ नाकबूल केल्या होत्या. सावरकरांचे व माझे नाते आहे. शिवाय आम्ही एकाच कॉलेजचे व गांवचे. त्यामुळे मला त्यांच्या संकटात मदत करणे भाग होते, म्हणून मी बाबांना मदत केली, इतके सांगून मी ती वेळ मारून नेली होती.) पण आता माझ्या हातात पक्के सापडला आहात. आतां सर्व कबूल केल्याशिवाय तुमची सुटका नाही. पाटणकरांनी व चतुर्भुजने सर्व कबूल केले आहे. तरी तुम्हीही कबूल करा. या मूर्खांच्या नादीं लागून आपल्या आयुष्याचे मातेरे करू नका, असे मी तुम्हाला तुमच्या सासऱ्यांच्या घरींच बजावलें होते. तुम्ही ऐकलें नाही. आतां तरी कबूल करा म्हणजे मी तुम्हांला यांत गोंवणार नाही' असे म्हणून माझ्या उत्तराची अपेक्षा तो करीत बसला.

मी त्याला सांगितले की, ''हे सर्व खोटें आहे. पाटणकर चतुर्भुज हे माझ्या फारशा ओळखीचे नाहीत. तेव्हां त्यांनीं काही जरी सांगितले असले तरी मला ते खरे वाटत नाही, आणि कबूल तर नाहीच नाही.'' माझे उत्तर ऐकून त्याने पाटणकरांना बोलावून आणले. गोपाळरावांनी मला स्पष्टच सांगितले की, ''भाऊ, आतां लपवण्यांत काही अर्थ नाही. मी सर्व सांगून टाकले आहे.'' हे पाटणकरांचे शब्द ऐकतांच मी थंडच झालो! पण अधिक काहीच बोललो नाही. गायडरने मला सदावर्ते इन्स्पेक्टर यांच्या ताब्यांत दिले, व सर्व कबूल करून घ्या म्हणून त्यांना आज्ञा करून तो निघून गेला. हा सर्व प्रसंग रात्री घडला होता.

रात्रभर मला झोंप आली नाही. पाटणकरांसारखा जिवाला जीव देणारा स्नेही सर्व काही कबूल करतो, आणि मलाही कबूल करावयास सांगतो, हे पाहून मी स्तिमितच होऊन गेलो होतो. पण इलाज काय? यांतूनही शक्य तितके निभावून गेलेच पाहिजे, असे विचार डोक्यांत चालले होते. आम्ही सर्व पोलीस पहाऱ्यांत असल्याने एकमेकांशी बोलण्याचीही चोरी होती. पण पोलिसांची नजर फिरतांच, किंवा ते डुलक्या घेत असता, आम्ही हळुंहळुं कुजबुजतच होतो. या कुजबुजीतच मला छळाचा भयंकर प्रकार कळला. तेव्हां 'आलीया भोगासी असावें सादर' याशिवाय पाटणकरांस गति नव्हती, असे मला कळून आले.

७.२३ पोलीस इन्स्पेक्टर सदावर्ते यांची सहानुभूति व मदत

सकाळी शौचमुखमार्जन झाल्यावर गायडरच्या आज्ञेप्रमाणे मला इन्स्पेक्टर सदावर्ते यांनी बोलावून घेतले. बदमाष अल्लीखान यांच्या हाताखालीं छळण्याचें काम करीत होता. सदावर्ते यांनी आरंभापासूनच सलगी दाखविण्यास सुरुवात केली. प्रथम मला त्यांनी आपल्याबरोबर चहा घेण्यास आग्रह केला. मीही तो घेतला. मला प्रथम वाटले की, ही सलगी म्हणजे अस्वलाच्या गुदगुल्या आहेत. म्हणून मीही सावधच होतो. पण त्यांनीं प्रथम ''रामभाऊ दातारांना तुम्ही ओळखतां काय'' असे मला विचारलें. रामभाऊ म्हणजे आमच्या मित्रमेळ्याचे सभासद व माझ्या परमस्नेह्यांपैकी वामनशास्त्र्यांचे वडील बंधु. तेव्हां मी त्यांना चांगलेच ओळखतो असे सदावर्त्यांना सांगितले. माझा व त्यांचा व पुण्याचे गणपतराव फडके यांचा अत्यंत निकट स्नेह आहे, असेही सदावर्ते म्हणाले. मीही जरा हीय्या करून त्यांना म्हणालों की, ''असे जर आहे तर तुम्ही आम्हांस मदत केली पाहिजे.'' ''कोणती मदत हवी'' असे त्यांनी विचारतांच ''पाटणकरांची व माझी गांठ एकएकटी घालून द्या'' असे मी त्यांना म्हणालों. ''आतांच ती संधी देतों'' असे म्हणून त्यांनी पाटणकरांना बोलावणे पाठविले. पाटणकरांना व मला एकत्र ठेवून हळूच सदावर्ते म्हणाले, ''तुम्ही दोघांनी मिळून काय जबाब द्यावयाचे ते ठरवा. आम्हांला पिस्तुले हवी आहेत. त्यांचा छडा लागत चालला आहे. ती न मिळाली तर निदान २० टोपडे तरी मारले जातील, ही गायडरला भीती आहे. म्हणून त्याचीं पिस्तुलें मिळविण्याची इतकी धडपड आहे. ती मिळाली म्हणजे मी तुमच्या इतर सर्व भानगडी उघडकीस येऊं देणार नाही; आणि त्या बाबतीत हवी ती मदत तुम्हांस करीन. रामभाऊ दातारांचा मी स्नेही. म्हणजे तुमचाही मी स्नेहीच आहे, असे समजा. आणि पूर्ण भरंवसा मजवर टाका. मजवरचा भरंवसा टाकलात तरच बरे. इतर म्हणजे पुढे सेवानिवृत्त झालेले, समर्थ भक्त म्हणून गाजलेले, आग्र्याहून सुटका या ग्रंथाचे कर्ते बाबासाहेब देशपांडे व पागे, कामटे वगैरे कोणीही तुम्हांस

मदत करणार नाही. त्यांच्याबद्दल सावध असा.'' असे सांगून सदावर्ते निघून गेले व मी व पाटणकर असे एकटेच तेथे राहीलो.

७.२४ सदावर्ते यांची थोडी माहिती

आमचा वसईचा बॉम्बचा कारखाना व त्यांतले सहकारी हे केवळ या सदावर्त्यांच्या बिनमोल साहाय्यामुळे आम्ही वांचवू शकलो. यामुळे त्यांच्याबद्दल येथेच दोन गोष्टी सांगणे बरे. यांचे नांव शिवराम विष्णु सदावर्ते. लो. टिळकांच्या वाड्याच्या मागेच यांचे राहते घर व सदावर्त्यांचे राममंदिर आहे. या एकाच अकल्पित सांनिध्याचा त्यांना मोठा अभिमान वाटे. देशभक्तीचे वारे आमच्या घरावर नेहमीच वाहते, असे ते म्हणत. लो. टिळकांना मंडालेहून आणण्यासाठींही ते पोलीस अधिकारी म्हणून गेले होते. त्यामुळेच त्यांच्या अंतःकरणांत देशभक्ती रुजली होती; आणि म्हणून अशी त्यांची वृत्ती झाली होती. त्यांतही त्यांचा व आमच्या अभिनव भारतांतल्या रामभाऊ दातारांचा अकृत्रिम स्नेह होता. त्यामुळेही देशभक्तीची भावना दुणावली होती. त्यांचे शिक्षण वगैरे बेताचेच होते. नोकरी पोलिसांतली असल्याने अनायसे व फुकट त्यांची चैनबाजी चालत असे. त्यामुळें त्यांना थोडासा बाहेरख्यालीपणाचाही नाद लागला होता. राजकीय गुन्ह्यांखेरीज इतर, म्हणजे खून, चोरी, दरोडे इत्यादी, गुन्ह्यांतील आरोपींना ते मुळींच दयामाया दाखवीत नसत. त्यामुळे गायडरचा त्यांच्यावर फार विश्वास बसला होता; आणि म्हणूनच या आमच्या खटल्यांतही त्याने त्यांचीच नेमणूक केली होती. असो.

७.२५ आमचे साहस व सदावर्त्यांवर विश्वास

पाटणकर व मी एकत्र बसल्यावर त्यांना सर्व हकीकत विचारली. त्यांनीही ती मोकळेपणाने सांगितली, वसईचा बॉम्बचा कारखाना वाचविण्यासाठींच केवळ मी कबुलीजबाब दिला, असे ते म्हणाले. मी अगाऊ सांगितलेली - मृतमनुष्य मध्ये घालून सांखळी तोडण्याची - युक्ती कां योजली नाहीत म्हणून मी त्यांना विचारले. ते म्हणाले की, ''मी गोंधळून गेल्यामुळे भलत्याच ठिकाणी ती योजली व ती फसली. पण ती योग्य तऱ्हेनें न उपयोजिल्याबद्दल त्यांना मनापासून वाईट वाटत होते. परंतु हातचा बाण सुटून गेला होता. नंतर त्याबद्दल खेद करण्यात अर्थही नव्हता. चतुर्भुजप्रमाणे त्यांनी रा. थत्ते यांचेही नांव सांगितले होते. त्यांनाही अटक करून आणले होते. पण त्यांच्या विरुद्ध पुरावा फारसा नव्हताच. तेव्हा सर्व जबाबदारी आम्ही दोघांनी घ्यावी, व हरीभाऊ थत्त्यांना सुटण्याची संधी घावी, असे आम्ही ठरविले. पण मी मॅजिस्ट्रेटपुढे कबुलीजबाब देणार नाही, असेही गोपाळरावांस सांगितले. अद्याप बॉम्बच्या कारखान्यांत भाट्यांच्याजवळ ठेवलेल्या पिस्तुलाची हकीकत पोलिसांस सांगावयाची होती. ती सांगताना आम्ही दोघांनी सदावर्त्यांना पूर्ण विश्वासांत घेण्याचे धाडस पत्करावयाचे ठरविले. आणि तेथलेही पिस्तुल त्यांच्या हवाली करावयाचें, व त्यांनी आमचा बॉम्बचा कारखाना उघडकीस आणावयाचा नाही, असा त्यांच्याशीं करार करावयाचा, असाही बेत ठरविला. एवीतेवीं कोणते तरी साहस त्या वेळी पत्करणें भागच होते. सदावर्त्यांना विश्वासांत घेतले नसते तर तेथल्या पिस्तुलाच्या पायीं तो सर्व कारखाना, व तत्रस्थ शेकडो सहकारी, उघडकीस येऊन

त्यांची गळचेपी व्हावयाची, व आमचे संकट आभाळाएवढे सहस्त्रगुणित व्हावयाचे. बरें त्यांना विश्वासांत घेतले, आणि त्यांनीं विश्वासघात केला, तरी अधिक ते काय होणार? असा विचार करून नशिबाची परीक्षा पाहण्याचा आम्ही निर्धार केला; आणि सदावर्त्यांवर विश्वास टाकावयाचें ठरविलें.

सदावर्ते आल्यावर आम्ही त्यांना आमचा बेत कळविला. पाटणकरांनीं हरिभाऊ थत्त्यांना बोलाविण्यास त्यांना सांगितले. थत्ते आल्यावर आम्ही आमचा बेत त्यांना कळविला. ''तुम्ही सुटण्याचा संभव आहे. तेव्हां आम्ही दोघे तुम्हांस त्यांत गुंतवीत नाही. सर्व जबाबदारी पिस्तुलांच्या बाबतींतली आम्ही घेतों. तुम्ही सुटलांत तर आमच्या दोघांच्या अनाथ कुटुंबांच्या चरितार्थाची सोय करा,'' असे थत्त्यांना आम्ही सांगून त्यांच्याकडून त्याबद्दलचे अभिवचन घेतले. थत्त्यांनींही ते दिले. त्या अभिवचनाप्रमाणे, अपेक्षेप्रमाणे निर्दोष सुटल्यावर, त्यांनी आमच्या कुटुंबांची चौकशीसुद्धा केली नाही, मग चरितार्थाची सोय करणे दूरच! असो. त्याप्रमाणे खलबत करून आम्ही पाटणकरांना मॅजिस्ट्रेटसमोर काय सांगावयाचे, हे ठरविले. त्याला सदावर्ते यांनीही संमति दिली.

७.२६बॉम्बचे कारखानदार वांचविले

दुसरे दिवशीं सदावर्ते त्या बॉम्बच्या कारखान्यांतलें पिस्तुल हस्तगत करावयासाठीं गोपाळरावांना बरोबर घेऊन मुंबईस गेले. सदावर्त्यांवर आम्ही जसा विश्वास टाकला होता त्याप्रमाणे त्यांनींही आमच्यावर टाकला होता. त्या वेळी गायडर पुण्यास गेला होता. गोपाळरावांना - खुनाच्या आरोपावरून पकडलेल्या आरोपीला - त्यांनीं स्नेह्याप्रमाणें सर्वस्वी वागविलें. बरोबर एकही पोलीस घेतला नव्हता. गोपाळरावांना हातबेडी किंवा काढणी घातली नव्हती. स्नेही ज्याप्रमाणे गांवी जातात, त्याप्रमाणेच दोघे गेले. मुंबईस गेल्यावर गोपाळरावांच्या मेव्हण्याकडे - रा. बाळकृष्णपंत गोरे याच्याकडे - ते थेट गेले. तेथे गोपाळरावांनीही थोडी सावधगिरी दाखविली. आपण स्वतः सदावर्त्यांना घेऊन, वसईस न जाता आपल्या मेव्हण्यास - बाळकृष्णपंत गोऱ्यांस - त्यांनीं पत्र देऊन वसईस पिस्तुल आणण्यास पाठविले. पुढची हकीकत रामभाऊ भाट्यांच्या मनोरंजक वर्णनांत वर आलीच आहे. म्हणून तिची पुनरुक्ती करीत नाही. पण त्याहीपेक्षां मनोरंजक हकीकत पुढेच आहे. ती म्हणजे सदावर्त्यांना पुण्यास आपल्या प्रिय पात्रांकडे जाण्याची आलेली हुक्की. पिस्तुल सांपडले म्हणजे त्याचा पंचनामा करावाच लागतो. वसईस तर तो करावयाचा नव्हता. म्हणून दुसरे गावच ठरविणे भाग होते. आणि सदावर्त्यांना पुण्यास जाण्याची लहर आली होती. म्हणून ते पिस्तुल घेऊन सदावर्ते व पाटणकर पुण्यास गेले; आणि बॉम्बच्या कारखान्याचा मागमूसही सदावर्त्यांखेरीज कोणासही कळला नाही. अशा रीतीने केवळ त्यांच्यावरच्या विश्वासामुळे वसईचा बॉम्बचा कारखाना व सहकारी आम्ही वाचविले.

७.२७ सदावर्त्यांच्या गमती

पुण्यास सदावर्ते व पाटणकर दोन दिवस राहीले. प्रिय पात्राबरोबर सदावर्त्यांनी आपली चैन करून घेतली. पिस्तुलाचा पंचनामा हवा तसा करून घेतला. त्यावेळी गायडर पुण्यास

होता. नियमाप्रमाणे सदावर्त्यांना त्यांची भेट घेणे भाग होते. त्याप्रमाणे ते गेले. पिस्तुलाबद्दल गायडरने विचारतां पिस्तुल एक-दोन दिवसांत मिळेल, सुगावा लागला आहे, अशी लोणकढी थाप त्याला ठेवून दिली. आणि आपली चैनचमन करून पाटणकरांसह पुण्याहून नाशकास परत आले. इतका धाडसी, विश्वासू, देशभक्त इन्स्प्टेक्टर आम्हांला वश झाला; व सर्व वसईचा बॉम्बचा कारखाना व तेथले अभिनव भारताचे सर्व सहकारी त्याच्या मदतीने आम्ही वाचवू शकलो, हे परमेश्वराचे उपकारच मानले पाहिजेत.

सदावर्त्यांच्याबद्दल आमची खात्री झाल्यामुळे आम्ही आमच्या पकडून आणिलेल्या सहकाऱ्यांना त्यांच्यावर विश्वास टाकण्यास सांगितले; पण पोलिसासंबंधाच्या सर्वत्र पसरलेल्या गैरविश्वासाने कोणी त्यांचा फारसा फायदा घेतला नाही. इतर पोलीस अधिकाऱ्यांनी इतर आरोपींना काही मदत केल्याचें ऐकिवात नाही. आतां कैलासवादी झालेले बाबासाहेब देशपांडे हे अनेक लोकांना सांगत असत की, 'मी नासिक केसमधल्या आरोपींना फार मदत केली. पण माझी माहिती त्याच्या अगदी उलट आहे. इतके मात्र खरे की, इतर काही ब्राह्मणद्वेष्ट्या पोलीस अधिकाऱ्यांनी, आम्ही केवळ ब्राह्मण म्हणून आम्हांला अधिक खड्ड्यांत टाकण्याची जी द्वेषबुद्धीने छळणूक केली तशी इतर काही ब्राह्मण व ब्राह्मणेतर अधिकाऱ्यांनीही केली नाही. जातिद्वेषानें अंध झालेली माणसें कसे पशुवत् आचरण करतात, हे आम्हांला या खटल्यांतही प्रत्ययास आले. उलट ब्राह्मण असूनही, आणि चाफेकरांसारख्या देशभक्तांच्या बरोबर द्रवीडांच्या खुनांत सामील असल्यामुळे कित्येक वर्षे तुरुंगवासाची शिक्षा भोगून आलेले, पण पुढे पोलीसांत नोकरीस लागलेले, साठे यांनी आमच्या बाबुराव खऱ्यांना लाथा मारण्यासही कमी केले नाही! असो. या सर्व प्रकरणाची हकीकत पुढे येईलच.

७.२८ बॉम्ब करण्याचे अन्य प्रयत्न

बॉम्बच्या बाबतींत इतरत्र प्रयत्न चालूंच होते. आतां अकालींच कैलासवासी झालेले पुरुषोत्तमपंत दांडेकर, व फाशी गेलेले विनायकराव देशपांडे, हे बाबुराव खऱ्यांच्या जवळ ही विद्या शिकून नाशिकास पिक्रिक ॲसिड व फल्मिनेट करीत होते. कोठुऱ्यासही वामन श्रीधर बर्वे त्या उद्योगांत होते. मुंबईसही आमच्याखेरीज इतर लोक हे यत्न करीत होते असे दिसते. कारण ग्रँट मेडिकल कॉलेजमधली पिक्रिकची बाटली बेपत्ता झाली होती. पुण्यासही काही प्रयोग झाले होते. त्यापैकी एका प्रयत्नाची हकीकत मनोरंजक आहे. पुण्याच्या गटातले (आतां कैलासवासी) आमचे शंकर पांडुरंग महाजन हे या प्रयत्नांत होते. त्यांच्या घरीं पिक्रिकच्या व इतर ॲसिडांच्या काही बाटल्या होत्या. त्या घरांत असतांनाच, त्यांना त्यांच्या बऱ्याच दाट ओळखीचे पोलीस अधिकारी अचानक अटक करावयास व झडती घ्यावयास आले. शंकरराव क्षणभर बुचकळ्यांतच पडले. पण त्यांनींही आपल्या सुपीक मेंदूंतून एक शक्कल लढवली. त्या अधिकाऱ्यांची ओळख असल्याने शंकररावांनी सलगी दाखवून म्हटले, ''बसाहो, चहा वगैरे घ्या, आणि मग तुमची झडती होऊं द्या, तुम्ही व मी येथेच आहोत.' असे म्हणून मी चहा सांगून येतो म्हणून उठले व घरांतल्या मंडळींना चहा ठेवण्यास सांगितले; आणि चहा होईपर्यंत पिक्रिकच्या बाटल्या मागच्या संडासांत ओतून त्यांचा नायनाट करा, असे सांगून परत बैठकीत येऊन बसले. इकडच्या तिकडच्या यांच्या गप्पा चालल्या होत्या, तों तों आत बॉम्बचा मुद्देमाल नाहीसा होत

होता! ते मुख्य काम उरकल्यावर मगच चहाचा निरोप आला. तोपर्यंत तो चहा होतच नव्हता! चहाची वर्दी आतून आल्यावर शंकरराव साळसूदपणानें आत जाऊन, सर्व निरवानिरव झाली याची खात्री झाल्यावर मगच, चहाचे कप घेऊन बाहेर आले. चहा, विडी वगैरे झाल्यावर मग झडती झाली. त्यांत मग काय सांपडणार?

अशा प्रकारें बॉम्बच्या प्रकरणाचीं ही उपाख्यानें संपली. येथे मला प्रत्यक्ष ज्यांची माहिती होती तेवढीच दिली आहे. दुर्दैवाने आज पुरुषोत्तमपंत दांडेकर व विनायकराव देशपांडे हयात नाहीत. ते असते तर यापेक्षा अधिक विश्वसनीय माहिती मी पुरवूं शकलो असतो. पण ''सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः' म्हणत, औंधचें प्रकरण सांगून, हे प्रकरण पुरें करतो.

७.२९औंधचा प्रयत्न व साताऱ्याचा अभियोग

अभिनव भारताच्या सभासदांवर सशस्त्र राज्यक्रांतीच्या कटाचा खटला चालूं असतांनाही, १९०१ च्या मे महीन्यामध्ये, आमच्याशीं संलग्न असलेल्या औंधच्या गुप्त मंडळींपैकी आर्टिस्ट रा. म. रा. हिंगे यांनी औंधास स्वदेशी पद्धतीने बॉम्ब तयार करण्याचें काम चालूं ठेवले होते. आणि वसईच्या मंडळींप्रमाणें त्यांनीं तो उडवूनही पाहीला. त्या आनंदाच्या भरात त्यांनी त्यांचे सहकारी मेहेंदळे यांना ती सर्व कृती सांगितली. पण दुर्दैव असे की, मेहेंदळे हे कच्च्या दिलाचे निघाल्यामुळे त्यांनी ती बातमी पोलिसास कळविली; आणि त्यामुळें डॉ. वा. वि. आठल्ये (सातारा), हिंगे, मेहेदळे व इंगळे यांच्यावर साताऱ्यास सेशन कोर्टांत खटला होऊन त्यांत पहील्या तिघांना आमच्याप्रमाणेच भयंकर शिक्षा – ५ – ८ - ३।। वर्षे अशा शिक्षा - झाल्या आणि हा राज्यक्रांतीचा अल्पसा प्रयत्न मुळांतच खुडला गेला. (डॉ. आठल्ये यांच्या आठवणी).

७.३०आमच्या विध्वंसक्षमतेचें गमक

वर दिलेल्या बॉम्बच्या सामानाच्या नासधुसीवरून वाचकांना आम्ही केवढा प्रचंड उद्योग चालविला होता, व किती ठिकाणी बॉम्बचे कारखाने चालूं केले होते, आणि योजनेप्रमाणे जर बॉम्बचे धूमधडाके उडवण्याचे ठरवले असते तर ब्रिटिश सरकारला ठिकठिकाणी कसे हादरवले असते, याची थोडी तरी कल्पना येईल. आमच्याखेरीज देशांत इतर गुप्त मंडळ्यांचेही हे उद्योग चालूच होते. त्याच वर्षी व्हाइसरॉय लॉर्ड मिंटोवर अहमदाबादेस फेकलेला बॉम्बच त्याची साक्ष देत आहे. आमच्या या सर्व खटपटी एकदम अचानक, कोणाही सहकाऱ्यास अगाऊ न कळवतां, जो ज्याक्सन-वध झाला त्यामुळे, वाया गेल्या याचेच आम्हांला अत्यंत वाईट वाटले. शत्रूच्या शेकडो हजारो लोकांना गारद किंवा जन्माचे जायबंदी करण्याची आमची तयारी होती. पण एकाच अधिकाऱ्याच्या वधासाठी एवढे आर्थिक, आणि शेकडो कुटुंबांचे जन्माचे, नुकसान झाले, कैकांना तुरुंगवास व देहदंड सोसावे लागले, ही दुर्दैवाची शर्थ झाली. नियोजनपूर्वक कार्य करावयाचे ठरले असूनही, तशा आणाभाका झाल्या असतांना, केवळ मोहवशतेने, असा सर्वस्वाचा घात झाला, आणि शत्रूला हादरा बसण्याऐवजी आम्हांला व आमच्या चळवळीलाच उलट हादरा बसला, याबद्दलचा खेद होतो. पण राष्ट्राच्या दीर्घकालीन जगड्व्याळ युद्धांत या चकमकीमध्ये असे अपघात व्हावयाचेच, हे जाणूनच आम्ही आमचें समाधान करून घेत होतो.

८ सरकारचे अभिनव भारतावरील हल्ले

रात्रिर्गमिष्यतिभविष्यति सुप्रभातम् ।

भास्वानुदेष्यति हसिष्याति पंकजश्रीः ।।

इत्थं विचिंतयति कोषगते द्विरेफे ।

हा हंत ! हंत ! नलिनीं गजमुज्जहार ।।

''रात्र जाईल, सुप्रभात होईल, सूर्य उजाडेल आणि कमल उमलून ते आपल्या शोभेने हसू लागेल, असा कमलांत अडकलेला मधुकर विचार करीत होता. तोच हायरे दैवा ! हत्तीने ते कमलच उपटून टाकलें'' या सुंदर कवितेत जी कमळातल्या मधूचा उपभोग घेण्यासाठी त्यांतच गुंगून अडकलेल्या मधुकराची रम्य कल्पना होती तशीच आमचीही होती. इंग्रज सरकारच्या राज्याविरुद्ध, एकदम, अनेक प्रांतांत, सशस्त्र क्रांतीची उठावणी करून ते उधळून टाकावयाचे, असे कल्पनातरंग व योजना हिंदुस्थानातल्या शेकडो क्रांतिकारकांच्या मनांत थैमान घालीत होत्या. त्या उद्देशाने गुप्तपणे लोकसंग्रह व शस्त्रास्त्र संग्रहही ठिकठिकाणी चालू होते. या भीषण संग्रामाची कल्पना इंग्रज सरकारलाही आलेली होती. क्रांतीसाठी जो वृत्तपत्रांतून, सभांतून, उत्सवांतून, ग्रंथांतून उघड प्रचार चालू होता त्यावरून हे वादळ लवकरच माजणार, अशी कल्पना बंगाल, महाराष्ट्र, पंजाब या प्रांतांतल्या सुभेदारांना (गव्हर्नरांना) तरी नक्कीच डांचत होती, असे 'राजद्रोहकमिटीचे इतिवृत्त' म्हणते. पण हा प्रचारही रिक्रूट भरतीसाठी आम्हांला करणेच भाग होते. त्यांतला धोकाही आम्ही जाणून होतो. पण तो पत्करूनही आम्हांला ते दिव्य करणे अगतिकतेने अवश्यच होते.

८.१ वंदे मातरम्चा खटला

हे प्रकट कार्य करण्याचा अपेक्षित परिणाम म्हणजे पोलिसांची नजर व पुढाऱ्यांची उचलबांगडी, हा झालाच. १९०६ मध्ये २७ सप्टेंबरला दसऱ्याच्या वार्षिक मिरवणुकीच्या वेळी एका पोलिसाने 'वंदे मातरम्' या जयघोषाला बंदी केली व बाबा सावरकरांच्या अंगावर हात टाकला. त्यासरशी त्याला बाबांनी लोळवले व तिंबले. ही हकीकत समजताच दंगल झाली. आणि पुढे मित्रमेळ्याच्या ११ आरोपींवर खटला झाला. किरकोळ मारामारीचा खटला. त्यांतही एका दारू प्यायलेल्या शिपायाने माजविलेला, पण पोलीस म्हणजे ब्रिटिश साम्राज्याच्या रक्षकाचा प्रतिनिधि! लगेच सर्व ब्रिटिश सत्ताधिकारी त्याच्यामागे उभे राहीले; आणि दुसऱ्या दिवशी ११ जणांना पकडून जामिनावर मोकळे केले. त्याबद्दलची हकीकत रा. गोखले यांच्या 'क्रांतिवीर बाबाराव सावरकरांच्या' चरित्रांत तपशिलासह दिली आहे. त्या निमित्ताने सत्ताधाऱ्यांनीं आपल्या सत्तेचे प्रदर्शन २०० पोलीस आणून गावात मिरवून केले. नंतर खटला भरला गेला; व तो वर्षभर, मॅजिस्ट्रेटच्या मर्जीप्रमाणे मुक्काम करीत करीत, जिल्हाभर नाचला व गाजला. अभिनव भारताच्या सदस्यांना ती इष्टापत्तीच झाली. त्या निमित्ताने त्यांनी मॅजिस्ट्रेटच्या मुक्कामाच्या ठिकाणी, व खेडोपाडी आणि जागोजागी, रात्री सभा भरवून वंगभंगाच्या चळवळीत स्वराज्य, स्वदेशी बहीष्कारादी उपायांवर उत्तेजनार्ह शेकडो भाषणे केली. शेवटी हा खटल्याचा

डोंगर १२ महीने पोखरून मॅजिस्ट्रेटने १०/२० रु. दंडाच्या किरकोळ शिक्षेचा उंदीर काढून त्याची बोळवण केली! पण या अभियोगामुळे 'मित्रमेळा' व त्याचे पुढारी पोलिसांच्या काळ्या यादीत गुंतले गेले. राजद्रोहात्मक चळवळी हे लोक करतात, यांची गुप्त संस्था आहे, आणि ती क्रांतिकारक आहे, हे पोलिसांना अगोदर कळलेच होते. पण प्रत्यक्ष कृत्य सरकाराविरुद्ध काही घडले नव्हते. ते या मारामारीने घडले; पोलिसांस हात घालावयास जागा सांपडली. ''मित्रमेळ्यापासून पोलिसांस फार त्रास होत होता'', असे आपल्या साक्षीत आमच्या खटल्यांत डेप्युटी सुपरिंटेडंट मारुतीराव तोडरमल म्हणालेही.

८.२ १९०८ मधला बाबांवरचा दुसरा खटला

महाराष्ट्रातल्या क्रांतिप्रचारकात सावरकर बंधूंचीं नावे पोलिसांनी १९०६ नंतर गोवून ठेवली होती, असे आमच्यावरील खटल्यांत या पोलीस अधिकाऱ्याने आपल्या जबानीत सांगितलेले आढळते. आणि त्यामुळे अशा क्रांतिवीरांना संकटांत घालण्यास सरकार टपलेलेच होते. परस्परच त्यांच्यावर संकटे आली तर सरकारला गुदगुदल्या होतच असत. लो. टिळकांना म्हणूनच ताईमहाराज-प्रकरणांत पेचात आणण्याचा बेशरम प्रयत्न कित्येक वर्षे चालू होता. पण परस्पर अशा वीरांचा काटा असा न निघाला तर, जी संधी येईल ती साधून, अशा चळवळ्या लोकाना तुरुंगात डांबण्याचा खटाटोप करण्यात येई. तशी संधी १९०८ मध्ये बाबांच्यावर, त्यांच्या अधीरतेने, पुन्हां आली. त्या वेळी देशभक्त अण्णासाहेब परांजप्यांच्यावर राजद्रोहाचा अभियोग मुंबईस सुरू होता. बाबा तेवढ्यासाठी लोकमान्यांच्या आग्रहावरून मुंबईस गेले होते. परांजप्यांच्या खटल्याच्या वेळी मॅजिस्ट्रेटच्या आवाराभोवती खूप गर्दी त्यांना पाहण्यास जमली होती व रेटारेटी चालू होती. रेटारेटीत एका पोलीस सुपरिंटेडंट गायडरने त्यासाठी बाबांना अटक केली. बाबांचे नाव त्याला कळले नसते, किंवा बाबांनीं खोटे नाव सांगितले असते, तर कदाचित त्यांने बाबांना सोडूनही दिले असते. किंवा जामिनावर त्यांची मुक्तता तरी केली असती. पण 'सावरकर' या नावाची इंगळी डसतांच त्याने हे सावज पक्केच पकडले. वास्तविक हा बेकायदा जमावाचा साधा गुन्हा. तोही मुंबईत घडलेला. त्या निमित्ताने नाशकास त्यांच्या घराची 'झडती' घेण्याचे काहीच कारण नव्हते. पण पोलीस निमित्तालाच टपलेले होते. आणि मॅजिस्ट्रेटही त्यांचे गुलाम झाले होते. त्यांनी त्यासाठी नाशकास बाबांच्या घराची झडती दुसऱ्या दिवशी घेतली. नारायणराव सावरकरीनीं दूरदर्शीपणाने, हे भावी संकट हेरून, विश्वनाथराव केळकरांना रात्रीच नाशकास पाठवून, झडतीत काही सापडू नये अशी व्यवस्था केली होती. त्यांनी व घरातल्या मंडळींनी शक्य ते कागदपत्र रातोरात जाळले. तरीही बऱ्याच माझिनीच्या प्रती, क्रांतिकारकाची, गुप्त संस्थांचीं, लष्करी शिक्षणाची काही पुस्तके व इतर प्रकाशने, काही पत्रे पोलिसांस मिळालीच. त्यांचा उपयोग या 'बेकायदा जमावाच्या' गुन्ह्याच्या खटल्यांत काहीच झाला नाही. पण पुढच्या १९०९ मधल्या सशस्त्र राज्यक्रांतीची तयारी व चिथावणी या १२१ कलमाखालच्या आरोपावरील त्यांच्या व आमच्यावरील, खटल्यांत पूर्णपणे झाला. बेकायदा जमावाच्या गुन्ह्याबद्दल बाबांना १ महीन्याचीच शिक्षा झाली.

८.३ सरकारचे मावळांशी कारस्थान

बंगालमध्ये १९०८ मध्ये मुजफरपूरच्या बॉम्बप्रकरणामुळे, क्रांतिकारक लो. टिळक व अण्णासाहेब परांजपे यांना राजद्रोहाच्या आरोपांवरून अनुक्रमे ६ वर्षे व १९ महीने, अशा जबर शिक्षा देऊन सरकारने आपापल्यापरी महाराष्ट्रात 'निर्वीरं उर्वीतलं' करून ठेवले होते. पण या सुमारास व तत्पूर्वीही इंग्लंडमध्ये विनायकराव सावरकर, बापट यांनी राजद्रोही भाषणे व प्रकाशने यांचा सपाटा चालविलेला होता. त्यामुळे सावरकर व बापट हे अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत अगोदरपासूनच सलूं लागले होते. त्यातच बंगालमध्ये क्रांतिकारकांनी स्फोटक अस्त्रांचा उपयोग चालविला होता. त्यांत बापटांचे नाव येऊन ते अज्ञातवासीही झाले होते. टिळक, परांजपे, सावरकर, बापट इत्यादीकांचा, महाराष्ट्रात इंग्रज सरकारचे राज्य सशस्त्र क्रांतीने उलथून टाकण्याचा बंगालप्रमाणेच एक अवाढव्य कट आहे, अशी सरकारी अधिकाऱ्यांची समजूत झालेली होती. त्याला काही आधार चांगल्या विश्वासू मवाळांकडून मिळतो की काय, याची खटपट चालली होती. टिळकांवरच्या खटल्याच्या वेळी त्यांचे शिष्य व मित्रपरिवार - म्हणजे तात्यासाहेब केळकर, दादासाहेब करंदीकर, दादासाहेब खापर्डे वगैरे - यांनी सरदारगृहांत तळ दिला होता. त्या संधीस आम्हांस सरकारच्या या अंतस्थ कारवाईचा पुरावा बिनतोड मिळाला. ती हकीकत मोठी मनोरंजक व बाबांवरच्या पुढच्या १९०९ मधल्या अभियोगाच्या दृष्टीने, सूचक व बोधप्रद आहे. ती अशी -

८.४ आमचे हेर मोघे

लो. टिळकांवर १९०८ मध्ये जो राजद्रोहाचा खटला झाला, त्याला त्यांच्या देशभर चाललेल्या राजद्रोही चळवळी हेच प्रमुख कारण होते. १९०७ पासून वंग देशांत बॉम्बचा उपयोग क्रांतिकारक करू लागले होते. महाराष्ट्रातही त्याचा पडसाद उठणार याची सरकारला चुणूक कळली होती. या सर्वांच्या बुडाशी टिळक, परांजपे, सावरकर हेच आहेत, हेही सरकारला ठाऊक होते. पण याबद्दल सरकारच्या गुप्त मसलती, कोणाकोणाशी, कशा काय चालल्या आहेत ते जाणण्याची आमची उत्कंठा होती. म्हणून आम्ही त्या पातळीवर होतो. विलायतेहून हिंदुस्थान सरकारास रात्री तारा येत. त्यांत त्याचा सुगावा लागेल अशी आमची अटकळ होती. आणि अपेक्षेप्रमाणे ते खरेही ठरले. आम्हांलासुद्धा ही अटकळ बांधण्यास टिळकावरील खटल्याच्या वेळी न्यायाधीश डावर याने व्हाइसरॉयच्या तारेला उत्तर म्हणून केलेली उघड तार त्यात होती Defence grore, depending jury अशी ही तार होती. ब्रिटिश राज्यांत न्याय-खाते, निदान हायकोर्टे, ही स्वतंत्र मानलीं जात. पण असा दुबळा न्यायाधीश (व्हाइसरॉयला) राजप्रतिनिधीला तार पाठवतो, व कदाचित त्याच्या इच्छेप्रमाणे अगदीच वागत नसला तरी, त्याच्या गोडीगुलाबीत राहू इच्छितो अशी वस्तुस्थिति या तारेवरून दिसते. असो. त्यावेळी रा. मोघे या नावाचे आमचे एक अभिनव भारतीय सदस्य मुंबईच्या मोठ्या तारखात्यात नोकर होते. त्यांनी डावरची तारेची नक्कल आमच्याकडे सरदारगृहांत पोचविली. आम्हांला विस्मय वाटला आणि टिळकांना डावर शिक्षा देणार, हे ठरल्यासारखेच होते.

नंतर मोघ्यांना आम्ही इतर काही तारा मिळतात का पहा, असे सांगितले. पण त्या बाबतीत सरकारचा बंदोबस्त कडेकोट होता. रात्रपाळीच्या कामावर एकजात ख्रिस्ती व

अँग्लोइंडियन लोक असावयाचे, असा नियमच होता. शिवाय विलायतेच्या तारा आकडे-लिपीत (कोडवर्ड) असावयाच्या. यामुळे आम्ही व मोघे बुचकळ्यांत पडलो. पण मोघ्यांना त्यांच्या ख्रिस्ती व अँग्लो-इंडियन दोस्तांची खोड माहीत होती. रात्रपाळीच्या वेळी हे लोक कामावर असले की, त्यांची प्रीतिपात्रेही आवतीभोवती असत. आणि पाळीपाळीने हे कामगार त्यांच्याशी धिंगाणा घालीत असत. मोघ्यांनी यांपैकी त्यांच्या एका दोस्ताला ''रात्रपाळीचे काम मी करतो तूं तुझ्या छेलछबेलीशी खुशाल गुंगत रहा'' असे आमिष दाखविले. तो कबूल झाला आणि मोघ्यांनी अंकलिपीतली (कोडवर्ड) एक तार नकळत आमच्याकडे पाठवली. पण ही अंक-लिपी कशी उलगडावयाची हे कोडे आम्हांला पडले. परंतु मोघे हे त्यामुळे निराश झाले नाहीत. त्यांनी सेक्रेटरीएटमधल्या त्यांच्या एका दोस्ताशी संधान बांधले. आणि त्याकरितां कोड जेथे ठेवतात त्या कपाटाचे तावदान, ऑफिस संपल्यावर, संध्याकाळी फोडून कोडच आम्हांला आणून दिले! त्या किल्लीने आम्ही - मी व माझे सहकारी हरि अनंत थत्ते यांनी - ती सर्व तार उलगडली.

८.५ ना. गोखल्यांची भेट व मोर्ल्यांचीं कारस्थाने

स्टेट सेक्रेटरी लॉर्ड मोर्ले यांनी व्हाइसरॉयला ती तार केली होती. त्यांत जी. के. म्हणतात, ''टिळकांचा सावरकर व बापट यांच्याशी घनिष्ठ संबंध आहे. तरी तुम्ही सावरकरांवर सक्त नजर असू द्या'' असा मजकूर होता. आम्ही ती तार टिळकांच्या परिवारांतल्या निवडक मंडळींनाही दाखविली. त्यावेळी ना. गोपाळ कृष्ण गोखले (जी.के.) हे विलायतेत होते. मोर्ले यांच्या भेटीगाठी ते घेत. त्यावरून 'जी.के.' म्हणजे नामदार गोखलेच होत, यांत शंका नव्हती. गोखल्यांनीं हे बुद्धिपुरःसर कदाचित् मोर्ल्यांना सांगितले नसेल. त्यांच्या भोळसटपणाचा फायदा मोर्ल्यांनी घेतला असेल, पण पुण्याचा मवाळकंपू हा टिळकाना पाण्यांत पहात होता हेही तितकेच खरे आहे. तत्कालीन मवाळ हे सरकारचे 'मित्र' बगलबच्चे होते हे उघडच होते. टिळकांना शिक्षा झाली त्या दिवशी या कंपूने पेढे वाटले असाही लोकप्रवाद होता. या कंपूचे गोखले हे परात्पर गुरु होते. टिळकांबद्दल त्यांना फारसा आदर नव्हता, हेही पुष्कळांना माहीत होते. त्यामुळे गोखल्यांबद्दल आदर नसणाऱ्यांना, व टिळकांबद्दल निष्ठा असणाऱ्यांना, गोखल्यांचे हे मोर्लेशी झालेले संभाषण देशद्रोहीपणाची चुगली (?) वाटली असल्यास नवल नाही. आणि तशी ती वाटली म्हणूनच पुण्यांतल्या एका गुप्त संस्थेंतील ब्रह्मगिरीबुवा, पाळंदे, परांजपे, शिधये या क्रांतिकारकांनी गोखल्यांना या चुगलखोरीबद्दल प्रायश्चित्त द्यावयाचे ठरविले होते. आमच्यावरील १९१० मध्ये सशस्त्र राज्यक्रांतीच्या आरोपावरून झालेल्या खटल्यांत या आरोपींनी ही गोखल्यांच्या खुनाच्या प्रयत्नाची हकीकत कबूल केली होती. पण त्या खुनशीपणाचे बीज या गोखल्यांच्या चुगलखोरीत (?) होते. असो.

८.६ गोखल्यांचे कारस्थान व बाबांवर सक्त पहारा

या तारेतल्या आज्ञेप्रमाणे सरकारी चक्रे फिरून लागलीच बाबा सावरकरांवर २४ तास पोलिसांचा पहारा बसला, ही एकच गोष्ट त्या तारेच्या खरेपणाचा सबळ पुरावा आहे. बाबांच्या चळवळी त्यामुळे अर्थातच रोखणे, बंद करणे, भाग पडले. तरीही ते या घरातून त्या घरात उडी मारून जाऊन, पहारेकऱ्यांस, कधी महत्त्वाच्या प्रसंगी, गुंगाऱ्या देऊन ८-८ दिवसही घरातून

नाहीसे होत. पोलीस त्यामुळे अतिशय चिडत. पण करणार काय? बाबा त्यांचे काही गुलाम नव्हते. पण या बाबांच्या गुप्त होण्याच्या हीकमतीमुळे, बाबांना हवे तेव्हा पकडता यावे म्हणून, त्यांचे पकडवॉरंट तारखेशिवाय जय्यत तयार ठेवलेले होते. आणि १९०९ मध्ये फेब्रुवारी महीन्यांत ते असेच पोलिसांस गुंगाऱ्या देऊन मुंबईस मजकडे येऊन राहीले असतां त्यांना माझ्याच खोलीत पकडण्यांत आले. विलायतेहून चतुर्भुज हा त्याच सुमारास पिस्तुले घेऊन येणार होता, ही बातमी कदाचित त्यांना तात्यांच्या पत्रांतून सांकेतिक शब्दांनीं कळली असावी, आणि म्हणूनच ते मुंबईस आले असावेत असा एक तर्क आम्ही बांधला होता.

८.७ बाबांना जन्मठेपेची शिक्षा

असो. गोखल्यांच्या कारस्थानाचे हे थोडेसे आगंतुक प्रकरण सोडून आपण बाबांच्या प्रकट कार्यामुळे त्यांच्यावर ओढवलेल्या संकटांची गोष्ट पुरी करू. सरकारने यावेळी त्यांच्यावर जे आरोप ठेवले होते ते ''लघु अभिनवभारत-माले''तल्या पदांनीं, व माझिनीच्या प्रकाशनाने, त्यांनी ''राजाविरुद्ध सशस्त्र युद्ध करण्याचा प्रयत्न केला, व अशा युद्धास उत्तेजन दिले'' असे होते. १२१, १२१अ, १२२, १२४अ वगैरे विधिनिर्बंधांतली (इंडियन पिनल कोड) कलमे त्यांच्यावर लागूं केली होती. प्रकट प्रकाशनांचाच हा परिणाम होता. त्यातही ''रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना'' या गोविंद कवीच्या उघड उघड सशस्त्र बंड करण्याचा उपदेश करणाऱ्या पदांवर सरकारचा फार कटाक्ष होता. पिनल कोडप्रमाणे तो बरोबर लागूं पडत होता. मागे निर्दिष्ट केल्याप्रमाणे १९०८ मधल्या त्यांच्या घरीच्या झडतीत सांपडलेले बॉम्बचे चोपडें, कागदपत्रे, लष्करी शिक्षणाची व युरोपांतल्या गुप्त संस्थांचीं पुस्तके, हा पुरावाही सरकारला फार उपयोगी पडला. प्रकाशनांच्या, व या उघड पुराव्याच्या आधारावर बाबांना त्या कलमाखाली जन्मठेप व इस्टेटजप्ती ही अघोर कठोर शिक्षा फर्मावण्यांत आली! बाबांच्या हातून युद्धाचे असे प्रत्यक्ष कृत्य कोणतेच घडलेले नव्हते. त्यामुळे आपण देतो ही शिक्षा राज्यक्रांतीच्या, केवळ उपदेशाच्या स्वरूपाच्या, गुन्ह्याला फारच जबर निर्दयपणाची आहे हे बी. सी. केनडी या इंग्रज न्यायाधिशालाही वाटले होते. पण फाशी किंवा जन्मठेप यांशिवाय कायद्यात त्या गुन्ह्याला दुसरी शिक्षाच सांगितली नसल्याने ''नाइलाजाने मला ती द्यावी लागत आहे, सरकारने ती वाटल्यास कमी करावी,'' असे या न्यायाधिशाने निवाड्यात स्पष्ट म्हटले होते. पण सरकारच्या जिवावर उठलेल्या बाबांना खुनशी सरकार दया कशी दाखविणार? त्यांना त्यांनी अंदमानांत झिजून झिजून मरण्याच्या हेतूने पाठविले, व त्यांचा किती अमानुष छळ केला, हे बाबांच्या चरित्रांत आलेच आहे.

या खटल्याच्या वेळेस बाबा सावरकरांच्या हातून एक मोठी चूक झाली तिचा उल्लेख येथेच केलेला बरा.

८.८ बाबांची घातकी इतिहास-लोलुपता

कै. बाबांना, अभिनव भारताच्या भावी इतिहासाला उपयोगी पडतील अशी, कागदपत्रे जपून ठेवण्याची फार हौस होती. त्यांच्या या इतिहासप्रेमाचा धोका त्यांना कळत नव्हता, असे नाही. पण इतर धोक्याच्या गोष्टी आपण करतोच आहोत, मग यानेच काय जास्त होणार, असा

त्यांचा विचार असे. आम्ही सर्वजण त्यांची कानउघाडणी याबाबत करीत होतो. पण मग ते आम्हांला न कळत या लेखी पुराव्याची गुप्त व्यवस्था करीत. त्यांना मुंबईस १९०८ मध्ये पकडल्यानंतर रातोरात चि. बाळ सावरकरांच्या मसलतीप्रमाणे (आता कै. ॲडव्होकेट) बाबूराव केळकर नाशकास आले, व ते व दातारशास्त्री यांनी रात्रीं घरीची झडती घेतली तेव्हा, विनायकराव सावरकरांची लंडनच्या गुप्त चळवळीची कित्येक पत्रे त्यांना मिळालीं! ती त्यांनी सर्व जाळली. म्हणून दुसऱ्या दिवशी अपेक्षित पोलीस झडतीत ती सरकारच्या हाती लागली नाहीत! ती सांपडली असती तर बाबासुद्धा आमच्या सर्वांच्या विरुद्ध भक्क पुरावा तेव्हाच मिळता; व त्यांत निर्दिष्ट केलेल्या इतर कैक सभासदांची व त्यांच्या हालचालीची इत्थंभूत माहिती १९०८ मध्येच पोलिसांस मिळती. त्यानंतर त्यांना जेव्हा माधवाश्रमात १९०९ च्या फेब्रुवारींत माझ्या खोलीत पकडले तेव्हाही मी त्यांच्या जामीनकी वगैरे व्यवस्थेसाठी त्यांच्याबरोबर नाशकास गेलो होतो. शिवाय, मी व माझे मित्र यांनी ठरवल्याप्रमाणे माझ्या बरोबर आमचे दुसरे अभिनवभारतीय सदस्य (हल्ली जुन्नरला वकिली करीत असलेले) रा. गणपतराव जोगळेकर हे निराळ्या डब्यांतून बसून नाशकास आले. जामिनकीची खटपट व्यर्थ गेल्यावर खाण्यापिण्याची व्यवस्था रात्री तुरुंगांत मी केली. आणि नंतर मी, गोविंद कवि, दातारशास्त्री आणि येसू वहीनी यांनी पुन्हा घराची रात्रभर झडती घेतली. तेव्हाही आम्हाला बरीच विलायतची तात्यांची पत्रे व इतर कागदपत्र मिळाले. आम्ही ते जाळले. त्याशिवाय मी व्यायामपटू रा. कृष्णराव महाबलांना व गणपतराव मगर यांना रातोरात भगूरला पिटाळून तेथे असलेले सर्व कागदपत्र - दैनंदिन्यासुद्धां - जाळण्याची व्यवस्था केली. मित्रवर्य जोगळेकरांना, बरोबर सोबत देऊन, कोठुरें येथे तसेच रात्री पिटाळले, व तेथे असलेल्या बॉम्बच्या साहित्याची वासलात लावली. या दक्षतेमुळे बराचसा पुरावा व मुद्देमाल पोलिसांच्या दुसऱ्या दिवशीच्या संकल्पित झडतीत सांपडला नाही. तरीपण आम्हांला, व सौ. येसू वहीनींनाही, नकळत बाबांनीं असे बरेचसे कागदपत्र, सभासदांचे पत्ते, बॉम्बच्या कृतीची पुस्तिका वगैरे घराच्या छपराखाली कौलारीत लपवून ठेवलेच होते!

बाबांची ही कागदपत्र ठेवण्याची खोड आम्हांला माहीत असल्याने, मी त्यांच्याशी, मुंबईहून रेल्वेंत बोलतांना, त्यांनी कोठें कागदपत्र ठेवले असल्यास मला आतां सांगा, म्हणजे मी त्यांचा नाश करतो, असे खोदखोदून विचारले. पण त्यांनी त्यावेळी मला 'काही नाही' असेच उत्तर दिले! पोलीस इन्स्पेक्टर रामभाऊ बल्लाळ यांच्या सहानुभूतीने बाबा, मी व २ अडाणी सशस्त्र पोलीस एवढेच एका डब्यांत होतो. आम्ही इंग्रजीत बोलत होतो. पोलिसांस ते येत नव्हते. ती संधी फारच नामी होती. पण ती बाबांनी घालवली. कौलारीतल्या कागदपत्रांची हकीकत मला तेव्हा कळती तर पुढच्या झडतीत ते सांपडले नसते. पण बाबांच्या त्या चुकीमुळे घोर अनर्थ झाला. मला न सांगता ती गोष्ट त्यांनी, पुढे काही दिवसांनीं, त्यांचे धाकटे बंधु बाळ सावरकर याला, तो त्यांचे अन्न घेऊन गेला तेव्हा, ''कौलारीत ५ रुपयांची नोट ठेवली आहे ती घे' अशा शब्दांनी सुचवली. त्यावेळी सरकारी नियमाप्रमाणे मॅजिस्ट्रेट जोशी हजर होते. त्या इंग्रजांशी एकनिष्ठ राहणाऱ्या, पण देशाशी द्रोह करणाऱ्या, नोकराला संशय आला व त्यांनी वाटेतच पोलिसाकरवी बाळाला थांबवले; व झडतीचे वॉरंट घेऊन त्याच्याबरोबर घरी जाऊन, सुचवलेल्या ठिकाणची झडती घेतली. त्यांत अनेक कागदपत्र, पत्ते, बॉम्बच्या कृतीचे पत्रक सांपडले! तरी चि. बाळने तेवढ्यांत, नजर चुकवून, एक दप्तर हातोहात उडवलेच!

बाबांच्या या कागदपत्र ठेवण्याच्या खोडीमुळे सरकारला त्यांच्या, व नंतर १९१० मध्ये आमच्या सर्वांच्या विरुद्ध, बराचसा पुरावा मिळाला. पत्त्यांच्या सुगाव्याने पोलिसांनी व सरकारने शेकडो लोकाना सतावले. बडतर्फ केले ते वेगळेच. आम्ही जे कागदपत्र जाळले तितके जर सरकारच्या हाती पडते तर शेकडो लोकांची आमच्याबरोबरच अंदमान किंवा तुरुंग यांत दीर्घकाल भरती झाली असती.

असो. गुप्त संस्थांचा खरा इतिहास कसा व का मिळणे शक्य नसते, याची कारणे वर दिलीच आहेत. आमच्याही अभिनव भारत संस्थेच्या गुप्त चळवळींचा इतिहास, म्हणूनच, सर्वच्या सर्व देणे या कारणामुळेच अशक्य आहे. स्मृतिपटावर, वयोमानाप्रमाणे पुसत पुसत, जो अवशिष्ट राहीला आहे तेवढाच येथे देत आहे. बाकी कर्मयोगाच्या फलत्यागाच्या सिद्धांतानुसार परमेश्वरार्पणच झाला आहे. असो.

८.९ वाळवे यांना शिक्षा

यानंतर पुन्हा कथानुसंधानाकडे वळू. बाबांच्याशिवाय, उघड प्रकाशनाचे कार्य करण्याबद्दल, आमचे सदस्य धानाप्पा सिद्रामाप्पा वाळवे यांनाही ६ महीन्यांची शिक्षा, टिळक व परांजपे यांचीं व्याख्याने प्रसिद्ध केल्याबद्दल, झाली होती. हे गृहस्थ चिवड्याचे व्यापारी होते व एकनिष्ठ होते. पण पोलिसांच्या गरक्यांत ते या प्रकाशनाच्या निमित्ताने सांपडले. त्यांना झालेल्या शिक्षेचे विशेष महत्त्व नव्हते. पण त्या जोरावर त्यांना पोलिसांनीं हुडकून, १९१० मध्ये महान् शिक्षेचा धाक दाखवून, आम्हां अभिनव भारताच्या सदस्यांविरुद्ध साक्ष देण्यास लावले. त्यांनी ती नाइलाजाने दिली; पण पुष्कळच छपवून बाकीची फारच थोडी माहिती सांगितली.

८.१० श्रीधर वामन बर्वे यांना शिक्षा

त्यांच्यानंतर विलायतेहून १९०७ मध्ये तात्या सावरकरीनीं काही तामिळ भाषेतली पत्रकें मद्रास प्रांतात वाटण्याचे काम बाबांवर सोपवले होते. बाबांनी ते काम कोठूरचे अभिनव भारतीय सदस्य वामन श्रीधर बर्वे यांजवर टाकले. हेतू हा की, कोठऱ्यासारख्या खेड्यांतून ती पाठवली गेली तर त्यांच्याबद्दल फारसा संशय कोणी घेणार नाही. आणि मद्रासी लोकांना कोठून ती आली याचा उलगडा होणार नाही. हेच बर्वे बॉम्बची विद्या शिकून ते तयार करण्याच्या कारवाईत होते. तात्या बर्वे यांनी ही पत्रके वाटण्याचे काम चोख बजावले. पण मद्रास इलाख्यांत ती सरकारच्या हाती पडली. आणि सुताने स्वर्गास जाणाऱ्या पोलिसांनी पोस्टाच्या शिक्क्यावरून कोठूरचा छडा लावला, व तात्या बर्व्यांना पकडले. पण बर्व्यांना तामिळ भाषा येते हे पोलिसांना सिद्ध न करता आल्याने, बर्व्यांना केवळ राजद्रोहाचे टपाली काम केल्याबद्दल ६ महीन्यांची शिक्षा ज्याक्सनसाहेबाने दिली.

सोलापूरचे आमचे कार्यकर्ते व 'स्वराज्य' पत्राचे संपादक बळवंत शंकर लिमये यांनाही १९०८ मध्ये राजद्रोहाच्या आरोपावरून तुरुंगवासांत अडकवून टाकले. यांचा व होतीलाल वर्मा यांचा घनिष्ठ संबंध होता. यांचे वतनही सरकारने खालसा केले.

८.११ गाडगीळ व जोशी यांना शिक्षा

अभिनव भारताच्या आपल्या सवंगड्यांपैकी ग्वाल्हेरहून पिस्तुल आणण्याच्या आरोपावरून रा. विठ्ठल बाळकृष्ण जोशी व महादेव बळवंत गाडगीळ यांना ६ महीन्यांची शिक्षा हत्यारीच्या कायद्याखाली ज्याक्सनसाहेबाने दिल्याचे मागे सांगितलेच आहे. तदनुरोधानेच ग्वाल्हेरच्या राज्यक्रांतीकारक कटाच्या खटल्याचां उल्लेख येऊन गेलेला वाचकास आठवत असेलच. सरकार आमच्या विरुद्ध हात धुवून पाठीस लागलेले होते. आम्हीही या परिणामांना शक्य तों तोंड देतच होतो. गाडगिळांनी शिक्षा भोगली, पण सरकारला फसवून पिस्तुल मात्र जाऊं दिले नाही.

८.१२ खऱ्यांचा मोकासा जप्त व राजद्रोह न करण्याबद्दल जामीन

या शिक्षासत्रांत नाशिकचे सुप्रसिद्ध वकील कै. वामन सखाराम उर्फ बाबासाहेब खरे यांची, यांना राजद्रोही भाषणे करण्याची संवय असल्याबद्दल, मुस्कटदाबी करण्यात आली; आणि ज्याक्सनसाहेबांनी राजद्रोहाच्या आरोपावरून त्यांचा मोकासाही जप्त केला. बाबासाहेब खऱ्यांनीं अभिनव भारतासाठी सर्व तऱ्हेचे कष्ट सोसले होते. द्रव्याची मदतही ते केव्हां केव्हां करीत असत. बाबांवर त्यांचा अतिशय लोभ होता. इतका की, काही खासगी व अत्यंत नाजूक कामांत बाबांच्या अभिप्रायावर त्यांनी आपली मदार ठेवली होती. ते अत्यंत भावनावश असत. १९०६ व ७ सालीं ते माझ्याबरोबर कलकत्ता व सुरत येथे कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या निमित्ताने, पण बंगालच्या क्रांतिकारकाच्या भेटीगांठीसाठी, आले होते. त्यांनी पदेंही केली होती. आणि कोणतीही सभा किंवा संमेलन असो, त्यांत ते ती स्वतः मोठ्या आविर्भावाने म्हणत असत. या भावनावशतेमुळे, व खाजगी व सरकारी आपत्तीमुळे, त्यांना पुढे वेडही लागले होते. त्यांना काही दिवस सरकारने धारवाडास ठेवले होते. तेथून ते सुटून आले पण मनाने व शरीराने कायमचे खंगून आले. वेड लागल्याने वकिलीही गेली आणि सरकारने मोकाशाचे उत्पन्नही बुडवले! यामुळे प्रतिमासी २-३ हजार रुपये वकिलींत सहज मिळवणाऱ्या या अत्यंत भावनाप्रधान देशभक्ताला अखेरीस दारिद्र्यांत, हालअपेष्टांत, झिजून झिजून मरावें लागले!

८.१३ नारायणराव कल्हईकरांना शिक्षा

इंग्रज सरकारने राजद्रोही चळवळी जाळूण टाकण्यासाठी पेटवलेल्या खाईंत रा. नारायण तुकाराम कल्हईकर या गृहस्थांसही हत्यारीच्या कायद्याचा चांगलाच चटका दिला. खुदिराम बोसप्रमाणे आपणही काही दिव्य करावे असा नारायणरावांचा बेत होता, असे त्यांच्याविरुद्ध एका साक्षीदाराने सांगितले होते. १८ महीने सक्तमजुरीची शिक्षा या गुन्ह्यासाठी त्यांना देण्यांत आली. ‘विहारी’ पत्रांत राजद्रोही लेख प्रसिद्ध केल्याबद्दल आमचे अभिनव भारतचे सदस्य भास्करराव फडके व रामभाऊ मंडलीक यांना शिक्षा झाल्याचा उल्लेख मागे आलाच आहे.

याप्रमाणे १९०७ पासून तो आमच्या १९१० मधल्या खटल्यापर्यंत महाराष्ट्रातली राजद्रोही व राज्यक्रांतिकारक चळवळ दाबून टाकण्याचा सरकारचा खुनशी व घातक उद्योग चालूच होता. लो. टिळकापासून तों अगदी सामान्य माणसापर्यंत जो जो कोणी राजद्रोही वाटेल त्यास या शिक्षासत्राच्या वणव्यांत टाकून, होरपळून, भाजून काढण्याचा त्यांनी चंगच बांधला होता. आणि

त्यांस या राक्षसी कामांत आमच्यांतलेच काही निमकहराम अधिकारीही मदत करीत होते. या त्यांच्या मदतीबद्दल इंग्रज सरकारने कोणाला जहागिऱ्या, कोणाला जमिनी, बढत्या व इतर सुखसोयी बहाल केल्या होत्या. त्यावेळच्या कोणकोणत्या देशद्रोह्यांनी अशी बक्षिसे सरकारकडून मिळवली त्यांची, नावनिशीवार यादी काढून, सध्याच्या राष्ट्रीय सरकारने त्या सर्व जहागिऱ्या, जमिनी व इतर सवलती जप्त करणे अगदी धर्म्य व उचित ठरेल. १९४२ च्या चळवळींबद्दल सरकारने जर हे धोरण स्वीकारले आहे, तर मागच्या चळवळींतल्या हरामखोरीबद्दलही असलेच धोरण पत्करणे जरूर आहे. निमकहरामी ही जरी काही दुष्टांना, फितुऱ्यांना, तात्पुरती फायदेशीर वाटली, तरी परिणामी, पुढच्या पिढ्यांनासुद्धां ती घातक ठरते, असे फितुरी लोकांना कळलेच पाहिजे.

८.१४ जुलुमाची प्रतिक्रिया प्रतिहिंसा ही अहिंसाच आहे

या सर्व सरकारच्या दडपशाहीची प्रतिक्रिया जुलमी इंग्रज अधिकाऱ्यांच्या खुनांच्या स्वरूपाने हिंदुस्थानांत व विलायतेतही दिसून यावयास लागली. सरकारच दडपशाही करते असे नव्हे. त्यांच्या विरुद्ध शीर हातावर घेऊन उठलेले आणि देशभक्तीने नखशिखांत मुसमुसणारे देशभक्तही सरकारी अधिकाऱ्यांना जमीनदोस्त करू शकतात, आणि प्रसंगी त्यांना कंठस्नानही घालतात, हे क्रांतिवीरही दाखवूं शकले. बंगाल, पंजाब, महाराष्ट्र, मद्रास प्रांतांनीं या बाबतीत स्पृहणीय कामगिरी करून दाखवली आहे. अर्थात् सरकारचे सामर्थ्य प्रचंड. त्यामुळे त्यांची दडपशाहीही विस्तृत प्रमाणावर होऊ शकली ही गोष्ट खरी. पण त्यांच्या विरुद्ध खवळून उठलेले देशभक्त थोडे असले, आणि त्यांचे सामर्थ्य थोडे असले, तरी जशाला तसा भेटतो, टोल्याला टोला बसतो, निधड्या छातीचे वीर अद्यापही भारतभू प्रसवूं शकते हे दाखवण्यापुरती चमक या प्रसंगी अभिनव भारताच्या वीरांनी विलायतेत व नाशकात दाखवली. कर्झन वायलीचा धिंग्रांनी विलायतेत एक बळी घेतला आणि कान्हेऱ्यांनी नाशकास ज्याक्सनला उडवला.

क्रांतिकारकांना जुलमी राज्यसत्तेविरुद्ध अल्पस्वल्प अशी जी, सत्ताधारी किंवा त्यांचे बगलबच्चे यांची, हिंसा करावी लागते ती, तत्त्वतः न्यायतः पाहीले तर, मूळ हिंसा नसून राज्यकर्त्यांनीं केलेल्या जुलमी व हिंसात्मक कृत्यांची प्रतिक्रिया - प्रतिहिंसा - किंवा अहिंसाच असते. खुनी माणसाला फाशी देणारी न्यायदेवता ही तरी, आरोपीच्या हिंसक कृत्याची प्रतिक्रिया म्हणूनच त्याला फाशी देण्यांत होणारी हिंसा ही न्याय्य मानते. नरराक्षसांशिवाय उगाच कोणी हिंसेस सहसा प्रवृत्त होत नाही. जुलूम, अन्याय, आत्मरक्षण यांसाठी, अगदी सर्व सामोपचाराचे उपाय संपल्यावरच, कोणीही सूज्ञ हिंसेस उद्युक्त होतो. पण ही हिंसाही प्रतिहिंसा असते, मूळ हिंसा नव्हे. मूळ हिंसा, खरी हिंसा, ही स्वार्थाने अंध आणि उन्मत्त झालेला पक्ष, यांच्या हातून प्रथम होते. देहदंड, मनोदंड, द्रव्यदंडापासून देहान्तापर्यंतच्या सर्व हिंसा या स्वार्थ किंवा पक्षांध झालेल्यांच्या हातून होतात. या सर्व हिंसा खऱ्या व मूळ हिंसा होत. आणि त्याच दोषार्ह आहेत. त्यांची प्रतिक्रिया म्हणून केलेली प्रतिहिंसा ही दोषार्ह कोणी मानीत नाही. न्यायतः होणारी प्रतिहिंसा ही जर सदोष असती तर सर्व दंडांची वा फाशीची शिक्षा देणे हेही अन्याय ठरले असते. त्या अधिकृत शिक्षांना कोणी सदोष मानीत नाहीत. इतकेच नव्हे, तर प्रतिहींसेला धर्मस्मृतीमध्ये मुद्दाम धर्म्य व न्याय्य असेच मानतात. तसेच आत्मरक्षणासाठी,

किंवा दुसऱ्याच्या रक्षणार्थ, केलेली प्रतिहिंसा ही सुद्धां धर्म्य व न्याय्य असेच सर्व देशांतले कायदे मानतात. ही न्यायधर्म्य प्रतिहिंसा या दृष्टीने अल्प हिंसा व म्हणून खरी अहिंसाच आहे. व्यवहार्य अहिंसा इतकीच.

हाच नियम क्रांतिकारकाच्या प्रतिहिंसेलाही लागूं असतो; नव्हे असला पाहिजे. क्रांति हीच मुळी जुलूम किंवा अन्याय यांची प्रतिक्रिया असते. कारणाशिवाय जसे कार्य नाही त्याप्रमाणेच जुलुमाशिवाय क्रांति नाही. जुलुमी राज्यकर्त्यांना हे समजत नाही असे नाही. पण त्यांची सत्तालोलुपता, स्वार्थ, हा त्यांना न्याय-अन्यायाची चाड बाळगूं देत नाही, आणि हा अन्याय, हा जुलूम सतत होत राहीला, त्या सत्तेखालीं राबणाऱ्यांच्या सहनशीलतेच्या मर्यादाही ओलांडू लागला, म्हणजेच त्याच्या विरुद्ध मग प्रतिक्रिया होऊ लागते. आणि सत्ताधाऱ्यांनीं केलेल्या हिंसेच्या विरुद्ध प्रतिहिंसा करणे हे, न्यायाची व सत्याची चाड बाळगणाऱ्या सद्गुणी नि:स्वार्थी नरवीरीचे, पुण्य अहिंसक कर्तव्यच होऊन बसते. आजपर्यंत इतिहासांत ज्या प्रतिहिंसा झालेल्या आहेत त्यांच्या मूलहेतूनुसार त्या सर्व अशाच न्याय्य आणि धर्म्य अहिंसाच आहेत. भगवद्गीतेतही श्रीकृष्णांनीं याच न्यायाला अनुसरून अर्जुनाला धर्म्ययुद्ध, धर्म्यहिंसा, करावयाला प्रवृत्त केले. प्रतिहिंसेला याप्रमाणे सर्व व्यवहार्य धर्मांत व न्यायालयांत अवश्य ते अहिंसेचे, मानाचे, व प्रतिष्ठेचे स्थान आहे.

तेच मानाचे स्थान क्रांतिकारकाच्या सद्धेतुमूलक केलेल्या अल्प-स्वल्प प्रतिहिंसेलाही मिळाले पाहिजे. सत्ताधिकाऱ्यांना धाक बसावा म्हणून त्यांच्या जुलुमाविरुद्धच क्रांतिकारक त्यांच्या जिवावर उठतात, आणि कोठें एखाद-दुसरें प्रतिहींसेचे कृत्य करतात. तसे अगदीं न्यायाच्या तराजूनेच मोजून पाहीले तर जुलमी सत्ताधिकाऱ्यांनीं केलेल्या हिंसेच्या मानाने प्रतिहिंसेचे पारडें जड भरतच नाही. त्यांच्या हिंसेच्या मानाने प्रतिहिंसेचे प्रमाण कमीच भरते. पण ती प्रतिहिंसा अवश्य असते, आणि म्हणूनच अहिंसा ठरते. म्हणूनच ऱ्यांडचा वध करणाऱ्या चाफेकरांना, कर्झन वायलीचा वध करणाऱ्या धिंग्रांना, आणि ज्याक्सनचा वध करणाऱ्या अनंता कान्हेऱ्यांना martyrs 'धर्मवीर' असे देशभक्तांनीं संबोधले आहे. धिंग्रांनीं आपल्या समर्थनांत याच विचारसरणीला अनुसरून पुढील वक्तव्य केले होते.

Terrories the officials, English and Indian, and the collapse of the whole machinery of oppression is not very far. The persistent execution of this policy, that has been so gloriously inaugurated by Khudiram Basu, Kanayalal Dutt and other martyrs, will soon cripple the British Govt. in India. This campaign of separate assassinations is the best conceivable method of paralyzing the bureaucracy and of arousing the people. The initial stage of the revolution is marked by the policy of separate assassinations.

BANDE MATARAM.

(सावरकरांनीं विलायतेत छापलेल्या एका पत्रकातील हा उतारा आहे.) - ''इंग्रज व हिंदी अधिकाऱ्यांना खुनांची जरब बसवा की, सर्व जुलमाचे यंत्र लौकरच कोलमडून पडेल. खुदिराम बसू, कनय्यालाल दत्त व इतर महाभागांनीं जे हे धोरण इतक्या यशस्वितेने तेजस्वितेने सुरू केले आहे, त्यामुळे हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्य लौकर खिळखिळे होईल. लोकांमध्ये जागृति उत्पन्न करण्यास, अधिकाऱ्यांस गर्भगळित करण्यास, निरनिराळ्या ठिकाणी अधिकाऱ्यांच्या

वधांची मोहीम सुरू करणे हीच सर्वोत्कृष्ट युक्ती आहे. राज्यक्रांत्यांच्या प्रारंभी असे विविध ठिकाणी वध झालेले आढळून येतात. वंदे मातरम् ।।'

८.१५ क्रांतिपूर्व प्रति हिंसेची आवश्यकता

हेच ऐतिहासिक क्रांतिपूर्व धोरण हिंदुस्थानांतही अनुसरले जावे अशी क्रांतिकारकाची इच्छा होती. दुसऱ्याही एका मुद्याने हे हिंसात्मक समर्थन होऊं शकते. ते असे. सशस्त्र क्रांतीची उठावणी करण्यापूर्वी प्रत्येक देशांत जनमताकर्षक असे काही ठळक भडक प्रसंग क्रांतिकारकांनी मधून मधून मुद्दाम घडवून आणले आहेत. जुलमी सरकारी अधिकाऱ्यांना चांगलीच जरब व दहशत बसावी, प्राणांची भीती वाटावी, आणि लोकांनाही क्रांतिकारकाचीं प्रचंड पण गुप्त कारस्थाने चालू आहेत हे सोदाहरण पटावें, म्हणून प्रत्येक परतंत्र देशाने, क्रांतीचा वणवा भडकवण्यापूर्वी, असली, दहशतवादाची काही कृत्ये मुद्दाम केलेली आढळतात. सरकारचे नैतिक धैर्य (morale) कमी व्हावें, आणि लोकाचे ते वाढावे, हा त्यांत एक उद्देश असतो. या कृत्यांबद्दल काही क्रांतिकारकांना फाशी दिल्याने जशी क्रांति थांबत नाही, तसेच या असल्या हल्ल्यांनी, किंवा जुलमी अधिकाऱ्यांच्या काही वधांनी, राज्यक्रांति पुरी होईल ही क्रांतिकारकांचीही अपेक्षा नसते. देशस्वातंत्र्याच्या कार्यांत जे बुद्धिमान लोक, आपल्या प्राणांचीच काय, पण सर्वस्वाचीही कदर न करतां, तनमनधनाने पडलेले असतात त्यांना या असल्या क्षणिक, तुरळक, दहशती चढाईच्या यत्नांनीं स्वातंत्र्य मिळणार नाही, हे कळण्याइतकी अक्कल खास असते. आणि तरीही ते ती उपर्युक्त हेतूकरतां करतात. ही असली हिंसक कृत्ये एखादे वेळी फसली तर त्याचा परिणाम कर्त्यांना तर भोगावा लागतोच, पण कधी कधी त्यांच्या संस्थांनाही घातक ठरतो, आणि इतरांनाही जाणवतो. ज्या सरकाराविरुद्ध असली हिंसात्मक खुनी किंवा विनाशक कृत्ये होतात ते पिसाळते, आणि सूडबुद्धीने कर्त्यांवर, त्यांच्या संस्थावर, व देशावर आणखी जुलूम करण्यास प्रवृत्त होते. क्रांतिकारकांच्या दृष्टीने ही इष्टापत्तीच असते. त्यामुळे लोकही अधिक चवताळतात. सुखासीन लोकाच्या दृष्टीने क्रांतिकारकांचीं ही कृत्यें अपघाती वाटतात; आणि हे लोकही, सरकारप्रमाणेच, पण जरा खालच्या सुरात, क्रांतिकारकांना शिव्या देतात, किंवा 'उच्छृंखल, माथेफिरू, देशघातकी' अशी नावे ठेवतात. सतीचे वाण घेतलेल्या देशभक्तांना हे सर्व समजून-उमजूनच सोसावे, करावे, लागते. तसे केले नाही, जुलमी अधिकाऱ्यांना त्यांच्या जुलमाचे प्रायश्चित्त म्हणून जर देहान्त शासन घडले नाही, तर 'क्रांतिकारक भागूबाई बनले, सरकारपुढे नमले, भ्यायले, पळाले' अशा वल्गना, शिव्याशाप, उच्चारावयालाही हेच लोक तयार असतात. सामान्य लोकांचे नैतिक धैर्य अशाने खचते, आणि असल्या नियोजित हिंसेने ते अगदीं उच्चतम बिंदूपर्यंत ठेवणे हे तर क्रांतिकारकांचे कर्तव्यच असते. कारण लोकाचे हे नैतिक धैर्यच प्रसंगोपात क्रांतिकारकाना उपकारक ठरते. १९४२ च्या 'चलेजाव'च्या आंदोलनांत काका कालेलकर व मश्रूवाला यांच्यासारख्या म. गांधींच्या भक्तांनीं हेच धोरण पत्करले होते. त्यामुळे गुप्तसंचारी, भूमिगत, देशभक्तांना लोकांच्या या नैतिक मनोधैर्यामुळेच मिहिनोमहीने गुप्त आश्रय मिळाला, आणि त्यांच्या सर्व सोयी पुरवल्या गेल्या. महाराष्ट्र, बंगाल, पंजाब, युक्त प्रांत, बिहार वगैरे प्रांतांतल्या माजी व आजी क्रांतिकारकांना - चंद्रशेखर आझाद, राजगुरू पिंगळे, जयप्रकाश नारायण, सुभाषचंद्र बोस, सरदार अजितसिंग, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअल्ली, साने गुरुजी वगैरे देशसेवकांना - या लोकांच्या गुप्त

सहानुभूतीवरच कित्येक महीने, वर्षेंही, जगतां आले, गुप्तपणाने देशत्याग करतां आला, तुरुंगांतूनही गुप्तपणाने सुटका करून घेतां आली! हजार रुपयांच्या बक्षिसांच्या सरकारी आमिषास लोक बळी पडेल नाहीत! ज्यांना ज्यांना गुप्त रीतीने देशभर फिरणाऱ्या या देशभक्तांचा ठावठिकाणा माहीत होता त्यांनी विश्वासघात व राजद्रोह केला नाही! हे कशाचे फळ आहे? लोकांच्या वाढत्या मनोधैर्याचेच हे फळ आहे. हे मनोधैर्य कशाने वाढेल? देशभक्तांच्या निरुपम त्यागाने! तुरुंगवास, फांस वगैरे शिक्षांची भीती न बाळगतां सरकारी जुलमाचा प्रतिकार केल्याने, हिंसक मार्गही पत्करून, आगगाड्या पाडून, सरकारी मालमत्तेची जाळपोळ करून, सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ले चढवून, क्रांतिकारकांनी हे मनोधैर्य कायम राखले, वाढवले, देशाला उपकारक केले. आणि त्याच प्रमाणांत उलट पक्षाचे, सरकारचे, मनोधैर्य बरबाद केले. या आताच्या, किंवा १९०५ ते २५ पर्यंतच्या, बंगाल व इतर प्रांतांतल्या क्रांतिकारकांनी हे सर्व जाणूनबुजून केले, ह्या कृत्यांचे झाले तर सुपरिणाम, नाहीतर तात्पुरते दुष्परिणाम होतील, हे या सर्व देशभक्तांना पूर्ण माहीत होते. पण काळच असा होता की, असली हिंसक प्राणघातकी विनाशक कृत्यें हे मनोधैर्य टिकवण्यासाठी करणे भागच होते.

असल्या कृत्यांत काही निरपराधी माणसे मरतात हे खरे. पण असे व्हावयाचेच. इतकी निरपराधी माणसांचीही किंमत क्रांतिसाठी दिलीच पाहिजे. देशासाठी व्यक्तिविषयक नुकसान हे होणारच. लढाईंत नाही का काही निरपराधी माणसे मरत? वाळल्याबरोबर काही ओलेही जळतेच. त्याला इलाज नाही. म्हणून इतकी स्वतःच्या प्राणांची, सर्वस्वाची, क्वचित् संस्थांची, क्वचित् निरपराध माणसांची, हानी झाली तरी परवडली. पण देशाचे लोकांचे मनोधैर्य, स्वातंत्र्यप्रेम, हे चढते, वाढते, उसळते ठेवलेच पाहिजे. सर्वच देशांतल्या सर्वच जाणत्या क्रांतिकारकानी हाच मार्ग चोखाळला आहे. त्यांत त्यांचे एतिहासिक सिद्धांतांचे, मानसशास्त्राचे, ग्यानच व्यक्त होते. सशस्त्र क्रांति करावयाची ठरवल्यावर मग क्रांतिपूर्व हे असले वधाचे प्रकार घडवून आणल्याशिवाय (''न निशिर्चतार्थाद्विरमन्ति धीराः') ह्या गंभीर वीर पुरुषांना विराम कुठला? एक पिढीच काय, पण कैक पिढ्यांचीं स्वातंत्र्ययुद्धें असल्या वीरीच्या या मनोवृत्तीनेच चालतात, आणि क्रांत्या यशस्वी होतात, असा इतिहासाचा निष्कर्ष आहे.

८.१६ अहिंसेचा व्यवहार प्रतिपक्षसापेक्ष असतो

प्रतिहिंसा म्हणजे व्यवहार्य अहिंसा होय हे जें वर म्हटले त्याला महात्मा गांधींनीं मुरड घातली असे सकृद्दर्शनीं वाटते. पण खुद्द महात्माजींनाही संपूर्ण अहिंसाव्रताचे पालन करणे पुष्कळ वेळां अशक्य झाल्याचे त्यांनी स्वतःच कबूल केले होते, हेही विसरतां कामा नये. त्यांतही ज्याच्याविरुद्ध अहिंसा काही अंशांनी यशस्वी झाली त्यांच्या संस्कृतीचाही विचार करणे अगत्याचे ठरते. दक्षिण आफ्रिकेतले जनरल स्मट्स्चे सरकार, किंवा इंग्लंडचे मजूर सरकार, हे संस्कृतीच्या काही तरी उच्च पातळीवरचे तत्त्वनिष्ठ, न्यायप्रिय, समाजाचे अग्रणी होते व आहेत. आणि त्यांच्या या सुसंस्कृततेलाच महात्माजींच्या अहिंसक आत्मक्लेशी चळवळीने द्रव आला, हे मुख्यतः ध्यानांत ठेवले पाहिजे. उलट, पिसाळलेल्या माकडांना ठार मारा, त्यांत हिंसा नाही, हेही महात्माजींनीच म्हटले आहे. आणि मनुष्यसमाजांतही पिसाळलेल्या लोकाविरुद्ध - उदाहरणार्थ पाकिस्तानांतले अत्याचारी - महात्माजींची अहिंसा निरुपयोगी ठरली, हेही आपणच

पाहिले आहे. 'अहिंसा परम धर्मः' हे तत्त्व उच्चतम आहे हे कबूल. पण त्याचा व्यवहार प्रतिपक्षसापेक्ष असतो. आणि म्हणूनच अहिंसा ही अंशतःच आणि तीही काही वेळां, आणि काही सुसंस्कृत प्रतिपक्षाविरुद्धच, उपयुक्त ठरते. हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांत महात्माजींचे अनुयायी असलेल्या मंत्र्यांनासुद्धां अहिंसा पाळणे अशक्य झाले होते. आणि कम्युनिष्टांसारख्यांच्या विध्वंसक चळवळीविरुद्धही अवश्य तितकी अल्प हिंसा करणे आज आपल्या स्वतंत्र भारतांतल्या अहिंसापती मंत्र्यांनाही करणे भागच पडत आहे. समाजसंरक्षणार्थ अवश्य तेथे, आणि अवश्य तितकीच, प्रतिहिंसा करणे, हे कोणत्याही सुसंस्कृत राज्यकर्त्यांना टाळता येत नाही. आणि प्रतिक्रियार्थ, सर्वसामोपचाराचे उपाय थकल्यावर, सशस्त्र युद्धापासून तो अल्पस्वल्प हिंसेपर्यंतचे सर्व प्रकार या 'धर्म्ययुद्धां'त येतात. लक्षावधी मनुष्यप्राण्यांची हिंसा ज्यांत होते असे युद्ध हे सुद्धां जर 'धर्म्य'युद्ध ठरते तर समाजरक्षणार्थ, अवश्य तेव्हा व अवश्य तितकी हिंसा, अहींसेचे सर्व मार्ग निरुपयोगी ठरल्यावर, करणे ही प्रतिहिंसा म्हणजे अहिंसाच होय.

राज्यकर्त्यांना तर काही प्रसंगी, अन्यायी प्रतिपक्षाकडून हिंसात्मक समाजघातक कृत्यें होण्यापूर्वी केवळ त्यांच्या हेतूसाठीच, प्रतिहिंसा म्हणजे अटक करणे अगत्याचे असते. प्रतिपक्षी हिंसा करील तेव्हा तर प्रतिहिंसा अवश्यच असते. पण त्याची हिंसा टाळण्यासाठी त्याला बंदिवासांत टाकणे ही हिंसा असली तरीही ती अपरिहार्यच असते. आणि ह्यांत त्याला दहशत दरारा बसवणे हाच हेतू असतो. राज्यरक्षणार्थ एवढाले प्रचंड खर्च करून मोठमोठालीं सैन्यें ठेवणे हे जसे प्रतिपक्षाला ठेचण्याचे, तसेच त्याला दरारा बसवण्याचेही, साधन असते. आणि आम्ही महात्माजींचे अनुयायी असलों तरी सैन्य ठेवीतच आहोंत. अहिंसेचेच रक्षण त्यामुळे होत आहे, असो. हा हिंसा-अहींसेचा वाद सोडून आपण मूळ विषयाकडे वळूं.

८.१७ मदनलाल धिंग्रा

या निष्कर्षाप्रमाणे इंग्रजी अमलांतल्या जुलुमांमुळे जी मने अगोदरच पेटलीं होती ती बाबांना झालेल्या राक्षसी शिक्षेच्या निमित्तामुळे अधिकच भडकली. औरंगाबादेस हुतात्मा कान्हेरे हाही त्यामुळेच तळमळत होता. आणि त्याची व गणू वैद्याची जेव्हा प्रथम भेट झाली तेव्हा तुम्ही बाबांच्या अमानुष शिक्षेबद्दल अधिकाऱ्यांचा वध करून सूड का घेत नाही म्हणून त्याने गणूस विचारलेही होते. आणि कोणी वध करण्यास तयार नसतील तर मी स्वतः त्या अधिकाऱ्याचा खून करण्यास तयार आहे, असे त्याने तेव्हास गणूस सांगितलेही होते. अशीच सूडाची मनोवृत्ती, पृथ्वीच्या दुसऱ्या टोंकाकडे, ६००० मैलांवर विलायतेत असलेल्या हुतात्मा मदनलाल धिंग्रा याला चैन पडूं देत नव्हती. त्याने बाबांसुद्धां हिंदी देशभक्तांवर झालेल्या या अघोर अन्यायाबद्दल सूड उगवण्याचे ठरवले, आणि तात्या सावरकरांजवळ ती गोष्ट काढली. करंदीकरांच्या 'सावरकर-चरित्रांत' (पृ. २५३-३००) या धिंग्रा-प्रकरणाचा विस्तारशः उल्लेख आला आहे. वाचकांना तेथे तो पूर्ण साद्यंत वाचावयास मिळेल. म्हणून येथे त्याचे विस्तृत वर्णन मी करीत नाही. पण पृथ्वीच्या दोन टोंकावर असलेल्या या दोन देशभक्तांच्या, हुतात्म्यांच्या, अंतःकरणांत सूडाची एकच वीरवृत्ती कसे थैमान घालीत होती, हे दृश्य पाहणे खरोखरच हृदयंगम व रोमांचकारी आहे. या दोघांनीं जे इंग्रज अधिकाऱ्यांचे वध केले त्यांतले

साम्य पुढे ज्याक्सन-प्रकरणी येईलच. पण धिंग्राचे अंत:करण कसे जवळ होते हे त्याने खिशांत ठेवलेल्या, पण कोर्टाने दडवलेल्या, त्यांच्या वक्तव्यावरून कळून येते. पोलीस व इतर अधिकाऱ्यांनी जरी ते दडवले, तरी सावरकरांनी ते साऱ्या जगांतल्या मुख्य मुख्य वृत्तपत्रांतून, धिंग्रा फाशी जाण्यापूर्वी, प्रसिद्ध केले. हुतात्मा कान्हेऱ्यांच्या खिशांतले वक्तव्य 'खुनास खून' असे होते. तेही 'न्यायालय' म्हणून मिरविणाऱ्या हायकोर्टांत आले नाही. पण या दोघां हुतात्म्यांच्या विचारसरणींत वृत्ती प्रमाणेच साम्य असणार. धिंग्रांनी आपल्या वक्तव्यांत म्हटले होते की, 'परवा एका इंग्रजाचे (सर वुइल्यम् कर्झन वायलीचे) रक्त सांडण्याचा मी प्रयत्न केला ही गोष्ट मला मान्य आहे. देशाभिमानी हींदी तरुणांना निर्दयपणे फांसावर लटकविण्यांत आले, व निर्वासित करण्यात आले, याबद्दलचा अल्पसा सूड म्हणून मी हे कृत्य केले... परकी शस्त्रास्त्रांच्या साहाय्याने दास्यांत जखडून टाकलेले राष्ट्र हे निरंतरच युद्ध्यमान राष्ट्र असते. नि:शस्त्र जातीला उघड उघड रणांगणांत उतरून सामना देणे अशक्य होत असल्यामुळे, मी दबा धरून हल्ला चढवला. मला तोफा वापरू देण्यांत आल्या नाहीत म्हणून मी माझें पिस्तुल काढले व झाडले... हिंदु म्हणून माझी अशी भावना आहे की, माझ्या देशाचा अपमान हा परमेश्वराचाच अपमान होय. ज्याची प्रकृति धडधाकट नाही, आणि ज्याची बुद्धिही सामान्यच आहे, अशा मजसारख्या भारतपुत्राजवळ मायदेशाप्रीत्यर्थ देतां येईल असे काही असलेच तर ते स्वत:चे रक्तच होय. ते रक्त मी मातृभूमीच्या वेदीवर अर्पिले आहे,' इत्यादी. धिंग्राला पुढें फाशीची शिक्षा झाली; आणि १७-८-१९०९ रोजी हा हुतात्मा, अभिनव भारताचा एक देदीप्यमान हिरा, शांत चित्ताने फांसावर चढला!

धिंग्राच्या या रोमहर्षक प्रकरणानंतर आपण अखेरच्या ज्याक्सनच्या वधाकडे वळू. या ज्याक्सन-वधाने अभिनव भारताचा अंतच झाला असल्याने ते प्रकरण किंचित् विस्ताराने देत आहे!

९ ज्याक्सन-वध

धिंग्राने ज्याप्रमाणे इंग्लंडमध्ये कर्झन वायलीचा वध केला त्याप्रमाणे, ६000 मैलांवर इकडे नाशकास, अनंत लक्ष्मण कान्हेरे याने ज्याक्सन कलेक्टरचा वध केला. त्याची हकीकत थोडक्यांत देण्यापूर्वी एक गोष्ट प्रामुख्याने सांगितली पाहिजे. आणि ती म्हणजे या (स्पेशल ट्रायब्यूनल) विशिष्ट न्यायासनासमोर चाललेल्या ज्याक्सन-वधाच्या खटल्यांत बऱ्यांच सुशिक्षित आरोपी देशभक्तांनी जी माहिती, पोलिसांच्या भयंकर छळामुळे, सांगितली ती सर्वस्वी खरी व पूर्ण नाही. सर्व आरोपी शिकलेले असल्याने, त्यांनी आपल्या साथीदारीस शक्य तितका बचावण्याचा यत्न केला; आणि प्रसंगापुरतीच, अवश्य तेवढीच, आणि कित्येक वेळां तीही मुरड घालून ठरवलेली, हकिकत कबुलिजबाबांत सांगितली. त्यामुळे आम्ही गमावलेल्यापेक्षां वांचवलेच पुष्कळ. आरोपींनींच हे केले असे नाही, तर ''सरकारतर्फेचे साक्षीदार आणि माफी दिलेले साक्षीदार (approvers) यांनीही सर्व अंत:करण खुले करून सांगितले नाही,' असे खुद्द स्पेशल ट्रायब्यूनलचे न्यायाधीशच आपल्या निकालपत्रकात म्हणतात; आणि तेच बरोबर आहे. बॉम्ब-प्रकरणांत आम्ही, इन्स्पेक्टर सदावर्ते यांना विश्वासांत घेऊन, ते सबंध बॉम्ब-प्रकरण कसे दडवून ठेवले, यांची हकीकत दिलीच आहे. तशाच अनेक कारवाया, हिकमती, जरी आमच्याइतक्या मोठ्या प्रमाणावर, या वधाच्या निराळ्या खटल्यांत इतरांनी केल्या नाहीत, तरी शक्य तेवढे आपले, व आपल्या कटांतल्या साथीदारांचे, नुकसान होऊ नये म्हणून सर्वांनीच मनोभावे प्रयत्न केले. म्हणून खुद्द न्यायदरबारात ज्या ज्या गोष्टी उघडकीस आल्या त्या सर्वस्वी विश्वसनीय व खऱ्या आहेत असा कोणीही गैरसमज करून घेऊ नये.

पण याबरोबरच खरी हकीकत मिळवण्याच्या बाबतीत बरेचसे देशभक्त दिवंगत झाले ही दुसरी अडचण उपस्थित झाली आहे. या कटातील मुख्य ३ देशभक्त - अनंतराव कान्हेरे, कृष्णराव कर्वे आणि विनायकराव देशपांडे - हे ज्याक्सन-वधासाठी फाशी गेले. जन्मठेप शिक्षा झालेल्या आरोपितांपैकी शंकर रामचंदर सोमण येरवड्यासच ११ डिसेबर १९११ मध्ये वारले. ज्याक्सन-वधाबद्दल जन्मठेप शिक्षा झाल्यावर, सुटण्याच्या आशाने, पुढे आमच्याविरुद्ध माफीचा साक्षीदार झालेला गणू वैद्य हाही मरून गेला. आणि माझ्या दुर्दैवाची कहाणी अशी की, पुढे पश्चात्ताप होऊन, केवळ लो. टिळकांविरुद्ध चिरोल-केसमध्ये याने चिरोलला अनुकूल साक्ष दिली नाही, या एकुलत्या एकच सत्कार्यासाठी, आमच्या घरादारावरून नांगर फिरवणारा हा सरकारी साक्षीदार जो मला चिकटला तो शेवटी, प्लेगने तडकाफडकी पुण्यास मेल्यावर, गावात त्याला उचलावयाला पुरेशी माणसे नव्हती म्हणून, माझ्याच खांद्यावर गेला!! माझ्या आणि टिळकांच्या दैवाच्या या गफलतीत गणू मात्र असा माझ्यावर मात करून गेला ही गोष्ट खरी! असो. त्या ज्याक्सन-वधाच्या मुख्य आरोपितांपैकी फक्त वामनराव नारायण जोशी एवढेच शिल्लक आहेत. त्यांना मी त्याचवेळची सर्व हकीकत कळवा म्हणून पत्रे लिहिली. पण अद्याप त्यांच्याकडून मला काहीच समजले नाही. त्यामुळे मला जी माहिती मिळाली त्यावरूनच मी थोडक्यांत त्या घडामोडींची माहिती येथे देत आहे.

९.१ कर्व्यांची गुप्त शाखा

अभिनव भारताच्या मुख्य शाखेपासून कृष्णाजी गोपाळ कर्वे हे मतभेदामुळे फुटून निघाल्यावर त्यांनी आपली एक स्वतंत्र गुप्त संस्था काढली. प्रथमतः ते 'मित्र-समाज' या संस्थेचे सभासद होते. हा 'मित्र-समाज' ही तत्कालीन हायस्कुलांतील २०० विद्यार्थ्यांची अभिनव भारताची एक शाखा होती. कर्वे उच्च शिक्षणासाठी मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजांत गेले होते. हे अतिशय हुशार, उत्साही, धाडसी, त्यागी व कळकळीचे कार्यकर्ते होते. त्यांचे सहकारी रा. गोपाळराव धारप लिहीतात की, ''विद्यार्थी असतांना त्यांनी नाशिकच्या ग्रंथालयांतील इतिहास व राजकारणावरचीं सर्व पुस्तकें वाचून काढली होती. शिवाय मित्र-समाजाचे त्यांचे सहकारी जे दांडपट्टा, नेमबाजी, तरवारीचे हात वगैरे शिक्षण नाशकास डोंगरउताऱ्यावर घेत होते त्यांत त्यांनीही हे शारीरिक व लष्करी बाण्याचे शिक्षण घेतले होते.' ''राज्यक्रांतीचे काम गुप्तपणे झाले पाहिजे... आणि अशा गुप्त कार्याशी सार्वजनिक प्रसिद्ध झालेल्या लोकांचा कोणत्याही प्रकारे काहीही संबंध ठेवावयाचा नाही, ही त्यांच्या गुप्त संघटनेची पहीली अट होती.' कर्व्यांच्या या संस्थेंत रा. विनायकराव नारायण देशपांडे, वामन नारायण जोशी, शंकर रामचंद्र सोमण, हे प्रारंभी सभासद होते. त्यानंतर आमच्या अभिनव भारतापैकी दामोदर महादेव चंदात्रे, गायधनी, व विष्णु गणेश केळकरशास्त्री हेही त्यांत ओढले. शंकरराव सोमणांनीं गोपाळराव धारपांना त्या संस्थेच्या दुसऱ्या गटांत शपथबद्ध करून घेतले. आणि धारपांनीं नंतर गणू वैद्य, पुरुषोत्तम लक्ष्मण दांडेकर, सदाशिव श्रीधर दांडेकर, रामचंद्र आबाजी काथे, रघुनाथ चिंतामण अंबेडकर, विनायक वासुदेव मनोहर, बा. ज. मराठे, ना. कृ. जोशी यांची एक गुप्त संस्था स्थापन केली. सर्वांचे उद्देश अभिनव भारताप्रमाणेच होते. पण या धारप गटापैकी गणू वैद्य व कर्वे गटांत फार खोल शिरला; आणि शस्त्रास्त्रें, पैसे वगैरेचा पुढे कोठीवालाही तोच होता. कर्व्यांच्या या गटांनीं आमच्याकडून व इतरांकडून पिस्तुले जमवली होती, व नेमबाजीचे शिक्षणही ते घेत. बॉम्बची कृतीही त्यांपैकी काही शिकले होते हे मागे आलेच आहे. या गुप्त संस्थांतून साप्ताहीक बैठकी किंवा वादविवाद, विवेचन, पठण, अभ्यास वगैरे काही होत नसे. त्यामुळे अडीअडचणींतून कसे पार पडावें, इतर देशांचे क्रांतिकारक त्या प्रसंगी कसे वागत, या ज्ञानाच्या, बुद्धीच्या, संस्कारात ही मंडळीं अगदी कोरी करकरीत व नवखीं होती. आणि ही या गटांनीं मनाच्या बुद्धीच्या तयारीची, ज्ञानाची, केलेली हेळसांड हीच त्यांना, व त्यांच्यामुळे शेकडो लोकाना, फार भोंवली. त्याबद्दलचे विवेचन पुढे ओघाने येईलच. असो.

९.२ अनंतराव कान्हेरे अभिनव भारताचे सभासद

आमच्या अभिनव भारतापैकी येवल्याचे माजी सावकार व वतनदार देशमुख, विनायक सदाशिव बर्वे, यांना मी शपथ दिली होती. त्यांनी येवल्यास जी शाखा काढली तिच्यांत काशिनाथ दाजी टोणपे हे एक होते. त्यांपैकी बर्वे व टोणपे यांचा सराफीचा व्यवहार असे. या व्यवहारात औरंगाबादचा गंगाराम रूपचंद्र याचे काही देणेघेणे टोणप्यांकडे असे, आणि त्यामुळे तो व त्याच्याबरोबर एकदां अनंत कान्हेरे हाही येवल्यास आला होता. येवल्यास टोणप्यांनीं अनंतरावाला व गंगारामाला अभिनव भारताचे शपथबद्ध सभासद करून घेतले. बर्वे हे गणूंचे वडील बंधु शंकरराव वैद्य यांचे मेहुणे. म्हणून धारप गटापैकी अंबेडकराने हत्यारांसाठी चोरलेली

एक सरी शंकररावांनी, नाशकास संशय येऊं नये म्हणून, येवल्यास आणून विकली. गणू वैद्यही येवल्यास या नात्यामुळे आला होता; आणि येवल्याहून औरंगाबादेस गंगारामकडे, धारपांचे पत्र घेऊन, शस्त्रास्त्रें विकत मिळतात का हे पाहण्यास गेला. तेथे शस्त्रास्त्रांच्या ऐवजी अनंता कान्हेरे याची व त्याची ओळख गंगाराममार्फत झाली. अनंता गंगारामाच्याच घरीं राहत असे. त्यांची अत्यंत दाट मैत्री होती. गजूला अनंताने टोमणा मारला की, 'नाशिकला येवढा जुलूम चालला असता तुम्ही गुप्त संस्थेचे शस्त्रधारी लोक अधिकाऱ्यांचे वध करून त्याचा सूड, वचपा, का घेत नाही?' 'आमचे लोक तयार नाहीतं.' अशी गजूने कबुली दिली. अनंता म्हणाला, 'तुम्ही तयार नसल्यास मी त्यांचा वध करण्यास तयार आहे.' औरंगाबादेसही असेच एक गुप्त संस्थेचे जाळे गोपाळराव धारपांनी विणले होते. त्यांतच अनंताचे सहाध्यायी व स्नेही काशिनाथ हरी अंकुशकर व दत्तात्रय पांडुरंग जोशी आणि इतर सभासद होते.

९.३ अनंताची वधाची तयारी व गणूची भंबेरी

गणूने ही अनंताची वध करण्याची इच्छा व सिद्धता कर्व्यांच्या गटापैकी देशपांडे, सोमण व जोशी यांना कळवली. कर्वे तेव्हा तेथे नव्हते. या तिघांनी अनंताला नाशकास बोलावून त्याला छेडण्याचे ठरवले. अनंता आल्यावर त्याने आपली तयारी दर्शवली, आणि जोशांच्या बरोबर ज्याक्सनच्या कचेरींत जाऊन, त्याचा चेहरा ध्यानांत ठेवून, कोठून त्याला मारतां येईल हेही पाहून ठेवले. पण 'जोंवरी न पाहीले पंचानना । तोंवरी जंबुक करी गर्जना' अशी गणूची स्थिती येथपासूनच होऊं लागली. त्याला हे वधाचे कृत्य नकोच होते. तो स्वभावतःच भेकड होता. त्याने अनंताला स्वच्छच सांगितले की, तूं या वधाच्या भानगडींत पडूं नको. कारण यांत जर मी सांपडलो, आणि पोलिसांनीं मला (गणूला स्वतःला) मारले तर मी सर्व सांगून देईन' (अनंतराव कान्हेऱ्याचा अखेरचा जबाब). या भेकड वृत्ती मुळे, हा वधाचा बेत टाळण्यासाठी त्याने अनंताला २-३ अटी या लोकांच्यापुढे मांड असे बजावले. त्या म्हणजे, ''२ पिस्तुले मला हवींत व नेमबाजीचे शिक्षण दिले पाहिजे, आणि कोणी तरी तुमच्यापैकी जोडीदार पाहिजे.'' गणूची अशी कल्पना होती की, यांपैकी कोणीही जोडीदार अनंताला मिळणार नाही आणि हा बेत फिसकटेल. आणि या अटींचीं मात्रा बरोबर लागूं पडली. त्यानंतर बऱ्याच वाटाघाटी झाल्या, आणि 'हा बेत शेवटी त्या गटाचे प्रमुख अण्णा ऊर्फ कृष्णराव कर्वे यांच्या संमतीशिवाय पार पाडावयाचा नाही,' असा कोलदांडा गणूने घातला. येथपर्यंत कर्व्यांना यांपैकी काहीच माहीत नव्हते, आणि त्यांना न कळतच उतावळेपणाने या सर्व कारवाया होत होत्या. शेवटी मुद्दाम कर्व्यांना मुंबईहून बोलावून आणले, आणि त्यांच्यापुढे ही सर्व हकीकत मांडली, तेव्हा कर्व्यांनीं ''तुम्ही जर कोणी अनंताला जोडीदार होत नाही तर त्याचा जीव का धोक्यांत घालतां ?'' असे या आपल्या साथीदारीना शरमावून तो वधाचा बेत तात्पुरता मोडून काढला. गणूला आपण जिंकली याचा आनंद झाला व त्याचा जीव भांड्यांत पडला, आणि अनंता परत औरंगाबादेस गेला. जाण्यापूर्वी त्याची कर्व्यांच्यावर फार श्रद्धा जडली होती, आणि मरणापूर्वी आपले फोटो असावेत म्हणून त्याने तेही काढून घेतले होते.

९.४ अनंतरावांची तळमळ

पण गणूच्या नादीं लागून आपण आपल्या ध्येयापासून च्युत झालो असे अनंताला वाटूं लागले. त्याला चैन पडेना. मदनलाल धिंग्रा हा त्याचा आदर्श वीर होता. तेव्हा काही तरी धिंग्रासारखें अलौकिक, इंग्रजाच्या वधाचे कार्य केले म्हणजे आपण कृतकृत्य होऊं अशी त्याची कल्पना होती. त्यामुळे त्याने रा. वामनराव जोशांना कळवले की, ''जोडीदारावांचून मी एकटाच वध करण्यास तयार आहे.'' हे पत्र मिळतांच या त्रयीने पुन्हा, पण या खेपेस भेकड गणूला न कळूं देतां, या वधाचा व्यूह रचला. या वेळेस मात्र कर्वे तेथे नाशकासच होते; आणि त्यांच्या संमतीनेच देशपांडे हे अनंतास आणण्यास औरंगाबादेस गेले आणि अनंता २१ डिसेबर १९०९ ला संध्याकाळींच नाशकास आला.

इकडे गणूच्या मनोराज्यांत जे बेत चालले होते त्यांपैकी एक म्हणजे या औरंगाबादच्या साथीदारांना पेणच्या बॉम्ब कारखान्यांत पिक्रिक ॲसिड तयार करण्याचे शिकवावे हा. त्यासाठी त्याने अंकुशकरला ''एकदा केव्हां तरी नाशकास ये म्हणजे तुला पैसे देऊन तेथे रवाना करीन,'' असे निमंत्रण देऊन ठेवले होते. अनेक कारणांने अंकुशकर अगोदर जाऊं शकला नव्हता. अनंता आपल्या भावी ध्येयसिद्धीच्या नादांत गर्क होता. त्याने आपला हा वधाचा बेत या अंकुशकर व द. पां. जोशी या मित्रांना अगाऊ सांगूनही टाकला होता! देशपांडे जेव्हा त्याला न्यावयास आले तेव्हा हे दोघे स्नेहीही त्याच्याच बरोबर यावयास निघाले. अनंता इतक्यांतच वध करील अशी मात्र या दोघांचीही कल्पना नव्हती. जोशी हा किर्लोस्कर कंपनीची नाटके पाहण्यास, आणि अंकुशकर ती पाहून तेथून पेणला जाण्यास म्हणून आले होते, असे दिसते. या दोघांनी नाशिक पाहिले नसल्याने, ते येणार हे गणूला अगाऊ कळविल्याने, त्यांना नेण्यास गणू स्टेशनवर गेला होता. पण अनंताला गणूंस टाळावयाचे होते. म्हणून अनंता दूर मागे गाडींत बसला होता; आणि स्टेशनवरून गणू, जोशी व अंकुशकर निघून गेल्यावरच अनंता नाशकास आला.

९.५ कर्व्यांची वधाची योजनां

अनंतास द्यावयास दोन ब्राउनिंगचीं भरलेलीं पिस्तुले कर्व्यांनीं गणूकडून मागवली; पण मुंबईस पाठवण्याच्या उद्देशाने ती मागवली आहेत, असे गणूस भासवले. तसेच अनंताबरोबर आपणच सशस्त्र जोडीदार राहावयाचे असेही त्यांनी, पण अनंताला न कळवतां योजले होते. आणि तेवढ्यासाठी सोमणांना संध्याकाळी गणूकडे पाठवून तिसरेंही पिस्तुल त्यांनी गणूकडून, पण गणूला खुनाच्या बेताचा कसलाही सुगावा लागूं न देतां, आणवले. वध झाल्यावर मन डळमळूं लागले तर, आत्महत्या करण्यासाठी म्हणून, अनंताजवळ कर्व्यांनीं सोमलाची पुडीही सोमणांच्या मार्फत दिली होती. तसेच जरूर तर दुसऱ्या पिस्तुलाने त्यानेही आत्महत्या करावी, असे अनंताला देशपाड्यांच्या मार्फत सांगून ठेवले होते. ''वध का केला'' हे, - अनंता लहान असल्याने - सोळाच वर्षांचा तो होता - त्याला नीट कोर्टापुढे किंवा म्याजिस्ट्रेटपुढे सांगतां येणार नाही, म्हणून 'खुनास खून' या मथळ्याचे एक पत्रकही अनंतास कर्व्यांनीं लिहून पाठवले होते. ही सर्व योजना अत्यंत दूरदृष्टीने व पूर्ण निर्दोष अशी रचली होती. आणि ती त्यांनी इतकी कसोशीने पाळली होती की, कर्वे यांत आहेत हे अनंतालाही, तो नाटकगृहांत वध

करण्यास जाईपर्यंत, कळले नव्हते. ते त्याच्या दृष्टीसही तोंवर पडले नव्हते. शिवाय आपले खरे नाव-गांव न सांगतां पुरभय्याचे, रामप्रसाद तिवारीसारखें, खोटे नाव व यू.पी. मधले काशीसारखें गांवाचे नाव सांग अशीही सक्त ताकीद दिली होती.

दहशतवादाच्या तत्त्वाप्रमाणे कोणत्या इंग्रजी अधिकाऱ्याचा वध करावा याबद्दल कर्व्यांनीं, ज. डावरच्या वधाचा यत्न फसल्यावर ज्याक्सनच वधार्ह ठरवला. स्वतः ज्याक्सन हा मोठा संस्कृतज्ज्ञ व विद्वान होता आणि स्वभावानेही नरम होता. तो ज्या राज्यपद्धतीच्या चौकटींत होता ती पद्धतच अशी होती की, स्वतःची इच्छा नसली तरी, वरच्या हुकुमाप्रमाणे त्याला काम करणे भागच होते. पण मनाने तो बरा होता. दारूबंदीसारख्या निष्पाप चळवळीला तो अनुकूलही होता; आणि तेवढ्यासाठी त्याला सरकारकडून तंबीही मिळाली होती. पण सरकारी धोरणाप्रमाणे त्यालाच काय पण प्रत्येक जिल्ह्यांतल्या इंग्रज व देशी अधिकाऱ्यांना वागणे भाग होते. नाशकास इंग्रजांविरुद्ध अभिनव भारताने प्रचंड क्रांतिकारक चळवळ चालविली होती. बंगालमध्ये १९०८ मध्ये, बॉम्बचा उपयोग करून, इंग्रज अधिकाऱ्यांच्या वधांचे प्रयत्न होऊ लागल्याने, महाराष्ट्रात इंग्रज सरकारने ही राजद्रोही चळवळ ठेचून टाकण्याचे ठरविले; आणि त्याप्रमाणे टिळक, परांजपे, सावरकर वगैरे राजद्रोही मंडळीस तुरुंगांतही कोंडले. या वरिष्ठ सरकारच्या धोरणाचा ज्याक्सन हा बंदा गुलाम होता. त्या धोरणाप्रमाणे त्याने सभाबंदीचे हुकूम, बाबा सावरकरांना पकडणे व त्यांच्यावर खटला भरणे, आणि बाबासाहेब खरे वकिलांचा जामीन घेणे व मोकास जप्त करणे, ही जुलमी कृत्ये केली होती. एका गाडिवानाला जिवे मारल्याबद्दल व्युइल्यम् या इंजिनिअरला त्याने, पुराव्याच्या अभावी, अजिबात सोडून दिले होते. हे त्याचे वर्तन पक्षपातीपणाचे दिसल्यासारखे खासच होते. पण या बाबतीत तो वरिष्ट सरकारची आज्ञाच मानीत होता. आणि त्याच्या या कृत्याकडे या दृष्टीने पाहीले तर तो विशेष जुलमी होता असे लोकही मानीत नसत. पण कर्वे गटाची समजूत, वरील कारणांमुळे, निराळी झाली होती आणि म्हणून त्यांनी तोच वधार्ह ठरवला. या बाबतीत नंतर अनंताचा व त्यांचा मतभेद झाला, असे अनंताच्या उद्गारांवरून म्हणावें लागते. ‘एका चांगल्या माणसास मारले याबद्दल मला वाईट वाटते’, असे खुद्द अनंतानेच आपल्या शेवटच्या १-२-१० च्या जबाबांत म्हटले आहे. पण कर्व्यांची विद्वत्ता व न्यायबुद्धी यांवर त्याचा पूर्ण भरवंसा होता व म्हणूनच तो ज्याक्सनला मारण्यास कबूल झाला. आणि त्याने २१-१२-१९०९ या दिवशी, एका पानसुपारीच्या समारंभाच्या वेळी, विजयानंद नाटकगृहांत, ज्याक्सनसाहेबासाठी मुद्दाम ठरवलेले ‘शारदा’ नाटक पाहण्यास ते आले असतां दाराशीच गोळ्या घालून त्याचा वध केला. आम्हां अभिनव भारताच्या सदस्यांना, किंवा कर्व्यांशी संलग्न असलेल्या मुंबई-पुण्याच्या त्यांच्या सभासदांना, हे माहितही नव्हते.

९.६ धिंग्रा व कान्हेरे यांच्यांतले साम्य

अनंता कान्हेरे व मदनलाल धिंग्रा या एकमेकापासून ६००० मैल दूर असलेल्या व परिचितही नसलेल्या, पण देशस्वातंत्र्याबद्दल रात्रंदिवस तळमळणाऱ्या देशभक्त व त्यागमूर्तींच्या या बाबतीतल्या मनोवृत्तीबद्दल विलक्षण आश्चर्यजनक साम्य दिसून येते. त्यांच्या सूडबुद्धीबद्दलचे साधर्म्य वर सांगितलेच आहे. दोघेही सर्वस्वाची चिता पेटवून तिच्यावर आरूढ होण्यास

विचारपूर्वक तयार झाले होते. दोघांनींही आपल्या राजकीय गुरुजानांची संमति घेतली होती. दोघांनीही आपल्या मनोधैर्याची व सहनशक्तीची सारखीच परीक्षा दिली होती. विस्तवावर ३०० अंशावर उकळत असलेल्या ऍसिडाच्या काचेच्या बरणीची मान धरून, तिने हात होरपळून भाजून रक्ताळत होते तरी ती उतरून, मदनलालने, हूं की चूं न करतां, सावरकरांचा प्राण वाचवला होता. अनंतानेही अगदीं अशीच पेटलेल्या दिव्याची चिमणी हातांत धरून, हात पोळत भाजत होते तरी, न कुरकुरतां आपल्या मनोधैर्याची परीक्षा दिली होती. वधाच्या अगोदर दोघांनीही आपले लक्ष्य नीट हेरून एकदां त्यावर हल्ला करण्याचा मनसुबाही रचला होता. प्रयत्न शंभर नंबरी यशस्वी व्हावा म्हणून दोघांनीही पिस्तुलांची प्रॅक्टिस करून आपली नेमबाजी अचूक ठरवून घेतली होती. मदनलालजीनीं आपला प्रयत्न हुकला तर तो पार पाडण्याकरितां बॅ. ग्यानचंद वर्मा व इंजिनिअर कोरगांवकर यांना सशस्त्र तयार ठेवले होते. तसेच अनंताच्या साहाय्यासही कृष्णाजी गोपाळ कर्वे व विनायक नारायण देशपांडे हे सशस्त्र हजर होते. दोघांनींही जरूर पडल्यास आत्महत्येची तयारी करून ठेवली होती. दोघांच्या जबान्याही ठरलेल्या होत्या आणि दोघांनींही - एकाने जुलैंत व दुसऱ्याने डिसेबरीत (१९०९) - आपापले बळी बिनचूक घेतले.

९.७ हत्यारांचे विषम कायदे

कर्झन वायलीला मारण्याचा कट जसा फार विचारपूर्वक रचण्यांत आला होता तसा मात्र येथे नव्हता. विलायतेतल्या कटांत सावरकरांचे अंग होते हे धिंग्राने कोर्टापुढे जे वक्तव्य प्रसिद्ध करण्याचे म्हणून योजले होते ते (challenge) खुद्द सावरकरीनीं लिहून दिले होते, या एकाच गोष्टीवरून ठरते. आणि इंग्रज सरकारने जेव्हा ते कोर्टापुढेही येऊ न देण्याचे कारस्थान केले तेव्हा त्याची जी एक प्रत सावरकरांपाशी होती तिला बॅ. ग्यानचंद वर्मांमार्फत सर्व जगभर प्रसिद्धि देण्याचे प्रतिकारस्थान सावरकरांनीच केले. ही गोष्टही सावरकरांच्या पूर्ण सल्ल्यानेच हा वध ठरला गेला होता हे सिद्ध करते. पण धिंग्राने या खुनाशी स्वत:शिवाय दुसऱ्या कोणाचाही संबंध नाही असे सांगून आपल्या सहकाऱ्यांस पूर्णपणे सुरक्षित ठेवले. अनंताने जरी स्वतः तोच कित्ता गिरविला तरी त्याच्याबरोबर आलेल्या २ मुलांनीं, समयसूचकतेच्या अभावी, सर्व सहकाऱ्यांचा सर्वस्वी घात केला. विलायतेत पिस्तुले सहज मिळत होती, म्हणून धिंग्रांनी ती राजरोस विकत घेतली होती. नेमबाजीही प्रसिद्ध शाळेत ते शिकले. ते या गोष्टी उघडपणे तेथे करू शकले. त्यामुळे पोलिसांना हत्यारांच्या बाबतीत काही करतां येत नव्हते. राजकीय कारणासाठी खून मी केला हेही त्यांनी अगाऊच मान्य केले होते. त्याबद्दलची सर्व जबाबदारी माझी आहे, इतर कोणीही यांत सहकारी नाहीत, हेही त्यांनी सांगून टाकले. यामुळे विलायतेतल्या पोलिसांनी पुढे फारशी चौकशी केली नाही. आणि एकट्या धिंग्रांच्यावर खटला होऊन हे प्रकरण संपले. येथे मात्र सर्वच उलट प्रकार झाला; आणि त्यांत सावरकरांसकट कैक लोक सरकारच्या ताब्यांत सांपडले.

९.८ हत्यारांचा कायदा भोंवला

धिंग्रांच्या बाबतीत जी गोष्ट सहज सुलभ होती तीच नेमकी हिंदुस्थानांत नव्हती. ती म्हणजे सुलभ शस्त्रप्राप्ति. धिंग्रांना पिस्तुल सहज विकत घेतां आले. त्याची नेमबाजीही राजरोसपणे उघड उघड एका गुरूजवळ शिकतां आली. हिंदुस्थानांत नेमक्या याच गोष्टी हत्यारांच्या कायद्यामुळे दुर्लभ होत्या. म्हणूनच सावरकरांना गुप्तपणे पिस्तुले इकडे पाठवावीं लागली; आमच्या अभिनव भारताच्या व आमच्याशी संलग्न असलेल्या सभासदांना ती गुप्तपणे ठेवावी लागली, व वारंवार गुप्तपणेच पाठवावी लागली. नेमबाजीही गुप्तपणेच करणे भाग पडले. ही गुप्ततेची आवश्यकताच आम्हांस ज्याक्सन-वधानंतर फार नडली. आणि कटाचा सुगावा लागल्यानंतर, पोलिसांच्या भयंकर छळामुळे, आणि समयसूचकतेच्या अभावी, बराचसा गोंधळ आणि त्यामुळे बरीच माणसे या गौप्यासाठीच उघडकीस येऊन तुरुंगांत आली. विलायतेत पोस्टाच्या तिकिटांप्रमाणे पिस्तुले मिळण्याची कायदेशीर सुलभता, व हिंदुस्थानांत, त्याच्या अगदीं उलट कायद्यामुळे, ती मिळण्याची आणि मिळाल्यानंतर त्यांच्या रक्षणाची दुष्करता, या गोष्टी धिंग्रा व कान्हेरे यांच्या खटल्यांची व कारवायांची तुलना करतांना ध्यानांत ठेवणे जरूर आहे. या गोष्टी विलायतेत कायदेशीर असल्याने तेथल्या पोलिसांना त्याबद्दल चौकशी करणे जरूरच नव्हते. हिंदुस्थानांत त्याच गोष्टीला प्रचंड महत्त्व आले. आणि त्यासाठीच येथल्या हिंदुस्थानच्या पोलिसांनीं हवे ते अत्याचार आरोपितांवर करून त्यांच्याकडून पिस्तुलांच्या ठावठिकाणाबद्दल माहिती मिळवली, आणि ती पिस्तुले गुप्तपणे ठेवण्याबद्दल शेकडो लोकांना छळले, आणि तुरुंगांत कैक वर्षे डांबून ठेवले. हिंदुस्थानातल्या शस्त्रास्त्रांच्या कायद्यामुळे, आमच्याप्रमाणे सर्वच प्रांतांत, हजारों क्रांतिकारक तुरुंगांत पिचत पडले.

९.९ ज्याक्सन-वधाचा गौप्यस्फोट

ही शस्त्रास्त्रांची दुर्मिळता आणि त्यांच्याबद्दलची गुप्ततेची आवश्यकता, या गोष्टी ध्यानांत धरून, मग हे ज्याक्सन-प्रकरण कसे उघडकीस आले हे ध्यानांत येणे सुलभ होईल. ज्याक्सन-वधाची हकीकत सांगतांना वाचकाच्या स्मरणांत असेल की, अनंतराव कान्हेऱ्यांबरोबर, गणूने निराळ्याच कारणाकरितां बोलावली होती म्हणून, दत्तात्रय पांडुरंग जोशी व काशिनाथ हरी अंकुशकर ही दोन तरुण मुले नाशकास औरंगाबादहून प्रथमच आली होती. वास्तविक अनंताने त्यांना बरोबर आणणे धोक्याचे होते. आणि सर्व ऑफस् झाल्यावर त्यालाही ती आपली चूक कळून आली, हे त्याच्या जबानीवरूनच दिसते. पण आपला कट फुटणार आहे ही त्याला तेव्हा कल्पना तरी कशी येणार? म्हणून त्यांना त्याने येऊं दिले असावें. असो. गणू अतिशय भित्रा आणि वधाच्या विरुद्ध होता, म्हणून त्याला अनंता त्या रात्रींच वध करणार आहे ही बातमी कर्वे गटाने कळूं दिली नव्हती. पण अनंताबरोबर ही औरंगाबादची २ मुले आली आहेत, असे विनायकराव देशपांडे यांस माहीत होते. ज्याक्सनचा वध करण्याच्या वेळी अनंताचा डाव हुकला तर वधाचे काम पुरें पाडण्यासाठी खुद्द कर्वे भरलेले पिस्तुल घेऊन नाटकगृहांत हजर होते. त्याचप्रमाणे देशपांडेही हजर होते. अनंताने ज्याक्सनचा वध केल्याबरोबर आपले नाव-गांव खोटे सांगावें, आणि 'खुनास खून' हे खिशांत ठेवलेले पत्रक दाखवावे, दुसऱ्या कोणास गुंतवूं नये, अशीही त्याला सूचना कर्व्यांनीं देशपांडे, जोशी यांच्यामार्फत दिली होती. पण धिंग्राप्रमाणे

मी वक्तव्य करणार आहे म्हणून आत्महत्या त्याने नाकारली. ज्याक्सनचा वध केल्याबरोबर पळशीकर म्याजिस्ट्रेटने अनंताचा हात धरला तेव्हा, 'तूं केवळ हिंदी आहेस म्हणून मी तुला जीवदान देतों', असे म्हणून अनंताने त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा प्राण घेतला नाही. आणि हात धरला गेल्यामुळे त्याला स्वत:चाही घात करून घेतां आला नाही. अनंताला पुढे पोलीसने पकडले; आणि तूं कोण, कुठला राहणारा असे विचारतां त्याने आपले खरे नाव, आणि औरंगाबादचा राहणारा अशी माहिती दिली. आणि इंग्रजांच्या जुलुमांचा सूड उगवण्यासाठी मी हे कृत्य लोकशिक्षणासाठी केले, यांत दुसरा कोणी साथीदार नाही, असे त्या रात्री १२ वाजतां मॅजिस्ट्रेटसमोर जबानीतून सांगूनही टाकले. पिस्तुलेही मी औरंगाबादेस एका अरबाकडून घेतलीं, त्याचा पत्ता माहीत नाही, असे सांगून कोणालाही न गुंतवतां तो मोकळा झाला होता. पण त्याने 'औरंगाबाद' हे गांवाचे सांगितलेले नावच पुढे भोंवले. आणि ते त्याने सांगूं नये म्हणून त्याला अगाऊ सूचना दिली असतांही त्याने ते सांगितले, ही त्याची बेशिस्त वागणूकच भयंकर घातकी ठरली. आपण जें देशभक्तीचे, पराक्रमाचे, निर्वाणीचे सत्कृत्य केले आहे त्याबद्दल आपले खरे नाव, गांव, धिंग्राप्रमाणे प्रसिद्ध व्हावे, या तारुण्यसुलभ आणि म्हणून काहीशा क्षम्य, अशा कीर्तिलालसेने त्याला मोह पडला. या कीर्तिलालसेनेच आपले फोटो प्रसिद्ध व्हावे या हेतूसाठी, त्याने आपले १०-१२ फोटोही अगाऊ, तो पूर्वी नाशकास आला होतो तेव्हाच, काढून घेतले होते. पण आपण सहज सांगितलेल्या आपल्या खऱ्या नावगांवामुळे, व पुढे गणूच्या भेकड आणि धांदरटपणामुळे, काय भीषण प्रसंग ओढवणार आहे, याची १६ वर्षांच्या या साध्याभोळ्या निर्लेप मनाला कल्पना व दूरदृष्टी नव्हती. कर्व्यांना मात्र ती होती, आणि म्हणूनच त्यांनी खरे नावगांव सांगूं नको, युक्त प्रांतांतले नाव व गांव सांग, अशी त्याला योग्य ताकीद दिली होती. पण तो चुकला.

९.१० औरंगाबाद नाव भोंवले

वध झाल्यावर पोलिसांची व कर्वे गटांतल्या लोकाची धांदल सुरू झाली. कर्वे व देशपांडे हे नाटकगृहांतून परत आल्यावर कर्व्यांनीं स्वत:जवळचे पिस्तुल देशपांड्यांजवळ दिले; आणि आपल्या सर्व गटांतील लोकांना, पोलिसांच्या झडत्यांत काही सांपडूं नये म्हणून, हत्यारें बॉम्बचे सामान वगैरे सर्व गोष्टींची निरवानिरव करण्यास कळवले. याच वेळेस विनायकराव देशपांड्यांनीं अनंताबरोबर आलेल्या दोन मुलांचे काय करावयाचे याबद्दल त्यांना विचारले. त्यांना माणूस देऊन मुंबईस प्रथम पाठवून द्या आणि तेथून, औरंगाबादेचे सरळ तिकिट न काढता, जवळच्या तारूर स्टेशनचे तिकिट काढून देण्याची व्यवस्था करण्यास गणूस कळवा, असे कर्व्यांनीं देशपांड्यांस सांगितले. त्याप्रमाणे देशपांडे गणूस कळविण्यास रात्रीचे गेले. आणि ज्याक्सनचा वध झाला आहे, तूं औरंगाबादेहुन आलेल्या मुलांना, मुंबईची त्यांना माहिती नाही म्हणून, माणूस बरोबर देऊन, मुंबईस प्रथम रवाना कर व तेथून त्यांना तारूरला पोंचविण्याची व्यवस्था कर, आणि हत्यारे कागदपत्र वगैरे सर्व सामानाची निरवानिरव कर, असे गणूस त्यांनी सांगितले. गणूने हे सर्व करण्यास पैसे नाहीत असे देशपांड्यांना कळविले, आणि बाकीची व्यवस्था करतो, असे सांगितल्यावर देशपांडे परत गेले. गणूची पैशाची वाण त्यांनी कर्व्यांना कळविली. हे होईपर्यंत रात्रही फार झाली होती.

ज्याक्सनच्या वधाची बातमी केशवराव परांजपे यांच्याकडूनच प्रथम गणूस कळली होती. त्यानंतर तो 'कापत कापतच' वर आला असे त्यांचे पाहुणे स्नेही अंकुशकर व जोशी आपल्या जबाबांत म्हणतातं! तो इतका घाबरला की, घरीतल्या हत्यारांचे व या पाहुण्या मुलांचे काय करावयाचे हे त्यास उमजेना. या तिघांनीं गणूच्या वडील भावास कळवण्याचे ठरवले. वडील भावाला या कटाची कसलीच माहिती नव्हती. त्यामुळे गणूने हे कळवितांच 'तूं माझ्या गळ्याला फांस लावलास' असे शंकरराव वैद्य चिडून रागाऊन म्हणाले. पण त्यांच्या चिडण्या-रागवण्याने काय होणार होते? देशपांडे इतक्यांत येऊन त्यांनी कर्व्यांचा निरोप गणूस कळविला. त्याप्रमाणे शेवटी पिस्तुले वगैरेचे गांठोडें करून शेजारच्या कौलारीत त्यांनी दडवून ठेवले, कागदपत्रे जाळली, आणि पहाटेच्या सुमाराला गणूने पिस्तुले आपल्या स्नेह्याकडे (नारायण कृष्ण जोशी) नेऊन ठेवली, आणि कर्व्यांकडून १० रुपये आणण्यास शंकरराव वैद्य स्वतः गेले. वास्तविक अशा आणीबाणीच्या वेळी, शंकररावांनीं 'कंजूषपणा' न करतां, १०-१२ रुपये स्वतः देऊन गणूस मुलांची ठरल्याप्रमाणे व्यवस्था करण्यास सांगावयास हवे होते. पण शंकररावांचा उपजत कंजूषपणा राष्ट्रघातकी ठरला व ते पैसे आणावयास कर्व्यांकडे गेले. कर्व्यांनी तरी लौकर उठून पैसे पोचवावयास हवे होते. तेही त्यांना जमले नाही. कर्व्यांनीच नंतर फार उशिरा गणूस १० रु. दिले. या सर्व धांदलींत मुंबईस या मुलांबरोबर पाठवण्यास कोणी खात्रीचा माणूसही मिळाला नाही. त्यामुळे गणूचीही त्रेधाच उडाली. बरे अशा वेळी, इतका उशीर झाला होता तर, बरोबर जाणता माणूस न देतां, या परकी अनोळखी कच्च्या बुद्धीच्या मुलांना पाठवावयाचे तरी नव्हते. पण तीही बुद्धि भेदरलेल्या शंकररावास व गणूस सुचली नाही. मुलांस ठेवून घेतले तर शंकरराव व कदाचित् कर्वे रागावतील अशीही त्याला भीती वाटली असावी. म्हणून कसेही करून या मुलांस, प्लेगच्या उंदराप्रमाणे, दूरदूर टाकण्याचे त्याने ठरवले. आणि येथेच या घाबरट, भेकड, धांद्रट गणूने सर्वांचा खड्डा खणला. खरे म्हटले म्हणजे ही अगदींच कच्चीं अनोळखी मुले इतक्या घाईने परत पाठवणे हेच धोक्याचे होते. आणि त्यांतही गणूसारख्या भित्र्या माणसावर एवढी जबाबदारी कर्व्यांनी टाकणेही योग्य नव्हते. पण त्यांनाही ते काम दुसऱ्या माणसावर सोपवण्याचे त्यावेळी सुचले नाही. त्यांत काही विशेष कठीण नव्हते हेही खरे. पण ते गणूस जमले नाही. आणि त्याने या अनोळखी परक्या मुलांना, कर्व्यांकडून उशिरा पैसे आले होते व गाडी चुकणार हे नक्की होते तरी, ते पैसे देऊन, मुंबईस जाण्यासाठी तांग्यात बसवून स्टेशनवर पाठवले.

९.११ अनंताच्या औरंगाबादी स्नेह्यांची कुतरओढ

पोलिसांनीं सर्वत्र नाकेबंदी केली होती. अनंताने औरंगाबादचे नाव सांगितल्यामुळे औरंगाबादचा कोणीही माणूस सांपडल्यास त्यांस अटक करा, असा अधिकाऱ्यांनी स्टेशन-पोलिसांस हुकुम दिला होता. त्यामुळे स्टेशनवर ते पाळत ठेवूनच होते. सकाळच्या एक्सप्रेसला ही मुले मुंबईला जावयाची होती. पण शंकररावांचा कंजूषपणा आणि गणूचा कमालीचा भेदरटपणा व धांद्रटपणा यामुळे या मुलांना गांवांतून निघण्यासच उशीर झाला होता. म्हणून त्यांची ती गाडी चुकली. आणि ते तसेच स्टेशनवर घोंटाळत १ तासानंतर येणाऱ्या दुसऱ्या गाडीची वाट पाहात तिष्ठत बसले. नाटकें पाहण्यास आलेली मुले. त्यानी आपल्याबरोबर काही विशेष सामानही आणले नव्हते. बरे काही अचानक प्रसंग आल्यास कसे वागावे, कशी बतावणी

करावी, हेही त्यांना कोणी सांगितले नव्हते. दोन्हीही १६-१७ वर्षांचे तरुण. त्यामुळे त्यांना स्टेशनवरील पोलिसांनीं सहज हटकतांच ते बावरले. पोलिसांना संशय आला; आणि त्यांनी त्यांना कोण, कोठून आला, कोठें रात्रीं उतरला होता याची चौकशी चालवली. एकाने काशीहून आलों असे सांगितले. दुसऱ्याने हैदराबादेहून आल्याची बतावणी केली. एकमेकांची ओळख आहे काय विचारतां एकाने होय, तर दुसऱ्याने नाही, म्हणून सांगितले. उत्तरात असा फरक आल्यावर पोलिसांचा संशय दुणावला. जवळ सामान नाही तर रात्र कोठे काढली, म्हणून विचारल्यावर दोघांनीं गंगेवर धर्मशाळेत होतो असे सांगितले असते तरी चालले असते. पण तेही त्यांना सुचले नाही. गणू वैद्याच्या घरी खाणावळ आहे तेथे रात्री उतरलो होतो असे सांगितले. अचानक पोलिसांच्या तडाक्यांत सांपडल्यामुळे ही मुले अगोदरच भयभी झाली होती. संशयामुळे त्यांना पोलिसांनीं नाशकास आणले, आणि गणू वैद्याचे घर दाखवा म्हणून त्यांच्यामागे लकडा लावला. पोलिसांचा ससेमिरा मागे लागतांच आम्ही औरंगाबादेहून आलो असे या दोन्ही मुलांनी कबूल केले. त्यामुळे तर नक्कीच शिकार सांपडली असे पोलीस अधिकाऱ्यांस वाटले. मुलांनी गणूचे घर दाखवतांच, संध्याकाळ होत आली होती म्हणून, सर्व माणसे बाहेर काढून देऊन, गणूच्या घराला मोहोर करून, दुसऱ्या दिवशी झडती घेण्याचे पोलिसांनी ठरवले व गणूस अटक केली. दुसरी मुंबईची गाडी पकडण्याच्या आंत, एकाच तासात, ही भावी प्रचंड अनर्थावह घटना घडली! आणि पोलिसांनीं सहज टाकलेल्या फाशाने, पांडवांप्रमाणे, आम्हांस देशोधडीस लावले.

९.१२ योजनेच्या अभावीं घात

स्टेशनवर व पोलीस कचेरींत हे २२-१२-१९०९ ला प्रकरण शिजत होते, याची कोणासच कल्पना नव्हती. त्या दिवसभर कर्वे गटांतलीं सर्व मंडळी आपापली पिस्तुले, बॉम्बचे सामान, कागदपत्र यांची निरवानिरव करीत होती. पण यावेळी या निरवानिरवींत काही सूत्रबद्ध व्यवस्था, योजना मुळींच नव्हती. एकाने आपले सामान दुसऱ्याजवळ द्यावें, ही निरवानिरव म्हणतां येत नाही. असे जोखमीचे एक सामान नष्ट तरी करून टाकावयाचे, किंवा जेथे कोणी इतर माणूस गुंतणार नाही, असा निर्जन ठिकाणी तरी ते गुप्त ठेवावयाचे, याला निरवानिरव म्हणणे शोभते. तसे या गणूच्या गटांतल्या सभासदांनी कोणी फारसे केले नाही. त्यांना तसे कोणी, कधी, आगाऊ शिकविले, पढविलेच नव्हते. त्यामुळे गणूने जसे सकाळीं पिस्तुल जोशांस दिले तसेच सदाशिव दांडेकराने, घाबरून त्याच्याजवळचे ब्राउनिंग पिस्तुल व ॲसिडांच्या बाटल्या, गणूच्या घरी दुपारी आणल्या; आणि तो घरी नव्हता म्हणून, त्याच्या बिछान्याखाली पिस्तूल छपवून ठेवले व बाटल्या कोनाड्यात ठेवल्या. गणूस त्याची कल्पनाही नव्हती. तो घरीही नव्हता. त्यामुळे तो निश्चिंचत होता. पण त्यानेच बोलावलेले त्याचे पाहुणे हे त्याच्या दुर्दैवाचा घडा पोलीस कचेरींत भरीत होते. आणि त्यांनी जेव्हा गणूचे घर दाखवले, आणि पोलिसांनी गणूस अटक करून घरावर मोहोर केली, तेव्हा गणूही सचिंत झाला. रात्र कशी तरी या तिघांनी पोलीस पहाऱ्यांत काढली. आपल्या घरी काहीच सांपडणार नाही याची गणूला खात्री होती. पण सकाळी घराची झडती पोलीस घेतांना खुद्द गणूच्या बिछान्याखालीच ब्राउनिंग पिस्तुल निघाले! कान्हेऱ्यांनीं ज्याक्सनला ज्या पिस्तुलाने मारले तसेच ब्राउनिंग पिस्तुल ते होते. कोनाड्यात ॲसिडाच्या बाटल्याही सांपडल्या!!! हा अकल्पित आघात पाहतांच अगोदरच भेकड असलेला गणू

पुराच भांबावून गेला! सुन्न होऊन काळा ठिक्कर पडला व त्याला दरदरून घामच फुटला. निश्चित योजनेच्या आणि प्रसंगावधानतेच्या अभावी, आणि आमच्या दुर्दैवाने, त्याच्यासारख्या अगदींच कच्च्या माणसांवर भयंकर कहरच गुदरला.

यापमाणे इंग्रज सरकारच्या सुदैवाने त्यांना, अगदीं त्यांच्या जबड्यांत, गणूच्या भेकडपणामुळे ढकललेली औरंगाबादच्या २ तरुणांची शिकार आयती, वधाच्या दुसऱ्याच दिवशी, मिळाली. मुद्देमाल कसा बेमालुम लपवावा याच्या निश्चित योजनेच्या अभावी, त्याला नकळत, सदू दांडेकराने त्याच्याच घरीत ठेवलेले पिस्तुल आणि बॉम्बचे सामानही पोलिसांना मिळाले. या दोन मुलांना 'मी खून करणार आहे' असे अनंताने मागे सांगितलेच होते. गणूची व अनंताची भेट पूर्वी झालीच होती. खुनाचे बेतही चालले गणूला माहीत होते. त्या कटात कोणकोण होते याचीही त्याला माहिती होती. त्याची शरीरप्रकृतीही क्षयी माणसासारखी जेमतेमच होती. त्यामुळे पोलिसांनी त्याला व त्या दोन मुलांना चौदावे रत्न दाखविताच त्यांची गाळण उडाली. बरे अशा संकटांत कसे वागावे, याची, मानसिक व बौद्धिक, पूर्वतयारी काहीच नव्हती. पिस्तुले आणि बॉम्बचे सामान नेहमी हाताळल्याचे गणूने या दोन मुलांना मोठ्या दिमाखाने पूर्वी सांगितले होते. इतकेच नव्हे तर अंकुशकरला पेणला बॉम्ब कारखान्यांत शिकण्यास पाठवण्याचे त्याने अभिवचनही दिले होते. म्हणूनच अंकुशकर नाशकास आला होता. कर्वे गटाचा गणू हा कारभारीच होता. आणि या कच्च्या दिलाचा हा गट्टा, एकदम, अचानक अनपेक्षित मुद्देमालासह पोलिसांस सांपडला. आणि, मागे त्याने म्हटल्याप्रमाणे, पोलिसांचा हीसका बसतांच तो भराभर सांगू लागला, सांपडलेली पिस्तुले व बॉम्बचे सामान व विद्या त्याला कर्व्यांनीं दिली होती. म्हणून त्याबद्दल त्याने कर्व्यांचे नाव प्रथम सांगितले. त्यावरून कर्व्यांना अटक झाली. जी स्थिति गणूची तीच कर्व्यांचीही पोलिसाच्या भयंकर छळामुळे झाली असावी. त्यांनीही नाइलाजाने पाटणकरांकडून पिस्तुले घेतल्याचे सांगितले. म्हणून पाटणकरांना मुंबईस अटक झाली. पाटणकरांची बॉम्बचा वसईचा कारखाना वांचवण्याची धडपड होती. त्या कारखान्यांतून नुकतेच ते वसईहून आले होते म्हणून त्यांच्या अंगाकपड्यांवर पिक्रिक ॲसिडचे डाग होते. छळ करतांना पोलिसांस ते दिसूं नयेत म्हणून त्यांनी चतुर्भुजकूडन पिस्तुले आणल्याचे एकदम कबूल करून, ती वेळ कशी निभावली, या त्यांच्या अडचणीचे वर्णन मागे आलेच आहे. चतुर्भुजवर पोलिसांची जून १९०९ पासूनच नजर होती, असे मुंबईचे पोलीस कमिशनर व्हिन्सेट, व सी.आय.डी. खात्याचे प्रमुख गायडर, यांनी आपल्या साक्षींतच सांगितले आहे. तोवर त्यांना चतुभुजने दाद दिली नव्हती. पण पाटणकरांनी त्याचे नाव सांगितल्यामुळे त्याला जेव्हा पकडले तेव्हाच तो बिथरला. आपला विश्वासघात पाटणकराने केला, अशी त्याची समजूत झाली. त्यामुळे त्यानेही, पोलिसांच्या छळास भिऊन, सावरकरांकडून पिस्तुले आणली, व सावरकरांनी सांगितल्याप्रमाणे भट व थत्ते यांजकडे जाऊन, भटांनीं सांगितल्यावरून, पाटणकरांना दिलीं, असे सांगून तो माफीचा साक्षीदार होण्यास कबूल झाला! यामुळे ज्याक्सन-वधाचां धागा अनंता कान्हेऱ्यांपासून थेट विलायतेस सावरकरांपर्यंत पोचला. सावरकर त्या वेळी प्यारिसला होते. आणि तेथे, त्यांच्या मित्रांच्या आणि आमच्या सूचना-सल्ल्याप्रमाणे, राहते तर त्यांना अटकही झाली नसती. ते तेथे सुरक्षित निर्वासितांप्रमाणे आजपर्यंतही राहूं शकते. पण त्यांना दुर्बुद्धी होऊन ते विलायतेत आले, आणि अचानक इंग्रज

सरकारच्या हातांत सांपडले. इकडचे वॉरंट तेथे तयार होतेच. पाटणकर व चतुर्भुजने माझे व थत्त्यांचे नाव सांगितल्यावरून मला व रा. थत्ते यांनाही पकडण्यांत आले.

कर्व्यांनीं घेतलेलीं पिस्तुले व बॉम्बचे सामान आणि उपकरणे नाशकास, गणूच्या मार्फत, निरनिराळ्या सभासदांच्या हातांत जातच होती. त्यामुळे त्यांचा छडा लावता लावतां अनेक माणसे अडकली गेली. कर्व्यांच्या मार्फत काही पिस्तुले पुण्यास रा. कृष्णाजी गोपाळ खरे (आमचे बॉम्बचे गुरु) यांच्याकडून त्यांचे मित्र ब्रह्मगिरीबुवा यांच्या हातांत गेली. तीही अशीच निरनिराळ्या माणसांच्या हातात गेल्यामुळे तेवढीं माणसे अडकवली गेली. एवंच, पिस्तुलांचा व बॉम्बच्या सामानाचा मागोवा काढतां काढतां अनेक माणसे, पूर्वनियोजनाच्या व समयसूचकतेच्या अभावामुळे, पोलिसांस सांपडलीं.

पिस्तुले, शस्त्रें व बॉम्ब कशासाठी गोळा करीत होतां या पोलिसांच्या प्रश्नास उत्तर देणे अवश्यच होते. तो हेतू अर्थातच सरकारी अधिकारी व त्यांचे बगलबच्चे यांच्या वधाचा होता, हेही सांगणे आले. अशा हेतूंसाठी जे जे या राज्यक्रांतीच्या कटांत आले होते, व ज्यांचा थोडासा तरी संबंध पिस्तुले, बॉम्ब, शस्त्रें यांच्याशी आला, त्यांनाही पोलिसांनी आपल्या जाळ्यांत खेंचले. पोलिसांच्या भयंकर छळामुळे, अगदी अवश्य तेवढीच जरी माहिती आरोपितांनी सांगितली तरी, खूनाच्या खटल्यांत ७, राज्यक्रांतीच्या खटल्यांत ३५, आणि किरकोळ हत्यारांच्या कायद्याखालच्या आरोपांवरून ५-६ असे सुमारें ५० जण आम्ही या चक्रांत सांपडलों; व फाशी, जन्मठेप, व १५ वर्षे सक्तमजुरीपासून तो काही महीन्यांच्या शिक्षा आम्हांस मिळाल्या.

९.१३ दोषचक्र मध्येच का तुटले नाही ?

हे दोषचक्र तांतडीने मधेच कुठे का तोडले गेले नाही अशी वाचकास शंका येणे साहजिकच आहे. त्याचे उत्तर आमच्या घटनेच्या नियमांत आहे. त्या नियमांप्रमाणे आमच्या गटांचे पुढारीच काय ते एकमेकास परिचित असत, सभासद नसत. त्यामुळे औरंगाबादच्या अनंताचा व आमचा कुठे संबंध येऊ शकेल अशी आम्हां कोणास कल्पनाही नव्हती. शिवाय पकडलेल्या लोकांची नावेही वृत्तपत्रांत उशिराच पोलीसकडून मिळत. या उशिरामुळेही आम्ही हे प्रकरण आम्हांस भिडेपर्यंत निष्काळजी होतो. आणि सर्वांत मोठे कारण म्हणजे एकमेकांवरचा पूर्ण विश्वास. आपला साथीदार पूर्ण विश्वासपात्र आहे आणि पोलिस-छळामुळे, आपल्याला तो गुंतवील, अशी कल्पनाही आम्हांला शिवली नव्हती. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कर्व्यांनीं खऱ्याचे नाव सांगितल्यावर, खऱ्यांचा मुंबईस पोलीस शोध करीत होत, व त्यांच्या पश्चात् त्यांच्या खोलीची पोलिसांनीं झडती घेतली होती, हे खऱ्यांना खरेच वाटले नाही. आणि म्हणून ते नेहमीप्रमाणे, पुण्याहून मुंबईस परत आले, आणि पोलीस कमिशनरच्या कचेरींत या झडतीच्या नित्तेधार्थ आपण होऊन हजर झाले! कर्वे आपले नाव सांगतील व आपण यांत गुंतू ही, कर्व्यांच्यावरील दृढ विश्वासामुळे, खऱ्यांना कल्पनाही नव्हती. माझे स्वत:चेही असेच झाले. १-१-१९१० पर्यंत वृत्तपत्रांत पाटणकर व चतुर्भुज यांना पकडल्याची बातमी आलीच नव्हती. मी सकाळीच ती वाचली, आणि १ तासाच्या आतच पकडलो गेलो. बातम्या कदाचित् अगाऊ मिळत्या तर, आमच्यापैकी काही जण तरी, सावध होऊन अज्ञातवासांत जाऊं शकलो असतो.

पण या २० पिस्तुलांनीं निदान २० खून तरी होतील ही धास्ती इंग्रज पोलीस अधिकाऱ्यांस असल्याने, त्यांनी उशिरा बातम्या देण्यांत पराकाष्ठेची दिरंगाई, आणि संशयितांना पकडून ठेवण्यांत कमालीची घाई, चालवली होती. म्हणून बातम्या मिळण्यापूर्वी अटकेनेच पहिली खबर आम्हांस मिळे. तसाच कर्व्यांच्यावर पाटणकरांचा एवढा विश्वास होता की, खुनाची बातमी कळतांच, पेणहून मराठे मुंबईस पाटणकरांच्या भेटीसाठी आले असतां पाटणकरांनीं आपला या खुनाशी काही संबंध नाही, असे त्यांना सांगून परत कसे पाठवले, हे मागे बॉम्ब-प्रकरणांत दिलेच आहे (मराठे यांची लेखी माहिती). शिवाय अण्णा कर्व्यांनी पाटणकरांना व मला ''आमच्या दोघांच्या सल्ल्याशिवाय काही असे अपघाती कृत्य करणार नाही'' असे, त्यांच्या परमपूज्य गुरूची शपथ घेऊन, आश्वासन दिले होते. त्यामुळे आम्ही कर्व्यांच्यावर पूर्ण विश्वासून होतो. त्यांतही वधापूर्वीच १-२ दिवस मी, आमच्या अभिनव भारतापैकी रा. विश्वनाथराव गोरे यांना नाशकास पाठवून, सर्व पिस्तुले मुंबईस परत मागवली होती. ''१-२ दिवसांत मीच मुंबईस येत आहे, येतांना ती घेऊन येईन', असे कर्व्यांनीं गोऱ्यांना उत्तर देऊन मुंबईस परत पाठवले होते. त्यामुळे तर अण्णा कर्वे या प्रकरणांत, आम्हांस काही न कळवितां, भाग घेतील, हे आमच्या स्वप्नांतही येणे शक्य नव्हते. म्हणून आम्ही अगदींच निर्धास्त होतो. अण्णा कर्व्यांकडून आम्हांला व इतरांना दिलेल्या अभिवचनांचे, शपथपूर्वक आश्वासनांचे, पालन पुरेपूर होईल अशी आम्हांस पुरी खात्री होती. कारण अशा राज्यक्रांतीच्या गुप्त कटांच्या कामांत सर्व मदार केवळ एकमेकांवरील दृढ विश्वासावरच असते. ती नसेल तर कोणतेही संघटित गुप्त कार्य होणेच अशक्य. म्हणून आम्ही कर्व्यांसारख्या धुरंधर कार्यकर्त्यांवर संपूर्ण विश्वास टाकून होतो. कर्व्यांनाही अज्ञातवासांत जाणे शक्य होते. २२ व २३ डिसेंबर हे २ दिवस ते मोकळे होते. पण कदाचित गणू वैद्य आपला विश्वासघात करणार नाही, अशी त्यांनाही खात्री असावी. पण सर्वत्र विश्वास-विपरीतच गोष्टी घडत होत्या! पण आम्हां कोणाला न कळवतां, खुनांत सामील होण्याचा कर्व्यांना एकदम आकस्मिक का मोह पडला, व त्यांत सामील झाल्यावरही, त्यांनी आम्हांस ती गोष्ट कळवून सावध का केले नाही, हे गूढ आम्हां कोणासही त्यांनी उकलून सांगितले नाही. उलट, आपल्या हातून अनपेक्षित गोष्टी घडल्या, व त्यामुळे सर्वच ओंफस् होऊन इतकी माणसे अडकली गेली, याबद्दल त्यांना मागून इतका पश्चात्ताप झाला की, आपण यापुढे जिवंत राहणे इष्ट नाही. म्हणूनच केवळ त्यांनी फाशीची शिक्षा आपणा स्वत:वर ओढून घेतली. त्यांच्या पहील्या जबानीप्रमाणे ती त्यांना मिळाली नसती. म्हणून अगदीं शेवटच्या जबाबांत त्यांनी म्याजिस्ट्रेटपुढे सांगितले आहे की, पूर्वी सांगितलेल्या ''हकीकतीवरून ज्याक्सनच्या वधाबद्दलची जबाबदारी इतक्या तऱ्हेने माझ्याकडे आहे तितक्या तऱ्हेने ती त्या जबाबावरून पूर्णपणे दिसून येत नाही. कारण जुलूम व अन्यायाचा प्रतिकार करण्याची कल्पना मी देशपांडे, सोमण व इतर मंडळीस सांगितली होती व त्यांस शक्य तर ज्याक्सनचा वध करण्यास सांगितले होते.' ''मी लहान भरलेले पिस्तुल घेऊन थिएटरमध्ये गेलो होतो. उद्देश हा की, जरूर लागल्यास अनंतास मदत करण्याची!' या शेवटच्या कर्व्यांच्या जबाबामुळेच त्यांना फाशीची शिक्षा झाली.

९.१४ वधाचा अचानक बेत

उपर्युक्त गूढाचा खुलाचा एकाच गोष्टीने होऊं शकतो. आणि ती ही की, ता. १९ पर्यंत वधाची कर्व्यांनाही कल्पना नव्हती. १९ तारखेला विनायकराव देशपांडे यांना ''औरंगाबादेस हत्यारांचा तपास करून ये, ज्याक्सनचा वध करण्याचा प्रयत्न इतक्या लौकर होणार नाही'' असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते. (कर्वे, १ ला जबाब). पण देशपांडे यांनी सर्व हकीकत अनंतास औरंगाबादेस सांगितल्यावर, अनंता दुसऱ्याच दिवशी, पण वध करण्याच्या उद्देशानेच, आला. आणि तो येणार ही बातमी कर्व्यांना कळल्यावर, २१ तारखेस सकाळी, वधाचा बेत नक्की झाला. त्यांच्या गुरूच्या आज्ञेनुसार, ३ जानेवारी १९१० ला ज्याक्सनचा वध करण्याचा कर्व्यांचा बेत होता. अनंता आल्याने, व ज्याक्सनसाहेब २३-१२-०९ ला नाटकगृहांत सांपडणार असल्याने, तो बेत २१ डिसेबरला संध्याकाळीं निश्चित ठरला. आणि म्हणून त्यांना आम्हांस अगाऊ कळवतां आले नसावे. आणि वध झाल्यावर ''आम्हांस मधल्या दोन दिवसांत, मी वधांत सामील आहे, सावध राहा.'' अशी सूचना त्यांनी दिली नाही, कारण ते गणूवर विश्वासून होते. असो. आम्ही गाफील का राहीलो, परागंदा का झालो नाही, आणि हे दोषचक्र मधेच का तुटले नाही? याचे स्पष्टीकरण हे येणेप्रमाणे आहे. ही सावधतेची सूचना कर्व्यांनीं आम्हांस दूर मुंबई-पुण्यास दिली नाही इतकेंच नव्हे, तर खुद्द नाशिक शहरीत विष्णुशास्त्री केळकर यांनाही ती मिळाली नाही! त्यामुळे तेही निश्चिंतच होते (केळकरांचा लेख). सूचनेचा अभाव, विश्वासपात्र व धुरंधर नेत्यावरील दृढ विश्वास, आणि गुप्ततेकरितां केलेला आमचाच नियम, आमच्या बोकांडी कसा बसला याची ही शोकांतिका अशी आहे.

आमच्या इकडेच हा असा गोंधळ झाला असे नाही. खुदिराम बसूने टाकलेल्या बॉम्बमुळे किंग्जफर्डच्या ऐवजी दोन केनेडी बायाच मेल्या. यामुळे जी 'अलिपूर बॉम्ब-केस' कलकत्त्यास झाली तीही अशीच वध झाल्यावर दोनच दिवसांत पोलिसांस उलगडली. त्या खटल्यात व आमच्या खटल्यांत हेच दोष झाल्याने त्यांच्याकडेही कैक माणसे फाशी व तुरुंगांत गेली.

१० इंग्रज सरकारविरुद्ध सशस्त्र बंडाचा अभियोग

ज्याक्सन-वधाच्या सबबीवर आम्ही सर्व पकडले गेल्यावर रीतसर आमच्यावर खटले करण्याची तयारी होऊं लागली. अपराधांचे भीषण स्वरूप पाहून सरकारने नवा जुलमी कादा (न्यू क्रिमिनल लॉ अमेंडमेट ऍक्ट १९०८) आमच्या खटल्यासाठी लागू केला. या कायद्याप्रमाणे म्याजिस्ट्रेटसमोर चौकशी, नंतर सेशन कमिट केल्यावर सेशन्स कोर्टांत खटला, नंतर हायकोर्टांत अपील, या मामुली नेहमीच्या लांबलचक प्रकाराला गचांडी देऊन, म्याजिस्ट्रेटने एकदम हायकोर्टांतल्या न्यायाधिशांपैकी ३ न्यायाधिशांच्या (खास कोर्ट) स्पेशल ट्रायब्यूनलकडेच खटला चालवण्यासाठी धाडावयाचा, व या ट्रायब्यूनलच्या निकालावर अपील नसावयाचे, अशी तडकाफडकी न्यायाची झटपट रंगारी पद्धती होती. या कायद्याने म्याजिस्ट्रेटच्या चौकशीत वकिली सल्ल्याचीही परवानगी नव्हती. त्यामुळे आमचा कायदेशीर बचाव करण्याचा हक्कच नाहीसा झाला होता. कारण वकिलांना आम्हांला भेटण्याची परवानगी असती तर आमच्या जबान्या पुष्कळच निराळ्या झाल्या असत्या. पण वकिलांना भेटण्याची परवानगीच नसल्याने पोलिसांच्या कारवायांना मुक्तद्वारच होते. खटल्याची पूर्व चौकशी करण्यासाठी ए. मॉटगॉमेरी या फर्स्ट क्लास म्याजिस्ट्रेटला नियुक्त केले होते. आरोपी पकडल्यावर त्याला पोलिसांच्या ताब्यांत ठेवणे (पोलीस कस्टडी), किंवा आपल्या ताब्यांत ठेवणे (म्याजिस्ट्रेटची कस्टडी), हा अधिकार या म्याजिस्ट्रेटकडे असे. पण या दोन्ही प्रकारांत फारसा भेदच नव्हता. आरोपी पुष्कळ होते म्हणून त्यांना अडकून ठेवण्यास पोलीसही पुष्कळ आणले होते; आणि आम्हांला ठेवण्यास तुरुंगांत पुरेशी जागाही नव्हती. म्हणून या दोन कस्टड्यां (अटके) मधला भेद निव्वळ नावापुरतांच खरोखर होता. आणि आम्ही सदासर्वदा पोलिसांच्याच ताब्यांत होतो. त्यामुळे पोलिसांच्या छळाला हवा तितका वाव मिळाला. कबुलीजबाब घेणारे म्याजिस्ट्रेट जे होते - पळशीकर व खोपकर - तेही सरकारचे मिंधे. त्यांची बढती पोलिसांच्या या खटल्याच्या रिपोर्टांवर. म्हणून पोलीस सांगतील त्याप्रमाणे ते जवळ जवळ वागत. शिवाय आम्हां आरोपींना जर यत्किंचितही सवलत दिली तर वरिष्ठ अधिकाऱ्यांची मर्जी जाणार, या धाकाने ते तरी आम्हांस कशाला कायदेशीर सवलती देतील? आम्ही सर्व सरकारच्या नरडीचा घोट घेण्यास निघालेले कट्टे राजद्वेष्टे, आणि ते खुद्द एकनिष्ट राजसेवक. तेव्हा आम्ही कायदेशीर त्यांचेही शत्रूच. मग ते आम्हांस का दया-माया दाखवतील? ती दाखवलीच तर कदाचित् आमच्याच रांगेत त्यांनाही पोलीस गुंतवावयाचे, किंवा बदलून सरकारच्या गैरमजर्ति रहावयाचे, हीही भीती त्यांना होतीच. त्यामुळे आम्ही केवळ पोलिसांच्याच हातांत ७-८ महीने खितपत होतो. पळशीकरीपेक्षां खोपकर काहीसे उजवे. पण हे पाहून पोलिसांनीं त्यांच्याकडे थोडेच आरोपी कबुली-जबाबासाठी पाठवले.

१०.१ छळाला मुक्तद्वार

म्याजिस्ट्रेटांची जेथे ही मनोवृत्ति तेथे पोलिस अधिकाऱ्यांची मनोवृत्ति काय असेल, याची वाचकांना कल्पना येईलच. सरकारचे क्रांतिकारकांविरुद्ध पराकाष्ठेचे कडक धोरण १९०८ पासूनच जाहीर झाले होते. त्या धोरणाची तळी उचलून धरणे हेच अथपासून इतीपर्यंत राजसेवकांचे

काम ठरले होते. तेव्हा आमच्यासारखे सरकारचे परम शत्रु हातात सापडले असतांना, आमच्या चितेवर पोळ्या भाजून घेण्याची ही आलेली संधी राजनिष्ठ पोलीस अधिकारी कशाला घालवतील? त्यांतही ज्या पोलीस अधिकाऱ्यांची या खटल्याकरितां खास नेमणूक झाली होती त्या गायडरने ''आरोपी मेला तरी हरकत नाही, पण पिस्तुले व इतर मुद्देमाल मिळालाच पाहिजे' अशी सक्त ताकीद, व सदर परवानगी, हाताखालच्या अधिकाऱ्यांना दिलेली. मग ते तरी आमच्या जिवाची कशाला पर्वा ठेवणार? आणि या गुन्ह्याचे स्वरूप राजकीय व भयंकर असल्याने, व त्याच्या शाबितीवरच या अधिकाऱ्यांची बहाली बढती असल्याने, या वाहत्या गंगेंत अनेक पोलीस अधिकाऱ्यांना आपले हात धुवून घेण्याची अमोल संधी मिळाली होती. अडीअडचणीला त्यांना गणू वैद्य होताच. बॅ. बॅप्टिस्टांनीं तर त्याला पुराव्यातला 'missing link' 'जुळता दुवा' हेच नाव ठेवले होते. कुठेही पुराव्याची साखळी तुटली की, तेथे गणूला पोलीस दडपीत, त्यामुळे त्यांनी , कोणतीही अडचण न जुमानतां, आमच्यावरील आरोपांची नाना प्रकार करून तळी भरली. पुराव्यासाठी आमचाच काय, पण साक्षीदारांचाही छळ होई. शिवाय, नवीन कायद्याप्रमाणे, कोठेही वकिलाला भेटण्याची संधी नसल्याने, बाहेरच्या लोकाना आमच्या छळाची माहितीही क्वचितच मिळे. आणि मिळाली तरी आमचा वाली कोण होणार होते? कायद्याप्रमाणेच ते अशक्य होते. बरें एखादे वेळेस जर घरच्या माणसांची, पोलिसांच्या परवानगीनेच, आणि त्यांच्या पहाऱ्यांतच, गांठभेट झाली तरी; त्यांना या छळाची हकीकत सांगण्याचीही दुप्पट चोरी होती. कारण पोलिसांच्या छळाविरुद्ध कागाळी केली तर पुन्हा भेटण्याची परवानगी मिळावयाची नाही ही भीती, आणि आमचा छळ होत आहे हे सांगितले तर आमच्या जिवलगांना अधिक काळजी, दुःख, वाटावयाचे ही दुसरी भीती. यामुळे आमचा तोंड दाबून पक्का दुप्पट बुक्क्यांचा मार होत होता. आमच्या छळाविरुद्ध कोठूनही ओरड होणेच शक्य नव्हते. वर्तमानपत्रांनाही कोणी कळवले तर तो मजकूप छापण्यासही पत्रकर्ते भीत असत. असा सरकारी जुलमाचा वरवंटा आम्हांला सगळीकडून रगडीत होता. परमेश्वरच आमचा पाठीराखा काय तो उरला होता.

१०.२ काही देशभक्त पोलीस

सर्व सामान्य पोलिसांबद्दल हे वर्णन जरी लागूं असले तरी या भांगेंत काही तुळशीही चुकून उगवल्या होत्या. सदावर्त्यांचे उदाहरण बॉम्ब-प्रकरणी आलेच आहे. तशीच काही तुरळक उदाहरणे होती. बाबा सावरकरांच्या घरीं इस्टेट जप्त करण्यास जेव्हा दोन फौजदार यावयाचे होते, तेव्हा एकाने आम्हांस अगाऊच निरोप पाठवला की, ''आम्ही येण्यापूर्वी तुम्हांला काय लांबवावयाचे असेल ते लांबवा, घरात काही फाटकी वस्त्रें व फुटकी भांडी ठेवा, व बाकीचे सर्व सामान दुसरीकडे हलवा.' आम्ही अगोदरच सावध होतो. पण ही सूचना मिळताच आणखीही सामान आम्ही दुसरीकडे हलवूं शकलो. तसेच, मला व रा. नागपूरकरांना पकडून जेव्हा मुंबईस पोलीस कमिशनरच्या कचेरींत आणले, तेव्हा त्याने त्याच्या एका हाताखालच्या अधिकाऱ्यांस आमच्याकडून काही कबुलीजबाब निघतो का, हे पाहण्यास सांगितले; आणि 'सीधा' करण्याचीही परवानगी दिली. पण तो अधिकारी खरा देशभक्त होता. त्याने आम्हांस एकेका कोठडींत नेऊन सांगितले की, ''तुम्ही नुसते ओरडा. मी तुमच्या अंगाला हातही लावणार नाही. पण तुमच्या आरोळ्यांनीं त्या हरामखोरास (पोलीस कमिशनरला) कळेल की, मी तुमची

कणिक तिंबतों आहे.'' त्याप्रमाणे आम्ही बतावणी केली. काही तासांनंतर त्याने कमिशनरला कळविले की, ''बेरड आहेत लेकाचे. कबूल होत नाहीत.'' तेव्हा त्याने आमचा नाद सोडला. आम्ही बहुतेक आरोपी ब्राह्मण असल्याने आम्हांला जेवूं खाऊं घालावयाला सरकारने एक सरकारी स्वतंत्र भोजनालय उघडून त्यांवर सर्व ब्राह्मण पोलीसच ठेवले होते. तेच आमचे आचारी व वाढपी. त्यांतल्या एकाने वाढतांना माझ्याजवळ, हळूंच वेळ सांपडेल तेव्हा, कुजबुजून काही मसलती कराव्या. या मसलतीमुळे मी आमच्या पिंपळगांवच्या गद्रे या अभिनव भारताच्या सभासदास वाचवू शकलो होतो. १९०५ पासून सरकारने हिंदुस्थानांत देशभक्तांच्याविरुद्ध जी जुलुमाची मोहीम सुरू केली होती, व शेकडो देशभक्तांस राजद्रोहासाठी तुरुंगांत टाकून छळले होते, त्याचा परिणाम या अशा देशभक्त पोलीस अधिकाऱ्यांवरही होऊं लागला होता. १९०८ मध्ये लो. टिळकांना जेव्हा अघोरी शिक्षा झाली तेव्हा तर पुष्कळच देशी पोलीस अधिकाऱ्यांना वाईट वाटल्याचे मला माहीत आहे. पण असे देशभक्त अधिकारी त्या काळांत थोडेच होते. १९४२ पर्यंत त्यांची संख्या खूपच वाढत गेली; आणि म्हणूनच अच्युतराव पटवर्धन, जयप्रकाश नारायण, यांना कित्येक महीने गुप्त राहून देशभर संचार करणे शक्य झाले. बाहेरच्या प्रकट कार्याचा, वृत्तपत्रांच्या सरकारी जुलमाविरुद्ध लेखांचा, सभा व्याख्यानादिकांचा, परिणाम पोलिसांवरही होई. काही पोलीस तर म्हणत की, सरकार आम्हांस जो पगार देते त्याच्या निम्मे जरी तुम्ही आम्हांस दिलांत तरी आम्ही या टोपड्यांची नौकरी सोडून देऊं. अशी त्यांच्यापैकी काहीची वृत्ती होऊं लागली होती. शिवाय आम्हीही आमचे काही कट्टे देशभक्त पोलीस, तुरुंग, वगैरे सरकारी खात्यांत भरती करीत होतोच. त्यामुळेही काही पोलीस अधिकारी आम्हांस मदत करू शकत.

१०.३ टिळकांना गोवण्याची कारवाई

येथेच पळशीकरांचे एक पुण्यकृत्य सांगून टाकतो. कोल्हापूर-प्रकरणाप्रमाणे इंग्रज सरकारचा, या आमच्या राज्याक्रांतीच्या गुप्त चळवळींत टिळकांना गुंतवावयाचा हेतू उघड होता. ऱ्यांडचा वध करणाऱ्या चाफेकरांना टिळकांची मदत असावी, असा सरकारचा संशय होताच. आणि चाफेकरांच्या मुलांना द्रव्यसाहाय्य टिळक करीतही असत. त्यामुळे तेव्हापासून सरकार टिळकांना राज्यक्रांतिकारक समजत होतेच. पण त्यांना अशा क्रांतिकारकांच्या जाळ्यांत अडकवण्याची संधी कधी मिळाली नव्हती. 'राज्यक्रांतीचा' महाराष्ट्रातला हा पहिलाच खटला. त्याच्या अगोदर १९०८ मध्ये त्यांना केसरींतल्या लेखांबद्दल ६ वर्षांची शिक्षा सरकारने दावर जज्ज मार्फत दिलीच होती. पण त्याने फक्त लेखांतला 'राजद्रोह' ठरला; टिळकांचा क्रांतिकारकांशी संबंध जुळला नाही. म्हणून या खटल्यांत त्यांचे नाव कुठे तरी गोवावयाचे ही पोलिसांची खटपट होती. १९०६ मध्ये टिळकांची व आमची गुप्त बैठक झाली होती. या खटल्यांत गणूने ते पोलिसांस सांगितले होते. अनंतराव कान्हेऱ्यांनीं 'केसरी', 'काळ' वाचून इंग्रजी अधिकाऱ्यांविरुद्ध आपले मत झाल्याचे, व ज्याक्सनचा वध केल्याचे, कबूल केले होते. तेव्हां या खटल्यांत जर टिळकांचे नाव गुंतवतां आले तर सरकारला हवे होते. गणू हा हुकमी पत्ता सरकारजवळ होताच. त्याच्या जबाबांत त्यांनी टिळकाचे नाव आणले. हा जबाब जेव्हा पळशीकरांसमोर गेला तेव्हा टिळकांचे नाव त्यांत पाहतांच, गणूवर ते खेकसले; व ''गाढवा. त्या महात्म्याचे का नाव घेतोस, शरम वाटत नाही तुला'' असे म्हणून, टिळकांचे नाव खोटेच

गुंतवले होते हे त्याच्याकडून कबूल करून घेऊन, ते त्याला खोडावयास लावले. आणि अशा प्रकारे टिळकांचा संबंध या खटल्यांत आला नाही. पण सरकारचा हा डाव हुकला तरी पुन्हा चिरोलवर जो टिळकानीं खटला केला होता त्यांतही पुन्हा सरकारने चिरोलतर्फे गणूची साक्ष व मुद्याबद्दल काढलीच होती. पण यावेळी गणूने ते सांगण्याचे स्पष्ट नाकारले. 'टिळकांच्या आठवणीं'त ती हकीकत मी दिलीच आहे. असो. आमच्यापैकी 'जुलुमाने' घेतलेले कबुलीजबाब पळशीकरांनी 'आरोपींनीं स्वखुशीने दिले' असे म्हणून शेरे मारले; पण त्याच पळशीकरांनी टिळकांबद्दलचा जिव्हाळा मात्र दाखवला! आमच्यावरील खटल्यांत त्यांनी काय पुण्याई केली असली तर ती एवढीच. असो.

१०.४ ज्याक्सन-वधाबद्दल शिक्षा

धाकदपटशा, छळ, आणि भुलथापा यांनी सर्व साक्षीपुरावा गोळा केल्यानंतर पोलिसांना कळून आले की, ज्याक्सन-वधाशी संबंध सर्वांचा जोडतां येत नाही. म्हणून अनंतराव कान्हेरे, कर्वे, देशपांडे, सोमण, वामनराव जोशी, गणू, आणि द. पां. जोशी या सातांवरच खुनाचा आरोप ठेवून तो खटला निराळाच केला. आणि तों अगोदरच उरकून तिघांना फाशी, ३ जणांना काळे पाणी, व जोशीना २ वर्षे, अशा शिक्षा या स्पेशल ट्रायब्यूनलने दिल्या. झाल्या एवढ्या शिक्षा या आरोपींना पुरे, असे समजून सरकारने त्यांच्यावर, ते कटांत होते तरी, पुन्हा इंग्रज सरकारविरुद्ध सशस्त्र बंड करण्याचा कटाचा खटला भरला नाही. पण त्याच खुनाशी व अधम इंग्रज सरकारने सावरकरांच्या बाबतीत तोही विवेक दाखवला नाही. आमच्या कटाच्या खटल्यांत त्यांना जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा एकतर्फी दिल्यावर - एकतर्फी म्हणण्याचे कारण सावरकरांना, हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायासनासमोर त्यांचा खटला चालू असल्याने, इंग्रजांच्या कोर्टातल्या कामांत भाग घेणे शक्यच नव्हते - पुन्हा सूडबुद्धीने, त्यांच्यावर इंग्रजांविरुद्ध 'युद्धास उत्तेजन' दिल्याचा आरोप ठेवून, त्यांना पुन्हा एकतर्फी निकालावर जन्मठेप व सर्वस्वापहरणाची (इस्टेट जप्तीची) शिक्षा ठोठावलीच!! इंग्रज सरकार किती दुष्ट आणि अधम वृत्तीचे झाले होते याची या सावरकरांच्या दुसऱ्या खटल्यावरूनच साक्ष पटते. असो. खुनाच्या खटल्यांत अंकुशकरला, व आमच्या खटल्यांत तो व जोशी यांना, माफीचे साक्षीदार केले होते. गणूला जन्मठेपीची शिक्षा दिली होती; पण, आमच्यावरील कटाच्या खटल्यांत त्याचा राजसाक्षी म्हणून उपयोग करावयाचा असल्याने, ती रद्द करून ३ वर्षे साधी शिक्षा त्याची केली. आणि त्याला आमच्या खटल्यांतला 'अडला दुवा' करून ठिकठिकाणी जरूर पडेल तसा त्याचा उपयोग करून घेतला.

१०.५ सशस्त्र क्रांतीची कट

खुनाचा खटला संपल्यावर आमच्यावर ''इंग्रज सरकारविरुद्ध सशस्त्र युद्ध करण्यासाठी कट केल्याचा'' १२१ ते १२३ या कलमांतले मुख्य आरोपी ठेवून, शस्त्रास्त्रांचा कायदा, आणि स्फोटकशास्त्रांचा कायदा हेही लावून, सरकारी कारवाई सुरू केली. इंग्रज सरकारविरुद्ध 'युद्ध' केल्याचा आरोप आमच्यावर लादण्याचा पहिला हेतू होता. पण मागाहून अक्कल सुचल्यामुळे तो बेत रद्द केला. खास कोर्टानेही १२१(अ) शिवाय बाकीची कलमे लागूं पडत नाहीत, असे

ठरविले. त्यामुळे कटाचा पुरावा सुरू झाला. मित्रमेळा व अभिनव भारत यांचा मुख्य प्रारंभींचा कट. पण सरकारला मिळालेले साक्षीदारच असे होते की, त्यांना आमच्या संस्थेचे आरंभवर्षही माहीत नव्हते! वास्तविक मित्रमेळा १९०० मध्ये स्थापन झाला. १९०१ सालीं त्याने जाहीर गणेशोत्सवही केले होते. वृत्तपत्रांतही ते गाजले होते. पण सरकारच्या 'गुप्त' पोलिसांना हे 'जाहीर' उत्सवही माहीत नव्हते! त्यांनी मारून-मुटकून बनवलेला मित्रमेळ्याचा सभासद गोसावी यालाही ते माहीत नव्हते. गोसावड्याने मित्रमेळा १९०३ मध्ये स्थापन झाला, आणि त्याचा तो मूळ सभासद होता, असे साक्षीत सांगितले! आणि सरकारनेही तेच खरे धरले! दुसरा खोटा साक्षीदार अमरसिंग. हा मुळीं पोलीसच होता. त्यानेही ठोकून दिले की, तो मित्रमेळ्याचा सभासद होता; आणि (बाळ) नारायणराव सावरकर हे मित्रमेळ्याचे मूळ सभासदही होते! वास्तविक बाळ तेव्हा १२-१३ वर्षांचा मुलगा होता. तेव्हा तो मूळ सभासद असणे अशक्य होते. हे कोर्टालाही पटले. बाळ सावरकराशी आपली जानी दोस्ती होती असे म्हणणाऱ्या या साक्षीदाराला बाळला ओळखतांही आले नाही ! तेव्हा सरकारतर्फेची त्याची साक्ष रद्दच ठरली. तिसरा साक्षीदार धानाप्पा वाळवे. पण त्याने अगदीच त्रोटक हकीकत सांगितली. एवंच, पुष्कळसा आमच्याविरुद्ध असलेला पुरावा असा बनावटच होता. पण आम्हांला तो खोडून काढणे अशक्य होते.

१०.६ आमचे अगतिकत्व

कारण आमचा गुप्त कट राजाविरुद्ध बंड करण्यासाठी होता, हे स्पष्टच सरकार म्हणत होते. आम्ही ते खोडून काढणे म्हणजे सरकारी साक्षीदार खोटे आहेत हे ठरवण्यासाठी आमचे साक्षीदार बोलावणे. आणि त्यांना बोलावयाचे म्हणजे त्यांनी आपण गुप्त कटांत होतो हे प्रथम कबूल करून मग, सरकारी साक्षीदार खोटे बोलतात, खरी वस्तुस्थिती अशी अशी आहे, हे शपथेवर सांगणे. गुप्त कटांची ती कबुली त्यांच्याच विरुद्ध प्रथम जाऊन तेच आमच्या बरोबर, किंवा नंतर, आरोपी म्हणून यावयाचे, अशी तेव्हा धास्ती होती. मग हे दिव्य कोण करणार? आणि करून तरी उपयोग काय होणार ते दिसतच होते. म्हणून आम्हांला सरकारी साक्षीदार खोटे आहेत, हे सिद्ध करणे अशक्यच होते. सरकारतर्फे आलेल्या गुप्त कटांच्या या २ मानीव सभासदांना सरकारने माफी देणे, हे त्यांच्या हातचे होते. पण आमच्यातर्फे आलेल्या सभासदांना आम्ही थोडेच माफी देऊं शकत होतो? उलट त्यांना सरकारच्या जबड्यांत लोटण्यासारखे आमचे काम झाले असते. म्हणून आम्हांला सरकारी साक्षीदारांचे वाभाडे काढणे अशक्यच होते.

आमच्याप्रमाणेच सावरकरांचीही गत झाली होती. ''मी मार्सेल्सला उडी टाकून पोहून किनाऱ्यावर लागल्यावर फ्रान्सच्या हद्दीत होतो. तेथें पकडण्याचा इंग्रज सरकारला अधिकारच नाही'', असे त्याचे म्हणणे होते. आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचा हा प्रश्न असल्यामुळे तो हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयापुढे इंग्लंड व फ्रान्स यांनी मांडला होता. या प्रश्नाचा जर सावरकरांना अनुकूल निकाल लागता तर इंग्रज सरकारला त्यांना मुक्त करून फ्रान्सच्या हवाली करणे प्राप्त होते. आणि म्हणून सावरकरांनीं ब्रिटिश कोर्टाचा, अधिकार न मानणे, हेच कायदेशीर होते. कारण तो मानला तर हेगचा सर्वच खटाटोप व्यर्थ जात होता. म्हणून कोर्टातल्या कामांत, या

परिस्थितीमुळे, ''मला हेगचा निकाल लागेपर्यंत, भाग घेणे शक्य नाही'', असे त्यांनी कोर्टाला स्पष्टच सांगितले. पण त्यांना चिरडण्यासाठी सरकार टपलेच होते. ते आपल्या हातांत सांपडलेली शिकार कशी जाऊं देणार? अगदी काटेकोर न्यायाप्रमाणे म्हटले तर त्यांच्यावरचा खटला हेगच्या निर्णयापर्यंत स्थगित करणे हेच या खास 'न्याय'कोर्टाला शोभले असते. पण न्यायाधीश झाले तरी ती माणसेच. कोर्टातले दोन न्यायाधीश कट्टे इंग्रज व त्यांचे तोंडीं लावणे तिसरे चंदावरकर. ते इरसाल मवाळ व सरकारजमा झालेले. ते कसे इतका न्याय सावरकरांच्यासारख्या इंग्रजांच्या कडव्या शत्रूला दाखवतील? त्यांनी पळवाट काढून सावरकरांचा मुद्दा मान्य केला नाही, आणि सावरकरांवरील काम पुढे चालविले! त्यामुळे सावरकरांना दोन्हीही खटल्यांत अगदीं मुग्ध बसावें लागले. आणि निर्लज्जपणे या खास 'न्याय' कोर्टाने त्यांच्याविरुद्ध एकतर्फी निकाल व 'न्याय' दिला !

शिवाय कायद्यातल्या एका कलमांप्रमाणे, जेव्हा अनेकांविरुद्ध खटला चालू असतो तेव्हा, त्यांच्यापैकी एकाने पुरावा दिला, आणि बाकीच्यांनीं न दिला, तरी सर्वांच्या विरुद्ध आरोपीतर्फेच्या वकिलांच्या भाषणाला सरकारी वकिलाला पुन्हा उत्तर देण्याचा हक्क असतो. कोणाही आरोपींनीं पुरावा दिलाच नाही तर हा हक्क सरकारी वकिलाला नसतो. आमच्यातर्फे पुरावा देण्याच्या अडचणी वर सांगितल्याच आहेत. पण मला माझ्यावरचा चतुर्भुजचा आरोप चांगला खोडतां आला असता. कारण ज्यावेळी त्याने माझी गांठ घेतली, व पिस्तुलांबद्दल त्याचे माझे बोलणे झाले, असे तो म्हणत होता, त्या नेमक्या तासाला व तारखेला, मी मुळी ग्रांट मेडिकल कॉलेजमध्ये हजर होतो. आणि हजरीपटावर माझी हजेरी नोंदलेलीही होती. मी तो हजरीपटाचा पुरावा दाखवूं इच्छित होतो. पण त्या एका गोष्टीसाठी, बाकीच्यांनी कोणीही पुरावा दिलेला नसल्याने, आमच्या बचावातर्फे जी मुद्देसूद भाषणे आमचे बॅरिस्टर करणार होते, त्यांना उत्तरें देऊन, ती खोडण्याचा हक्क सरकारी वकिलाला मिळाला असता. आणि त्यामुळे कोर्टाच्या मनावर आमच्या बॅरिस्टरीच्या मुद्देसूद भाषणाचा जो काही इष्ट परिणाम होण्याचा संभव होता त्याला खो बसता. म्हणून मला माझ्या मित्रांनी व वकील-बॅरिस्टरांनीं गळ घातली की, तो पुरावा देऊं नये. आणि मला त्यांचे म्हणण्याला, नाइलाजाने, मान तुकवावी लागली. मनाविरुद्ध निकाल देतांना, या पिस्तुलाच्या मुद्यावर, भटांतर्फे पुरावा आला नाही, असे निकाल-पत्रकातही कोर्टाने म्हटले आहे. आणि चतुर्भुजचे म्हणणे खरे धरून त्या मुद्द्यावर माझ्याविरुद्ध निकाल दिला आहे. मला अद्यापही वाटते की, हा मुख्य मुद्दाच जर माझ्या म्हणण्याप्रमाणे मला अनुकूल ठरता, आणि चतुर्भुज खोटा ठरता, तर कदाचित मला हरिभाऊ थत्ते यांच्याप्रमाणे संशयाचा फायदा मिळून मी दोषमुक्त झालो असतों, किंवा निदान शिक्षा तरी कमी झाली असती. पण मला बहुतमाचे ऐकावे लागले. आणि त्याचा भूर्दंड ५ वर्षे शिक्षा भोगावी लागली? 'कायदा गाढव असतो' अशी जी इंग्रजीत म्हण आहे, तिचा पुरा अनुभव सावरकरीना व मला असा आला. असो.

१०.७ बॅ. बॅप्टिस्टांचे उपकार

आमच्यासाठी बॅ. बॅप्टिस्टा यांनी जे आपुलकीने, नि:स्वार्थाने, कळकळीने आणि अतिशय हुषारीने कोर्टांत काम केले त्याबद्दल त्यांना आमच्या कृतज्ञतेची पुष्पांजली वाहणे माझे कर्तव्य

आहे. आमच्यापैकी पुष्कळसे अगदी गरीब, निष्कांचन, होते. पण एक पैही न घेतां, अशा दरिद्र्यांचे काम त्यांनी मनोभावाने केले. ''वकीलपत्रावर फक्त सही, आणि असेल ती माहिती, द्या आणि माझ्यावर विश्वास टाकून निर्धास्त असा'', असे त्यांनी आमच्यापैकी पुष्कळांना आश्वासन दिले, आणि त्यांचे कामही केले. या त्यांच्या निरपेक्ष सेवेबद्दल आम्हां सर्वांच्याच मनांत अत्यंत आदर वसत होता. बॅ. सावरकरांचे सर्व काम त्यांनी असेच पूर्ण निरपेक्षतेने केले. त्यावेळी आमच्यातर्फे कोर्टांत उभें राहण्यासही वकील-बॅरिस्टर भीत होते. अशा वेळी या वृद्ध त्यागी देशभक्ताने पुढे येऊन आमचा व इतर वकील-बॅरिस्टरांचा मार्ग सुकर केला, याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तितके थोडेच. इतरही बॅरिस्टर-वकिलांनीं त्यांचे धाडस पाहून आमचीं वकिलपत्रे घेतली. पण टक्के मोजून घेतल्यावर! बॅप्टिस्टाकाका व इतरेजन यांमध्ये हा फरक होता.

१०.८ न्यायाची विचित्रता व घाई

आमच्या खटल्याच्या निकाल-पत्रकात पुष्कळसा भर आरोपींच्या कबुलीजबाबांवरच दिलेला आहे. इतर स्वतंत्र पुराव्याने आरोपींच्या कबुलीजबाबाची शाबिती झाली तरच कबुलीजबाब विश्वासार्ह मानावे, असा पुराव्याच्या कायद्यात सर्वमान्य संकेत आहे. आणि तोही हिंदुस्थानांतले पोलीस आरोपींना छळून कबुलीजबाब घेतात, हे निदर्शनाला आल्यावरून रूढ झालेला आहे. पण आमच्या खटल्यांत परस्परांच्या कबुलीजबाबांनीं कबुलीजबाब सिद्ध मानून आरोप सिद्ध झाले, असा कोर्टाने निष्कर्ष काढला होता. पुढे कित्येक वर्षांनीं, मी १९१५ त सुटून आल्यावर, हायकोर्टांत एका खटल्यांत कबुलीजबाबांच्या शाबितीचा प्रश्न निघाला होता. आणि वकिलांनीं, आमच्या खास कोर्टाने दिलेल्या निकालाचा आधार घेऊन, स्वतंत्र पुराव्याने कबुलीजबाब सिद्ध न झाले तरी ते विश्वासार्ह मानावे, असा मुद्दा त्यावेळचे न्यायमूर्ति शहा यांच्यापुढे मांडला. न्यायमूर्ति शहांनीं त्यावेळी उद्गार काढलेले प्रसिद्ध आहे की, ''१९१० चा खास कोर्टाचा निकाल विशिष्ट परिस्थितीत दिला असल्याने मी तो मुळींच मानीत नाही!' या स्वतंत्र बाण्याच्या न्यायमूर्ति शहांच्या शालजोडींतल्या अहेरावरून आमचा खास कोर्टाच्या निर्णयाची किंमत पुढच्या कालांतल्या स्वतंत्र वृत्तीच्या न्यायमूर्तींनी किती मानली होती, याची वाचकांना कल्पना येईल. त्यांतही आरोपींचा छळ झाल्यामुळेच हे कबुलीजबाब दिले आहेत, असे याच आमच्या कोर्टाला, काही बाबतीत तरी, वाटले होते, हे त्यांच्याच एका निर्णयावरून दिसते (करंदीकरकृत सावरकर-चरित्र, पान ४३२). आणि या कोर्टानेच पळशीकर-खोपकर या म्याजिस्ट्रेटांना या कबुलीजबाब घेण्याच्या पद्धतीबद्दल कसे तासले होते, हेही त्या ग्रंथांतच (पृ. ४३३-३४) दिले आहे. असे असूनही या कबुलीजबाबांवरच कोर्टाने विश्वास ठेवला तरी कसा, याचेच आश्चर्य वाटते. याबद्दल पुढे परिशिष्टांत अधिक वर्णन दिले आहे.

या खास 'न्याय' कोर्टाची निकाल जाहीर करण्याची घाईही अशील विलक्षण होती. २१-१२-१९०९ ला ज्याक्सनचा वध होऊन पकडापकडीला सुरुवात झाली. आणि तेव्हांपासून आम्हांला पकडून तब्बल १ वर्ष पुरे होईतों या खटल्याचे काम चालले होते. १५-९-१९१० ला या खास कोर्टांत आमच्या कामाला प्रारंभ झाला, आणि आमच्यातर्फेच्या बॅरिस्टरांची भाषणे २२-१२-१९१० ला संपली. १२ महीने चाललेल्या, व ३५ आरोपी असलेल्या, या अभियोगाबद्दल पूर्ण

विचार करून निर्णय देण्याला कोणत्याही कोर्टाला निदान ८-१५ दिवस तरी सहज लागले असते. पण २२-१२-१९१0 ला, आमच्या बॅरिस्टरांची भाषणे संपली न संपली तोच, २४-१२-१९१0 ला, आमच्यावरील सर्व प्रचंड पुराव्याचे मंथन करून, या कोर्टाने आपला निकालही जाहीर केला! एका चोवीस तासांच्या प्रचंड व प्रदीर्घ कालावधींत या न्यायमूर्तींनी, आमच्याविरुद्ध असलेल्या पुराव्याच्या सागराचे मंथन करून, चुटकीसरशी आपला निर्णय कसा दिला, ही गोष्ट लोकाना विस्मयास्पद तर वाटलीच, पण कोर्टाच्या 'न्याया'बद्दल शंकास्पदही झाली. आणि त्यामुळे या खटल्याचा निर्णय अगाऊच ठरला होता, असे लोकप्रवादही ऐकू येऊ लागले. या तडकाफडकी दिलेल्या निर्णयाने लोकाचे इंग्रजी न्यायपद्धतीबद्दल वाईट मत झाले असले तर त्यांत लोकांचा दोष काय?

१०.९ इंग्रज व हिंदी पोलीस

असो; या आमच्यावरील चाललेल्या खटल्याबद्दल लिहावे तितके थोडेच. सरकारी जुलुमाचा कोळसा कितीही उगाळला तरी तो काळाच ठरणार. म्हणून हे प्रकरण येथेच आटपते घेतो. पण एका गोष्टीबद्दल मात्र उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. ती म्हणजे इंग्लंडमधील पोलिसांची आरोपींशी वागणूक आणि आमच्या पोलिसांची वागणूक यांतला फरक. जेव्हा हुतात्मा धिंग्राला कर्झन वायलीचा खुनी म्हणून पकडले तेव्हा त्याचा इंग्रज पोलिसांनी कोणताही छळ केला नाही. इतकेच नाही, तर उलट तेथल्या पोलिसांनीं त्यांना बजावले की, - 'जी जी गोष्ट तुम्ही, खुषीने का होईना पण, आमच्याजवळ सांगाल ती आम्ही तुमच्याविरुद्ध उपयोगांत आणूं. काय सांगावयाचे किंवा न सांगावयाचे याबद्दल तुमच्यावर सक्ती नाही!' कोठे ही इंग्रज पोलिसांची भलाई व सुजनता आणि कोठे आमचा अनन्वित छळ करून पुरावा गोळा करू पाहणाऱ्या आमच्या पोलिसांची क्रूरता व अधमपणा? तसेच स्कॉटलंडयार्डचा सावरकरांविरुद्ध आणलेला साक्षीदार पार्कर यांनेही, सावरकरांना अधिक गुंतवण्यासाठी, खोटे बोलण्याचे साफ नाकारले, आणि स्पष्ट सांगितले की, चतुर्भुजने आणलेली पिस्तुले सावरकरांनी विकत घेतली नव्हती! त्याच्या सर्वस्वीं उलट आमच्या पोलीस अधिकाऱ्यांचे वर्तन होते. त्याच्या साक्षीत खऱ्याखोट्याचा विधिनिशेधच नव्हता! हल्लीचे पोलीस अधिकारी पूर्वीपेक्षां सुधारले आहेत, पण ते अधिक सत्य व न्यायनिष्ठ झाले तर स्वतंत्र हिंदुस्थानला ते भूषणच होतील.

१०.१० बंड केल्याबद्दल झालेल्या शिक्षा

या खटल्यांत सरकारविरुद्ध उठलेल्या बंडखोरांना 'न्याय'मूर्तींनी दिलेल्या शिक्षा व आरोपींचीं नावे येणे प्रमाणे :-

१. बॅ. विनायक दामोदर सावरकर (५0 वर्षे काळे पाणी), २. केशव श्रीपती चांदवडकर (५ वर्षे), ३. त्र्यंबक गंगाधर मराठे (१0 वर्षे), ४. कृष्णाजी गोपाळ खरे (१0 वर्षे), ५. गोपाळ कृष्ण पाटणकर (१0 वर्षे), ६. व्यंकटेश परशराम नागपूरकर (७ वर्षे), ७. विष्णु महादेव भट (५ वर्षे), ८. सखाराम दादाजी गोऱ्हे (५ वर्षे), ९. दामोदर महादेव चंद्रात्रे (५ वर्षे), १0. पुरुषोत्तम लक्ष्मण दांडेकर (५ वर्षे), ११. गोपाळ गोविंद धारप (५ वर्षे), १२. श्रीधर वासुदेव शिधये (४ वर्षे), १३. वामन काशिनाथ पाळंदे (४ वर्षे), १४. दामोदर चिंतामण परांजपे (४

वर्षे), १५. रघुनाथ विद्याधर भावे (४ वर्षे) , १६. विष्णु गणेश केळकर (३ वर्षे), १७. काशिनाथ दाजी टोणपे (३ वर्षे), १८. अनंत विष्णु कोनकर (३ वर्षे), १९. विश्वास बळवंत डावरे (३ वर्षे), २०. पुरुषोत्तम वामन गोखले (३ वर्षे), २१. विनायक गोविंद तिखे (२ वर्षे), २२. बळवंत रामचंद्र बर्वे (२ वर्षे), २३. सखाराम रघुनाथ काशीकर (२ वर्षे), २४. विनायक वासुदेव मनोहर (६ महीने), २५. गंगाराम रूपचंद (६ महीने), २६. रघुनाथ चिंतामण अंबेडकर (६ महीने), २७. नारायण दामोदर सावरकर (६ महीने). एकूण ३८ आरोपींपैकी ११ दोषमुक्त म्हणून सोडून दिले.

१०.११साध्या चुकीचे घनघोर परिणाम

ब्रिटिश सरकारविरुद्ध आम्ही बंड उभारले होते, तेव्हा केव्हां तरी हा प्रसंग आमच्यावर कोसळणारच होता. मला हे स्वप्न पडत होते म्हणून मी डॉक्टरीचा अभ्यास पत्करला होता, हे मागे सांगितलेच आहे. पण तो प्रसंग, आमच्या योजनेप्रमाणे सर्व होऊन, सरकारला चांगलाच हात दाखवल्यावर झाला असता तर आम्हांला त्याचे वाईटही वाटले नसते. आम्ही आपल्या प्राणांची अंजली घेऊन स्वातंत्र्यलक्ष्मीला अर्पायला सिद्ध होतो पण आमच्या प्राणांची, आमच्या सर्वस्वाची, होळी होत असतां शत्रूचाही पुरा वचपा घेतल्याचे श्रेय आम्हांस हवे होते. आणि आम्हांला सर्व देशभर निदान देशांत पुष्कळ ठिकाणी, एकदम उठावणी करून, इंग्रज सरकारला हादरून भेदरून टाकण्याची योजना, बंगाली क्रांतिकारकाशी हातमिळवणी करून, अमलांत आणावयाची होती. तिच्यासाठी आम्ही बरेंचसे साहीत्य - शस्त्रास्त्रें - जमवले होते व जमवीतही होतो. त्याचा व्याप किती होता हे मागे आलेच आहे. तो आणखी वाढवण्याची, ठिकठिकाणी त्याचे साठे करण्याची, आमची तयारी वाढत चालली होती. आणि पुरेसा साठा होईपर्यंत, आणि बंगाली क्रांतिकारकाचे सहकार्य मिळून सर्व सिद्धता पुरी होईपर्यंत, आम्ही दबा धरून बसलो होतो. पण आमचे भवितव्य निराळे होते. आमच्या धुरंधर कर्व्यांच्या आश्वासनावर आम्ही विसंबून असतां, त्यांना असा एकदम अपघाती मोह होईल, अशी आम्हांस कल्पना नव्हती. अकालिक आणि वैयक्तिक उठावणी ही आम्हांला, आमच्या योजनेला, त्यावेळी तरी, घातक होती. पण कर्व्यांना ती करण्याचा मोह झाला आणि त्यांनी ज्याक्सनचा वध घडविला. हा अचानक झाला हे खरेच. पण त्यांना तरी काय कल्पना की, पूर्ण दूरदृष्टीने त्यांनी जी या वधाची योजना, शक्य तितक्या कसोशीने, ठरविली ती अनंतराव कान्हेऱ्यांनीं, सहज कीर्तिलोलुपतेमुळे, सांगितलेल्या नावगांवावरून इतकी घातकी ठरेल? अनंताला तरी काय कल्पना की, कर्व्यांच्या इशाऱ्याविरुद्ध घडलेल्या थोड्याशा चुकीने, एवढा कल्लोळ उठेल? अनंताबरोबर आलेलीं दोन मुले जर स्टेशनवर न जातां गांवांतच ७-८ दिवस राहती तर काहीच घडले नसते. बरें त्या दिवशी सकाळच्या गाडीने शेकडो लोक मुंबईस गेले होते. कोणाहीबद्दल पोलिसांना शंका आली नव्हती. पोलिसांना तरी ही शिकार अगदीं अकल्पित सहजासहजी सांपडली. पोलिसांचा कावळा बसावयाला आणि आमच्या दैवाची फांदी मोडावयाला एक गांठ पडली. आमच्या सर्वांच्या दुर्दैवाचा तो एक भयानक सहज एका तासांतला खेळा होता. साध्या चुकीचे, पण अत्यंत भयंकर परिणामकारी, असे प्रायश्चित्त आम्हांस मिळेल अशी कल्पनाच कोणाची नव्हती. यामुळे पुष्कळसा आमच्या दुर्दैवानेच हा आमचा छळ आरंभला होता असेच म्हणावें लागते. त्या दुर्दैवाचे खेळ पुढच्या प्रकरणांत विस्ताराने येतील. पण किरकोळ शिस्तभंगाच्या मामुली चुकीचे इतके घनघोर परिणाम होतील हे कोणाच्याच स्वप्नांतही नव्हते.

ते परिणाम दृष्टीस पडल्यावर कर्व्यांनीं आपणांवर फाशीची शिक्षा ओढवून घेतली. एका घुंगरुटाला मारण्यामुळे आमच्या सर्वस्वाचा नाश झाला, हे त्यांना सारखे बोचत होते.

१०.१२ अभिनव भारताची योजना

अभिनव भारताचे राजकीय धोरणं, योजना, काय होती याचे खुद्द सावरकरांनीच आपल्या आत्मवृत्तात वर्णन केले आहे. ते म्हणतात, ''त्या सशस्त्र क्रांतीची योजना तरी कोणती?... जी माझिनी, आयर्लंड, आणि रशियांतील क्रांतिकारक ... आचरीत होते, आणि १८५७ च्या क्रांतीयुद्धांत भारताने आचरून दाखविली. त्या योजनांच्या आधारे तेच गनिमाकाव्यांचे धोरण... सैन्यांत आणि पोलिसांत क्रांतीचा प्रसार आणि गुप्त क्रांतिकारकांची भरती करणे, ... परराष्ट्रांशी संधान बांधणे, इंग्रजी सत्तेच्या केंद्रावर आणि प्रतिनिधींवर वैयक्तिक छापे येतां जातां घालणे, संस्थानांतून आणि सरसीमेपलीकडे शस्त्रास्त्रांचे सांठे करून, मधून मधून शक्य होतांच, लहान-मोठ्या उठवण्या आणि बंडें करीत राहणे, त्यायोगे देशांत क्रांतीचे शिक्षण, मरणाचे बाळकडू, मरणाची क्षम्यता प्रदीप्तवीत शत्रूस राज्यशकट हाकणे अधिकाधिक धोक्याचे आणि दुर्घट करीत जाणे, आणि शेवटी एखाद्या महायुद्धात इंग्लंडचे बळ ... क्षीण होत असता भारतांतही निकराचे क्रांतियुद्ध पुकारून मुक्त होणे, ... पुन्हा फसल्यास पुन्हा तशीच उठावणी घेणे, ही त्यावेळच्या आमच्या सशस्त्र उठावणींची रूपरेखा होती. इंग्रजांचे १0-१५ लोक मारले की ते पळतील अशी दुधखुळी समजूत आम्ही केव्हांही करून घेतली नव्हती. पण आमची निष्ठा अशी की, तीस कोटि लोकाचे हे राष्ट्र. यांतील ... २ लक्ष वीर जरी अशा छाप्याने ... वृकयुद्ध लढू निघतील तर आपले स्वातंत्र्य संपादन करू शकतीलच शकतील'' (पृ. २३0)

वरील उताऱ्यावरून 'वैयक्तिक छापे', ''लहानमोठ्या उठावण्या आणि बंडें' मधून मधून करीत राहणे हे या योजनेत समाविष्ट होतेच. क्रांतीचे शिक्षण, मरणाचे बाळकडू, शत्रूस राज्यशकट हाकणे धोक्याचे आणि दुर्घट करीत राहणे, आणि शेवटी, एखाद्या महायुद्धांत इंग्लंडचे बळ क्षीण झाले असतां, भारतांत क्रांतियुद्ध पुकारून मुक्त होणे याच गोष्टी अनुक्रमें आम्ही करू इच्छित होतो. आणि बंगाली करीतिकारकही त्याच रीतीने कार्य करीत होते. त्यांत फसण्याचा संभव होताच. पण योजनाबद्धता असून ते फसणे निराळे, आणि योजना न करतां एकदम अचानकपणे शत्रूच्या प्रतिनिधीवर वैयक्तिक छापा घालणे निराळे. योजनाबद्धतेत आपले साथीदार सावध असतात आणि म्हणून शत्रूच्या हातांत सांपडत नाहीत. योजना नसल्यास ते सांपडतात. आणि हुतात्मा कर्व्यांनीं अचानकपणे योजलेल्या या छाप्यांत आम्ही कोणीच, नाशिकचे केळकरशास्त्रीसुद्धां, सावध नसल्याने सांपडलों आणि सर्व खटाटोप वाया गेला. आमच्या स्वार्थत्यागाबद्दल पुरी किंमत आम्हांस मिळाली असती, शत्रूची आमच्या इतकीच नुकसानी झाली असती, तर आम्हांस कृतार्थता वाटली असती. पण युद्धांत, आणि राज्यक्रांतिसारख्या दीर्घकालीन युद्धांत, अशी केव्हां केव्हां फसगत होतेच. आणि त्या फसगतीमुळे भलतेच नुकसानही सोसावें लागते. आमचे दुर्भाग्य होते ते. पण आमची सेवा वाया गेली नाही. अंशतः तरी ती मातृचरणी रुजू झालीच आहे. कारण बायरन कवीने म्हटल्याप्रमाणे

Freedom’s battle once begun,

Bequeathed by bleeding sire to son

Though baffled off is ever won.

''स्वातंत्र्याचे युद्ध एकदां सुरू झाले की, ते रक्तबंबाळ पित्याने पुत्रांस शेवटची ठेव म्हणून दिले जाते, आणि त्यांत कितीही पराजय झाले तरी शेवटी त्या युद्धांत विजय मिळतोच मिळतो.'

१०.१३ तिचे अंतिम साफल्य

आमच्या रक्तबंबाळ पिढीने पुढच्या पिढ्यांस तो स्वातंत्र्ययुद्धाचा ठेवा दिला; आणि महात्माजींच्या आणि सुभाषचंद्रांच्या धुरिणतेखालीं, १९२० ते १९४७ पर्यंत तो पुढच्या पिढ्यांनीं, पण आमच्या योजनेप्रमाणेच वर्तून, त्यांत जय मिळवला आहे. आम्हांला त्यांतच समाधान आहे. काहीसे नि:शस्त्र प्रतिकाराने, सत्याग्रहाने, आणि काहीसे उठावणी, बंडें, करून, सैन्य फितवून, सुभाषचंद्र बोस यांनी, इंग्रजांस राज्याशकट हांकणे दुरापास्त केले. आणि दुसऱ्या महायुद्धांत इंग्लंडचे बळ क्षीण होत असतां, १९४२ त 'चलेजावची' म्हणजे महात्माजीनीं Do or Die ची क्रांतीची, चळवळ उठवून इंग्रजांस जेरीस आणले, आणि सुभाषबाबूंनी सशस्त्र सैन्यच आसामच्या सरहद्दीवर आणून इंग्रजांस त्राही भगवान् करून सोडले. आमचा बेत न फसता, आणि आम्हांला ४/५ वर्षे दबा धरून चढाईची तयारी करतां आली असती, तर अशीच १९१४ ते १९१८ ची पहिल्या महायुद्धाची संधी अनायसे प्राप्त झाली असता, आम्हीही सशस्त्र क्रांतीच्या युद्धाची उठावणी करू शकलो असतो. पण ते भाग्य आमचे नव्हते. ईश्वराची इच्छाच तेव्हा भारत स्वतंत्र व्हावा अशी नव्हती. पण जरी तेव्हा आमच्या हातून भारत स्वतंत्र न झाला तरी आज तो झाल आहे, हेच आमच्या अल्पशा प्रयत्नांचे बक्षीस आहे. आणि यांतच आमचा संतोष आहे. इंग्रज सरकारनेही आमच्याविरुद्ध बंडाचाच आरोप करून आमचे उद्दिष्ट काय होते याची ग्वाही दिली आहे. आणि हे उद्दिष्ट त्याच योजनेने, थोडीशी कालमानाप्रमाणे निराळी साधने वापरून, महात्माजी व नेताजी यांनी साध्य केले आहे.

११ अपयशाची कारणमीमांसा

असो. झाल्या त्या अनिष्ट गोष्टी होऊन गेल्या. त्यांचे भयंकर परिणामही भोगले. कित्येकाच्या संसाराची राखरांगोळीही झाली. कित्येक धारातीर्थी पतनही झाले. पण आमच्या डॉक्टरी वैद्यशास्त्रांत रोगी मेल्यावरही, शक्य असेल तर, त्याचे प्रेत फाडून आपले रोगनिदान बरोबर होते की नाही, हे पाहण्याचा प्रघात आमच्या शिक्षणक्रमांतच समाविष्ट असतो. त्याप्रमाणे पाहीले तर आमच्या सभासदांची बौद्धिक तयारी, गुप्त मंडळ्यांच्या अस्तित्वाला व सातत्याला जितकी अवश्य असते त्यापेक्षां, पुष्कळच कमी ठरली असे म्हणणे भाग येते. याचे कारण इतकेच की त्यांनी, दर आठवड्यास किंवा इतर वेळीही, गुप्त संस्थांच्या कारवायांचे शिक्षणच घेतले नव्हते. अभिनव भारताच्या काही गुप्त बैठकीतून हे शिक्षण कटाक्षाने देण्यांत येत असे. 'बुद्धिर्यस्य बलं तस्य' हा आमचा विश्वास होता. युद्धशाळेमध्ये ज्याप्रमाणे हल्ल्याचे (offensive) आणि बचावाचे (Defensive) शिक्षण घोळून घोटून देण्यांत येते, व इतर देशांच्या लढायांतील उदाहरणे देऊन सैनिकाचे प्रसंगावधान व समयसूचकता वाढवण्याची शिकवण दिली जाते, तसेच गुप्त संस्थांमधल्या सैनिकांनाही दिले पाहिजे. म्हणजेच संभाव्य अडचणींच्या वेळी कसे वागावे, संकटांत कोणत्या युक्त्या-प्रयुक्त्या योजाव्या, हे सैनिकांस, विशेषतः सेनाग्रणींस, चटकन समजते. प्रचलित सत्तेविरुद्ध उठावणी करून क्रांति करणाऱ्या गुप्त संस्था म्हणजे गनिमीकाव्याच्या सैन्यांतले लहान लहान गटच होत. त्यांना या असल्या शिक्षणाची तर अतिशय आवश्यकता असते. आम्ही हे आमच्या काही सभासदांना शिकवीत होतो. बाबा सावरकरांच्या झडतीत पाश्चात्य गुप्त संस्था व युद्धशास्त्रावरील जी पुस्तके सांपडली ती या उद्देशाकरितांच संग्रहांत ठेविली होती. आमचे सरकारी निवृत्तवेतनी मित्र रा. हरिभाऊ रिसवूड म्हणतात की, कै. अण्णासाहेब परांजपेच ही पुस्तकें बाबांना देत असत. माझिनी, ग्यारिबाल्डी, यांच्या 'कारबोनारी', 'तरुण इटली' या गुप्त संस्थांची माहिती व फ्रेंच राज्यक्रांति, आयरिश गुप्त संस्था, डचांची स्वराज्यस्थापना, अमेरिकेतल्या स्वातंत्र्यपूर्व गुप्त संघटना यांबद्दलचीं पारायणे आमच्या काही साप्ताहिक सभांतून होत. समर्थ रामदासस्वामींनी मठस्थापना कशी केली, व गुप्त संघ कसे प्रस्थापित केले, याचे दासबोधपठनही वारंवार आम्ही करीत होतो. त्यामुळे अभिनव भारताचे बरेचसे सदस्य समयज्ञ व हजरजबाबी (Resourceful) होत असत. पण या कटांत समाविष्ट केलेल्या इतर गुप्त शाखांत हे शिक्षण देण्याचा फारसा प्रघात नव्हता. उलट, व्याख्यानबाजी म्हणून त्यांची हेटाळणी होत असे. त्यामुळे दुर्दैवाने, भयंकर प्रसंग अचानक येऊन ठेपल्यावर, हे सभासद गांगरून जाऊन किंकर्तव्यतामूढ झाल्यास नवल नव्हते. अगदी पूर्वनियोजना करून दिली असली तरीही कित्येकजण प्रसंगी भांबावून जातात. मग ज्यांना नियोजन फारसे माहीत नव्हते, आणि गुप्त कटांतल्या व्यवहाराचा अनुभव नव्हता, असे विशीच्या आंतले तरुण, अशा शिक्षणाभावीं, गांगरून गेले नसते तरच नवल. ज्यावेळेस पिस्तुले विलायतेहून आली, व ज्यांस मी ती आणावयास सांगितलीं, त्या गोपाळराव पाटणकरांना मी त्यावेळीच बजावले होते की, केव्हांही, केवळ अपघाताने, वा दुर्दैवाने, तुमच्या हाती शस्त्र सांपडेल, त्यावेळी ते शस्त्र कोणाकडून आणले असा पोलिसांनी प्रश्न विचारल्यास कोणी तरी नुकत्याच मेलेल्या आपल्या एका मित्राचे नाव सांगून, त्याने ती दिली असे म्हणून, मोकळे व्हावे, म्हणजे तेथेच सांखळी तुटते, आणि बाकीची शस्त्रे व माणसे बचावतात. पण हे

सांगूनसवरून झाले असतांही पाटणकरांनीं त्यांचे मृत मित्र विठ्ठलराव मराठ्यांचे नाव भलत्याच ठिकाणी सांगितले! आणि त्यामुळे त्या युक्तीचा काहीच उपयोग झाला नाही. बॉम्बचा कारखाना कसा वाचवावा या विचाराने ते अगदीं भांबावून गेले होते. म्हणून ते ही युक्ती विसरले. त्यांच्यापेक्षां मग आमच्या माधवराव गाडगीळांनीं आपली समयज्ञता चांगलीच गाजवली. ग्वाल्हेरहून आणलेले पिस्तुल गोदावरीच्या डोहांत फेकून दिले, अशी थाप मारून त्यांनी पोलिसांना तर चकवलेच, पण पिस्तूलही सुरक्षित ठेवले. कै. शंकर पांडुरंग महाजनांनीं असेच समयज्ञतेचे उत्कृष्ट दर्शन पोलिसांस चकवून घडवले होते. त्याचे वर्णन मागे आलेच आहे. अनंतराव कान्हेऱ्यांनींही औरंगाबादेस आपण अरबाकडून पिस्तुले घेतली, अशी थाप देऊन चांगलेच प्रसंगावधान दाखवले होते. अशी समयसूचकता इतरांनी दाखवली नाही. त्याबद्दलची त्यांनी बौद्धिक तयारीच केली नव्हती. आणि अंतःस्फूर्तीही काहींची दिसून आली नाही. या बौद्धिक तयारीच्या आणि समयसूचकतेच्या अभावी बरेच जण गांगरून गेले. आणि पोलिसांच्या युक्त्या-प्रयुक्त्या व छळांनीं बळी पडून कबुलीजबाब देऊन, पोलिसांच्या जाळ्यांत पडले.

११.१ पोलिसांचा अमानुष छळ

यप्रमाणे बऱ्याच सभासदांची बौद्धिक तयारी नसल्याने ब्रह्मगिरी व बर्वे यांच्यासारख्या काही भोळ्या सभासदांनीं, राजसाक्षींच्या थापांना बळी पडून कबुलीजबाबही दिले! पोलिसांच्या अमानुष छळाला बळी पडून, केवळ नाईलाजाने, कबुलीजबाब त्यांच्यापुढे कित्येकवेळी द्यावा लागतो. ते एकपक्षीं क्षम्य म्हणतां येईल. आणि आमच्यापैंकी पुष्कळांचा असा भयंकर छळ पोलिसांनीं केलाही (बाबा सावरकरांना तर विजेचे प्राणांतिक धक्केही दिले असे त्यांच्या चरित्रांतच वर्णन आहे). तसेच आमच्यापैकी आज नाशकास प्रसिद्ध असलेले वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर यांचाही अमानुष छळ केला. त्यांची स्वतःची हकीकत त्यांच्याच शब्दांत येथे देतों.

ता. २५-१२-१९०९ रोजी रात्री पकडले. सरकारवाड्यामध्ये चणे-मुरमुरे भत्ता देऊन बसविले. अंग-झडती उघडें करून घेतली. हातांत बेड्या कायम ठेवून ऐन थंडींत बसवून ठेवले होते. मध्यरात्रीनंतर अल्लीखान, झारापकर, सादवर्ते, देशपांडे, निरनिराळे येऊन हरतऱ्हेचे साधक-बाधक प्रश्न, शिवीगाळ, लाथ्या-बुक्क्या, वगैरे तऱ्हेचे त्यांचे चौकशीचे प्रकार होते.

झोंप तर घेऊं द्यावयाची नाही. हातांतल्या बेड्यांना दोरी बांधून वरती खुंटीला अडकवून ठेवायची, पाणीसुद्धां मिळायचे नाही.

ता. २६ ला दिवसा गायडर, कर्णिक, आठवले यांची चौकशी निराळ्याच प्रकारची, पण मारहाण नाही.

ता. २६ ला रात्रीं पुन्हा आधल्या दिवशीचाच प्रकार. विशेष म्हणजे बसवून डोकें जमिनीला टेकायचे व पाठीवर कॉन्स्टेबलला बसावावयाचे. मानेला कळ लागली म्हणजे रडायला यायचे. वरती पुन्हा थपडा, लाथा, असा प्रकार चालूच.

ता. २७ ला पुन्हा तसाच प्रकार. घरी झडती वारंवार चालूच.

ता. २७ ला रात्री आणखी नवीन प्रकार.

दोन्ही पाय दोन्ही बाजूला फाकून ठेवायचे व त्यावर मनुष्य बसवून कबुली काढायची. जी काय थोडी माहिती मिळेल त्यावर पुन्हा दिवसभर चौकशी व्हायची. रात्री पुन्हा झोप नाहीच. खुंटीला टांगून ठेवायचे. बसल्या बसल्या विश्रांती घ्यायची. लघ्वीलासुद्धां त्यांच्या मेहेरबानीने जायला मिळाले म्हणजे आनंद मानायचा. त्या चार दिवसांत परसाकडेसुद्धां व्हायची नाही.

ता. २८ ला मजजवळील पिस्तुल त्यांना मिळाले. नंतर मारहाणीचा प्रकार कमी झाला, पण त्यानंतर म्याजिस्ट्रेटपुढे कबुलीजबाब देण्याचा त्रास सुरू झाला. आपण न केलेली गोष्टसुद्धां कबूल करण्यास लावून पळशीकरांपुढे वारंवार न्यायचे. अमका मनुष्य तुमचे नाव सांगतो तेव्हा तुम्ही का नाकबूल करतां वगैरे धाकधपटशा. या त्रासांतून मुक्त होण्याकरितां पळशीकर यांच्याकडे कबुलीजबाब झाला व त्रास कमी झाला (केळकरांचा लेख).

हातपाय पसरून त्यावर काठ्या ठेवून त्यांच्या दोन टोकावर २ पोलीस बसवून मांड्यावर असह्य भार टाकण्याच्या छळाला रा. केळकरांसारखे मोठमोठे तालीमबाजही शेवटी नमले. (विष्णुशास्त्री हे अट्टल तालीमबाज होते). पण या छळापुढे ते अगदीं गाय झाले. त्यांतही ८-८ दिवस सक्तीने जाग्रण पाडावयाचे. त्या जाग्रणाने माणसास मरण पत्करले पण हा छळ नको, असे होई. यशिवाय एका मारवाडी गृहस्थाच्या मलद्वारीत मिरच्याची पूड घालण्याचा अमानुष प्रकारही झालाच. गुह्य भागांवरच्या केसांना काडी लावून पेटवून तेथे भाजण्याचा छळही झाला. फाशी गेलेले देशपांडे हायकोर्टात म्हणाले, ''अल्लीखानाने हातरुमालाचा फांस लावून माझे वृषण दाबले. खुर्चीप्रमाणे पण निराधार स्थितीत मला बसवण्यांत आले. पाय पसरून, मागे हात बांधून दोन इसम दोन पायांवर उभे राहात.' रा. धारप व चंद्रात्रे यांनीही ज्याक्सन-वधाच्या खटल्यांतल्या साक्षींत हायकोर्टात आपल्या छळांच्या हकीकती सांगितल्या. पण इतकें सांगूनही पुन्हा त्यावेळच्या 'न्याय' कोर्टातल्या स्पेशल जज्जांनीं या सर्वांचे कबुलीजबाब आपखु ती चे आहेत, पोलीस-छळामुळे दिलेले नाहीत, असे गृहीत धरलेच ! तत्कालीन न्यायमूर्ति - बेसिल स्कॉट, चंदावरकर व हीटन - किती न्यायी होते हे यावरून दिसलेच. असो.

आमच्या चौकशीसाठी नेमलेल्या काही पोलिस अधिकाऱ्यांचीं तर आरोपींस उलटे विहीरींत टांगून ठेवल्याबद्दलही ख्याति होती. हा छळाचा प्रकार मात्र आमच्या वेळी झाला नाही. याशिवाय अंगावर कोणत्याही खुणा न दिसतील अशाही छळाच्या युक्त्या पोलिसांनीं शोधून काढल्या होत्या. त्यांपैकी असह्य प्रकार म्हणजे ८-८ दिवस बिलकूल क्षणभरही झोंप येऊं न देणे हा होय. आमचे सॉलिसीटर थत्ते या छळाने गोगलगाय झाले. या अशा भयंकर असह्य छळामुळे पुष्कळांना कबुलीजबाब देणे भागच पडले.

११.२ कायद्याचे थोतांड

कायदेशास्त्राप्रमाणे पोलिसांपुढे दिलेला कबुलीजबाब, मारहाण करून घेतल्यास, म्याजिस्ट्रेटसमोर परत घेतां येतो. पण कायद्याच्या पुस्तकातच हा कायदा राहतो. शिवाय आरोपीलाही हे तत्त्व माहीत हवे. तेही आमच्यांपैकी पुष्कळांना माहीत नव्हते. आमच्या वेळचे देशद्रोही पळशीकरांसारखे, बढतीसाठी सरकारची हांजी हांजी करणारे, म्याजिस्ट्रेट असले म्हणजे ते मुळीं या पोलीसापुढच्या कबुलीजबाबावरच सही घेत. आणि आरोपीने हा 'स्वखुशीने' दिलेला

कबुलीजबाब आहे, त्याच्या अंगावर मारहाणीच्या खुणा नाहीत, असा सपशेल खोटा शेरा त्याखालीं ठोकून देत (खुद्द म्याजिस्ट्रेटांच्या तोंडून हायकोर्टांत हा सगळा प्रकार बाहेर आला होता. तरीही हायकोर्टाने ते जबाब गृहीत धरलेच! करंदीकरकृत सावरकरचरित्र). पुढच्या कोर्टांत हे कबुलीजबाब मागे घेता येतात. पण, त्यावेळी त्यांचा फारसा उपयोग होत नाही. कारण, मूळच्या जबाबाप्रमाणे काही खोटे साक्षीदार, काही खराखोटा मुद्देमाल, इतर आरोपींचे पुष्कळसे सारखे दिसणारे कबुलीजबाब, हे सर्व पुराव्याचे बस्तान तोपर्यंत पोलीस बेमालुम बसवून ठेवतात. त्यामुळे आरोपींना त्यांतून सुटणे अशक्यप्राय होते.

जी गोष्ट म्याजिस्ट्रेटांची तीच सरकारी डॉक्टरांची. नोकरी टिकवणे, बढती मिळवणे, या स्वार्थासाठी तेही पोलिस अधिकाऱ्यांना वश असत. त्यांतून त्यांच्या कानापर्यंत आरोपीच्या मारहाणीची तक्रार पोचेल व त्याच्या अंगावर खुणा दिसतील तर ते त्यांची नोंद करून ठेवणार. पोलिसांच्या अटकेत आरोपी असतांना पोलीस आपण होऊन कशाला त्याला डॉक्टरकडे नेतील? आणि यदाकदाचित् नेलाच तरी इंग्रज सरकारचा मिंधा डॉक्टर त्याच्यावर थोडीच दया दाखवणार आहे? आणि त्यांतही इंग्रज सरकारविरोधी राज्यक्रांतीच्या आरोपींना दया दाखवली तर इंग्रज सरकारने डॉक्टरलाच आरोपी म्हणूनही खेचले असते, अशी तेव्हा भीती होती! मग डॉक्टरच्या तपासणीची आशाच कशाला? या आपत्ती मुळे डॉक्टरी तपासणीची कल्पना व्यर्थच होती. पण, आरोपी भयंकरच आजारी झाला तरच त्याला सरकारी दवाखान्यांत, पण कैदी म्हणून, पाठवीत. मला असेच पाठवले होते.

पोलीस-छळाने जबरदस्तीने दिलेल्या कबुलीजबाबांबद्दल हे झाले. पण सरकारने गुन्ह्यांची माफी दिलेल्या राजसाक्षींच्या (Approvers) जबाबाबद्दल काय म्हणणार? आणि पोलिसांच्या थापांना भुलून दिलेल्या कबुलीजबाबाचे समर्थन कसे करणार? बौद्धिक तयारीत अशा कोणत्याही आमिषाला बळी पडूं नये, असे शिक्षण ठाकून ठोकून दिले जाते. ज्यांना ते मिळाले होते त्यांना या अमिषाने एकदांही मोह पाडला नांही!

आमच्या भोळ्याभाबड्या ब्रह्मगिरीबुवा चांदवडकरांना तर पोलिसांनी भुलथापांनीं बरेंच फसवले! आणि त्यांतही त्यांच्याविरुद्ध माफीचे साक्षीदार झालेले (आता कै.) वासुदेव रामचंद्र कुळकर्णी (हे बी.ए., एलएल.बी. गृहस्थ ८-१५ दिवस कुरुंदवाडचे म्याजिस्ट्रेट झालेले.) यांनी केवळ स्वार्थासाठी, बुवांना, व बुवांची आज्ञा शिरसावंद्य मानणाऱ्या व मुलांप्रमाणे वाढवलेल्या रा. पाळंदे, परांजपे, शिधये या गृहस्थांनाही, बुवांमार्फत हातोहात फसवले! या त्यांच्या गर्ह्य वर्तनाबद्दल त्यांना गुप्त कटांतली कोणतीही शिक्षा कमीच ठरती. असो. सांगण्याचा मुद्दा इतकाच की, आमच्यापैकी बऱ्याच जणांत बौद्धिक तयारीचा बराच अभाव होता आणि त्याचा परिणामही अत्यंत भयंकर झाला.

११.३ कळकळ म्हणजे कर्तबगारी नव्हे

पुष्कळशा संस्थांत सभासदांची ध्येयनिष्ठा, कळकळ, हीच बौद्धिक सामर्थ्याचे गमक समजली जाते. पण या गोष्टी अगदीं परस्परभिन्न आहेत. एक असली म्हणजे दुसरी असतेच असे नाही. एकावाचूनही दुसरी असू शकते. त्यातही शौर्य, धैर्य, मनुष्यस्वभावाचे ज्ञान, प्रसंगावधान, हजरजबाबीपणा या अवश्य गुणांचा समुच्चयही संस्था-चालकांना अवश्य असतो.

सैन्यांत हे नेतृत्वाचे गुण अंगी बाणण्यासाठी फारच खबरदारी घेण्यांत येते. सैनिकांना, व विशेषतः अधिकाऱ्यांना, या गुणांचा परिपोष होईल असे शिक्षण सतत चालू असते. राज्यक्रांति म्हणजे प्रतिराज्याची तयारी. म्हणून क्रांतिकारकांनाही असेच शिक्षण देणे अवश्य असते. आम्ही ते देत होतो. पण इतर काही संस्थांत त्याचा पत्ता नव्हता. त्यामुळे गणू वैद्यसारख्या अत्यंत भेकड व नादान माणसास, केवळ देशस्वातंत्र्याच्या कळकळीच्या एका मुख्य गुणावर, त्याच्या संस्थेंत जबाबदारीची कामे म्हणजे सभासद मिळवणे, हत्यारे जमवणे, ठेवणे, बॉम्ब तयार करणे वगैरे देण्यांत आली होती. औरंगाबादेस गणूनेही आपल्यासारखेच दुसरे नालायक सभासद करून घेतले होते. अनंतराव कान्हेरे याने आपल्या अखेरच्या जबाबांत नेमके यावरच बोट ठेवून सांगितले आहे की, ''गणू वैद्याने औरंगाबादेहून बोलावलेली व म्हणून त्याच्या (अनंताच्या) बरोबर आलेलीं अंकुशकर व जोशी ही, गणूइतकीच कच्ची भित्री व नादान, मुले मजबरोबर आली नसती, व गणू वैद्य आमच्या कटात नसता, तर प्राण गेला असता तरी मी काही सांगितले नसते.'' ''मला जर कोणी पोलिसांनीं मारले तर मी सर्व सांगून देईन,'' असे गणूच मजजवळ म्हणाल्याचे अनंतरावाने आपल्या जबानींत सांगितले आहे! आणि ज्याक्सनच्या वधाची बातमी जेव्हा रात्रींच गणूला कळली तेव्हा हे तिघेही शेंदाड शिपाई 'फार घाबरले' आणि गणू तर 'कापत कापतच वर आला' असे अंकुशकर व जोशीच आपल्या जबानींत म्हणतात! आणि त्यांतही सर्वांत मोठा त्यांच्या नालायकीचा पुरावा म्हणजे नेमके हेच तिघे माफीचे साक्षीदार झाले! सांखळीचे सामर्थ्य तिच्यांतल्या कच्च्या दुव्यावर अवलंबून असते', अशी इंग्रजी म्हण आहे. तिचे बरोबर प्रत्यंतर या त्यांच्या गुप्त संघटने आले! त्यांनी बुद्धिमत्ता व शूरत्वाखेरीज इतर गुणांच्या बाबतीत चांगली काळजी घेतली होती. निरनिराळ्या गटांच्या सभासदांना एकमेकाची नावेही कळू नयेत, अशी गुप्त व्यवस्था त्यांनी केली होती. पण नेतृत्वाच्या गुणांकडे पूर्ण दुर्लक्ष झाले होते; आणि त्या मुळेच गणूसारख्या भेकडालाही गुप्त संस्थेंत राहतां आले; आणि, त्याच्या भीरुत्वाची हळूंहळूं प्रचीति येत असतानाही, त्याच्यावर महत्त्वाची कामे सोपवली. 'अपात्री विश्वास' हा आम्हांला असा सर्वतोपरी नडला.

११.४ दुर्दैवाचा कहर

पण हे सर्व दोषाविष्करण केल्यावरही आमच्या रहस्यस्फोटाचे बरेचसे माप केवळ दुर्दैवावर टाकावेच लागते. 'विनाशकाले विपरीत बुद्धि' म्हणतात तेही, काही अंशी तरी, खरे मानणे भाग पडते. त्याशिवाय माननीय व धुरंधर कर्व्यांच्या हातून अशा चुका घडल्या नसत्या. कर्व्यांना त्यांच्या परमपूज्य व दिव्यदृष्टि गुरुजींनीं (कै. बिडकरमहाराज) सांगितले, बजावले होते की, १९०९ सालीं त्याने कोणतेही असे साहसाचे काम करू नये. ही त्यांची आज्ञा त्यांनी का मानली नाही, याला विनाशकाल आला होता म्हणून विपरीत बुद्धि झाली याशिवाय दुसरे उत्तर नाही. कदाचित् त्यांनी या आज्ञापालनासाठीच ३-१-१९१० ही १९०९ साल उलटून गेल्याची तारीख ठरवली होती, अशी शंका येते. पण २१ डिसेंबरला अनंतरावच येऊन ठेपल्यावर, आणि वधार्ह ज्याक्सन हा २३ तारखेनंतर जाणार म्हणून, देशपांडे, सोमण प्रभृतींनीं घाई करून तोच दिवस वधाचा मुकर केला. त्या प्रसंगी त्यांनी अनंताला दिलेली ताकीद व तयारी ही कर्व्यांच्या दूरदृष्टीचे उत्तम द्योतक आहे. पण कीर्तिलोभामुळे अनंतरावने ती शिस्त मोडली, याबद्दल कर्व्यांना दोष देतां येत नाही. पण नंतर नाशकाहून अन्यत्र अज्ञातवास कर्व्यांनीं केला असता

तरी भागले असते. पण तीही बुद्धि त्यांना झाली नाही. अनंतरावांबरोबर औरंगाबादेहून आलेलीं २ मुले घाईघाईने परत न पाठवतां, काही दिवस नाशकासच आपल्याकडे किंवा इतरत्र ठेवून घेऊन, मग इतर लहान स्टेशनवरून त्यांची रवानगी करण्याचे ठरवले असते, तर हा सर्व घोटाळाच टळता. पण तीही बुद्धी त्यांच्यासारख्या चतुरस्र माणसास सुचली नाही. पण त्यांनी गणू वैद्याला त्यांची रवानगी करून देण्याची जी योजना कळवली होती ती उत्तम व निर्दोष होती. गणूच्या हातून, व त्याच्या भावाच्या कंजूषपणामुळे, ती लौकर पार पाडली नाही हा दोष कर्व्यांचा नव्हे. आणि १ तासानंतर येणाऱ्या गाडींत ही मुले बसण्यापूर्वीच पोलिसांच्या तावडींत ती सांपडतील ही गणूलाही कल्पना नसावी. असो. वध होण्यापूर्वी कर्व्यांनीं अगाऊ आमचा सल्ला घेणे, वधाचा बेत काही तासांत ठरल्याने, शक्य नव्हते हे खरे. पण वध झाल्यावर आम्हांस सावधगिरीची सूचना देणे शक्य होते, ती त्यांनी दिली नाही. अगदी साध्या गोष्टींतही बारकाव्याला जपणाऱ्या या विद्वान, चतुर, धाडसी गृहस्थाला यांपैकी या प्रसंगी, एकही सद्बुद्धी सुचूं नये, याचे राहून राहून सखेदाश्चर्य वाटते. आणि 'दैवेनोपहतस्य बुद्धिरथवा सर्वा विपर्यस्यति' या संस्कृत सुभाषितांच्या सत्याचा प्रत्यय येतो.

गणूच्याही बाबतीत दुर्दैवाचा आघात चांगलाच प्रचीतीस येतो. अंकुशकर व जोशी या सोबत्यांना पाठवण्याच्या वेळी योग्य माणूस व १० रु. त्याच्याजवळ असते तर हे सर्व बिनबोभाट काम होण्याचा संभव होता. शेकडो लोक सकाळच्या एक्सप्रेसने गेलेही होते. पण शेकडो रुपये कधीं कधीं जवळ असणाऱ्या गणूपाशी त्याच दिवशी १० रुपयेही नव्हते! बरें रात्रीं या पाहुण्यांसह आपल्या घराची सर्व झडती आपण घेऊन, आपल्या घरी संशयास्पद एकही वस्तु नाही अशी खात्री त्याने करून घेतली होती; आणि तो दुपारी रा. केशवराव परांजपे या मित्राच्या घरी जाऊन निजला होता. त्याच वेळी सदाशिव दांडेकराला 'त्याच्याच' घरीं जाऊन, तो तेथे नसतां, त्याच्या बिछान्याखालीं ब्राउनिंग पिस्तुल व कोनाड्यांत ॲसिडें ठेवण्याची दुर्बुद्धी का व्हावी? यांतला नियोजनाचा अभाव अंशतः जरी जबाबदार धरला तरी, काही अंशी तरी याला गणूच्या दुर्दैवाशिवाय काय उत्तर आहे? हा मुद्देमाल कदाचित् घरी झडतीत न सांपडतां तर गणू इतका भेदरलाही नसता. निदान त्या बेकायदा वस्तूचे स्पष्टीकरण करण्याचे तरी टळले असते; व तो काही तरी धीर धरूं शकला असता. पण भयंकर मुद्देमाल अचानक घरात सापडल्यावर त्याची बोबडी वळली तर त्यांत नवल नाही. दुर्दैवाचा प्रभाव, काही अंशी तरी, यांत स्पष्ट दिसतो, हे म्हणणे भाग आहे.

आमच्या गोपाळराव पाटणकरांच्याही बाबतीत दुर्दैवाचा पुष्कळांशी फांसा पडला होता असे म्हणणे भाग पडते. अंगावर पिक्रिकचे डाग असतांच ते का पडकले जावे, याला कारण त्यांच्या दुर्दैवाशिवाय सांगतां येत नाही. बरें, त्यांना मी अगाऊ कळवलेली युक्ती - त्यांना त्यावेळी आठवली नाही, हेही त्यांच्या दुर्भाग्याचेच चिन्ह नव्हे तर काय? त्यांतही त्याच वेळी दैव कसे उलटसुलट खेळ खेळत होते याचे प्रत्यंतर आमचे गणपतराव काळे यांच्या उदाहरणांत आहे. ते हातांत बॉम्बचे सामान असतां, सद्बुद्धी होऊन, त्याच केशवजी नायकाच्या चाळीच्या दुसऱ्या जिन्याने उतरत असतां, पहिल्या जिन्याने पाटणकरांस पकडण्यास पोलीस वर आले! केवढी दैवाची एकावर खैर तर दुसऱ्यावर भयंकर फैर! एकाच क्षणीं, एकाच स्थानीं, एक सहज दैवाच्या लीलेने तरतो तर दुसरा त्याच्या खाईंत पडतो! याला दैवाशिवाय काय उत्तर देणार?

तसेच ८ वर्षे शिक्षा भोगून सुटण्याच्या आधीं १० महीनेच ते येरवड्यास इन्फ्ल्यूऐंझाने वारले, आणि मला त्यांचे प्रेतच ओंकारेश्वरावर न्यावें लागले! याला तरी दुर्दैव नाही तर काय म्हणावयाचे?

उलट सर्वांत दैवाची मेहेरनजर झाली असेल तर आमच्या वसईच्या बॉम्ब-कारखान्यांतील रामभाऊ भाटे व त्यांचे सर्व साथीदार यांच्यावर. ते कसे आमच्या व सदावर्त्यांच्या कारवाईने निसटले ते मागे आलेच आहे. ते जर आमच्यांत सांपडले असते तर जन्मठेपेची शिक्षा त्यांना निश्चितच मिळती. ती तर टळलीच; पण उलट त्यांच्या सुदैवाने त्यांना जन्मभर सरकारी नोकरी व आज पेन्शनही लाभले! ज्या सरकारवर तिलांजलि घेऊन ते उठले होते, ज्या सरकारचा बारावा ते घालणार होते, त्याच सरकारने त्यांचे सरकारी नोकर म्हणून बारसे केले! हा विलक्षण दैवयोगच नव्हे काय?

तात्या सावरकरांच्या बाबतीतही दुर्दैवाने त्यांना फ्रान्सहून इंग्लंडला येण्याची अशीच दुर्बुद्धी दिली. नंतर मार्सेलिसला दैवाचा असाच उलटा डाव पडला. अगोदर ठरल्याप्रमाणे त्यांना सोडवण्यास आलेले त्यांचे स्नेही जरा उशिरा येऊन पोंचले! भर समुद्रांत एवढ्या साहसाने उडी टाकून, पोलिसांचा डोळा चुकवून, मैलभर पोहून, तीराला पोंचलेले सावरकर, थोड्या मिनिटांच्या अवधीसाठी, २ जन्मठेपींच्या शिक्षेस पात्र व्हावें. हा केवढा भयंकर दुर्दैवाचा कहर म्हटला पाहिजे? कोठे ती काही मिनिटे, आणि कोठे हा १४ वर्षे हालअपेष्टांचा अखंड भडिमार! बाबांच्या दुर्दैवाला तर सीमाच नव्हती. दैवाचा आणि त्यांचा जन्मभर उभा दावाच होता. त्यांच्या चरित्रांतले त्यांचे वर्णन कोणाही सहृदय माणसाला पाझर फोडील. अंदमानांतल्या खोलीच्या बंद लोखंडी दाराला हातकडी घालून त्यांना उभें लटकवले आहे, अंगांत ताप फणफणत आहे, आणि आमांशामुळे उभ्या उभ्याच खालीं रेच होत आहेत, हा त्यांचा देखावा मनश्चक्षूपुढे उभा राहीला की जिवंत नरकवास काय असतो, याचे चित्र कल्पनेत येऊं शकते. काय हा अघोर छळ? केवढे भीषण दुर्दैव? तसेच त्यांचे धाकडे बंधु डॉ. नारायणराव सावरकरही लहानपणी दुर्दैवाने थबथबून निघाले होते. भगूरला या लहान मुलाला प्लेग झालेला; गावाबाहेर देवळांत हे सर्व बंधु वनवासांत राहीलेले; हा मुलगा बेशुद्ध होऊन झाडाखाली टाकलेला आणि त्याला मुंगळे लागलेले! हे भीषण दृश्य मनासमोर आले की, पोटांत अद्यापही कालवाकालव होते.

दुर्दैवाच्या खेळाच्या आणखी माझ्याविषयींच्या काही गमती सांगून हा आमचा दैवाचा फासा पुरा करू. मी ज्या दिवशी मुंबईस पकडलों गेलो, त्याच दिवशी नाशकास आमच्या दाराशी एक कुत्रें, आपण होऊन चालत येऊन, अचानक मेले अशी गोष्ट आमची मंडळी सांगतात! त्यांच्या व आईच्या मनांत चर्र झाले, आणि दुसऱ्याच दिवशी माझ्या अटकेची बातमी त्यांना कळली. इतरांच्या बरोबर दैव मलाही फरफरा ओढीत होतेच. पण मी त्याची फारशी क्षिति बाळगली नाही. परंतु आमच्या विरुद्ध सर्व पापे करून आम्हांला कोणाला फाशी, जन्मठेप, व इतर शिक्षा देण्यास मदत करून, गणू वैद्य, मेल्यावर, त्याचे प्रेत न्यावयास कोणी नव्हते म्हणून, तो माझ्या खांद्यावर गेला त्याचे मला अद्यापही राहून राहून आश्चर्य वाटते. अगदी त्याच कोटीतली गोष्ट म्हणजे आम्हांला कठोर अघोर शिक्षा फर्माविणाऱ्या न्यायमूर्ति चंदावरकरांच्याबद्दलची. त्यांच्याबद्दल आम्हांला कोणताही आदर असण्याचे कारण नव्हते. उलट पूर्ण सळसळणारा तिरस्कारच होता. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, माझें नाशकास वसंत-

व्याख्यानमालेत ज्या दिवशी व्याख्यान होते त्याच दिवशी ते वारले; आणि आमचे अध्यक्ष, भाऊसाहेब पाटणकर वकील, यांनी मला अगदीं आयत्या वेळी गळच घातली, नव्हे एकदम जाहिरही केले की, ठरलेल्या विषयावर भट न बोलतां आज 'चंदावरकरांच्या चारित्र्यावरच' बोलतील! मी अगदीं अचानक त्यांच्या तावडीत सांपडलो. न बोलावे तरी पंचाईत, बोलावे तरी पंचाईत. बोलावे तर मनांत धुमसत असलेला अनादर व्यक्त व्हावयाची भीती, आणि न बोलावे तर सौजन्याची हानी. अशा आड-विहीरींत मी सांपडलो. पण शेवटी सौजन्याचीच सरशी झाली. आणि आम्हांस भयंकर शिक्षा ठोठावणाऱ्या चंदावरकरांबद्दल मला सभ्यपणाने बोलणे भाग पडले! मेल्यावर गणू खांद्यावर गेला. चंदावरकर गळीं उतरले! दैवाची लीला काय वर्णावी!

असो. सांगण्याचा मुद्दा एवढाच की, आमच्यांतल्या काही जणांच्या चुकांच्या बरोबर दैवाची प्रतिकूलताही आम्हांला भयंकर नडली. भगवद्गीतेत 'दैवं चैवात्र पंचमम्' म्हणून कर्मसिद्धीचा दैव हा पांचवा घटक मानला आहे. म्हणजे निदान १/५ तरी यशापयशाचा भाग त्याच्या आधीन आहे, असे म्हणावेंच लागते. 'विधिरिह बलीयान्नतु नरः' हा अनुभव पूर्वापारचा आहे.

११.५ अभिनव भारताची अखेर

धिंग्राच्या अभियोगाने विलायतेतील अभिनव भारताचे अधिष्ठान जसे उठवावें लागले तसेच आमच्यावरील बंडाच्या व इतर खटल्यांनीं महाराष्ट्रातलेही अभिनव भारताचे अस्तित्व संपले. आमच्यांतले बरेच कर्ते सभासद तुरुंगांतल्या अंधारकोठडींत खितपत पडले. जे सुदैवाने उरले होते त्यांनाही सरकारच्या टेहळणीमुळे आपापले कार्यक्रम आवरते घ्यावे लागले. आणि अभिनव भारताचा असा शोकान्त शेवट झाला. त्यांतून काही हालचाल करणारे जे होते त्यांनी १९१३-१४ मध्ये हातपाय हालविण्यास सुरुवात केली तों पहिले महायुद्ध आले; आणि १९१४ ते १९१८ पर्यंत सरकारच्या राजकीय चळवळीविरुद्ध असलेल्या धोरणाला तीक्ष्ण धारच चढली. आमच्यापैकी जे सुटून आले त्यांच्यावर कित्येक वर्षे रोज २४ तास गुप्त पोलिसांची सक्त नजर होती. मी १९१५ मध्ये सुटल्यावर मजवरही २४ तास खडा पहारा काही महीने होता. अशा स्थितीत आम्ही पुनः गुप्त चळवळीचे राजकारण करू लागणे देशहिताच्या दृष्टीने अनिष्ट होते. पुढच्या पिढीनेच ते अंगावर घेणे युक्त होते. तसे काही लोक आम्हांस भेटत. पण १९२० पासून महात्मा गांधींनी नवीनच प्रयोग सुरू केले; आणि त्या नवीन प्रयोगांकडे नव्या पिढीने मोठ्या कुतूहलाने धांव घेतली. पण क्रांतिकारकांच्या चळवळी वायां गेल्या नाहीत. त्यामुळे १९०५ पासून इंग्रज सरकार खडबडून जागें झाले. या चळवळीचा पहिला परिणाम म्हणजे १९०८-१९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणा या होत. त्यानंतर या चळवळीच्या सातत्याने मॉटफर्ड सुधारणांचे १९१७ मध्ये आश्वासन मिळून १९१९ मध्ये त्या पदरात पडल्या. महात्माजींच्या नवीन निःशस्त्र चळवळींचा परिणाम १९३५ च्या घटना कायद्यात झाला. आणि शेवटी १९४२ ची चलेजावची निकराची चळवळ, नेताजी सुभाषचंद्रांची प्रतिस्वराज्याची सैन्याधिष्ठित तयारी, आणि विलायतेत त्यामुळे झालेली मजूर सरकारची मनःक्रांति, यामुळेच आज हिंदुस्थान स्वतंत्र झाला आहे. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धापासून तों तहत १९४७ पर्यंत देशांतल्या क्रांतिवीरींनीं जी बंडे केली ती, तात्पुरती जरी दडपशाहीने शमलीं, तरी त्यांच्यामुळे उत्पन्न झालेला मनःक्षोभ धुमसतच

राहिला. हिंदुस्थानच्या खवळलेल्या क्रांतिसागरात ब्रिटिश साम्राज्याचे तारूं बुडणार हे ठरलेलेच होते. 'केव्हां' एवढाच काय तो कालवाचक प्रश्न होता. या खवळलेल्या दर्यांत अभिनव भारताने आपल्या प्रचंड लाटेचा एकतरी प्रचंड धक्का या साम्राज्याच्या नौकेला दिला होता, एवढे तरी इतिहास नमूद करील असे वाटते. आणि एवढ्यांतच आमचे समाधान आहे. गीतेतल्या कर्मफलत्यागाच्या शिकवणीप्रमाणे आम्ही, आमचे सर्वस्व पणाला लावून, ब्रिटिश साम्राज्याच्या विरुद्ध, इतर प्रांतीय क्रांतिकारकांसह, गनिमीकाव्याचे छुप्पे हल्ले करण्यास सज्ज होतो. काही हल्ले साधले, काही फसले. जयापजय हे दीर्घकालीन युद्धांत यावयाचेच. किंबहुना क्रांतियुद्धांत जय हा अखेरीस मिळतो. त्यापूर्वी सर्व पराजयच सोसावे लागतात. जयापजयाच्या हेलकाव्यांत आमच्यापैकी जे धारातीर्थि पडले त्यांचीं दृश्य स्मारकें होणार नाहीत. त्यांचीं नावेही विसरलीं जातील. ९० वर्षांच्या या प्रदीर्घ युद्धांत ३ पिढ्या तरी कमीत कमी गारद झाल्या. कोणाकोणाची स्मृति इतिहास ठेवणार? त्यांतही गुप्त संस्थांनी माजविलेल्या या लढाया. त्यांत मुद्दामच गुप्तता ठेवावी लागते. नावे कळूं नयेत, बेत कळूं नयेत, म्हणून चिठ्ठीचपाटी ठेवणेही वर्ज. मग या गुप्त वीरांना प्रसिद्धि, इतिहासांत स्थान, कसे मिळणार? तशी त्यांची, निदान पुष्कळांची, अपेक्षाही नव्हती. गुप्ततेमुळे आम्ही कोण हे जसे आम्ही प्रसिद्ध करीत नव्हतो, एकमेक आमचे आम्हांलाही माहीत नव्हते, त्याप्रमाणे आमची क्रांतिकृत्ये जनतेस कळूं नयेत म्हणून इंग्रज सरकारही दक्ष होते. लॉ-रिपोर्टस्मध्ये आमच्यावरील खटल्यांचे निवाडेही हायकोर्टाने प्रसिद्ध होऊं दिले नाहीत! अशा प्रसिद्धिविन्मुख वीरांचीं, अज्ञात योद्धांचीं, स्मारकें कशी होणार? आणि कोण व किती करणार? भारताचे आजचे स्वातंत्र्य आणि त्याचा डौलाने फडकत असलेला तिरंगी विजयध्वज हेच आमच्या अल्पस्वल्प प्रयत्नाचे चिरकालीन स्मारक आहे. त्यांत आम्हीं सर्व समाविष्ट आहोत. क्रांतिकारकांच्या प्राणांच्या, आणि स्वातंत्र्यप्रेमाच्या, आडव्या उभ्या असंख्य तंतूंनीं विणलेला आजचा भारताचा हा विजयध्वज आहे. त्या तंतूंना नावे नाहीत. त्या विजयध्वजाला फक्त 'भारतीय स्वातंत्र्य' हे भव्य दिव्य नाव आहे. त्यांतच आमच्यापैकी जिवंत वा मृत आत्म्यांना समाधान आहे, आनंद आहे, कृतार्थतेची मन:शांति आहे. जय हिंद ! जय भारत !! जय स्वातंत्र्यलक्ष्मी !!!

समाप्त

१२ परिशिष्ट पहीले - तुरुंगांत आणि मुक्ततेनंतरचा छळ

२१ डिसेंबर १९०९ ला ज्याक्सनचा वध झाला आणि त्या वधाच्या निमित्ताने आम्हांला प्रथम पकडले. पण आमच्यावर खुनाचा आरोप सिद्ध होणे शक्य नव्हते. म्हणून आमच्यावर इंग्रज सरकारविरुद्ध सशस्त्र क्रांति करण्याचा बंडखोरीचा आरोप ठेवला. आणि त्याचा निवाडा २४ डिसेंबर १९१० ला म्हणजे पुऱ्या १ वर्षानंतर, झाला! या १ वर्षाच्या कच्च्या कैदेचा आम्हांला शिक्षा देतांना कोर्टाने फारसा विचारही केला नाही! कारण त्याचा त्यांच्या निवाड्यांत क्वचितच उल्लेख आहे! म्हणजे शिक्षेंत हे १ वर्ष अधिकच गेले. मात्र खटल्याच्या वाफेच्या रुळाखालीं इंग्रज सरकारने, राज्याचा मार्ग निर्वेध करण्यासाठी, आमच्यासारखे जे उंच अडथळे होते ते साफ करून त्यांचा मार्ग निष्कंटक करून टाकला. कच्च्या कैदेंत याप्रमाणे १ वर्षभर आम्ही होतो. आगामी तुरुंगवासाची ती पूर्वतयारीच होती. सर्वच एकध्येयाने प्रेरित झालेले होते. या संकटाचा वज्राघात केव्हां तरी आपल्यावर कोसळणार याची सर्वांनाच कल्पना होती, आणि सर्व त्याला तयारही होते. त्यामुळे, आणि खटल्याच्या दीर्घसूत्रीपणामुळे, ही कच्ची कैद इतकी आंगवळणी पडली होती की, हंसण्या-खेळण्यांत, गप्पाटप्पांत, आमचे दिवस सहज निघून जात.

आमच्यापैकी काही जणांनीं कायद्याचा अभ्यास केला असल्यामुळे, आणि आमच्याविरुद्ध गोळा केलेल्या पुराव्याच्या तारतम्यामुळे, आमच्यापैकी कोणाकोणाला किती शिक्षा होणार, याचाही अंदाज आम्ही बांधून ठेवला होता. मला ५ वर्षे शिक्षा होणार, हे मी माझ्या मातु:श्रीला व पत्नीला ५/६ महीन्यांपूवर्चि सांगून टाकले होते. त्याप्रमाणे माझा अंदाज अगदीं तंतोतंत बरोबर ठरला. आणि या निश्चिततेमुळे मी शिक्षेच्या आदल्या रात्रीसुद्धां इतका निश्चिंत होतो की, मला अगदीं गाढ झोंप लागली होती.

खास कोर्टांत शिक्षांचे 'पुण्यहवाचन' झाल्यावर आम्ही भर कोर्टांत ''स्वातंत्र्यलक्ष्मी की जय' म्हणून जयजयकार करून आमच्या दुर्दम्यतेची साक्ष तेथेच इंग्रज सरकारास पटवली. हायकोर्टातले सर्व न्यायाधीश, वकील, बॅरिस्टर, इतर पोलीस अधिकारी आमच्याकडे आश्चर्यचकित मुद्रेने पाहूं लागले. पोलिस, विशेषत: इंग्रज अधिकारी, चवताळले, पण करणार काय? झाले यापेक्षां ते आमचे अधिक काय वांकडें करणार होते? म्हणून ते पुष्कळ जरी गुरगुरले तरी आम्ही थोडेच त्यांना भिणार होतो? आम्ही प्रसन्न मुखाने एकमेकांचा निरोप घेतला आणि तुरुंगांत प्रविष्ट झालो.

१२.१ माझा अपमृत्यूचा छळ

पक्क्या कैदेचे वर्णन करण्यापूर्वी कच्च्या कैदेंत माझ्या स्वत:बद्दल घडलेल्या काही उर्वरित गोष्टी, विश्वासराव सावरकरांच्या आग्रहामुळे, येथेच सांगणे इष्ट आहे. आमच्या चौकशीच्या वेळी पोलिसांनीं आमच्यापैकी पुष्कळांना भयंकर छळले म्हणून मागे सांगितलेच आहे. दुसऱ्या दीर्घ छळासाठीच जणुं काय, पण या पोलिस-छळांतून मी मात्र अजिबात निसटलो. त्याचे पहीले कारण म्हणजे सदावर्त्यांची अनुकूलता आणि दुसरे म्हणजे मला तेथले घाणेरडे कच्चे अन्न न मानवल्यामुळे झालेला आमांशाचा भयंकर विकार! त्यामुळे मी इतका आसन्नमरण झालो की, मला सरकारी रुग्णालयांत (हॉस्पिटलमध्ये) पाठवणे कठोर

पोलिसांससुद्धा भागच पडले. हा कदाचित खरोखर येथेच मरेल अशी त्यांना भीती वाटूं लागली होती. म्हणून माझी ब्याद त्यांनी रुग्णालयांत टाकली. आणि पोलिसांऐवजी यमराज्याच्या वाटेवर मी लागलों. तेथे मात्र माझ्या सुदैवाने माझा वर्गबंधु डॉ. रामराव शिंदे, (पण पोलिसांस माहीत नसलेला,) दुय्यम डॉक्टर असल्याने मी वाचलो. नाही तर माझा अपमृत्यूच मला दिसत होता. त्याचा छळ मात्र मला सोसावा लागला. असो. औषधोपचार चालू असतांच माझ्या भयंकर आजाराची माहिती त्याच्यामार्फतच बाहेर बऱ्याच लोकास कळली. आणि म्हणून धाडस करून आमचे अभिनव भारताचे तेव्हाचे सदस्य रा. दादासाहेब गद्रे, वकील, हे मला भेटावयास रुग्णालयांत आले. इतर कोणीही आले नाहीत, किंवा त्यांना पोलिसांनी परवानगीही दिली नसेल. दादासाहेबांचे बंधु काकासाहेब गद्रे आणि मी अगदी बरोबरीचे. इंग्रजी शाळेतही वर्गबंधु. शाळेतल्या व कॉलेजमधल्या माझ्या पहिल्या व दुसऱ्या नंबरामुळे दादांचे माझ्यावर काकांप्रमाणेच प्रेम असे. आणि मी आसन्नमरण झालो असे कळतांच ते भेटावयास आले. मी तेव्हा सुधारूं लागलो होतो. रामरावांनी मला तेथे रुग्णालयांत बरेच दिवस, माझ्या म्हणण्यास्तव, ठेवून घेतले. आणि म्हणूनच मी पोलिसांच्या छळांतून सहिसलामत वांचलो. रामराव नसता तर कदाचित् यमसदनासही तेव्हाच पोंचलो असतो. पोलिसांच्या छळाऐवजी दारुण रोगाचा छळ सोसला हाच काय तो माझ्या बाबतीत बदल झाला होता. त्या महिन्या दीड महिन्याच्या आजारात कित्येक दिवस, अंगाची व वस्त्रांची स्वच्छता नसल्यामुळे, सगळ्या कपड्यांत व अंगावर उवा झाल्या होत्या. म्हणून दादासाहेब गद्रे यांच्यामार्फत घरातून कपडे मागवले, व त्या छळांतून सुटलो. रुग्णालयांतून परत आलो तेव्हा पोलिसांच्या अटकेतून (कस्टडी) म्याजिस्ट्रेटच्या अटकेत (कस्टडीत) सर्वच गेले होते, आणि छळाचा काळही संपला होता. कारण पोलिसांनी पुराव्याची सर्व सांखळी जुळवून टाकली होती.

१२.२ चतुर्भुजला फोडण्याचा प्रयत्न

मी ग्रांट मेडिकल कॉलेजमध्ये तिसऱ्या एम्.बी.बी.एस्.च्या वर्गांत असतांना मला ‘‘औषधिविज्ञान’ (मटीरियामेडिका) शिकवणारा जो अध्यापक होता (कॅप्टन बेटस्, आय.एम्.एस्.) तोच त्यावेळी नाशिकला सिव्हिल सर्जन म्हणून बदलून आला होता. त्या बेट्याने मला ओळखले असलेच पाहिजे. पण त्याने तसे कधींच दाखवले नाही. त्याच्या हाताखालीं डॉ. रामराव शिंदे होते, नाशिक हायस्कूलमध्ये मी शिकत असतां रामराव माझा वर्गबंधु होता. बेटस्ने, व विशेषतः रामरावने, मला योग्य ते औषधोपचार केले. माझ्या शेजारच्या खोलीतच सावरकर, पाटणकर, व माझ्याविरुद्ध उभा केलेला राजसाक्षी चतुर्भुज हाही आजारी म्हणून ठेवला होता. रामरावांकडून मला ही हकीकत कळली. त्यामुळे चतुर्भुजला जर फितवतां आले तर पाहावें, म्हणून मी रामरावामार्फत २-३ वेळां यत्न केले. पण तो पक्का बिलंदर होता. त्याने माझ्या व रामरावांच्या प्रयत्नांना दाद दिली नाही. सुदैव एवढेच की, त्याने चुगली करून रामरावाला खड्ड्यांत टाकले नाही. रामरावही हा धोका जाणूनच होता. पण त्याने माझ्यासाठी तेवढे धाडस केले, त्याबद्दल आतां त्याचे प्रसिद्धपणे आभार मानावयास हरकत नाही.

१२.३ तुरुंगांतल्या छळाची सुरुवात

आमची पक्की कैद भायखळ्याच्या तुरुंगांत सुरू झाली. घरच्या कपड्यांऐवजी तुरुंगाचा पोशाख व तेथलीं टिनचीं दोन भांडीं एवढाच काय तो आमच्यांत फरक झाला. तेव्हा आतांप्रमाणे, राजबंद्याचे किंवा प्रतिष्ठित कैद्याचे अ व ब वर्ग नसल्याने, आम्ही सर्व इतर कैद्याप्रमाणे 'सब घोडे बारा टक्के' या क वर्गांतच होतो. पण त्यांच्यापेक्षां काही बाबतीत आमची अधिकच कुचंबणा होती. आम्ही इतर कैद्यात राजद्रोह पसरवूं या भीतीने त्यांनी आम्हांस त्यांच्यापासून स्वतंत्र ठेवले होते. आणि खुनशी सरकारचे हुकूम असे होते की, शक्य तर आम्हांस एकेकटेच ठेवावें. एकपक्षीं ते बरेच होते. कारण त्या घाणेरड्या व हलकट लोकांत राहणे संकटच झाले असते. पण त्यामुळे आमच्यापैकी पुष्कळांस, या बिनकायदेशीर एकांतवासामुळे, फारच त्रास झाला. त्याचे वर्णन पुढे येईलच; परंतु सरकारजवळ तुरुंगांत आम्हांस सतत एकेकटे ठेवण्यास पुरेशा खोल्याच नव्हत्या. त्यामुळे आम्हांस काही वेळां तरी एकत्र ठेवणे त्यांना भाग होते.

भायखळ्याहून काही दिवसांनीं निरनिराळ्या तुरुंगांत आमची रवानगी होऊं लागली. पाटणकर व मी मात्र मार्च १९११ पर्यंत तेथेच होतो. सावरकरांवर नंतर जो एकतर्फी 'राजाविरुद्ध लढाईला उत्तेजन' दिल्याचा आरोप ठेवून नवा खटला चालू केला होता त्यांत पाटणकरांना, व मला, शक्य तर आरोपी म्हणून गोवावे, असा विचार घाटत होता. पण हायकोर्टाने ते मानले नाही, म्हणून त्यांतून आम्ही निसटलो. पुढे सावरकरांविरुद्ध आम्ही साक्ष द्यावी म्हणून आम्हांस शिक्षेतून मुक्त करण्याची लालूच दाखवण्यांत आली. पण त्याला आम्ही ठोस नकार दिला. इतकेच नव्हे तर गायडरची त्याबद्दल निर्भत्सनाही केली. परंतु, आमच्या विरोधाला न जुमानता, जर साक्षीच्या पिंजऱ्यात आम्हांस उभे केलेच तर शपथ नाकारावयाची, आणि त्यासाठी ६ महीन्यांची शिक्षा अधिक ओढवून घेऊन या संकटांतून मुक्त व्हावयाचे, असेही आम्ही ठरवले. अरविंद घोषांविरुद्ध बाबू बिपिनचंद्र पाल यांनी साक्ष देण्याचे नाकारण्याऐवजी हीच युक्ती स्वीकारली होती. पाटणकरांनीं त्याप्रमाणे, साक्षीच्या पिंजऱ्यांत उभे केल्यावर, शपथ घेण्याचेच नाकारले. हे पाहून त्यांनी मला साक्षीला बोलावलेच नाही. सावरकरांना या आरोपावरून पुन्हा दुसरी जन्मठेपेची शिक्षा दिली; आणि १९६० सालीं, पुऱ्या ५० वर्षांनीं, त्यांच्या मुक्ततेचा काल न्यायप्रिय इंग्रज सरकारने ठरवला!

गायडरची तोंडावर निर्भत्सना केल्यामुळे की काय, मला मार्चमध्ये एकदम सिंध-हैदराबादच्या तुरुंगांत पाठवण्यांत आले. माझ्या अगोदर तेथे आमच्यापैकी ५-६ जण जाऊन पोहोचलेच होते.

१२.४ ३ आठवड्यांत २१ पौंड वजन घटले

तुरुंगांतल्या क वर्गाच्या कैद्याच्या हालअपेष्टांचे विस्तृत वर्णन करण्यात स्वारस्य ते काय असणार? सावरकरांनीं 'माझी जन्मठेप' या ग्रंथांत, व बाबांच्या चरित्रांत, त्यांचे वर्णन आलेलेच आहे. तुरुंगच तो. सर्व तऱ्हेचीं नियंत्रणे तेथे असणार आणि तशी होतीच. त्यांपैकी काही थोडींच

येथे सांगतों. म्हणजे हल्लींच्या अ व ब वर्गात राहून आलेल्या खुशालचंद राजबंदींना, आणि नवीन पिढीला, आमच्या छळाची काहीशी कल्पना येईल.

कैदी तुरुंगांत प्रविष्ठ झाला म्हणजे त्याच्या शरीरप्रकृतीची डॉक्टरांकडून तपासणी करण्यात येते. आणि त्याची प्रकृति व वयाप्रमाणे त्याला कठीण, मध्यम, व हलक्या श्रमांची कामे द्यावीत, अशी त्याला नोंद करावी लागते. तुरुंगांत आमची तपासणीही भायखळ्याच्या तुरुंगांतल्या डॉक्टरने केली नाही. तो वास्तविक माझ्याबरोबरच मेडिकल कॉलेजमध्ये शिकणारा मिलिटरी शिष्य (M.M.P. मिलिटरी मेडिकल प्यूपिल म्हणून तेंव्हा एक वर्ग असे) होता. पण अँग्लो इंडियन असल्याने त्याला साहेबापेक्षां ताठा अधिक. त्याने कोणालाही न तपासतांच सगळ्यांना कठीण (Hard) श्रमाचीं कामें द्यावीत, असे आमच्या तिकिटांवर लिहूनही टाकले! आम्हांला तरी तेव्हा काय माहीत की, असली तपासणी असते, आणि तिच्यावर श्रमविभाग असतो? त्यामुळे हैद्राबादला गेल्यावर मला कठीणतम श्रमाचे काम - चक्की पिसणे - उभे राहून हाताने दळणे - हे देण्यांत आले. त्यांतही येरवडा, साबरमती, वगैरे तुरुंगांत ३०-३५ पौंडच धान्य अगदीं धडधाकट कैद्याला दळावयास देत. हैदराबाद तुरुंगांत पंजाबी मुसलमान व पठाण कैदी येत असल्याने, तेथे ३५ च्या ऐवजी ४५ पौंड धान्याचा ठेका ठरला होता. आणि हे पहाडी लोक ४५ च काय पण, विडी तंबाकू दिल्यास, ९० पौंडही धान्य सहज दळीत! आम्हांला मात्र ते अतिशय त्रासदायक होते. माझ्या सुदैवाने त्यावेळी हैदराबादला मला (कै.) वामन मल्हार जोशी, (कै.) पुरुषोत्तमपंत दांडेकर, श्रीधर वासुदेव शिधये यांच्याच कोठडींत ठेवले होते. त्यांची दळण्याच्या कामाची पाळी होऊन गेली होती, म्हणून बरें झाले. ते बिचारे, मी थकलों म्हणजे, मला दळण्यास मदत करीत. पण माझें हृदयच अशक्त असल्याने त्यांच्या मदतीनेही माझा ठेका कधींच पुरा होत नसे. आणि मी तरी काय करणार? मला हृदयाच्या धडधडीचा (Tachycardia) तेव्हा विकार होता. त्यामुळे मला निम्मेंही काम करवत नव्हते. या तिघांनी आपापली कामे संभाळून मला मदत केली तरी २५-३० पौंडापेक्षा माझी मजल जात नव्हती. सुदैवाने त्यावेळी तुरुंगांतला मुख्य जमादार पास्कल म्हणून एक कोंकणातला ख्रिस्ती मराठा होता. तो मराठी बोलत असे. आम्ही महाराष्ट्रीय म्हणून त्याला आमच्याबद्दल आदर होता. त्यामुळे तो माझें काम कमी झाले तर कागाळी करीत नसे. पहीले काही दिवस हातांनीं दळतांना हाताला टरारून फोड आले. त्यामुळे काम पुरें झाले नाही. या सबबीवर ४-५ दिवस मी वेळ मारून नेली. काही दिवस इतर सबबी सांगितल्या. येणेप्रमाणे काम कधींच पुरें झाले नाही. शिवाय दळण्याच्या या भयंकर श्रमाने भूक फार लागे. आणि वेळी ३ भाकरी खाल्ल्या तरी भूक भागत नसे. म्हणून मग दळलेले कोरडें पीठच खावें लागे. अशा स्थितीत ३ आठवडे कसेबसे मी काढले. पण एवढ्या काळांत या श्रमाने माझें २१ पौंड वजन कमी झाले! आणि काम होईच ना, तेव्हा मी सुपरिंटेंडटला ही हकीकत सांगितली. तो म्हणाला, 'तुला कठीण काम द्यावे हे कोणत्या शहाण्याने लिहीले?' तेव्हा मी त्याला मला कोणी तपासलेच नाही, हे सांगितले. तो आश्चर्यचकित झाला, आणि त्याने तात्काळ जेलरला मला दुसरे मध्यम श्रमाचे काम द्या म्हणून हुकूम फर्मावला, व मी त्या कठीण श्रमांतून कायमचा मुक्त झालो.

१२.५ तुरुंगांत माणुसकीलाही मज्जाव

ह्या सुपरिंटेडंटला (कॅ. फ्रेजर आय्.एम्.एस्.) थोडी माणुसकी होती म्हणून मी हृद्रोगांतून तेव्हा बचावलों. पुढे मी त्याच्याजवळ आम्हांला वाचावयाला काही पुस्तकें द्या म्हणून विनंती केली. तुरुंगांत आम्हांला योग्य अशी वाचावयास पुस्तकें कोठून असणार? तेथले कैदी म्हणजे बहुतेक सगळेच अक्षरशत्रु. तेव्हा त्यांच्या योग्य असे मोठे ग्रंथ म्हणजे अंकलिपी, अक्षरओळखीची पुस्तकें, काही ४-५ यत्तेपर्यंतचीं क्रमिक पुस्तकें, आणि फार फार म्हणजे गोष्टीवेल्हाळ ग्रंथ! त्यांत तेथली भाषा सिंधी किंवा उर्दू. आम्हांला हे मोठमोठे अंकलिपीचे ग्रंथ काय होय! त्यांतही भाषेची मोठीच अडचण. कॅ. फ्रेजरला आमच्या तक्रारी पटल्या; आणि, तुरुंगांतल्या नियमांना न जुमानतां, तो आपल्या घरच्या इंग्रजी कादंबऱ्यांचीं पुस्तकें आम्हांला देऊं लागला. मी पाश्चात्य वैद्यकाचा विद्यार्थी म्हणून मला तो त्याच्याकडे येणारे British Medical Journal हें नियतकालिक देत असे. त्यामुळे बौद्धिक भूक काही काल थोडीशी शमली होती. पण सर्व तुरुंगांचे मुख्याधिकारी I.G.P. एकदा आले. आणि या उंटावरच्या शहाण्याने कादंबऱ्यांची सवलत बंद केली! आणि आमच्या पुस्तकाची मागणी जी धुडकावली ती आम्ही सुटावयाच्या वर्षी - ४ वर्षांनीं - पुरी केली!

१२.६ एकांतवास आणि आत्महत्येचा संकल्प

पुढे काही दिवसांनीं आमची पांगापांग झाली. आणि सरकारी हुकुमाप्रमाणे प्रत्येकाला निरनिराळ्या खोल्यांतून ठेवले. आम्हांला कायदेशीर एकांतवासाची शिक्षा नव्हती. पण ती अशी आमच्यावर लादली होती. त्यांत माझ्या वाट्याला जी खोली आली होती ती एका मोठ्या यार्डमध्ये होती. माझ्यावर जो वॉर्डर नेमला होता तो एक म्हातारा पठाण होता. त्याला फक्त पठाणी पुष्तु भाषा माहीत होती. उर्दू व हिंदुस्थानी काही शब्द तेवढे तो तेथेच शिकला होता. त्यामुळे त्या मोठ्या भयाण जागेंत सारा दिवस तो आणि मी अशी दोनच माणसे. जेवण घेऊन येणारा फक्त २ वेळां येई. भाषाभेदामुळे एकमेकांच्या तोंडाला कुलूप लागले होते. फक्त करपल्लवी चाले. ३-४ महीने याप्रमाणे मी अगदीं निर्जन एकांतवासांत काढले. तुरुंगाधिकाऱ्यास ‘मला निदान माणूस ‘दिसेल’ अशा ठिकाणी तरी ठेवा, म्हणून विनंत्या केल्या. तो म्हणे ‘मी सरकारी हुकुमाचा बंदा. ते मला करतां येत नाही.’ यामुळे एकांतवास अगदीं असह्य झाला, आणि मी आत्महत्या करण्याचे ठरवले. माझ्या कामासाठी एक मोठा सुवा रोज माझ्या कामाबरोबर येई व जाई. एक दिवस मी तो सुवा आत्महत्येसाठी लपवून ठेवला. शारीरशास्त्राचे ज्ञान असल्याने गळ्यांतल्या (क्यारोटिड) मोठ्या शुद्ध रक्तवाहीनींत नेमका तो खुपसून आत्महत्या करण्याचा माझा संकल्प होता. पण पुन्हा प्रयत्न करून पाहावा, म्हणून मी रात्रीं तो रद्द केला. सुदैवाने नेमकें त्याच वेळी त्या वैद्यकीय नियतकालिकात Melancholia ‘नैराश्यजन्य मानसिक रोग’ या विषयावर लेख आले होते. मी सुपरिंटेंडटला सांगितले की, ‘‘अगदीं त्या वर्णनाप्रमाणे माझी मन:स्थिती झाली आहे - आणि तूं जर या एकांतवासांतून मला न काढलेस तर मी एक वेडा तरी होईन किंवा आत्महत्या तरी करीन.’’ त्याला ते पटले व त्यांतून माझी मुक्तता झाली! कारण कैद्याच्या आरोग्यासाठी त्याला योग्य दिसेल ती चिकित्सा करण्याचा त्याला अधिकार होता. माझ्याप्रमाणेच अगदीं वेडापर्यंत माझे सहकारी मित्र दामोदर महादेव

चंद्रात्रे यांची अशा एकांतवासामुळे पाळी आली होती. पण आम्ही, तुरुंगाचे सर्व नियम झुगारण्याचे धाडस पत्करून, चंद्रात्र्यांना दिवसा सोबत करीत होतो, आणि म्हणूनच ते त्या संकाटांतून निभावले.

१२.७कदान्न व विषारी अन्नाचा कहर

तुरुंगांतला कायमचा मोठा छळ म्हणजे तेथले कदान्न. आम्हांला कोणालाही ते खाण्याची जन्मांत संवय नव्हती. त्यामुळे मी तर वजनांत ३५ पौंड कमी झालो होतो. एखादे वेळेस तर भाकरी इतक्या कडू येत की, आम्हीच काय पण आमच्या सोबतिणी चिमण्याही त्या खात नसत! त्यांनी अन्न खाल्ले नाही म्हणजे ते वाईट असलेच पाहिजे, हा आमचा अडाखा होता. पण ते खाल्ले नाही तर दुसरें थोडेंच मिळणार होते? मग उपासमार होई.

तुरुंगांतल्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे एक दिवस मोठाच हाहा:कार झाला. भाजी ज्या भांड्यांत भरून कैद्यास पोंचवावयाची त्या मोठ्या भांड्यांत कसले तरी विषारी तेल होते. ते भांडें स्वच्छ न करतां त्यांतच भाजी ओतली आणि ती नेहमीप्रमाणे कैद्यास वाटली. मी १-२ घासच खाल्ले असतील. इतरीनीं थोडीफार खाल्ली असेल. कारण ती न खाल्ली तर भाकरी खावयाची कशाशी? शिवाय 'कुठला तरी बेचव पाला 'भाजी' म्हणून खाण्याची संवयच होती. म्हणून प्रत्येक कैद्याच्या पोटांत थोडी फार तरी ती गेलीच. संध्याकाळचे ते जेवण झाल्यावर सर्व कैदी बंद झाले. आणि रात्री त्या विषारी भाजीने आपला प्रभाव दाखवण्यास सुरुवात केली. कॉलऱ्याप्रमाणे सर्व कैदी रेच आणि वांत्या यांनी अगदी हैराण झाले. माझी तर फारच तिरपिट झाली. सगळ्या तुरुंगभर हा प्रकार घडला. सुपरिंटेंडंट, जेलर, सर्व धावून आले. पण करणार काय? अतिशय आजारी होते त्यांना औषधपाणी दिले. सुदैवाने त्या रात्री कोणी दगावले नाही. आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे या साऱ्या कल्लोळांत २७ वर्षे तुरुंगांतच काढलेल्या एका कैद्याने हे हलाहलही पचवले होते! त्याला काहीच झाले नाही!'

१२.८ दु:सह शीतोष्णता व त्यामुळे मृत्यु

सिंध प्रदेश म्हणजे भयंकर उष्ण. त्यांत एका वर्षी तर बाह्य हवेतले तपमान (टेंपरेचर) १२४ अंशापर्यंत गेले होते. सामान्यतः ११८ ते असे. अशा बाह्य उष्णतेत आम्ही होरपळून निघत होतो. रात्रीं १० वाजतांसुद्धां भिंतीना टेकवत नसे इतक्या त्या तापत. मग मनुष्याची कथाच काय? अशा उष्णतेत झोंप कशी येणार? काही रात्री तर जाग्रणच पडे. त्यांतून गार पाणीही मिळण्याची अशक्यता. त्यामुळे तेथला उन्हाळा असह्य होई. एके दिवशी तर अशा (Sun-heat stroke) भयंकर उष्णतेने ९ माणसे तुरुंगांत मेली! त्यांना सिंधूच्या वाळूंत काम करावे लागे. व उष्णतामान १२४, खालीं वाळूही भयंकर चटके बसतील अशी तापलेली! गार पाण्याचा स्पर्शही नाही! अशा उष्णतेने ९ कैदी उन्हाची 'झळ' लागून पटापट तरफडून मेले. पण लक्ष कोण देतो? आम्ही राजकीय कैदी म्हणून आम्हांस बाहेर नेणेच शक्य नव्हते. या नियमामुळे आम्ही जिवंत राहीलो. पण दरसाल होरपळत होतोच.

उन्हाळ्याप्रमाणे सिंधमधला हिवाळाही कडक. तेथे वर्षाऋतूंत पाऊस नाहीच म्हणाना. वर्षांतून ५-६ इंच सारा पाऊस. त्यामुळे दरसाल कडक प्रखर उन्हाळा, आणि तितकाच कठीण

हिवाळा. हिवाळ्याला उबदार कपडे जाडेभरडे देत. पण तेच रुतत. पण तसेच अंग आंखडून, एका अवयवाची ऊब दुसऱ्याला देत, त्या बोचणाऱ्या जाड्या-भरड्या तरटावर अंग टाकून, कोपऱ्याचा आसरा घेऊन, रात्र काढणे भाग पडे. त्यांतही एखादे वर्षी भयंकर थंडीची लाट (Cold wave) आली म्हणजे दिवसा ऊनही गार वाटे, मग रात्रीचे हाल कशाला विचारावे!

१२.९ तुरुंगांतल्या काही प्रतिष्ठित चोऱ्या

हालांबरोबर काही गमतीही होत. सिंध प्रांतांतले माजी कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. चोइतराम गिडवानी हे त्या वेळी तुरुंगांत सरकारी नोकरींत दुय्यम डॉक्टर होते. आम्हांला बौद्धिक उपासमार होत आहे हे त्यांना पाहावेना. म्हणून त्यांनी रवींद्रनाथांचे 'साधना' हे पुस्तक एक दिवस आम्हांला आणून 'चोरून' दिले. प्रथमच रवींद्रनाथांच्या ग्रंथांचे दर्शन आम्हांला तेव्हा झाले! आम्ही तुरुंगाच्या सर्वाधिकाऱ्याला वारंवार विनवफीत होतो की, सरकारी खर्चाने तरी आम्हांस ग्रंथ द्या, किंवा आमच्या खर्चाने, पण हवीं तर सरकारने पसंत केलेली, पुस्तकें तरी आम्हांस आणूं द्या. पण २-३ वर्षे त्या कर्नल ज्याक्सन नावाच्या ढनें नुसती टोलवाटोलवी चालविली. आम्हांला त्याचीं उत्तरें येत की, ''सरकारजवळ बजेटांत पैसा नाही म्हणून पुस्तकें सरकारी खर्चाने देतां येत नाहीत; आणि खासगी खर्चाने देतां येत नाहीत कारण तसा नियम नाही!' वास्तविक नियम करणारा हाच अधिकारी. पण तसा नियम करण्याची त्याची इच्छाच नव्हती. कारण आमचे होतील तितके हाल पाहण्यांत त्याला गंमत वाटे! या अन्यायामुळे डॉ. चोइतराम चिडले आणि त्यांनी अशा वाममर्गाने आम्हांला पुस्तकें दिली!

१२.१० मुंगी नाही पण हत्ती गेला!

पुढे एकदाचे ३-४ वर्षांनीं हे तुरुंगाचे मुख्याधिकारी प्रसन्न झाले आणि आम्हांला शेक्सपिअर, ज्ञानेश्वरी, आणि काही इतर थोडी अशी ४।५ पुस्तकें दिलीं. त्यांत मौज ही होती की, या शहाण्याने आम्हांला Motley's Raise of the Dutch Republic हा ग्रंथ दिला! आम्ही जाणूनबुजून राजद्रोही क्रांतिकारक. हा ग्रंथ म्हणजे डच लोकानी राज्यक्रांति करून स्वातंत्र्य कसे लढून मिळवले त्याबद्दलचा. तो मागण्यास आम्हीच धजलों नसतों. पण खुद्द तुरुंगाधिकाऱ्यांकडूनच आमच्याकडे तो आला! या शहाण्याच्या अकलेतून प्रथम मुंगी जात नव्हती तेथून हा सबंध हत्ती बाहेर आला! असो. ज्ञानेश्वरी आल्याने मात्र मनाची तळमळ शांत झाली. मी तुरुंगांत तिचे ५ वेळा पारायण केले. ही ५ पुस्तकें मिळावयास सनदशील पद्धतीने ४-५ वर्षे लागली.

१२.११ इंग्रजी भाषेचे आम्ही दोन अधिकारी

तुरुंगांतली आणखी मौज म्हणजे तेथल्या ढची. साऱ्या तुरुंगांत इंग्रजी चांगले जाणणारे व लिहूं शकणारे काय ते आम्ही दोन. एक मुख्य अधिकारी आणि त्याखालीं एकदम मीच. आमचे जेलर इंग्रजी ५वी यत्ता शिकलेले, आणि डेप्युटी जेलर तर तिसरींतच घुटमळलेले. त्यामुळे इंग्रजी लिहिण्यासमजण्याची त्यांना पूर्ण अडचण. सुपरिंटेंडंट हा आय्.एम्.एस्. पैकी कॅ. भाटेना म्हणून पार्शी गृहस्थ होता. जेलरीच्या अकटोविकट ज्ञानामुळे त्याला त्याच्या कचेरीचे काम

करणे कठीण पडे. म्हमून त्याने मला मग ऑफिसमध्येच घेतले. मला कामाची माहिती झाल्यावर त्याची कामें भराभर उरकूं लागली. पण मला ऑफिसमध्ये घेण्याची 'चोरीच' होती. कोणी मोठा अधिकारी आला म्हणजे तो मला माझ्या कोठडींत पाठवी, आणि तो गेला म्हणजे पुन्हा बोलावून घेई. जेलर, डेप्युटी जेलरना जी कामें करतां येत नव्हती ती मी करू लागल्याने तुरुंगांतल्या इतर कैद्याना मी म्हणजे एक मोठा अधिकारीच वाटूं लागलों. याचा फायदा असा झाला की, साऱ्या तुरुंगभर मला हवे तेथे जाण्याची मोकळीक मिळाली आणि तुरुंगाचा कारभार सर्व माहीत झाला.

१२.१२ सरकारचा खुनशीपणा

पहीले महायुद्ध (१९१४-१९१८) आम्ही तुरुंगांत असतांच सुरू झाले. त्यामुळे तुरुंगखात्यांतले सर्व आय्.एम्.एस. अधिकारी लढाईवर गेले. तुरुंगखात्यांत मग नव्या अधिकाऱ्यांची भरती झाली, आणि डॉक्टर म्हणून काही लोकांना त्या जागा मिळाल्या. यामुळे हैदराबाद तुरुंगावर माझे एक समव्यवसायीच सुपरिंटेडंट म्हणून आला. वजन कमी झालेल्या कैद्याना डॉक्टरने हवे ते औषध व अन्न द्यावें, असा त्याला अधिकार आहे. या माझ्या समव्यवसायिकाने माझें वजन ३५ पौंड कमी झालेले पाहून मला दूध, पोळी वगैरे अन्न देण्याचा हुकुम दिला. त्यामुळे शिक्षेच्या शेवटच्या वर्षांतच बौद्धिक व शारीरिक भुकेचे तुटपुंजे समाधान झाले. तोंपर्यंत आमचे हाल खुनशीपणाने चालूच होते.

आमच्याविरुद्ध इंग्रज सरकारच्या खुनशीपणाचे आणखी एक गमक म्हणजे १९११ ला जो राज्यरोहणाचा दिल्ली-दरबार झाला त्यावेळी सर्व इतर कैद्याच्या शिक्षा कमी झाल्या. पण आमच्या मात्र एक दिवसानेही कमी केल्या नाहीत! इतर कैद्यांनाही याबद्दल मोठे आश्चर्य वाटले. आम्हांलाही त्याबद्दल फारशी आशा नव्हतीच. त्यामुळे आम्हांला नित्य नियमाप्रमाणे ठराविक दिवसांची सूट मिळून आम्ही आमच्या शिक्षा भोगूनच बाहेर पडलों.

१२.१३ सोडतांनाही प्लेगांत ढकलले

इंग्रज सरकारच्या आशा दुष्ट व मूर्खपणाचे प्रदर्शन माझ्या सुटकेच्या वेळीही झालेच. मी नाशिकचा राहणारा म्हणून तुरुंगाच्या नियमाप्रमाणे मला नाशकास आणून सोडावयाचा शिरस्ता खरा. पण त्यावेळी नाशिकला प्लेगची साथ होती. माझ्या घरातच मालकाचीं २ माणसे प्लेगने मेली होती. म्हणून मी मला पुण्यास माझ्या श्वशुरगृही नेऊन सोडा, किंवा मला अगोदर प्लेगप्रतिबंध लस टोंचून मग नाशकास न्या, असा योग्य व साधा आग्रह धरला. पण सरकारी हुकूम म्हणजे हुकूम. प्लेगप्रतिबंध लस टोंचून सोडण्याचा नियमांत आधार नाही म्हणून ती टोंचली नाही! आणि कैदी जेथे राहणारा तेथेच त्याला पोंचवावयाचा असा नियम म्हणून पुण्यास पाठवतां येत नाही, असा सुपरिंटेडंटने हुकूम दिला! मी त्याला विचारले की, सुटलेल्या कैद्याचे आयुष्य अधिक मोलाचे का तुमचा नियम? तो निरुत्तर झाला पण हुकूम बदलूं शकला नाही! इंग्रजांच्या नोकरशाहीची अक्कल अशी तेव्हा वाहात होती.

असो. शेवटी सरकारी नियमाप्रमाणे माझ्याबरोबर एक जमादार देऊन मला नाशकास थेट प्लेगच्या खाईंत आणून टाकले! जमादार बिचारा हिंदु होता. त्याला नाशिकची यात्रा करावयाची

होती. म्हणून माझ्या सुटकेच्या वेळी मुद्दाम त्याने आपलीच योजना मजबरोबर येण्याची करून घेतली होती. मी त्याला प्लेगची लस टोचून घेण्यास अगोदर बजावले होते, व त्याप्रमाणे त्याने ती टोंचून घेतली होती. मी सुटल्यावर त्याने मला आपल्या घरीं नेऊन जेवण दिले व मग आम्ही निघालों. माझ्यामुळे त्याला नाशिक-पंचवटी यात्रा घडणार यामुळे तो आनंदांत व कृतज्ञ होता; आणि आम्ही दोघांनीं एकमेकाची सोय पाहून प्रवास केला. नाशकास आल्यावर हुकुमाप्रमाणे त्याने पोलीसकडे वर्दी दिली व मी घरी आलों.

१२.१४ दारिद्र्याची सीमा

सुटकेचे अगोदरचे दिवस म्हणजे इतर कैद्याना मोठे आशेचे व आनंदाचे. माझे मात्र तसे नव्हते. माझ्या दारिद्र्याला तेव्हा सीमा नव्हती. अक्षरशः निष्कांचन स्थितीत मी होतो. माझे मेहुणे (आता कै.) अनंतराव लेले हे माझ्या शिक्षेच्या दिवसांत दरमहा १० रु. माझ्या पत्नीस, त्यांच्या बहीणीस पाठवीत. त्यांतच माझी आई व पत्नी यांनी दिवस कंठले. इतर स्नेह्यांनीं, विशेषतः (आता सर्व कै.) वामनशास्त्री दातार, वामन श्रीधर बर्वे, विश्वनाथराव केळकर, गोविंद कवि यांनी अडीअडचणींत थोडीफार मदत करावी. पण खरा आधार फक्त या १० रुपयांचा. आमचा खटला चालू असतां घरीत जी काय चार-पाचशेंची पुंजी होती ही सर्व माझ्या आईने व पत्नीने वकिलांच्या खिशांत, मी नको नको म्हणत असतां, घातली. त्यामुळे घरात शिल्लक शून्यच होती. अशा भयंकर दारिद्र्यात मी सुटणार होतो. त्यामुळे ‘पुढे काय’ हा प्रश्न सुटकेपूर्वी मला सारखा भंडावीत होता. इंग्रज सरकार हात धुवून पाठीस लागलेले. ते रोजगारधंदा थोडाच सुखासमाधानाने करू देणार? त्यामुळे मन खिन्नच होते.

१२.१५ लो. टिळकाचा एकमेव आधार

पण पुढची माझी स्थिती ओळखून माझ्या काही मित्रांनीं मला आपण होऊन जी मदत केली ती बिनमोल होती. मुंबईस येतांच (आतां कै.) प्रा. दत्तोपंत केतकर यांनी एकदम १०० रु. ची नोट माझ्या हातांत ठेवली. त्यामुळे मला बराच धीर आला. पुढे पुढे १० महीने मी केवळ मित्राच्या उसनवारीवर व मदतीवर काढले. माझ्या कयासाप्रमाणे, इंग्रज सरकारच्या हुकुमावरून, मजवर २४ तास सारखा पहारा होता. त्यामुळे कुठें नोकरी पहावयाला जावें तर मालक म्हणे तुमच्या मागचे हे शुक्लकाष्ठ आम्हांला जाचणार. मग आम्ही उगाच ही ब्याद तुमच्याबरोबर आमच्या का मागे लावून घ्या? १९१५ सालीं लोकाची मनाची तयारीही आमच्यासारख्या रोजद्रोही लोकाना जवळ करण्याची नव्हती. जो तो आम्हांला टाळी. त्यामुळे हे १० महीने फारच जाचांत काढले. श्वशुरांच्या घरीं तरी किती महिने रहावयाचे? शेवटी मनाचा अखेरचा हिय्या करून मी लो. टिळकांना भेटावयाचे ठरवले. इतर पुढाऱ्यांनीं आम्हांला पाठच दाखवली होती. म्हणून शेवटचा आसरा टिळक हेच होते. १९१५ च्या डिसेंबरात मी त्यांना भेटलो व सर्व कहाणी त्यांना सांगितली. ‘लो. टिळकांच्या आठवणी’ या ग्रंथांत मी ती, व त्यानंतर त्या महात्म्याने मला कसे जवळ केले, आणि केसरी-मराठ्याचा दुय्यम संपादक म्हणून नोकरींत घेतले, ही हकीकत आलीच आहे. म्हणून पुनरुक्ती येथे न करतां त्या ग्रंथाकडेच वाचकांचे लक्ष वेधतो. टिळकांच्या आधारावरच पुढचा माझा संसार मी रेटला. इतकेंच

नव्हे तर पुन्हा मेडिकल कॉलेजमध्येही, त्यांच्याच आश्रयामुळे, मी प्रविष्ट होऊन डॉक्टर होऊं शकलों. त्यांचे उपकार मी जन्मोजन्म विसरणार नाही.

१२.१६ सरकारचे टिळकांविरुद्ध कारस्थान मी मोडले

केसरींत त्यावेळी माझ्याप्रमाणेच राजकारणांत पोळलेले असे दोन गृहस्थ टिळकानीं माझ्या अगोदरच घेतलो होते. ते म्हणजे सेनापति बापट आणि कै. वामन मल्हार जोशी. अलिपूर बॉम्बकेसमध्ये सेनापतीचा संबंध आला होता. म्हणून ते कित्येक वर्षे अज्ञातवासांत होते. पुढे ते बाहेर आल्यावर इंग्रजांनीं त्यांच्यावर खटला भरला नाही. कारण त्यांच्याविरुद्ध साक्ष देणाऱ्या राजसाक्षीदाराला, नरेंद्रनाथ गोस्वामी याला, तुरुंगांतच कन्हयालाल दत्ताने गोळी घालून ठार केले होते! त्यामुळे त्यांच्याविरुद्ध पुरावाच नव्हता. पण वैरी म्हणून सरकार त्यांस समजेच. वामनराव जोशी तर राजद्रोही ठरून शिक्षा भोगून आले होते. पण राजकीय क्रांतीशी या दोघांचा संबंध स्पष्ट सिद्ध नव्हता. टिळक हे १८९७ त चाफेकरांनीं केलेल्या ऱ्यांडच्या खुनाला उत्तेजन देणारे, आणि क्रांतिकारक मताचे होते, आणि त्यांच्या केसरींतले लेख वाचून अनंतराव कान्हेऱ्यांनीं नाशकास ज्याक्सनचा वध केला, असे इंग्रज सरकारास ठरवावयाचे होते. आमच्या ‘अभिनव भारता’शी त्यांचा दाट संबंध होता, असे गणू वैद्याच्या तोंडून आमच्या खटल्यांत वदवण्याचा सरकारने भगीरथ प्रयत्न केला. पण तोही मागे सांगितल्याप्रमाणे, पळशीकरांच्या टिळकांबद्दलच्या आदराने, फसला होता. म्हणून, ती चूक सावरण्याकरितां पुन्हा चिरोलकेसमध्ये, गणूला साक्षीला बोलावून, टिळकांचा ‘अभिनव भारता’शी, व ज्याक्सन-वधाशी, संबंध जोडण्याचा सरकारचा डाव होता. गणूला चिरोलचे समन्स लागतांच त्याच्या वडील बंधूंना घेऊन रात्री तो मजकडे आला. त्याचा वडील भाऊ व तो, मी राहात होतो त्याच गल्लींत, पुण्यास राहात होते. आल्यावर त्याने माझ्या पायावरच डोके ठेवले. ज्याक्सन-वधाच्या खटल्यांत त्याला झालेली २५ वर्षे जन्मठेपेची शिक्षा, आमच्या खटल्यांत तो राजसाक्षी झाल्यामुळे, कमी करून ३ वर्षांची साधी कैद केली होती, व आमच्या कटाच्या खटल्यांत त्याला माफी दिली होती. पुढे तो सुटल्यावर पोलिसांनी त्याला युरोपियन जिमखान्यांत भर २५ रु. पगाराची नोकरीही दिली होती. गणूवर हे उपकार सरकारने केले असल्याने तो आपला मिंधा आहे, असे सरकारास वाटत होते. आणि म्हणून टिळक हे राजकीय कटांना व खुनांना उत्तेजन देत असत, असे गणूच्या तोंडून वदवून घेण्यासाठी, चिरोल-केसच्या निमित्ताने, चिरोलतर्फे साक्ष देण्यास गणूस समन्स लागले होते.

१२.१७ गणूचा पश्चात्ताप व पापक्षालन

ते घेऊन तो मजकडे आला. मी त्यावेळी केसरींत दुय्यम संपादक होतो. गणू मला म्हणाला की, ‘‘आजवर माझ्या हातून झालीं ती पापें झालीं. त्याच्याबद्दल मला पश्चात्ताप होतोच आहे. पण टिळकांसारख्या महात्म्याविरुद्ध साक्ष देण्यास चिरोलने जी गळ घातली आहे तिच्यांतून मला वाचवा. टिळकांच्याविरुद्ध प्राण गेला तरी मी साक्ष देणार नाही. मात्र त्यांतून सुटावयाचे कसे ते मला सांगा.’’ गणूवर विश्वास ठेवणे कठीणच होते. पण Saints have a past and sinners have a future - साधूंनीं पूर्वायुष्यांत काही पापें केलेलीं असतात; आणि

पापीही उत्तरायुष्यांत पुण्यवान् होऊ शकतात - या इंग्रजी म्हणीप्रमाणे गणूच्या पश्चात्तापयुक्त वचनावर विश्वास ठेवा, अशी त्याच्या वडील भावाने मला ग्वाही दिली. पण त्यावर विश्वास ठेवा म्हणजे मारेकऱ्यावर विश्वास ठेवणेच होते. पण टिळकांसाठी तेही धाडस मी केले.

मी ही गोष्ट दुसरे दिवशी लोकमान्यांच्या कानावर घातली. त्यांनी मला सांगितले की, ''गणूने मला (टिळकांना) अनुकूल साक्ष दिली तर त्याची नोकरी जाईल. पण ती गेली तर मी त्याला दुसरी ३५ रु. पर्यंतची नोकरी देईन. शिवाय मी 'अभिनव भारता'च्या सदस्यांना सबूर करा, उतावीळपणाने भलतेच करू नका,'' म्हणून थोपवूनच धरले होते ही खरी गोष्ट आहे. तीच त्याने सांगावी म्हणजे झाले. हा निरोप गणूला कळवा, आणि तो कबूल असल्यास, व तुमची त्याबद्दल खात्री झाल्यास, त्याला माझ्याकडे भेटण्यास घेऊन या.'' मी गणूला हे कळवले. तो आनंदित होऊन मजबरोबर टिळकांकडे आला. त्याने त्यांना साष्टांग नमस्कार घातला, आणि कृतापराधांची क्षमा करा म्हणून म्हटले. टिळकांनी त्याला आश्वासन देऊन ठरल्याप्रमाणे वागणारना, म्हणून विचारले. त्याने होकार दिला, आणि आनंदाने तो घरीं गेला. ठरल्यांप्रमाणे त्याने याही प्रसंगी सरकारला चीत पाडले, आणि सरकारचा टिळकाविरुद्ध रचलेला हाही डाव मी हुकवला.

पण तो हुकला म्हणूनच चिरोलचा वकील कार्सन याने टिळकांना ''तुम्ही राज्य-क्रांतिकारक म्हणून कोर्टाने शिक्षा दिलेल्या भटांना (मला) आपल्या नोकरींत ठेवले आहेना?' हा प्रश्न विचारला (केळकरकृत टिळकचरित्र, खंड ३, भाग ४ पहा). आणि टिळकानींही त्याला बेडरपणाने होय, राजकारणांत शिक्षा झालेले लोक राष्ट्राचे प्रधानही होतात, असे सणसणीत उत्तर दिले! टिळकांच्या गोटांत माझ्याशिवाय 'कोर्टांत सिद्ध झालेला क्रांतिकारक' कोणीच नव्हता. म्हणून माझें नाव मुद्दाम घेऊन टिळकाचा क्रांतिकारकाशी संबध होता, इतकेंच नव्हे तर तो त्यांनी चिरोल-केसपर्यंतही चालू ठेवला आहे, हे ठरवण्याचा कार्सनचा मुद्दा होता. गणूला आम्ही फितवल्यावर तो संबंध सिद्ध करण्यास एवढा एकच पुराव्याचा आशातंतु चिरोलला होता. आणि त्याचा त्याने उपयोग करून घेतला. या एक लहानशा मुद्यावरच टिळकांविरुद्ध निकाल दिला असे नव्हे. कारण गोरक्षण, हिंदु-मुसलमानांचे दंगे, वगैरे अनेक साधे मुद्दे त्यांत होते. पण सरकारचे टिळकांविरुद्ध प्रयत्न कोठवर चालत असत याचे हे एक निदर्शक आहे.

१२.१८ मुक्ततेनंतरही छळ

शिक्षा भोगून सुटलेल्या आम्हां लोकांना सरकार कसे छळीत होते याचे शिधयांच्या बाबतीत पुरें प्रत्यंतर आले होते. शिधयांना आमच्या खटल्यांत ४ वर्षांची शिक्षा झाली होती. सुटून आल्यावर १८ विश्वे दारिद्र्यांत खितपतणाऱ्यांना कोठें तरी नोकरी करणे भागच होते. त्यांनी महत्प्रयासांनीं मुंबईच्या स्मालकॉज कोर्टांत नोकरी मिळविली. सरकारला हे कळतांच त्यांनी तेथल्या न्यायधिशाला सांगून त्या बिचाऱ्याच्या मुलाबाळांच्या तोंडचा तेवढाही घास काढून घेतला! पुढे शिधये थेट मद्रासपर्यंत नोकरीप्रीत्यर्थ गेले. पण तेथूनही त्यांना पोलिसांनीं हुसकले आणि त्यांची अन्नानगत करून सोडली. शेवटी बिचाऱ्याने भिक्षा मागून आपला चरितार्थ कसाबसा चालविला होता. एक दिवस ते भटक्या भिक्षुकाप्रमाणे अकल्पित माझ्या घरीं येवल्यास आले, आणि एक मंत्र म्हणून भिक्षां देही म्हणून म्हटले. त्यांना मी तात्काळ

ओळखले आणि सर्व हकीकत विचारली. त्यांनी त्यांच्यामागे पोलीसांसा ससेमिरा कसा लागला होता हे सर्व सांगून, शेवटी अक्षरशः त्यांना भिकेला कसे लावले, याची हृदयद्रावक हकीकत सांगितली. मी त्यांना स्वतः व हस्तेपरहस्ते मदत मिळवून देऊन त्यांची रवानगी केली ही गोष्ट निराळी. पण शिक्षा भोगून सुटल्यावरही सरकारचा छळ कोठपर्यंत चाले याचे हे भडक उदाहरण आहे.

१२.१९ माझा विश्वविद्यालयांत छळ

क्रांतिकारकांना कोठेंही शक्य तितकें छळावयाचे, त्यांचे संसार मोडावयाचे, हे धोरण सरकारी नोकरशाही इमानाने चालवीत होती. इतकेंच नव्हे तर त्यांनी पाळलेलीं कुत्रींही आम्हांला कशी अडवीत याचीं २-३ उदाहरणे सांगून हे छळपुराण आटपते घेतों. तुरुंगांत जाण्यापूर्वी माझी कायद्यापैकी पहीली एलएल.बी.ची, व डॉक्टरीपैकी दुसरी एम.बी.बी.एस.ची, अशी दोन शिक्षणक्रमांतल्या परीक्षा पास झाल्या होत्या. दोन्हीही शाखांपैकी शेवटच्याच परीक्षा राहील्या होत्या. दुसऱ्या एलएल.बी.च्या टर्म्सही भरून झाल्या होत्या. सुटल्यावर टिळकांच्या आश्रयाने संसाराची घडी थोडीफार बसल्यावर, या दोहोपैकी एक, किंवा शक्यतर दोन्ही, पदव्यांच्या परीक्षा देऊन कोणता तरी वकिलीचा किंवा डॉक्टरीचा धंदा चालवण्याची सोय करून ठेवावी, या उद्देशाने मी खटपट चालवली होती. वकिलीच्या धंद्याची एलएल.बी.ची परीक्षा घरीं अभ्यास करूनही पास होणे शक्य होते. पण त्याला बी.ए.ची पदवी तेव्हा अवश्य असे. आणि सरकारच्या लांगूलचालनी कुत्र्यांचे बहुमत असलेल्या मुंबई विश्वविद्यालयाच्या तेव्हाच्या सेनेटने सावरकर, मी व खरे या आम्हां तिघां क्रांतिकारकाच्या बी.ए.च्या पदव्या काढून घेतल्या होत्या. ती पदवी पुन्हा मिळवणे भाग होते. म्हणून मी मुंबई विश्वविद्यालयाकडे अर्ज केला होता. मुंबई विश्वविद्यालयाचे लॉ-सिंडिक व उपकुलगुरु, आणि आमच्या खटल्यांतले एक न्यायाधीश, चंदावरकर यांना घरीं जाऊन त्यासाठी भेटलोही. पण पदवी देतांच येत नाही, असे या शहाण्याच्या कांद्याने मला सांगितले! कारण काय तर म्हणे तशी कायद्यात सोय नाही! ही या सरकारी बगलबच्चांची आमच्याबद्दलची सहानुभूति! पुढे सर चिमणलाल सेटलवाड उपकुलगुरु झाल्यावर, त्यांनी ज्या सेनेटच्या ठरावाने आमच्या पदव्या रद्द केल्या तो ठरावच रद्द करून आमच्या पदव्या परत पुनरुज्जीवित केल्या. या गोष्टीवरून चंदावरकरीची मनोवृत्ती आमच्याबद्दल कशी होती हे उघडच झाले. तो ठराव रद्द करण्यात डॉ. डगन व डॉ. सर्व्हेअर या दोन पारशी गृहस्थांनीं निरपेक्ष मदत केली. या उदारमनस्क पारशी गृहस्थांनीं, त्यावेळी माझी व त्यांची ओळख नसतांही, जी सहानुभूती दाखवली तिच्याशी आमच्या चंदावरकरांचे वर्तन वाचकानीं पाहावें; म्हणजे सरकारच्या छळाला हेही 'मम' म्हणून कसे हात लावीत हे त्यांच्या ध्यानांत येईल. असो. एलएल.बी.ला यामुळे मला बसतां येईना.

एम.बी.बी.एस.च्या परीक्षेसाठी माझा २ वर्षांचा अभ्यासक्रमच पुरा व्हावयाचा होता. तेव्हा साऱ्या मुंबई इलाख्यांत ग्रांट मेडिकल हे एकच मेडिकल कॉलेज. आणि ते सरकारचे. मग तेथल्या मुख्य अधिकाऱ्याने माझ्यासारख्या क्रांतिकारकाला शिष्य म्हणून पत्करणे म्हणजे मुसळाला अंकुर फुटण्याइतकें अशक्य होते. कर्नल स्ट्रीट म्हणून एक पक्क्या हाडाचा साम्राज्यवादी तेथला मुख्याध्यापक. त्याने मला कॉलेजमध्ये घेण्याचेच नाकारले. आणि

सरकारी छळवादाची पुरी प्रचीति १९२० पर्यंत, सुटून आल्यावर ५ वर्षांपर्यंत, आणून दिली. पुढे मॉटफर्ड सुधारणानंतर बॅं. बॅप्टिस्टांच्या मदतीने मी मेडिकल कॉलेजमध्ये जाऊन डॉक्टरीची परीक्षा देऊं शकलों.

एवंच, तुरुंगांत आणि सुटून आल्यावरही, सरकार आमचा छळ कसा करीत होते याची ही, नमुन्यासाठी म्हणून. माझ्यापुरती थोडीशी माहिती दिली आहे. इतरांचीही त्याची आवृत्तिच असणार. म्हणून पुनरुक्ती न करतां विस्तारभयास्तव ती येथेच आंखडती घेतो. या छळांत माझे मित्र रा. सखाराम दादाजी गोऱ्हे हे मात्र क्षयी होऊन आम्हांला टाकून यमसदनास गेले! आनंदाची व अभिमानाची गोष्ट एवढीच की, या छळाने नामोहरम होऊन सरकारास कोणीही शरण जाऊन माफी मागितली नाही. आमचे सत्त्व व स्वत्व आम्ही पूर्ण राखले.

१३ परिशिष्ट दुसरे - खास कोर्टाचा खासा न्याय

ज्याक्सन-वधाच्या सबबीवर ५0 जण पकडले, पण त्या वधाच्या खटल्यांत फक्त ७ च आरोपी कोर्टापुढे ठेवले - (१) अनंत लक्ष्मण कान्हेरे, (२) कृष्णाजी गोपाळ कर्वे, (३) विनायक नारायण देशपांडे, (४) शंकर रामचंद्र सोमण, (५) वामन नारायण जोशी, (६) गणेश बळवंत वैद्य, (७) दत्तात्रय पांडुरंग जोशी. यांपैकी पहील्या तिघांना फाशी, दुसऱ्या तिघांना जन्मठेप काळेपाणी, आणि जोशी यांना फक्त २ वर्षे, अशा शिक्षा खास कोर्टाने ठोठावल्या. बेसिल स्कॉट, हीटन व चंदावरकर या तीन हायकोर्टातल्या न्यायाधिशांचे खास कोर्ट या वधाच्या, आमच्या, व सावरकरांवरील आणखी एका खटल्यासाठी १९०८ च्या कायद्यासाठी 'झटपट' चौकशी करण्याकरितां, मुंबई सरकारने नेमले होते. या कोर्टाने वधाच्या खटल्यांत जो निकाल दिला तो आमच्या कटाच्या व सावरकरांवरच्या २ऱ्या खटल्यांत दाखल झाला होता. खुनाच्या आणि आमच्यावरील सशस्त्र क्रांतीच्या खटल्यांतील निवाडेही, माझ्या समजुतीप्रमाणे, कोणत्याही कायद्याच्या छापील मासिकात या खास कोर्टाने प्रसिद्ध होऊं दिले नव्हते. मग पुराव्याचीं पुस्तकें प्रसिद्ध होणे अशक्यच होते. पण मला या खटल्यांचे खास कोर्टापुढे दाखल केलेले काही दस्तऐवज व इतर कागदपत्रे माझे मित्र रा. दत्तात्रय धोंडदेव पुराणीक, येथील मॉडर्न हायस्कुलांतले, व माजी टिळक विद्यालयाचे शिक्षक, यांच्याकडून मिळाले. ते नाशकास असतांना, एक दिवस म्युनिसिपालिटीच्या केराच्या कूंडीवर टाकलेलीं काहीशी ४ फाटकी पुस्तकें त्यांना दिसलीं. एवढीं मोठालीं पुस्तकें केरीत कशी टाकलीं, आणि ती आहेत तरी कशाचीं, म्हणून सहज पाहतां त्यांना कळून आले की, ती नाशिकच्या या दोन प्रसिद्ध खटल्यांतील पुराव्यांचीं आहेत. त्यांनी ती उचलून आणून बांधून काढलीं, आणि जपून ठेवली. माझे मित्र रा. द. न. गोखले व शि. ल. करंदीकर, यांनी 'बाबा, आणि तात्या सावरकरांचीं चरित्रें' लिहीतांना यांतील मजकुराचीं टिपणे करून नेलीं होती. पण, इंग्रज अंमल तेव्हा थोडा फार तरी होता म्हणून, त्यांनी या पुराव्याचा जाहीर उल्लेख केला नव्हता. मीही त्या पुस्तकाचा या ग्रंथासाठी उपयोग करून घेतला आहे. त्यांतही बरींच पाने गहाळ झाली आहेत. पण त्याला इलाज नाही. रा. पुराणिक यांनी हा पुरावा आस्थेवाइकपणाने जो जतन करून घेतला त्याबद्दल त्यांचे आता जाहीर आभार मानतों. खास कोर्टाने जेथे निवाडेही प्रसिद्ध होऊं दिले नाहीत, तेथे पुरावा ते आमच्या हाती कसा लागूं देणार? पण सत्याच्या खुनाला वाचा फुटते ती अशी. असो.

१३.१ खास न्यायाची खास पद्धती

या खास कोर्टाने ३ खटल्यांत जो खासा न्याय दिला, त्याच्या विलक्षण पद्धतीतल्या काही ढोबळ चुका व गंमती येथे देतों.

ज्याक्सन-वधाच्या खटल्यांत पुराव्याची सर्व मदार आरोपींच्या कबुलीजबाबांवरच होती. खास कोर्टानेही हे स्पष्ट म्हटले आहे. ते म्हणते -

''It is from these statements 'mainly' that knowledge of the facts, which preceded the murder, is derived. If they are relevant, it is essential to take them into consideration, analyse and value them. It is argued that they are not relevant and

they are not true.'' हे कबुलीजबाब कायदेशीर लागू नाहीत आणि खरेही नाहीत असे आरोपींच्या बॅरिस्टरीचे म्हणणे होते. या कोर्टापुढे गणू वैद्य व दत्तात्रय पांडुरंग जोशी यांनी हे कबुलीजबाब मागे घेतले नाहीत, या गोष्टीचा कोर्टाने मोठ्या दिमाखाने उल्लेख केला आहे. पण त्यांना, त्यानंतरच्या आमच्या खटल्यांत, राजसाक्षी - माफी देऊन केलेली सरकारी साक्षीदर - करावयाचे होते, हे कदाचित त्या वेळी या कोर्टाला माहीत नसेल; किंवा मुद्दाम ही गोष्ट कोर्टाच्या निदर्शनास फिर्यादी पक्षाने - सरकारने - आणली नसेल. पण वस्तुस्थिति तशी होती, हे पुढे सिद्धच झाले. आणि गणूची जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा ३ वर्षे साध्या कैदेवर आणली, आणि दत्तु जोशी यास माफीचे साक्षीदार केले, हाच पुरावा त्याबद्दल आहे. तेव्हा हे २ कबुलीजबाब सरकारनेच, सरळ आणि उघडच, Inducement (लालूच) दाखवून घेतले होते, आणि म्हणूनच ते सपशेल बेकायदेशीर व गैरलागू होते. बाकीच्या आरोपींनी ते बळजबरीने घतले होते म्हणून परत घेतलेच होते. आणि आमच्या राज्यक्रांतीच्या खटल्यांत पळशीकर-खोपकर या म्याजिस्ट्रेटांना, कबुलीजबाब घेण्याच्या पद्धतीबद्दल, याच कोर्टाने खरपूस चापले होते, हे मागे सांगितलेच आहे. तेव्हा आरोपींच्या बॅरिस्टरांनीं हे कबुलीजबाब जबरदस्तीने, जुलमाने, किंवा लालूच दाखवून घेतले, आणि म्हणून त्याज्य, हा मुद्दा जो मांडला होता, तोच खरा होता. पण तरीही या खास कोर्टाने ते ग्राह्य म्हणून दाखल करून घेतलेच!

१३.२ सरकारवरच उपकार

आरोपींतर्फे बॅरिस्टरांचा दुसरा मुद्दा असा होता की, ''ज्या (१९०८ चा न्यू क्रिमिनल लॉ ऍमेंडमेंट ऍक्ट) कायद्याखाली हा खटला चालला आहे त्याच्या ३ऱ्या कलमाप्रमाणे म्याजिस्ट्रेटला आरोपींच्या जबाबांवरून, त्यांचा स्वतःचा आरोप सिद्ध होईल असे, प्रश्न विचारण्याचा अधिकार नाही. आरोपीने स्वखुशीने दिलेला जबाब असेल तरच तो त्याने दाखल करून घ्यावा.' हे कलम ह्या कोर्टाला इतके नडले की, 'ते अव्याप्त आहे' (not an exhaustive enactment) अशी ह्या कोर्टाला मल्लिनाथी करावी लागली! आणि याचा अर्थ करतांना या न्यायाधिशांनीं जे अकलेचे तारे तोडले आहेत ते पाहून हल्लींचा कोणताही स्वतंत्र बुद्धीचा न्यायाधीश हसेलच. परवाच मुंबई हायकोर्टाने, सरकारी वकिलाला, असल्याच एका कायद्याच्या 'अव्याप्त किंवा अपुर्ते'पणाच्या मुद्यावर, सरळ सांगितले की, ''सरकारने कायदा 'पुरता व्यापक' करून घ्यावा. आम्ही, सरकारवर उपकार करून, तो पुरता व्यापक करण्यास बांधलेलों नाही!' पण आमच्या खास कोर्टाला सरकारला, क्रांतिकारकांपासून वाचवावयाचे होते म्हणून, कायद्यातली उणीव त्याने 'अव्याप्तीच्या' मुद्द्यावर भरून काढली, आणि, सरकारवर उपकार करून, आमचा काटा सरकारच्या पायांतून काढला!

मागे सांगितल्याप्रमाणे आरोपींनीं बरीच माहिती खोटी सांगितली होती. आपल्या इतर देशबांधवांना वाचवण्यासाठी त्यांना हे करावे लागले होते. त्यामुळे पोलिसांनी कोर्टापुढे जी माहिती सांगितली होती त्यावरून कोर्टाने ठरवले की, हा ''गुप्त कट १९०८ मध्ये अस्तित्वांत आला! तात्कालीन राजकीय वातावरणाचा तरुणांच्या मनावर परिणाम (Political influence) झाला होता. या गुप्त मंडळाने हत्यारे जमवली, स्फोटक पदार्थ (बॉम्बसाठी) तयार केले, आणि राजकीय हेतूसाठी ह्या खुनाचा बेत रचला'' वगैरे वगैरे. मुख्य मुद्याच्याबद्दल सर्व निवाड्यांत

एवढींच वाक्यें आहेत. बाकीचे भारूड कायद्याची कसरत, व वेळी पूर्तीही, करून आरोपींवर गुन्हा सिद्ध कसा होतो हे दाखवण्यांत खर्च झाले आहे. त्यांतल्या २ गमती वर दिल्या आहेत. बाकीच्या आमच्या खटल्यांत ज्या घडल्या त्यांतील काही देतों.

१३.३ सर्वांची एकच मोट बांधली

वधाचा ७ जणांवरचा खटला चालू असतांच, पकडलेल्या इतर ४० आरोपींची चौकशी चालूच होती. त्यांपैकी रा. कोल्हटकर अटकेंतच वारले, चौघांना नुसत्या हत्यारांच्या कायद्याखालीं शिक्षा झाली. बाकी आम्ही ३५ जण उरलों, आणि आम्हांला 'न्याय' देण्यासाठी त्याच तीन न्यायाधिशांच्या खास 'न्याय' कोर्टांत आम्हांला पाठवून दिले. ज्याक्सन-वधाबद्दल ७ देशभक्तांना दिलेल्या शिक्षा मागे सांगितल्याच आहेत. पुढे आमच्यानंतर पोलिसांनी कोठूरचे देशभक्त बळवंत रामचंद्र बर्वे व इगतपुरीचे काशीकर यांना बरेच दिवसांनी पकडले होते. तरी त्यांनाही आमच्यांतच, न्याय 'झटपट' मिळावा म्हणून, प्रविष्ट केले होते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनाही, आमची चौकशी सुरू झाल्यानंतर हिंदुस्थानांत आणले. पण त्यांनाही आमच्याबरोबरच खास न्यायालयांत पाठवले. निरनिराळ्या वेळी जरी हे तिघे पकडले आणि त्यांची चौकशी पुष्कळ दिवसानंतर सुरू झाली, तरीही आम्हां आतां ३८ जणांना न्यायाच्या सागरात गटंगळ्या खाण्याकरिता एकाच होडींत ढकलले. वास्तविक काटेकोर न्यायनियमानुसार हे कायदेशीर म्हणतां येत नाही. पण तरीही आम्हां ३८ जणांना एका दावणींत गोवले खरे. आमच्या बॅरिस्टरांनीं मागाहून आलेल्या आरोपितांच्या आरोपांनीं सर्वांचेच आरोप पक्के होतात, आणि म्हणून ह्या आरोपींचे खटले एकत्र चालवून नयेत, या मुद्यावर खूप आक्षेप घेतले. पण न्यायाधिशांनी ते उडवून लावले ! सत्तेपुढे शहाणपण असे लंगडें ठरले!

१३.४ शास्त्र व न्यायनीति गुंडाळली

न्यायनीतीला अनुसरून या न्यायमूर्तींनी आमचा व सावरकरांचा नंतरचा २रा खटला चालवणे योग्य नव्हते. कारण ज्याक्सन-वधाचा खटला याच तिघांपुढे चालला होता. आणि त्यांत या आमच्यावरील कटाच्या आरोपाचा उल्लेख येऊन गेला होता. त्यामुळे या न्यायाधीशांचीं मने आमच्याविरुद्ध कलुषित झाली असणे अगदी स्वाभाविकच होते. पण सरकारला कदाचित् इतर न्यायाधिशांबद्दल विश्वास नसल्यामुळे म्हणा, किंवा अन्य कारणाने म्हणा, हेच न्यायाधीश 'फिट्ट' वाटले. आणि याही बहाद्दरांनीं, सर्व मानसशास्त्र व न्यायनीति गुंडाळून, आमचाही खटला चालवण्याचे मान्य केले! न्यायपद्धतीचा हा मुळांतच खून होता.

या अभियोगाचे काम ६९ दिवस चालले. आमच्यापैकी तिघांना - शंकर बळवंत वैद्य, विनायक सादशिव बर्वे आणि विनायक काशिनाथ फुलंब्रीकर यांना - विशेष पुरावा दिसेना म्हणून, खटला सुरू झाल्या दिवसापासून ५व्याच दिवशी, न्यायाधीशांनी सोडून दिले. वास्तविक यांच्याविरुद्ध पुरेसा पुरावा नव्हता, ही गोष्ट, लाखो रुपयांच्या सरकारच्या चंदीवर चरणाऱ्या, सरकारी ॲडव्होकेट जनरल व वकील म्हणवणाऱ्या शहाण्यांच्या कांद्यांना कळावयास हवी होती. पण न्यायाचा फार्सच करावयाचा होता. आणि इंग्रज सरकारच्या न्यायालयांत न्याय मिळतो, हे

दाखवण्यापुरताच, यांच्याविरुद्ध फारसा पुरावा नव्हात तरी, यांना वर्षभर कच्च्या कैदेचा धक्का दिला होता, हे त्यांना खास कोर्टाने ताबडतोब सोडले या गोष्टीवरून स्पष्टच होत आहे.

१३.५ न्यायमूर्ति का न्यायाची विभूति ?

सावरकरांनीं, त्यांची फिर्याद आंतरराष्ट्रीय न्यायालयांत प्रविष्ट केली होती म्हणून, या अभियोगांत कोणताही भाग घेण्याचे नाकारले होते. तरीही हे न्यायाधीश म्हणतातच की, बॅ. बप्टिस्टांनीं यांचे अप्रत्यक्षपणे समर्थन चालवले होते! त्यांतही विशेष विस्मयाची गोष्ट म्हणजे सावरकरांवर, आमच्या कटाच्या अभियोगानंतर, जो आणखी 'सरकारविरुद्ध युद्धास उत्तेजन देण्याच्या' आरोपावरून १९११ त खटला भरला, तोही याच तिघांपुढे चालला! आणि आमच्या २ खटल्यांतल्या कारवायांनी मने कलुषित होणे संभवनीय असतांही त्यांनी तो चालवला! त्यांतही सावरकरांनीं भाग घेतला नव्हता. त्यावेळी तर एकतर्फी खटला चालू असतांही या न्यायाच्या 'विभूतींना' हीही सबब नव्हती. तरीही त्यांनी सावरकरांना दुसरी जन्मठेपेची शिक्षा सुनावलीच!

आमचा अभियोग खास 'झटपट' कायद्याप्रमाणे (न्यू क्रिमिनल लॉ ऍमेंडमेंट ऍक्ट १९०८) चालला होता हे मागे सांगितले आहेच. ही गोष्ट, व वरची न्यायाधिशांबद्दल सांगितलेली पूर्वग्रहदुष्टताही, ध्यानांत घेतली म्हणजे आमच्यावरील सरकारी खटल्यांचे कोळसे हेच त्रिमूर्ति न्यायाधीश कसे पुनः पुन्हा उगाळीत होते, हे वांचकांच्या ध्यानांत येईल. या न्यायाधीशांची न्यायनिष्ठा कितीही सोंवळी असली तरी ती माणसेच होती. आणि मानसशास्त्राच्या साध्या नियमानुसार त्यांचीं मने निर्लेप राहणे शक्यच नव्हते. पण सरकारच्या या बंद्या गुलामांनी मानसशास्त्राची, आणि तन्निष्ठ न्यायनीतीची, पर्वा ठेवली नव्हती!

१३.६ पुराव्याच्या ग्राह्याग्राह्यतेच्या मौजा

या आमच्यावरील अभियोगाचे दैनंदिन काम कसे चालू होते हे रा. करंदिकरांनी सावरकरांच्या चरित्रांत वर्णन केलेच आहे. म्हणून त्याबद्दल विशेष लिहीत नाही. न्यायालयांत आलेल्या खऱ्याखोट्या पुराव्यांतल्या मौजा, व खुद्द या त्रिमूर्तींना आढळून आलेलीं व्यंगें, ही थोडीशी दाखवून, त्यांचा आजपर्यंत कोठेही न प्रसिद्ध होऊ दिलेला पूर्वग्रहदुष्ट निर्णय व तदनुसार आम्हांला दिलेल्या शिक्षा एवढेच मी येथे थोडक्यांत दर्शविणार आहे.

१. आमच्याविरुद्ध पोलिसांकडून जो पुरावा मांडला गेला त्यापैकी १ ला म्हणजे राजसाक्षींचा पुरावा. राजसाक्षी म्हणजे सरकारला फितूर होऊन आमच्यावर उलटलेले आमचेच सभासद. हे पांच होते. १. गणू वैद्य, २. दत्तात्रय पांडुरंग जोशी, ३. अंकुशकर, ४. वासुदेव रामचंद्र कुलकर्णी, आणि ५. चतुर्भुज अमीन. यांच्याबद्दल हे न्यायमूर्ति म्हणतात, ''यांचा पुरावा (substantially false) 'फारसा खोटा' दिसत नाही. त्यांनी त्यांना माहीत असलेल्या सर्वच गोष्टी सांगितल्या नाहीत. (वास्तविक या मुद्यावर त्यांची माफी रद्द करून त्यांच्यावर पुन्हा खटले करणे कायदेशीर होते. पण न्यायाधिशांनीं तसे सुचवलेही नाही!) एकाने तर बरेच लपवलेले आहे. त्यांच्या पुराव्यांतली खरी अडचण म्हणजे त्यांनी इतरांविरुद्ध फारसे खोटे सांगितले, ही नसून त्यांनी, स्वतःची कातडी बचावण्यासाठी, बऱ्याचशा खऱ्या व पुऱ्या गोष्टी

सांगितल्या नाहीत ही आहे. आणि यामुळे आम्हांला प्रत्येक आरोपीचा गुन्हा ठरवण्यास दुसरा पुरावा अवश्य आहे.'

खरे पाहीले तर या खुद्द न्यायविभूतींच्याच शब्दांवरून हे राजसाक्षी, त्यांच्या स्वतःच्या गुन्ह्यापुरते तरी, अविश्वसनीयच ठरले. मग जे एका बाबतीत विश्वासार्ह नाहीत त्यांचा पुरावा, आणि तोही सुटण्याची लालूच दाखवून मिळवलेला पुरावा, आम्हां आरोपींविरुद्ध तरी का विश्वसनीय मानावा? त्यांच्या पुराव्याची साथ करणारा इतर पुरावा होता हे मानले तर, तोही पुष्कळसा, मागे व पुढे सांगितल्याप्रमाणे, आरोपींना किंवा साक्षीदारांना, जबरदस्तीने मारून ठोकून, किंवा लालूच दाखवून, मिळवलेल्या कबुलिजबाबांचा. म्हणजे तोही तितकाच अविश्वसनीय. याचा अर्थ अके खोट्याला दुसऱ्या खोट्याचे पाठबळ. पण हेही या न्यायविभूतीना 'ग्राह्य' वाटले! आजच्या वरिष्ठ कोर्टात हे पचले नसते असे वाटते.

२. पुराव्याचा दुसरा प्रकार म्हणजे इतर आमच्याचपैकी बिनमाफीच्या (unpardoned) साक्षीदारांचा. याही बाबतीत हेच कोर्ट, राजसाक्षीप्रमाणेच, या साक्षीदारांबद्दल अविश्वास दाखवते. ते म्हणते की, ''या साक्षीदारांपैकी एकाला तर प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि ऐकलेल्या गोष्टीमध्ये विवेकच करतां आला नाही! या साक्षीदारांपैकी काहीनीं सर्वच ज्ञात असलेली माहिती सांगितली नाही. म्हणून या 'बिनमाफीच्या' (हा शब्द कोर्टाचाच आहे) साक्षीदारांच्या पुराव्यांतही, राजसाक्षींच्या पुराव्यांप्रमाणेच, कच्चे पक्के दोष (infirmities) आहेत. यांनी व त्यांनी काही बाबतीत, तपशिलांत 'घोटाळा' केला असून (confused) 'विपर्यासही' (distorted) केला आहे. पण इतर पुरावा पुष्कळ असल्याने आम्हांला सत्य हुडकून काढतां आले.'

या माफीच्या आणि बिनमाफीच्या साक्षीदारीबद्दल हेच कोर्ट पुढे म्हणते की, ''राजसाक्षी व इतर साक्षीदार हे प्रारंभीं आरोपीच होते. आणि म्हणून पुष्कळ दिवस 'पोलिसांच्या दडपणाखालीं' होते. आणि म्हणून पुष्कळ दिवस 'पोलिसांच्या दडपणाखालीं' होते. (And were as much under the influence of the police.)''

न्यायमूर्तींच्या या कबुलीजबाबांवरून याही साक्षीदारांचा पुरावा बिनतोड खोटा किंवा अविश्वासनीय ठरतो. पुष्कळ दिवस पोलिसांच्या अटकेंत असलेले, पण पुढे साक्षीदार व्हा म्हणजे तुम्हांला सोडूनन देऊं अशी लालूच दाखवून, किंवा मारून मुटकून धाक दाखवून, साक्षीदार बनवलेले लोक पोलिसांच्या इच्छेप्रमाणेच सांगणार, हे एखादें शेंबडे पोरही सांगू शकेल. या साक्षीदारांनींही, स्वतःला बचावण्यासाठी, खोटे सांगितले हेही हे कोर्टच म्हणते. त्यांनी तपशिलांत ''घोटाळा' केला व ''विपर्यास' केला, हेही या कोर्टाचेच शब्द आहेत. तरीपण इतर पुराव्यावरून (म्हणजे मागे सांगितलेले आरोपीचे कबुलीजबाब) हा 'खोटा', 'घोटाळ्याचा', 'विपर्यस्त' पुरावाही कोर्टाने ग्राह्य व विश्वसनीय धरला! आणि आम्हांला 'न्याय' दिला!

३. पुराव्याचा तिसरा भाग म्हणजे झडत्या व त्यांत मिळालेला मुद्देमाल. हा पुरावा 'पुष्कळसा' substantially खरा आहे असें कोर्ट म्हणते, पण लगेच लिहिते की, ''यांतल्या साक्षीदारांच्या जबाबांत तपशिलांत 'पुष्कळच' फरक आहे.'' (many differences in detail appear) पण या फरकांमुळे तो 'महत्त्वाच्या बाबतींत' खोटा आहे असें म्हणण्याला सबळ कारण नाही.'' एकदा कोणतीही गोष्ट मनाशी ठरली असली म्हणजे मनुष्य तिला जुळतील त्याच गोष्टींवर विश्वास ठेवण्यास उत्सुक असतो आणि बाकीच्या विरुद्ध गोष्टींकडे कानाडोळा

करतो. कोर्टाचे तसेच येथे झाले आहेसे दिसते. कारण असे की, साक्षीदार या शब्दाचा अर्थच असा की, त्याने त्या गोष्टी 'प्रत्यक्ष' पाहिलेल्या होत्या. मग तपशिलांत त्यांच्या पुराव्यांत 'पुष्कळसे' फरक कां यावे? ते आले, हे कोर्टच म्हणतें आणि तरीहि हा पुरावा मान्य!

४. पोलिसांच्या पुराव्याबद्दलही या कोर्टाचा अनुकूल ग्रह का तर त्यांनी 'शपथेवर' सांगितले म्हणून. आमच्या पोलिसांना, निदान त्यावेळच्या इंग्रज अमदानींतल्या पोलिसांना, खऱ्या-खोट्याची किती चाड असे, याबद्दल त्यावेळच्या कैक हायकोर्टांनीं ताशेरे झाडलेले लॉ-रिपोर्टांत आढळतात. आणि ईश्वराची 'शपथ' घेऊन सांगणारा अमरसिंगासारखा पोलीस-साक्षीदार सपशेल खोटा असे या कोर्टानेच ठरवले होते. तरीही 'शपथेवर' सांगणारे म्हणून इतर पोलीस-साक्षीदार खरेच बोलले, असे हे कोर्ट म्हणाले! आणि न्यायमूर्तींनी त्यांच्या मतांची जी कारणें दिलीं आहेत ती उभयपक्षींही लागू पडतात, हेही या कोर्टाच्या ध्यानांत आले नाही! त्यांपैकी पहिले कारण काय तर म्हणे ज्या 'तातडीने' (rapidity) आरोपी व मुद्देमाल सांपडला त्या त्वरेवरून असे दिसते की, पोलिसांना माहिती ''सहज मिळाली, त्यांनी छळ केला म्हणून नव्हे – Information was easily obtained, and was not the result of ill-treatment or coercion. ''जणुं बेदम मारामुळे आरोपींकडून माहिती त्वरेने मिळणे अशक्यच आहे? या अगडबंब ज्ञानाचे हे खंदक पुढे म्हणतात की, ''आरोपी पुष्कळ होते, त्यांना इकडून तिकडे नेत होते, ते पुष्कळसे एकत्रच रहात होते, आणि म्हणून पोलीस तपास उघडपणेच चालत होता.'' या कारणांमुळे 'पोलिसांनीं जुलूम केला किंवा धाक दाखवला' असे दिसत नाही! जणुं काही अनेक लोकांना एकदम मारतां ठोकतां येत नाही! गर्दी मोडण्यासाठी पोलीस जमावावरच हल्ले करतात, ही साधी गोष्टही या न्यायमूर्तींना माहीत नव्हती काय? आणि न्यायमूर्तींचे हे म्हणणे जर खरे मानले तर मग कायद्याचा धाकच व्यर्थ ठरावयाचा. उलट, बहुतेक लोक कायदा निमूटपणे पाळतात, ही गोष्टच पुष्कळांना एकाच वेळी धाकात ठेवतां येते, हे ठरवते.' पण आमचे कोर्ट या साध्या गोष्टींवरून 'उलट' अनुमाने काढीत होते! कारण आम्हांला भरडावयाचे होते ना?

५. ज्याक्सन वधाच्या खटल्याप्रमाणेच आरोपींचे कबुलिजबाब हा त्यानंतरचा मुख्य श्रेष्ठ पुरावा. त्याचे महत्त्व, याही खटल्यांत, कोर्टाला इतकें वाटत होते की, 'त्यांवाचून इतर पुराव्याला काही किंमत नाही. (Without them (confessions) much of the testimony would be deficient in probative force for the purposes of the case. These statements therefore are of the first importance.)' असे हे कोर्टाच म्हणते. आणि आरोपींच्या वकिलानीं हे जबाब खुशीने दिले नसून मारहाणीमुळे, आमिषामुळे, धाकामुळे, जबरदस्तीने पोलिसांनी घेतले, आणि म्हणून ते पुराव्यांत ग्राह्य मानूं नयेत असे परोपरीने सांगितले. ज्या म्याजिस्ट्रेटांनीं - पळशीकर व खोपकर - ते घेतले त्यांच्याबद्दल त्यांच्या उलट तपासणींत बऱ्याच काळ्याबेऱ्या गोष्टी कोर्टापुढेच उघडकीस आल्या. मागे त्याबद्दल लिहीलेले वाचकास आठवत असेलच. तरीही हे त्रिमूर्ति म्हणतात की, ''मॅजिस्ट्रेटांचे वर्तन संशयास्पद नव्हते आणि म्हणून कबुलीजबाब पुराव्याच्या कायद्याप्रमाणे (२४ कलम) ग्राह्य आहेत; आणि पोलिसांच्या वर्तणुकीबद्दल आम्ही आमचे अनुकूल मत पूर्वीचं दर्शविले आहे !' आहे की नाही खासा न्याय?

१३.७ सर्वच बनावट पुरावा

'बुडत्याला काडीचा आधार' या म्हणीप्रमाणे ''स्वातंत्र्यलक्ष्मी की जय' या पत्रावरील किंवा वह्यावरील शब्दांतही या न्यायमूर्तींना आमच्या सशस्त्र क्रांतीचा हेतू दिसला! हास्यास्पदतेची ही शर्थ झाली!

पुरावा पुष्कळसा 'बनावट' होता. याचीं मुख्य कारणे दोन. एकतर आम्ही सर्व सुशिक्षित आरोपी होतो; आणि म्हणून बऱ्याच गोष्टी आम्ही स्वत:च, मागे वर्णिल्याप्रमाणे, पोलिसांना 'बनवण्यासाठी' विपर्यास करून सांगितल्या व पुष्कळशा छपवल्या. माफीच्या किंवा बिनमाफीच्या साक्षीदारीनीं, ते आमचेच असल्याने, पुष्कळसे तेच केले. कारण आम्हांला शेकडो लोकांना वांचवावयाचे होते. शिवाय आमच्या गुप्त मंडळ्यांच्या नियमाप्रमाणे प्रत्येकाला सर्व गोष्टी माहीतच नसत. कोर्टही म्हणते की, ''अभिनव भारताची गुप्तता इतकी परिपूर्ण होती की, पोलिसांना संशय होता तरी, १९०९ मध्ये घडलेल्या ज्याक्सनवधापर्यंत पोलिस काहीही या संस्थेविरुद्ध करू शकले नाहीत.'' बाबा सावरकरांच्या झडतीत जें १७७६ ते १८७६ पर्यंत 'युरोपांतल्या गुप्त मंडळ्यांच्या इतिहासाचे (फ्रॉस्टकृत) पुस्तक सांपडले होते त्यातही ''युरोपांतल्या क्रांतिकारक गुप्त संस्थांचे अलग अलग गट होते; आणि ''त्या घटनेवरून आम्ही आमच्या गुप्त संस्थांचे जाळे बनवले होते.'' असे कोर्टाने लिहीले आहे. सारांश, कोणत्याही सभासदांस सर्व गटांची सर्वच माहिती असणे अशक्यच होते आणि म्हणून अभिनव भारताची व इतर गटांची इत्थंभूत हकीकत सांगणे कोणालाही शक्य नव्हते. आमच्यापैकी काही हुतात्मे फाशी, किंवा अंदमानांत काळ्या पाण्यावर, गेले तरीही त्यांनी, त्यांना माहीत असलेली, सर्व हकीकत कधींच सांगितली नाही. जी सांगितली तीही पुष्कळशी 'बनावट' होती; आणि आधीच आम्ही मुद्दाम 'बनावट' केलेल्या पुराव्याला सबळ करण्यासाठी पोलिसांनी आणखी 'बनवलेला' पुरावा आणला. ते तरी बिचारे काय करणार? कोठून तरी, कसा तरी पुरावा, त्यांच्या वरिष्ठांच्या हुकमाप्रमाणे, आमच्या विरुद्ध आणणें त्यांना भागच होते आमि तो कसा-बसा त्यांनी 'बनवला' आणि एकमेकांशी जुळता करून घेतला. आणि अशा 'दुबार बनावट' पुराव्यावर 'सत्याचा' शिक्का मारून, या खास कोर्टाने आम्हांला 'खासा न्याय' देऊन शिक्षा ठोठावल्या. न्यायाचा फार्स सरकारला करावयाचा होता, आणि तेवढ्यासाठी या खास कोर्टाच्या न्यायाचा देखावा त्याला करणे भाग होते. आणि न्यायकोर्टानेंही, वर सांगितल्याप्रमाणे ''खोटा, घोटाळ्याचा, विपर्यस्त, व बनावट'' पुरावा खरा धरून इंग्रज सरकारवर, आम्हांला शिक्षा ठोठावून, उपकार केले. 'न्याय' आणखी तो काय असतो? असो.

१३.८ खरा पुरावा

अभिनव भारताची खरी माहिती मागेच सांगितली असल्याने, आणि विपर्यस्त संक्षिप्त व बनावट स्वरूपांत थोडीबहुत तीच कोर्टापुढे आली असल्याने, त्याचे पुन्हा येथे वर्णन करीत नाही. आमच्याविरुद्ध खरा पुरावा म्हणजे अभिनव भारताने सशस्त्र क्रांतीच्या पुरस्कारार्थ केलेलीं पदें, पोवाडे व प्रकाशने यांचा, आणि तदनुरोधाने जमवलेल्या शस्त्रास्त्रांचा. प्रसिद्ध केलेल्या वाङ्मयांत, विशेषत: गोविंद कवीच्या 'रणवीण स्वातंत्र्य कोणा मिळेना' या पदाचा, माझिनीच्या प्रस्तावनेचा, आणि Challenge, Oh Martyrs वगैरे विलायतेत प्रसिद्ध करून हिंदुस्थानांत

पाठवलेल्या पत्रकांचा उल्लेख कोर्टाने केला आहे. त्यांत इंग्रज सरकारविरुद्ध सशस्त्रक्रांतीच केली पाहिजे, अर्जविनंत्या शिष्टायांसारख्या शांत सनदशीर मार्गाने ते स्वराज्य देणार नाहीत, असे स्पष्ट सांगितले होते. आणि शस्त्रास्त्रांचा उपयोग व सांठा कशाकरितां असतो हे, या प्रचारकी वाङ्मयाच्या संदर्भाने, न सांगताच कळण्यासारखे आहे. या दोन गोष्टी मुख्य धरून, व तदनुसार विलायतेत हुतात्मा धिंग्राने केलेला कर्झन वायली व लालकाका यांचे वध, आणि नाशिकास झालेला ज्याक्सनचा वध, या गोष्टींवरून, सशस्त्र क्रांतीचा आरोप अभिनव भारताच्या सदस्यांवर सिद्ध होणे हे शक्यच होते. कोर्टाने त्याच मुख्य आधारावर निर्णयाची भिस्त ठेवून इतर बनावट पुरावा त्याला जुळता करून घेण्याचा यत्न केला आहे. आम्ही इंग्रज सरकारविरुद्ध सशस्त्र क्रांतीचा प्रचार आणि प्रयत्न करीत होतो, आणि आम्हांला त्याबद्दल इंग्रज कोर्टाने शिक्षा दिल्या, हे अपेक्षेप्रमाणे ठीकच झाले. क्रांतीचा प्रयत्न तेव्हा यशस्वी झाला असता, निदान आमच्या योजनेप्रमाणे देशभर क्रांतीचा डोंब उसळला असता, आणि मग आम्हांला शिक्षा झाल्या असत्या, तर आम्हांला त्याचे वाईट वाटले नसते. पण इंग्रजांची सद्दी १९१० त संपली नव्हती म्हणून आमच्या प्रयत्नांचा अकालींच गर्भपात झाला; आणि इंग्रजांना ३७ वर्षे, १९४७ पर्यंत, जीवदान मिळाले. पण १९४७ च्या विजयाला या आमच्या यत्नांनी थोडा फार तरी हातभार आम्ही लावला यांतच आम्हांला समाधान आहे. तसे पाहीले तर १८५७ त १० मेला सुरू केलेला स्वातंत्र्य-प्राप्तीच्या युद्धाचा संकल्प १९४७ त पूर्ण झाला. त्या दरम्यानचे सर्वच प्रयत्न, आमच्याप्रमाणेच, अपुरे पडले. पण त्याची सांगता आतां झाली आहे. त्यांतच कृतकार्याचा आनंद आहे, शांति आहे.

मागे सांगितल्याप्रमाणे आम्ही २७ जणांनी, ज्यांच्या विरुद्ध पुरावा कमी होता त्यांना वाचविण्यासाठी, आमच्यावर बऱ्याच गोष्टी ओढवून घेतल्या. म्हणून पूर्वी सांगितलेले ३ आणि खटल्याचे शेवटी ८ असे ११ जण दोषमुक्त ठरवून न्यायकोर्टाने सोडून दिले. सुटलेल्या ८ जणांचीं नावे : १. विनायक काशिनाथ गायधनी, २. रामचंद्र बाबाजी काथे, ३. गोविंद सदाशिव बापट, ५. हरि अनंत थत्ते, ५. शंकर पांडुरंग महाजन, ६. मुकूंद पांडुरंग मोघे (*हे मोघे मागे वर्णिलेले तारमास्तर मोघे नव्हेत. हे कर्व्यांच्या गटापैकी बॉंबस् चे शेल्स करणारे होते. तारमास्तर मोघ्यांना दुर्दैवाने दुर्बुद्धी होऊन लॅमिंग्टन रोड केसमध्ये ते राजसाक्षी झाले!*), ७. केशव गणेश परांजपे, आणि ८. त्र्यंबक विनायक जोग. बाकी आम्हां २७ जणांना जन्मठेपीपासून तो ६ महिने शिक्षेपर्यंतच्या शिक्षा झाल्याचे मागे सांगितलेच आहे.

१३.९ न्यायाची घिसाडघाई

इतर दृष्टीनेही या विशिष्ट न्यायासनाच्या निर्णयाला कोणतीच किंमत देतां येत नाही. त्यांतही विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी व संशयास्पद गोष्ट म्हणजे या एवढ्या ३५ आरोपींच्या विरुद्ध, ६९ दिवस चाललेल्या, खटल्याचा निर्णय, आमच्या बॅरिस्टरीची आमच्या बचावाची भाषणे संपल्यानंतर, २ दिवसांतच घिसाडघाईने देण्यांत आला! पुढे नाताळची सुटी होती म्हणून, इतकी तांतडी करून, हे कोर्ट आमची ब्याद वारून, मुक्त झाले. ७९ टाइप केलेल्या पृष्ठांचा एवढ्या मोठ्या खटल्याचा निर्णय इतक्या त्वरेने ज्या अर्थी देण्यांत आला त्या अर्थी या कोर्टाने आमच्या वकील-बॅरिस्टरांचे म्हणणे कितपत ध्यानांत घेऊन त्यावर विचार केला असेल

याची कल्पना व शंका वाचकाना सहजच येईल. मागे वर्णन केल्याप्रमाणे मानसशास्त्र कोळून प्यायलेल्या या न्यायमूर्तींच्या पूर्वग्रदुष्टतेचा, ही निर्णय देण्यांतली घिसाडघाई, हा एक उत्कृष्ट पुरावाच नाही काय? त्यांच्या निर्णयावर या झटपट कायद्यामुळे अपील होऊं शकत नव्हते, या गोष्टीचा तरी त्यांनी विचार करावयास हवा होता!

१३.१० अस्सल इंग्रजांचे स्वातंत्र्यप्रेम

या शंकास्पद घिसाडघाईमुळे या तीन न्यायमूर्तींच्या निर्णयाला कै. न्यायमूर्ति शहा सारख्यांनी काय किंमत दिली होती, याचा उल्लेख मागे आलाच आहे. या विलक्षण तांतडीमुळे म्हणा, किंवा सरकारचीच पुंगी वाजवावयाच्या स्वभावामुळे म्हणा, या निर्णयांत आमच्यासारख्या फांसावर चढण्यासही तयार झालेल्या तरुणांच्या उदात्त स्वराज्यकाक्षी मनोवृत्ती बद्दल, आमच्या ध्येयाच्या पावित्र्याबद्दल, एक चकार शब्दही नाही! उलट, अलिपूर बॉम्ब केसचा निर्णय देणाऱ्या बीचक्रॉफ्ट या अस्सल इंग्रज न्यायाधिशाला, स्वातंत्र्याचे ध्येय दृष्टीपुढे ठेवून फांसावरही जाण्यास हसत तयार असणाऱ्या तरुणांच्या सद्हेतूबद्दल, अनुकूल उद्गार काढल्यावांचून राहवले नाही. तो म्हणाला की, ''स्वातंत्र्याचे ध्येय दृष्टीपुढे ठेवल्याबद्दल कोणताही अस्सल इंग्रज आक्षेप घेऊं शकणार नाही!'' बंगाली तरुणांनीं व आम्ही योजलेल्या साधनांबद्दल मतभेद असूं शकेल, पण साध्याबद्दल तर तो असण्याचे कारण नाही. पण आमच्या एका काळीं देशभक्त मानल्या गेलेल्या चंदावरकर न्यायमूर्तीला हेही निर्णयांत लिहिण्याचे धैर्य झाले नाही. स्वातंत्र्याबद्दलचे मुसमुसणारें प्रेम जें बीचक्रॉफ्ट इंग्रज दाखवूं शकतो ते या त्रिमूर्तींपैकी २ इंग्रज न्यायाधिशांनी, व चंदावरकरासारख्या हिंदी गृहस्थानेही, दाखवले नाही! यावरून या न्यायाधिशांच्या मनोवृत्तीवर लख्ख प्रकाश पडतो. स्वातंत्र्याच्या ध्येयाबद्दलचे उदात्त मनोधैर्य व्यक्त करणे हे तर राहूंच द्या, पण या निर्णयाच्या प्रसिद्धीने, कधीकाळीं, पुढच्या हिंदी तरुणांना आमच्या देशभक्तीची कल्पना येईल, आणि ते आम्हांला कदाचित धन्यवाद देतील, याची या न्यायधिशांना भीती व काळजी वाटून, त्यांनी हा निवाडा प्रसिद्धही होऊं दिला नाही! यावरूनच त्यांच्या मानसिक दौर्बल्याची आणि बौद्धिक अध:पतनाची यथार्थ कल्पना येते. पण हे असे अध:पातकीच दुर्दैवाने आमच्या वांट्याला आले होते!

१४ परिशिष्ट तिसरे - कोल्हापूर बॉम्ब केस

लेखक : श्री. नानासाहेब गोखले

१४.१ लो. टिळक व गंगाधरराव देशपांडे यांचे क्रांतिकारकाशी संबंध

महाराष्ट्रात छत्रपति श्रीशिवाजी महाराज यांचा उत्सव सुरू करण्याची कल्पना कै. लोकमान्य टिळक यांनी काढतांच तिचा पुरस्कार करून ती कोल्हापुरात रूढ करण्यासाठी श्री. हणमंतराव कुलकर्णी मुरकीभावीकर यांनी श्रीशिवाजी क्लब या नावाची संस्था स्थापन केली, व काही तरुण सहकाऱ्यांच्या साहाय्याने कोल्हापुरात पहिला श्रीशिवजयंत्युत्सव साजरा केला. या समारंभाचे अपूर्व यश पाहून कोल्हापुरातील बऱ्याच तरुणांना स्फूर्ति मिळाली आणि ते शिवाजी क्लबचे सभासद झाले. राष्ट्रीय व ऐतिहासिक पुढाऱ्यांचे उत्सव वेळोवेळी साजरे करणे, कथा-कीर्तन-प्रवचन-पुराणांच्या साहाय्याने जनतेला राष्ट्रीय शिक्षण देणे, हे उद्देश संस्थेने जाहीर केले असले तरी पारतंत्र्यांतून मुक्त होण्यासाठी तरुणांच्या मनांत चेतना उत्पन्न करण्याचे कार्य क्लबच्या बैठकीतून सदैव चालू असे. या सर्व चळवळींचे कर्तेपण श्री. कुलकर्णी यांच्याकडे असून त्यांना श्री. झुंजारराव घाटगे, श्री. रं. वि. व का. वि. खानविलकर, अनंतराव लेले (गुरुजी), दामोदर जोशी, दामू सोनार, वामन आपटे, मणी करंदीकर वगैरे लोकांचे साहाय्य होते. संस्थेला काहीतरी दैनंदिन कार्यक्रम असावा, व त्यायोगे सभासदांत शिस्त संघटना निर्माण व्हावी, म्हणून संस्थेने नित्यशः काठी, बोथाटी, दांडपट्टा व कवायत इत्यादींचे शिक्षण सुरू केले. संस्थेच्या कार्याची प्रगती श्री. हणमंतराव कुलकर्णी वेळोवेळी पुण्यास लोकमान्यांना समक्ष कळवीत असत. वरचेवर जाण्या-येण्यामुळे श्री. कुलकर्णी यांच्या अंगची तडफ लोकमान्यांनी जाणली व त्यांचे बोलणेचालणे होऊन हणमंतरावांनीं संस्थेची सूत्रें आपल्या सहकाऱ्यांच्या हाती देऊन कोल्हापूर सोडले.

१४.२ सशस्त्र क्रांतीची पूर्वतयारी

छत्रपतीनीं स्वराज्यप्राप्तीसाठी जी प्राथमिक तयारी केली, तशी तयारी संस्थेच्या सभासदांनी करावी असा प्रचार सभासदांत सुरू झाला, व त्याचे पर्यवसान डाके घालण्यांत झाले. या प्रकरणीं दामोदर जोशी, प्रसादे, वामन आपटे, मणी, करंदीकर वगैरे सभासदांना कारावास पत्करावा लागला. तरी पण संस्थेचे कार्य बंद पडले नाही. यांच्या जागी नवे सभासद आले. त्यांनी केवळ उत्सवाचे ध्येय दृष्टीसमोर ठेवून छत्रपतीचा उत्सव सुरू ठेवला. ही मंडळी चिकित्सक, सुविद्य, संयमी व कालमान ओळखून व कायद्याच्या मर्यादा जाणून, वागणारी असल्याने उत्सव-समारंभात विघ्ने उत्पन्न झाली नाहीत. मर्यादित स्वरूपाच्या साप्ताहिक सभांमधून राजकारणाचे पाठ देण्याची प्रथाही त्यांनी तशीच नेटाने चालू ठेवली. त्यावेळी श्री. दा. वि. गोखले, (केसरीचे उपसंपादक), गंगाधर नेने, (पुढे डॉ. आतां कै.) गो. स. पळसुले, श्री. द. नागपूरकर, गोविंद गोखले वगैरे मंडळींच्या हाती संस्थेची सूत्रें काही काळ होती. सुमारे दहा वर्षेपर्यंत ही संस्था निरनिराळ्या लोकानीं चालविली. मध्यंतरी वंगभंगाची चळवळ आली व स्वदेशी-बहीष्काराची लाट उसळली. लोकमान्यांच्या चतु:सूत्रींचा उच्चार विद्यार्थीवर्गांत होऊं

लागला. तशांत (आतां कै.) श्री. स. खं. अळतेकर, दिगवडेकर प्रभृति वकील मंडळींनीं कोल्हापुरीत लोकप्रतिनिधि-सभेची उठावणी केली. ब्राह्मणब्राह्मणेतर वादाचे मूळ वेदोक्त प्रकरण उद्भवले. त्यानंतर लौकरच लोकमान्यांना शिक्षा झाली. या सर्व गोष्टींचे पडसाद तरुण तडफदार विद्यार्थ्यांच्या मनांत उमटत होते.

बंगालमधील क्रांतिकारकांनी मुझफरपूर येथे पहिला बॉम्ब उडविला त्याचाही परिणाम कोल्हापुरीतील क्रांतिकारक प्रवृत्ती वर झाला. शिवाजीक्लबमधून बाहेर पडलेले श्री. दामोदर जोशी यांनी या प्रक्षुब्ध वातावरणाचा फायदा घेऊन काही विद्यार्थ्यांना आपले मनोगत सांगितले. दामोदर जोशी हे गृहस्थ साहसी, कारस्थानी व तडफदार वृत्तीचे, पण अबोल कार्यकर्ते होते. लोकमान्यांनीं नेपाळांत श्री. कुलकर्णी मुरकीभावीकर व कै. कृ. प्र. खाडिलकर यांच्यामार्फत जे उद्योग सुरू केले होते त्यांत दामुअण्णा होते. ते बंगाल, बिहार, उत्तर हिंदुस्थान वगैरे ठिकाणी हिंडून आले होते. बंगालच्या फाळणीची चळवळ जशी महाराष्ट्रातील नेत्यांनी उचलून धरली, तशीच तेथील ‘अनुशीलन समिती’चे दहशतवादी धोरण महाराष्ट्रातील तरुणांनी आत्मसात करावे, त्यासाठी घरादारांचीं, आतेष्टांची, प्रसंगी प्राणाचीही, पर्वा न करतां देशासाठी बलिदान करावे, या उद्देशाने कोल्हापूर व पुणे या ठिकाणी संघटना निर्माण कराव्या म्हणून दामोदर जोशीने खूप खटपट केली व त्यांत त्यांना यशही आले. या संघटनेतूनच कोल्हापूरचा बॉम्ब-खटला निर्माण झाला.

१४.३ घटनेचे सुसंघटित कार्य

पुण्यास रा. गोविंद पांडुरंग बापट या नावाचे अतिशय हुशार, धोरणी व दहशतवादी प्रवृत्तीचे एक विद्यार्थी होते. त्यांनी महत्प्रयासाने बॉम्ब तयार करण्याची विद्या हस्तगत केली होती. दामोदर जोशीची व त्यांची योगायोगाने गांठ पडली; व मोठ्या प्रमाणावर बॉम्बची निर्मिती करून त्यांचा प्रसार महाराष्ट्र, कर्नाटकमध्ये करण्याचे ठरले. कोल्हापुरासही याची शाखा काढून तेथेही हळूहळू बॉम्बचा कारखाना उघडण्याचे उद्योग सुरू झाले. कोल्हापुराहून पुण्यास निरनिराळ्या शाळा-कॉलेजांत जे विद्यार्थी आले त्यांच्या अंत:करणांत क्रांतीची ज्योत पेटवण्यांत श्री. नागपूरकर यांनी पुढाकार घेतला. लोकमान्य टिळकांना सरकारने सहा वर्षे काळेपाण्याची शिक्षा दिल्यामुळे क्रांतिकारकाचा नुसता जळफळाट सुरू होता. ही सारी मंडळी वेळोवेळी निरनिराळ्या ठिकाणी रात्री-बेरात्री एकत्र येत व आवेशयुक्त भाषणे करीत व बेलभंडार उचलून शपथा घेत असत. बंदुक व पिस्तुल कसे हाताळावें याचे शिक्षणही त्यांना हळूहळूं मिळूं लागले. पुण्यांतील सुप्रसिद्ध कार्यकर्ते श्री. भाऊसाहेब गोखले, कै. वासूकाका जोशी प्रभृति मंडळी या संघटनेची आस्थेने चौकशी करीत. एवढेंच नव्हे तर त्यांना अडल्या-पडल्यास द्रव्यसाहाय्यही देत असत. श्री. भाऊसाहेब गोखले हे तर असल्या प्रवृत्तीच्या लोकांचे मोठें आश्रयस्थान होते. स्वतः झीज सोसून, पोलिसाच्या वक्रदृष्टीची पर्वा न करता, भाऊसाहेब सर्वांना जेवूं-खावूं घालीत, व त्यांच्या प्रवासखर्चाची व्यवस्था करीत. लोकमान्यांना शिक्षा होण्यापूर्वी, होतीलाल वर्मा नावाच्या एका बड्या क्रांतिकारकाची ओळख त्यांनी कोल्हापूर-संघटनेच्या सभासदांशी करून दिली होती. पुण्यास चालू असलेल्या पिकेटिंगच्या कार्यात भाग घेण्यासाठी या संघटनेतील विद्यार्थी त्यांच्याकडे गेले असतां त्यांनी स्वच्छ बजावले की, ‘‘यापेक्षां मोठी कामे तुम्ही

शिरावर घेतली आहेत. तिकडेच सर्व लक्ष केंद्रित करा. पिकेटिंग हे तात्पुरते असून त्यासाठी भरपूर मंडळी मिळतील.'' हा प्रोत्साहनपर आशीर्वाद समजून श्री. बापट यांनी बॉम्बनिर्मितीचे कार्य धडाक्याने सुरू केले.

१४.४ पुण्याचा बॉम्बचा कारखाना

पुण्यास शनवार पेठेंत, आपटे घाटावर, आपटे यांच्या वाड्यांतील मागील बाजूच्या तिसऱ्या मजल्यावर गंगाधर गोखले, विष्णु काटदरे, राजोपाध्ये वगैरे विद्यार्थी रहात होते. हे सर्वजण सायन्स कॉलेजमध्ये इंजिनिअरिंग शिकणारे होते. यांची एका बाजूची एकान्तवासाची खोली बापटांनी बॉम्बगोळ्याच्या निर्मितीसाठी पसंत केली. त्याच पेठेंत राहणारे व न्यू स्कूलमध्ये शिक्षकाचे काम करीत असलेले श्री. नागपूरकर, हे बापटांना मधूनमधून साहाय्य करीत असत. याशिवाय गंगाधर गोखले यांचे स्नेही श्री. ग. रा. वाशीकर (मेडिकल स्कूल) हेही रात्री-बेरात्री येऊन मदत करीत. श्री. बापटांनी प्रयोग करावेत व श्री. गोखले यांनी त्या प्रयोगाप्रमाणे नायट्रो-ग्लिसरिन, गन कॉटन वगैरे ज्वालाग्राही पदार्थ सावधानतेने तयार करावे; नागपूरकर, गद्रे यांनी बॉम्बची प्रस्फोटकता अजमावून पहावी; शेवटी श्री. बापट यांनी (इग्निशन) ज्वलनशील वात तयार करून बॉम्ब सिद्ध करावे. हे सारे बॉम्ब नाशिकला मिळणाऱ्या पितळी फिरकीच्या तांब्यांत केले होते.

पुण्यास बॉम्बची निर्मिति होत आहे, हे ऐकून कोल्हापूरच्या काही विद्यार्थ्यांनीं, तेथील प्रायव्हेट हायस्कूलमधील रसायने व उपकरणे चोरून, दामोदर जोशी याच्या स्वाधीन केली. पण दामोदर जोशी यांना तेवढ्या सामुग्रींत बॉम्ब तयार करतां आले नाहीत. म्हणून त्यांनी पुण्याहून कोल्हापूरास बॉम्ब पाठविण्याविषयीं तातडीचे निरोप पाठविले. तेव्हा गंगाधर गोखलेने एका ट्रंकेत आठ-दहा बॉम्ब घालून ती ट्रंक रातोरात पुण्याहून कोल्हापुरास नेली व ते बॉम्ब व इग्निशन्स दामोदर जोशी यांच्याकडे दिले. कोल्हापुरास एका समारंभानिमित्त पुष्कळ साहेब जमणार होते. त्यावेळी त्या बॉम्बचा उपयोग करण्याचे दामोदर जोशीने योजिले होते. पण, का ते कोण जाणे, तो योग साधला नाही. दामोदर जोशी यांनी परशुराम सुतार, पाडळकर, वडणगेकर, शेणोलीकर, अंबपकर, पाध्ये वगैरे मंडळींना क्रांतीची दीक्षा दिली होती. गंगाधर गोखले हा मधूनमधून कोल्हापुरास जाऊन पुण्यांतील हालचालींची माहिती या मंडळींना देत असे. एके दिवशी पुण्यास आपटे यांच्या वाड्यांत, गोखले यांच्या खोलीत, संध्याकाळीं ज्वालाग्राही पदार्थांची परीक्षा चालू असतां, अकस्मात जंगी स्फोट झाला व त्या धडाक्याने वळचणीचे छप्पर ढासळले. सुदैव हे की, त्यामुळे कोणासही इजा झाली नाही. पण थोड्याच वेळांत तिथे पोलीस आले. पोलीस येणार हे अगाऊ हेरून बापट व गोखले प्रभृतींनी दोनतीन भुईनळे टाकोटाक आणून, त्यावर जाड रीजण ठेवून, ते पेटवले व रीजणाचे तुकडे इतस्ततः पसरून ठेवले. भुइनळे उडवण्याची गंमत करीत असतां, रीजण छपराला लागला व छपर पडले, अशी बतावणी पोलीसांपुढे सर्वांनी केली, व ते प्रकरण तिथेच जिरलेसे वाटले. पण तेव्हापासून गुप्त पोलिसांचा पहारा या मंडळींच्या मागे सुरू झाला. पोलिसांनीं छडा लावून कोल्हापुरास दामू जोशी यांच्यावरही पाळत ठेवली व अखेर काही तरी निमित्त ठेवून, प्रथम दामू जोशी व नंतर त्यांचे सहकारी, यांना अटक करण्यात आली. ही बातमी ताबडतोब पुण्यांतील मंडळींना

कळविण्यांत आली. मुंबईस श्री. दा. वि गोखले यांनाही ही वार्ता कळतांच ते पुण्यास आले. बापट, गोखले, गद्रे, नागपूरकर यांच्याशी खलबत करून बॉम्ब तयार करण्याचे सारे साहित्य नाहीसे केले, व पोलिसांना काहीही मुद्देमाल मिळू नये, अशी व्यवस्था करून ते लगेच मुंबईस गेले. दुसऱ्याच दिवशी गद्रे, गोखले व बापट यांना पुण्यास अटक झाली.

१४.५ कोल्हापुरास प्रयाण

त्याच रात्री फरासखान्यांत फौजदार रामा पांडू, कामटे, सदावर्ते, अळवणे वगैरे मंडळींनीं तीनही आरोपींना खूप सतावले व मारहाण केली. दोन-तीन दिवसांनी जबाबासाठी म्याजिस्ट्रेट कारव्हालो यांच्यासमोर उभे केले. पण काहीच निष्पन्न होईना, म्हणून सर्वांना कोल्हापुरास पोलीस बंदोबस्तांत रवाना केले. तेथे गावाबाहेर कावळ्यांच्या बंगल्यांत दामू जोशी प्रभृतींना ठेवले होते. तिथेच, पण पृथकपणे, त्रिवर्गांना कोंडण्यांत आले. तेथेही पुनः 'पोलीस-तपास' सुरू झाला. 'समजुती'साठी एकेकाला नेऊन खूप समजूत देण्यांत आली. पण जेवढे पोलिसांनीं धरले त्या व्यतिरिक्त इतरांचीं नावे सांगायचीं नाहीत हे सर्वांनीं ठरविले असल्याने फक्त दहा मंडळींशिवाय इतरांना कसलाच त्रास झाला नाही. या सर्व उद्योगासाठी पुण्यास पैसा कुणी पुरवला, कुणी इतर साहाय्य केले, पुढारी मंडळींचा यांत किती हात होता वगैरे बाबत गोखले याला पोलिसांनी फारच छेडले. पण इतरांना यांत गोवावयाचे नाही, या निर्धाराने गोखलेने कसलाच थांगपत्ता लागूं दिला नाही. कोल्हापूर-पोलिसांच्या मदतीला इंग्रजी पोलीस आले. त्यांनीही बरेच उलटसुलट प्रश्न विचारलेच पण सर्वांचीं एक ठशाचीं उत्तरे आल्यामुळे अखेर दहा जणांवरच खटले भरण्यांत आले. या कटाचे एकंदर तीन भाग करण्यात येऊन तीन खटले कोर्टांत सुरू झाले. रीतसर साक्षीपुरावे होऊन तीनही खटले सेशन कमिट करण्यात आले. हे खटले चालविण्यासाठी कोल्हापूर-दरबारने इंग्रजीतील सेशनजज्ज सी. ए. किंकेड यांची नेमणूक केली. सरकारतर्फे बॅ. बिनिंग व पुण्याचे देशमुख वकील यांची निवड झाली. आरोपीतर्फे बॅ. बॅप्टिस्टा, काका पाटील इत्यादी वकील मंडळी आली. रासायनिक द्रव्यांची चोरी, अनधिकृतपणे ज्वालाग्राही पदार्थ व हत्यारें जवळ बाळगणे, व प्रस्फोटक बॉम्ब तयार करून ते ठिकठिकाणी पाठविणे, वगैरे आरोप या मंडळीवर ठेवण्यांत आले. गोविंद पाटोळे नावाचा, पाध्ये व शेणोलीकर यांचा एक स्नेही, माफीचा साक्षीदार म्हणून पुढे आणण्यांत आला. शेवटी सर्व खटल्याचा निकाल होऊन श्री. बापट यांना सात वर्षे, गोखले याला सहा वर्षे व तीन महीने, शेणोलीकर अंबपकर यांना पांच वर्षे, पाध्ये व सुतार नऊ महीने, पाडळकर, वडणगेकर यांना एक वर्ष, अशा सक्त मजुरीच्या शिक्षा देण्यांत आल्या. दामोदर जोशी व गद्रे यांना, भरपूर पुरावाच्या अभावी, मुक्त करण्यात आले. दामोदर जोशी व गद्रे यांना पुनः पकडण्यासाठी पोलिसांची धांवाधांव सुरू झाली. तेवढ्यांत गद्रे निसटला, व दामू जोशी सांपडला. दुसरा गुन्हा शोधून त्याला पुनः अटक करण्यात आली.

१४.६ टिळकांविरुद्ध छत्रपतींचे कारस्थान

या सर्व मंडळींनीं काही महीने कोल्हापूर सेंट्रल जेलमध्ये काढल्यावर, बापट यांना साबरमती, गोखले यांना धुळे, शेणोलीकर व अंबपकर यांना येरवडा येथील तुरुंगांत पाठवण्यांत

आले. कोल्हापूर केसमध्ये उल्लेखिलेल्या बॉब्सची निर्मिति पुण्यास झाली असतां, त्यांतील काही विद्यार्थी कोल्हापूरचे होते, येवढ्यासाठी, कै. छत्रपति शाहू महाराजांनीं हा खटला कोल्हापुरास चालावा म्हणून इंग्रज सरकारकडे खूप गळ घातली. बरेचसे सव्यापसव्य प्रयोग केले, आणि खटला कोल्हापुरात चालविण्याची संमति मिळवली. पुण्याचे लो. टिळक, कर्नाटकचे गंगाधरराव देशपांडे प्रभृती मंडळींचे, व त्यांच्या जहाल पक्षाचे, पाठबळ या बॉम्ब प्रकरणीं होते, ही गोष्ट महाराजांना सिद्ध करावयाची होती. ब्रिटिश सरकारचे राज्य उलथून पाडण्याचा कट माझ्या प्रयत्नांने उघडकीस आला, अशी फुशारकीही मिरवावयाची होती. पण या कटातील लोकानीं, पोलिसांच्या नजरेंतून जे निसटले त्यांचीं नावे तशीच गुलदस्तांत ठेवण्याचे ठरविल्यामुळे महाराजांना भारीच रुखरुख लागून राहीली. पुढारी मंडळींचीं नावे आरोपींनी घ्यावींत म्हणून त्यांना मारहाण तर झालीच, पण शेवटी सुटकेचीं अभिवचने खुद्द महाराजांनी दिली; नोकरीचीं व बक्षिसांचीही आमिषे दाखविलीं; पण त्यांचा काहीही उपयोग न झाल्यामुळे पुनः दामू जोशीवर खटला भरून त्यांत इतरांना पकडावें हा डाव रचण्यांत आला.

१४.७बॉब्स कुठे गेले ?

पुण्याहून जे बॉब्स गोखले यांनी कोल्हापुरास दामूकडे पोचविले त्याचे काय झाले याचा तपास पुढे पोलिसांना लागला. त्यांपैकी काही बॉब्स बेळगांवास श्री. गंगाधरराव देशपांडे यांच्याकडे गेल्याचे समजल्यावरून त्यांनी देशपांडे यांच्यावर पाळत ठेवली. श्री. हणमंतराव देशपांडे यांच्याकडे ते पोचविल्याचे दामूकडून कळतांच श्री. हणमंतराव यांना पकडण्यांत आले, पण प्रत्यक्ष बॉम्ब हाती आले नाहीत. परंतु ज्या पितळी तांब्यांत बॉम्ब केले जात असत, तसला एक तांब्या त्यांच्या घरी सापडला व तेवढ्यावरच त्यांच्यावर खटला भरण्यांत आला; पण लहानशा दंडावरच त्यांची सुटका झाली.

१४.८ गंगाधरराव मोकळेच राहीले!

ज्यांच्यासाठी दामूला पुन्हां पकडले ते गंगाधरराव याही खटल्यांत गुंतले गेले नाहीत, म्हणून छत्रपतींनीं एक नवीनच कारस्थान आरंभले. कोल्हापूरचे श्री. गणपतराव मोडक हे मुंबईच्या 'राष्ट्रमत' पत्रांत काम करीत असत. श्री. गंगाधररावांचा व मोडकांचा तिथे परिचय झाला होता. (तत्पूर्वीही कोल्हापूरच्या पोलिटिकल एजंटाला ठार मारण्यासाठी दामूला मोडकांनीं प्रोत्साहन दिले, ही गोष्ट गंगाधररावांना माहीत होती). कोल्हापूरच्या छत्रपतींनी मुंबईस मोडकांची भेट घेऊन त्यांनी कोल्हापुरास यावे, त्यांच्या केसालाही धक्का लागणार नाही, असे अभिवचन दिले. त्यावर विसंबून मोडक कोल्हापूर स्टेशनवर उतरताक्षणीच त्यांना अटक करण्यात आली! त्यांच्या नावाचा उपयोग करून, श्री. गंगाधररावांना जाळ्यांत ओढण्याचे प्रयत्न महाराज व त्यांचे हस्तक फर्नांडिस यांनी सुरू केले. कोल्हापूरचे एक रहवासी व संस्थानी नोकर श्री. शाळिग्राम यांच्याजवळ बॉम्बची कृति छापलेले एक पुस्तक महाराजांनीं दिले. ते पुस्तक मोडकांनीं पाठविले अशी बतावणी करण्यास सांगून, शाळिग्राम यांना बेळगांवास श्री. गंगाधरराव यांच्याकडे धाडण्यांत आले. श्री. गंगाधरराव यांना गोत्यांत आणण्याचे असले काही यत्न सुरू झाले आहेत, ही कुणकुण कोल्हापुरास, फौजदारीच्या हुद्दयावर असलेल्या, श्री. म्हैसकर यांना

लागली. त्यांनी गोडबोले नावाच्या माणसाहाती निरोप पाठवून गंगाधररावांना सावध केले. ठरल्याप्रमाणे शाळिग्राम पुस्तकासह गंगाधररावांच्याकडे आले, व, मोडकांच्या नावाचा उपयोग करून, पुस्तक सुरक्षित जागी ठेवण्यास सांगितले. ''उद्या या, मी योग्य जागा शोधून ठेवतो' असे सांगून गंगाधररावांनीं त्याला वाटेला लावले, व घडलेली हकीकत तेथील कलेक्टर ब्रँडन यांना कळविली. गंगाधररावांच्या सांगण्याची शहानिशा करण्यासाठी, कलेक्टरसाहेबांनी शाळिग्राम यांना अटक करतांच त्यांनी सत्य हकीकत सांगितली, व पुस्तक परत पोस्टाने महाराजांकडे पाठविण्याचे कबूल केले. कलेक्टरनी कोल्हापूर पोस्ट मास्तरला कळवून, पुस्तकाचे पार्सल तसेच ठेवण्यास सांगून, दुसऱ्या दिवशी ते पुस्तक मिळविले, व घडलेली हकीकत मुंबई सरकारला कळवली. खुद्द छत्रपतीच याच्या मुळाशी असल्याने सरकारने ते प्रकरण धसास लावले नाही.

१४.९ पुन: गंडांतर

याही सांपळ्यांतून गंगाधरराव निसटले, हे पाहून छत्रपतींनी, फेरिसचा खून करण्याच्या कटांत, गंगाधररावांना पुनः पकडण्याचा यत्न झाला. परंतु गंगाधररावांनीं गाडगिळांच्याच घरीं आपला हेर पाठवून त्याचा सर्व गुप्त पत्रव्यवहार पळवून आणला, व तोही कलेक्टरपुढे ठेवला. यानंतर बडे पोलिस अंमलदार गायडर गंगाधररावांना भेटले व त्यांनी त्यांना सुरक्षिततेची हमी देऊन निर्भय केले. गंगाधररावांनी छत्रपतींच्या डावावर डाव करण्यात यश मिळविले, त्याचे पुष्कळसे श्रेय त्यांचे स्नेही व शिष्य कै. गोविंदराव याळगी यांनाच आहे. श्री. याळगी हेही स्वभावतःच क्रांतिकारक होते व त्यांचा कोल्हापूरच्या क्रांतिकारकांना आधार होता. पोलिटिकल एजंट कर्नल फेरिस यांना मारण्यासाठी दामूने जें पिस्तूल वापरले ते बेळगांवांतून नेले होते.

१४.१० कर्नल फेरिस वांचले

कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट कोणत्या गाडीने पुण्यास जाणार याची माहिती मिळवून दामू जोशी त्या गाडीने पुण्यास गेला. आळंदी ते घोरपडी या दोन स्टेशनांच्या दरम्यान, दिवस मावळून अंधार झाल्यावर, पिस्तुल झाडायचे असे ठरले होते. पण फेरिस साहेबांच्या सुदैवाने ऐनवेळी पिस्तूल उडाले नाही. या सर्व प्रकरणांच्या चौकशीसाठी खुद्द स्कॉटलंड यार्डचे हुशार अधिकारी वॉलिंजर यांनी कोल्हापुरास तळ दिला; परंतु छत्रपतींना हवे असलेले पुढारी व चळवळे यांना या कटांत गोवणे अशक्य झाले. उलट गायडर व वॉलिंजर यांनी छत्रपतींनाच दोष दिला, असे ऐकिवांत आहे.

दामू जोशी व त्याचे १-२ सहकारी यांना ज्या ठिकाणी अटकेत ठेवले होते, त्याच्या नजिकच कोल्हापूर जनतेकडून काढून घेतलेलीं पिस्तुले व बंदुका होत्या. त्या मिळविण्यासाठी दामूने त्या इमारतीला आग लावून दिली व त्याच आरोपावरून त्याला शिक्षा ठोठावण्यांत आली. नंतर कारागृहातून दामू शिताफीने निसटला. वऱ्हाडांत त्याने मोटारींचा व्यापर सुरू केला; व शेवटी ७-८ वर्षांनंतर तो पुनः पकडला वगैरे वृत्तान्त बराच रोमहर्षक असला तरी, त्याचा कोल्हापूर-कटाशी काहीही संबंध नसल्याने, तो येथे लिहीणे अप्रस्तुत होईल.

१४.११ कोल्हापूर-कटाचे धागेदोरे

कोल्हापूर-कटांत थोडीच मंडळी सामील असली तरी त्यांचे संबंध वऱ्हाडपासून बेळगांवपर्यंत होते. गंगाधरराव, वासूकाका जोशी, बाबूराव गोखले वगैरे मोठी मंडळी जरी प्रत्यक्ष कटांत वावरत नव्हती तरी अडचणीच्या वेळी त्यांचा सल्ला व साहाय्य घेण्यांत येत होते. पोलिसांच्या मारहाणीला भिऊन, किंवा आमिषांना लालचावून, कोणीही अवाक्षर काढायचे नाही, अशा शपथा कटवाल्यांनीं घेतल्या असल्याने, या खटल्यांत दहापेक्षां अधिकांना गोवणे पोलिसांना अशक्य झाले. येवढेच नव्हे तर माहिती मिळून सुद्धां पुरावा उपलब्ध न झाल्याने पुष्कळ मंडळी तशीच सहीसलामत राहीली. श्री. गद्रे हे त्या वेळी जे निसटले ते अद्याप सापडले नाहीत; तरीपण त्यांचा योगक्षेम ठीक चालला आहे. लो. टिळक मंडालेहून परत आल्यावर त्यांना जेव्हा ही हकीकत समजली त्यावेळी त्यांनी सुटून आलेल्या तरुणांची पाठ थोपटली. त्यांच्या प्रोत्साहनपर आशीर्वादावरच आज हयात असलेली मंडळी समाधानांत आहेत, व अद्यापही ती टिळक-तत्त्वांशी एकनिष्ठ राहीली आहेत.

***